

# शुद्र पुर्वी कोण होते?

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

शूद्र पूर्वी कोण होते?


लेखक : डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

अनुवाद : चांगदेव भवानराव खैरमोडे

प्रकाशक : प्रबुद्धभारत पुस्तकालय
आणि प्रकाशन व्यवसाय
१८१/बी, बाळाभाऊ पेठ,
महात्माफुले शाळेजवळ, वैशालीनगर रोड,
कमाल चौक, नागपूर-१७
दुरध्वनी क्र. ०७१२-६५४० ६५४
मो.क्र. : ०९८५०३३२२९६

संगणक : मिरा काम्प्युटर
नागपूर

मुद्रण : श्रीसमर्थ ऑफसेट
नागपूर

मुखपृष्ठ : सोनु ग्राफीक
नागपूर

प्रकाशन तिथी : २४ ऑक्टोबर २०१२

मूल्य ₹ : १००/-




डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# अनुक्रमणिका


■ प्रस्तावना पाच

प्रकरण १ ले

■ शूद्रांचा कूटप्रश्न १९

प्रकरण २ रे

■ शूद्रांच्या उत्पत्तीबद्दलचा ब्राह्मण ग्रंथांतील सिद्धांत ३७

प्रकरण ३ रे

■ शूद्रांचा दर्जा कोणता, याबद्दलचे ब्राह्मणग्रंथांतील प्रमेय ४३

प्रकरण ४ थे

■ शूद्र आणि आर्य यांचा झगडा ६५

प्रकरण ५ वे

■ आर्यांचा परस्परांतील झगडा ८७

प्रकरण ६ वे

■ शूद्र आणि दास १०६

प्रकरण ७ वे

■ शूद्र पूर्वी क्षत्रिय होते ! १२०

प्रकरण ८ वे

■ वर्णांची संख्या तीन की चार? १४१

प्रकरण ९ वे

■ ब्राह्मण व शूद्र यांचा झगडा १४९

प्रकरण १० वे

■ ब्राह्मणांनी शूद्रांना अधोगतीस कसे नेले? १७१

प्रकरण ११ वे

■ समेटाची हकीगत २०६

प्रकरण १२ वे

■ सिद्धांताची कसोटी २२५

■ संदर्भ सूची २३१

# प्रस्तावना

शूद्रांच्या एकंदर परिस्थितीसंबधी जे वाङ्मय अस्तित्वात आहे त्या वाङ्मयाची सद्य:स्थिती लक्षात घेतली तर या विषयावर आणखी एक पुस्तक प्रसिद्ध केले तर, हे पुस्तक अनाठायी आहे असे मानता येणार नाही; किंवा ते पुस्तक एका उपेक्षणीय प्रश्नाचा खल करीत आहे असेही म्हणता येणार नाही. हिन्दी-आर्य लोकांची सामाजिक संघटना चातुर्वर्ण्याच्या सिद्धांतावर उभारलेली होती आणि चातुर्वर्ण्य म्हणजे ब्राह्मण लोक (पुरोहित), क्षत्रिय लोक (लढवय्ये), वैश्य लोक (व्यापारी) आणि शूद्र लोक (हातकाम करणारे) अशा चार वर्गांमध्ये केलेली समाजाची विभागणी होय असे सर्वसाधारण रूढ मत आहे. परंतु शूद्रांच्या प्रश्नांचे खरे स्वरूप काय आहे किंवा त्याचा विस्तार केवढा आहे, याबद्दलची कल्पना त्या मतावरून येत नाही. समाजाची विभागणी चार वर्गात करण्याशिवाय चातुर्वर्ण्याला दुसरे काही साधावयाचे नसते. तर चातुर्वर्ण्य हे एक फार निरुपद्रवी तत्त्व आहे असे मानण्यात आले असते. दुर्दैवाने याच्यापेक्षा निराळा कावा चातुर्वर्ण्याच्या सिद्धांतात आहे. या सिद्धांताने समाजात भेदभाव उत्पन्न केला आणि चार वर्णांनी सामाजिक व्यवहारात परस्परांशी कसे वागावयाचे याची रूपरेषा त्या सिद्धांताने विषमतेच्या तत्त्वानुसार आखून ठेवली. त्याचप्रमाणे, उच्चनीच भावनेच्या आधारावर उभारलेली विषमतेची पद्धत केवळ काल्पनिक स्वरूपाची नाही. तिच्यावर कायदेशीरपणाचा शिक्कामोर्तब केलेला आहे; त्या पद्धतीबरहुकूम एखाद्याने वर्तन केले नाही तर तो शिक्षेस पात्र होतो. असे मूर्त स्वरूप चातुर्वर्ण्याने त्या पद्धतीला दिलेले आहे. चातुर्वर्ण्याने शूद्राला उच्चनीचपणाच्या शिडीच्या अगदी खालच्या पायरीवर ठेवलेले आहे, एवढेच नव्हे तर चातुर्वर्ण्याने त्याच्यावर असंख्य अपमानास्पद अटी व अपात्रतादर्शक बंधने लादली व यामुळे शूद्राला जे नीच स्थान सामाजिक कायद्याने देण्यात आलेले आहे. त्या स्थानापासून वरच्या स्थानाकडे जाण्याला त्याला सक्त मनाई करण्यात आलेली आहे. खरे पाहून गेले तर, हिंदू समाजात अस्पृश्यांचा पाचवा वर्ण उत्पन्न होईपर्यंत शूद्र म्हणजे नीचातला नीच माणूस असे हिंदूंना वाटत होते. शूद्रांच्या प्रश्नाचे स्वरूप कसे आहे याची यावरून कल्पना येते. हा प्रश्न किती महत्त्वाचा आहे याबद्दल लोकांना कल्पना नाही. याचे कारण हे की, शूद्रांची संख्या किती आहे हे समजून घेण्याची त्यांनी कधी पर्वा केली नाही. दुर्दैवाने, शिरगणतीच्या (सेन्सस रिपोर्ट) अहवालामध्ये त्यांची संख्या स्वतंत्रपणे निराळी दाखविलेली नाही. परंतु अस्पृश्यांची लोकसंख्या जमेस न धरली तर शूद्रांची लोकसंख्या हिंदूंच्या लोकसंख्येच्या मानाने ७५ ते ८० टक्के भरते याबद्दल शंका नाही. संख्येने इतक्या मोठ्या लोकांबद्दल ज्या पुस्तकात चर्चा केलेली आहे, ते पुस्तक एका उपेक्षणीय प्रश्नाची चर्चा करीत आहे, असे कदापि म्हणता येणार नाही.

हे पुस्तक हिंदी-आर्य समाजातील शूद्र लोकांसंबंधी आहे. शूद्रांचे जे काही प्रश्नोपप्रश्न

असतील त्यांच्याबद्दल ऊहापोह करणे सध्याच्या काळी प्रशस्त नाही असे एक मत प्रदर्शित केले जाते. हिंदू टोळ्या आणि जाती (Hindu Tribes and Castes) या पुस्तकाचे लेखक मि. शेरिंग हे आपल्या पुस्तकात या मुद्द्याबद्दल लिहितात की, (Vol. I, Introduction)-

''शूद्र लोक हे आर्य होते किंवा हिंदुस्थानचे मूळचे रानटी रहिवासी होते किंवा जमातींच्या संमिश्रणाने तयार झालेल्या टोळ्यांतील लोक होते  हा प्रश्न वास्तविक सध्या फारसा महत्त्वाचा नाही. अगदी प्राचीन काळात शूद्र लोकांचा एक स्वतंत्र वर्ग निर्माण करण्यात आला आणि त्यांना समाजात चवथे किंवा शेवटचे स्थान देण्यात आले. वरच्या तीन वरिष्ठ वर्णांची जी स्थाने होती त्यांच्यात आणि शूद्रांच्या स्थानात पुष्कळसे अंतर ठेवण्यात आले आहे. शूद्र लोक प्रथमतः आर्य नव्हते ही गोष्ट आपण जरी मान्य केली तरी आर्यांच्या तीन जातींमध्ये त्यांचे संश्रिम विवाह इतक्या मोठ्या प्रमाणावर झाले की मूळच्या शूद्र लोकांचे रूपांतर 'आर्य लोक' असे आतापर्यंत होत आलेले आहे. या असल्या रूपांतरामुळे शूद्रांना काही बाबतीत तोट्यापेक्षा फायदाच जास्त झालेला आहे, हे पूर्वी दाखविण्यात आलेले आहे आणि ज्या काही टोळ्यांना सध्या शूद्र म्हणून संबोधण्यात येते त्यांच्यात वास्तविकपणे ब्राह्मण व क्षत्रिय लोकांचे गुणावगुण जास्त ठळकपणे दृग्गोचर होतात. ब्राह्मण व क्षत्रिय लोकांच्या गुणावगुणांपेक्षा इतर लोकांचे गुणावगुण त्या टोळ्यांमध्ये अगदी कमी प्रमाणात पहावयास मिळतात. सारांश, इंग्लंडमधील सेल्टिक टोळ्या अँग्लो-सॅक्सन वंशात जशा मिसळून गेल्या त्याचप्रमाणे शूद्रांच्या टोळ्या इतर वंशांमध्ये मिसळून गेल्या आहेत. इतर वंशांमध्ये शूद्र टोळ्यांचे संमिश्रण इतके झालेले आहे की, त्यांना जे पूर्वी स्वतंत्र अस्तित्व होते ते अजिबात नष्ट झालेले आहे.''

या मताची उभारणी दोन चुकीच्या पायावर केलेली आहे. प्रस्तुत कालचे शूद्र लोक म्हणजे परस्परांपासून भिन्न असलेल्या वंशांमधून उत्पन्न झालेल्या जातींचा समूह असले हे शूद्र लोक व हिंदी-आर्य समाजातील मूळचे शूद्र लोक हे वांशिक दृष्टीने परस्परांपासून अगदी वेगवेगळे आहेत. ही परिस्थिती लक्षात न घेता मि. शेरिंग यांनी वरील जे मत प्रदर्शित केले, ही त्यांची पहिली चूक होय. शूद्रांच्या प्रश्नांचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा त्या प्रश्नांचा मध्यवर्ती बिंदू शूद्र लोक होत नाहीत, तर त्यांच्यावर ज्या देहदंडाची व निर्बंधांची कायदेशीर पद्धत लादण्यात आलेली आहे ती पद्धत त्या प्रश्नांचा मध्यवर्ती बिंदू ठरते. हा मुद्दा लक्षात न घेता मि. शेरिंग यांनी आपले मत प्रदर्शित केले ही त्यांची दुसरी चूक होय. हिंदी आर्य समाजातील शूद्रांच्या जीवनाची दोरी आपल्या हातांत ठेवण्यासाठी ब्राह्मणांनी ही देहदंडाची व निर्बंधाची पद्धत प्रथमतः तयार केली याबद्दल संशय नाही. स्वतंत्र, वेगळी आणि सहज ओळखता येईल अशी जमात म्हणून हे मूळचे शूद्र लोक आता रहात नाहीत. ते वरिष्ठ जातींत इतके मिसळून गेलेले आहेत की त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाचा मागमूसही लागत नाही. परंतु विशेष नवलाची गोष्ट ही की, मूळच्या शूद्रांसाठी जे कायदेकानू केलेले होते ते कायदेकानू मूळचे शूद्र अस्तित्वात राहिलेले नाहीत तरी, अस्तित्वात राहिले व मूळच्या शूद्रांशी ज्यांचा कसलाही संबंध नाही अशा हिंदू समाजातील सर्व कनिष्ठ दर्जाच्या

लोकांना सध्या ते कायदेकानू लागू करण्यात आले. हे कसे घडून आले हे जाणून घेण्याची सर्वांना उत्सुकता असेल. याबद्दल माझे स्पष्टीकरण असे आहे की हिंदी-आर्य समाजातील ब्राह्मणांनी केलेल्या कायदेकानूंच्या जबर तडाख्यांनी शूद्र इतके जर्जर झाले असतील की, ते दिवसेंदिवस जास्त जास्त अधोगतीला जाऊन शेवटी जमातीतील अगदी नीच दर्जाचे स्थान त्यांना मिळाले असेल. याचे दोन परिणाम झाले. एक परिणाम असा झाला की, शूद्र या शब्दाच्या अर्थात बदल करण्यात आला. एका विशिष्ट जमातीचे नाव असा शूद्र या शब्दाचा मूळचा अर्थ होता. तो मूळचा अर्थ नष्ट झाला आणि संस्कृतिहीन, स्वाभिमानशून्य आणि समाजात कसल्याही प्रकारची इज्जत नसलेल्या नीच वर्गातील लोक यांचे सामान्य नाम म्हणून शूद्र हा शब्द वापरण्यात आला. दुसरा परिणाम असा झाला की, शूद्र या शब्दाचा अर्थ व्यापक म्हणजे पुष्कळ प्रकारच्या लोकांना लागू होणारा करण्यात आला, त्यामुळे शूद्रांसाठी जे कायदेकानू करण्यात आले होते तेही व्यापक लोकसमुदायासाठी वापरले जाऊ लागले. प्रस्तुत काळचे शूद्र हे पूर्वीच्या काळच्या शूद्रांपैकी जरी नाहीत तरी वर सांगितलेल्याप्रमाणे मूळच्या शूद्रांसंबंधीचे कायदेकानू त्यांच्यावर लादण्यात आले. ते काही असो, एवढी गोष्ट मात्र नक्की की, मूळच्या अपराध्यांसाठी जे कायदेकानू केलेले होते ते निरपराधी लोकांना लागू करण्यात आले. मूळचे शूद्र लोक हे प्रस्तुत काळच्या कनिष्ठ मानलेल्या वर्गातील लोकांहून निराळे लोक आहेत हे ओळखण्याची ऐतिहासिक दृष्टी जर हिंदू धर्मशास्त्रकारांना असती तर शूद्रांची ही कारुण्यावस्था, निरपराध्यांची ही कत्तल त्यांना टाळता आली असती. हे कायदेकानू पूर्वीच्या शूद्रांना जितक्या कडक रीतीने लागू करण्यात येत असत तितक्यात कडक रीतीने ते प्रस्तुत काळच्या शूद्रांनाही लागू करण्यात आले. हे सत्य आहे व ते दुर्दैवाने घडून आलेले आहे. हे कायदेकानू कसे उत्पन्न झाले या गोष्टीची चौकशी जुन्यापुराण्या काळात शिरून केली पाहिजे, असे आजच्या शूद्रांना केवळ वाटत नाही; तर ते कायदेकानू आमच्यावर कसे व का लावण्यात आले याची चौकशी होणे जरूर आहे असे त्यांना वाटते.

शूद्रांची उत्पत्ती कशी झाली या प्रश्नाची चर्चा होणे जरूर आहे. परंतु ही चर्चा करण्याचा मला काय अधिकार आहे, अशी शंका कोणीतरी एखादा माणूस प्रदर्शित करील. हिंदुस्थानच्या राजकीय प्रश्नांवर बोलण्यास तुम्हास अधिकार आहे, परंतु धर्म आणि हिंदुस्थानचा धार्मिक इतिहास हे तुमचे विषय नव्हेत व त्यासंबंधी तुम्ही चकार शब्दही काढता कामा नये, असा मला अगोदरच काही लोकांकडून धमकीवजा इशारा मिळाला आहे. असला इशारा मला देण्याची माझ्या टीकाकारांना का जरुरी भासली असावी हे मला समजत नाही. मी तत्त्वशोधक किंवा लेखक आहे अशी ऐट मारतो व ती ऐट अवास्तव आहे म्हणून ती ऐट जिरविण्याच्या हेतूने जर तो इशारा टीकाकारांनी मला दिलेला असेल तर त्यांचा सारा खटाटोप व्यर्थ आहे. कारण हिंदुस्थानच्या राजकीय प्रश्नांवरसुद्धा बोलण्याची योग्यता माझ्या अंगात नाही हे मी कबूल करतो. संस्कृत भाषेवर माझे प्रभुत्व नाही व म्हणून मला धर्म व हिंदुस्थानचा धार्मिक इतिहास या विषयावर चकार शब्दही बोलता येणार नाही.

या हेतूने जर तो इशारा टीकाकारांनी दिलेला असेल तर मी कबूल करतो की, मला संस्कृत भाषेची चांगली माहिती नाही हा माझ्यात दोष आहे. परंतु या क्षेत्रात कार्य करण्यास मी या दोषामुळे सर्वस्वी अपात्र कसा ठरतो हे मला समजत नाही. इंग्रजी भाषेत ज्याचा अनुवाद झालेला नाही किंवा त्या भाषेत ज्याच्यावर ग्रंथ लिहिलेले नाहीत असे संस्कृत वाङ्मय अगदी थोडेच असेल. संस्कृत भाषेचे मला ज्ञान नाही म्हणून मला प्रस्तुत विषयासारखा विषय हाताळण्यास अडचण पडलीच पाहिजे असे होत नाही. कारण, मी असे छातीठोकपणाने म्हणू शकतो की, मजसारखी साधारण बुद्धी ज्याला आहे अशा कोणाही माणसाने या विषयासंबंधीच्या योग्य त्या वाङ्मयाचा, अर्थात् इंग्रजी अनुवादातील वाङ्मयांचा १५ वर्षे जर अभ्यास केलेला असला तर त्याला या विषयासंबंधी बोलण्याची किंवा लिहिण्याची बरीच योग्यता प्राप्त झालेली आहे, असे समजण्यास काही हरकत नाही. या विषयावर बोलण्यास माझी कितपत योग्यता आह याबद्दल सांगावयाचे म्हटले तर हे प्रस्तुतचे पुस्तक त्याबद्दल निर्वाळा देईलच. कदाचित असेही होईल की, माझा हा प्रयत्न म्हणजे ज्या ठिकाणी देवदूत जाण्यास धजत नाही त्या ठिकाणी मूर्ख लोक घिसाडघाई करून शिरतात. या वचनाची सत्यता दाखविणारे एक उदाहरण होईल. परंतु मूर्खालासुद्धा काही कर्तव्यकर्म करावयाचे असते याबद्दल माझी श्रद्धा आहे व म्हणून माझ्या प्रयत्नाबद्दल मला समाधान वाटते. मूर्खाचे कर्तव्यकर्म हे की जेव्हा देवदूत झोपी गेलेला असेल किंवा सत्याचा घोष करण्यास तयार नसेल तेव्हा मूर्खाने आपले योग्य ते कर्तव्य चोख बजवावे. या मनाई केलेल्या क्षेत्रात मी का शिरलो याचा खुलासा हा असा आहे.

विशेष लक्षात ठेवण्यासारखे या पुस्तकात काय आहे? या विषयाचे संशोधन करून त्यातून मी जे निष्कर्ष काढलेले आहेत तेच विशेष स्वरुपाचे आहेत याबद्दल संशय नाही. या पुस्तकात दोन प्रश्न उपस्थित केलेले आहेत- (१) शूद्र पूर्वी कोण होते? आणि (२) चवथा वर्ण म्हणून त्याची गणना हिंदी-आर्य समाजात कशी करण्यात आली? या प्रश्नांना माझी जी उत्तरे आहेत त्यांचा सारांश पुढीलप्रमाणे आहे-

(१) सूर्यवंशांच्या ज्या आर्य जमाती होत्या त्यातील एका जमातीचे शूद्र होते.

(२) एक काळ असा होता की, ज्यावेळी आर्य समाज फक्त तीन वर्ण म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य असे वर्ण मानीत होता.

(३) शूद्रांचा स्वतंत्र असा वर्ण नव्हता. हिंदी-आर्य समाजातील क्षत्रिय वर्णाचा एक भाग असा शूद्रांचा दर्जा होता.

(४) शूद्र राजे आणि ब्राह्मण यांच्यामध्ये एकसारखे झगडे चालू असत, या झगड्यांमुळे ब्राह्मणांवर अनेक अत्याचार आणि अपमानास्पद दुराचार करण्यात आले होते.

(५) शूद्रांनी आपल्यावर अत्याचार व जुलूम केले ही जाणीव ब्राह्मणांच्या अंतःकरणाला एकसारख्या टोचण्या देत होती, म्हणून ब्राह्मण शूद्रांचा द्वेष करू लागले व द्वेषामुळे शूद्रांचे उपनयन करण्याचे ब्राह्मणांनी नाकारले.

(६) शूद्रांना उपनयन नाकारल्यामुळे शूद्र आपल्या मूळच्या क्षत्रियपदापासून च्युत

झाले व सामाजिक दृष्टिने त्यांची अधोगती झाली. त्यामुळे त्यांचा दर्जा वैश्यांच्या खालचा झाला आणि याप्रमाणे त्यांचा स्वतंत्र चवथा वर्ण उत्पन्न करण्यात आला.

हे वरील जे निष्कर्ष मी काढलेले आहेत त्यांच्याबद्दल विद्वान लोकांचे काय भाष्य बाहेर पडणार आहे, याची मी अर्थात वाट पाहिली पाहिजे. हे निष्कर्ष नुसते मौलिक आहेत असे नव्हे, तर सध्या या बाबतीतील जे निष्कर्ष रूढ मानले जातात, त्या निष्कर्षांच्या अगदी उलट स्वरूपाचे आहेत हे ठरविणे, याबद्दल निर्णय देण्याची ज्यांची योग्यता आहे अशा माणसांच्या मनोरचनेवर अवलंबून राहील. अर्थात असल्या माणसाला या बाबतीत एखाद्या सिद्धांताची फारच आवड उत्पन्न झालेली असेल तर माझा सिद्धांत कुचमामाचा आहे, असे तो ठरवील. त्याने असा जरी निर्णय दिला तरी त्याबद्दल मला फारशी फिकीर वाटणार नाही; कारण, असला माणूस विरोधी असतो व विरोधाशिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची त्याच्याकडून अपेक्षा करता येत नाही. परंतु टीका करणारा माणूस, मग तो कितीही सावधान वृत्तीचा असो अगर कितीही जुन्या मताचा असो, जर प्रामाणिकपणे टीका करीत असेल आणि उघड अंतःकरणाने वागत असेल व सत्यकथा कोणत्या आहेत हे कबूल करण्याची त्याची तयारी असेल, तर त्याला माझे मत स्वीकारण्यास तयार करण्याबद्दल मला निराशा वाटत नाही. ही माझी अपेक्षा कदाचित चुकीची ठरेल. परंतु एका गोष्टीबद्दल मला संपूर्ण खात्री आहे. ती गोष्ट ही की, या विषयाबद्दल नवे विचार, नवीन दृष्टिकोन, नवयुगासंबंधीची नवी स्वप्ने या सामुग्रीने माझे पुस्तक ओतप्रोत भरलेले आहे हे माझ्या टीकाकारांना कबूल करावे लागेल.

विद्वान लोकांची गोष्ट सोडली तर हिंदू समाजातील लोकांना माझा नवीन सिद्धांत कसा काय वाटेल, याबद्दल तर्कवितर्क करीत बसणे बरेच गंमतीचे होईल. आजच्या हिंदूंचे नक्की पाच वर्ग आहेत. हिंदू समाजाच्या रचनेत काही वैगुण्य आहे, हे कधीही कबूल करण्यास तयार नसलेला व जुन्या मताचा म्हणून समजला गेलेला असा एक वर्ग आहे. हिंदू समाजव्यवस्थेत सुधारणा करण्याची भाषा बोलणे हे या वर्गातील लोकांना भयंकर पापमय वाटते. आर्य समाजिस्ट या नावाने ओळखला जाणारा हिंदूंचा एक वर्ग आहे. ते फक्त वेदांवर विश्वास ठेवतात. वेदांशिवाय इतर कोणत्याही धर्मग्रंथांवर त्यांचा विश्वास नाही. जे वेदांत नाही ते त्याज्य असे ते मानतात. म्हणून या बाबतीत आर्य समाजिस्ट व जुन्या मताचे हिंदू यांच्यात मतभेद आहे. वेदांतील आधाराशिवाय काही करावयाचे नाही अशी आर्य समाजिस्टांची धर्मश्रद्धा आहे.

हिंदू समाजव्यवस्था सर्वथैव चुकीची आहे हे कबूल करणारा एक हिंदूंचा वर्ग आहे. परंतु याबद्दल सदर समाजव्यवस्थेवर हल्ला करण्याची जरुरी नाही असे या वर्गाचे मत आहे. याबद्दल त्यांचे म्हणणे असे आहे की, सदर समाजव्यवस्थेला कायद्याचा पाठिंबा नाही व म्हणून ती व्यवस्था जरी मृतवत झालेली नाही तरी ती मृत्यूच्या पंथाला लागलेली आहे. राजकारणाबद्दल जागृत असलेला हिंदूंचा एक वर्ग आहे. अशा सुधारणा घडवून आणण्यापेक्षा स्वराज्य प्राप्त करून घेणे हे त्यांना अधिक महत्त्वाचे वाटते. हिंदूंचा पाचवा वर्ग आहे तो

प्रगतीप्रिय लोकांचा. यांना सामाजिक सुधारणा फार महत्त्वाची वाटते, ती इतकी की स्वराज्य मिळविण्यापेक्षा जास्त.

दुसऱ्या वर्गात मोडणारे हिंदू कदाचित असे म्हणतील की, या पुस्तकाची सध्या काही जरूरी नाही. या लोकांचे हे म्हणणे मी कबूल करू शकत नाही. ब्रिटिश हिंदुस्थानातील चालू कायदा हिंदू समाजात रूढ असलेल्या जातीपद्धतीला मान्यता देत नाही असे जेव्हा हे लोक म्हणतात, तेव्हा त्यांचे म्हणणे एका अर्थी बरोबर वाटते. एखादा हिंदू सिव्हिल प्रोसिजर कोडाच्या ११ व्या कलमाचा आधार घेऊन जर एखाद्या सिव्हिल कोर्टातून मी अमक्या वर्गाचा आहे असा जाहीरनामा मिळवू लागला तर तसला जाहीरनामा त्याला मिळणार नाही, हे खरे आहे. एखादा माणूस कोणत्या वर्णाचा आहे, या प्रश्नाचा विचार जर ब्रिटिश हिंदुस्थानातील कोर्टांना करावयाचा झाला तर तो विवाह, वडिलोपार्जित इस्टेट मिळणे आणि दत्तक घेणे यासंबंधी कोर्टापुढे जे खटले असतील त्या खटल्यांमध्ये करावा लागतो. ब्रिटिश हिंदुस्थानातील कायदा हिंदूंच्या चार वर्णांना मानीत नाही हे खरे आहे. परंतु या विधानाचा अर्थ काय होतो याबद्दल चुकीची समजुत करून न घेण्याबद्दल प्रत्येकाने दक्षता बाळगावी हाच मुद्दा स्पष्टपणे मांडावयाचा तर (१) वर्णव्यवस्था पाळणे हा ब्रिटिश हिंदुस्थानातील कायदा गुन्हा मानतो असा त्या विधानाचा अर्थ होते नाही; (२) वर्णव्यवस्था नष्ट झालेली आहे असा त्या विधानाचा अर्थ होत नाही; (३) नागरीक हक्क प्राप्त करून घेण्यासाठी वर्णव्यवस्थेच्या नियमाचे पालन करणे जरूर आहे, अशा स्वरूपाच्या खटल्यात वर्णव्यवस्थेला कायद्याने उचलून धरले नाही असा त्या विधानाचा अर्थ होत नाही; (४) वर्णव्यवस्थेच्या पाठीमागे कायद्याचा जो सर्वसाधारण पाठिंबा असतो तो काढून घेण्यात आलेला आहे असा त्या विधानाचा अर्थ होतो. समाजातील संस्था केवळ कायद्याच्या पाठिंब्याने टिकून राहतात असे नाही. संस्था इतर गोष्टींच्या पाठिंब्याने सुद्धा टिकून राहतात. यापैकी धर्माचा पाठिंबा व समाजाचा पाठिंबा ही फार महत्त्वाची आहेत. वर्णव्यवस्थेला धर्माचा पाठिंबा आहे. वर्णव्यवस्थेला धर्माचा पाठिंबा मिळाला, केवळ यामुळे हिंदू लोकांनी वर्णव्यवस्थेला समाजाचा संपूर्ण पाठिंबा दिला. या बाबतीत कायद्याने कोणतीही आडकाठी ठेवलेली नाही. धर्माचा पाठिंबा वर्णव्यवस्थेला मिळाला, केवळ यामुळे वर्णव्यवस्थेचे अस्तित्व कायम टिकून राहिले. वर्णव्यवस्थेची अंमलबजावणी करणारा कायदा अस्तित्वात नसताही वर्णव्यवस्था टिकून राहिली हे सिद्ध करण्याचा एक पुरावा म्हणजे असा की, शूद्र लोक व अस्पृश्य लोक यांना हिंदू समाजात प्राचीन काळी जे स्थान होते तेच स्थान आतापर्यंत टिकून राहिलेले आहे. म्हणून, प्रस्तुतसारख्या विषयाचा सांगोपांग विचार करणे जरुरीचे नाही असे म्हणणे योग्य दिसत नाही.

राजकारणाबद्दल जागृत असलेल्या हिंदूंबद्दल बोलावयाचे तर असे म्हणता येईल की, या विषयाच्या बाबतीत या गृहस्थाच्या मतांना फारशी किंमत देऊ नये. या विषयाकडे पाहण्याची याची दृष्टी साधारणतः दूरवर पोहोचणारी नसते. दूर अंतराच्या टप्प्यावर असलेल्या परिस्थितीकडे पाहण्याची धम्मक त्याच्या दृष्टीत नसते. या बाबतीतील एखादा प्रश्न कितीही

तातडीचा असला परंतु तो सोडविण्याच्या भानगडीत हा गृहस्थ पडला तर ते लोकांना आवडणार नाही असे या गृहस्थाला वाटले तर सदरहू प्रश्नाला तो शक्य तर थोडासा विरोध करील व सदरहू प्रश्न सोडविण्याचे लांबणीवर टाका असे तो म्हणेल.

राजकारणाबद्दल जागृत असलेल्या हिंदूंची अशी मनःस्थिती असल्यामुळे त्यांना हे पुस्तक म्हणजे एक ब्याद आहे असे वाटणे अगदी साहजिक आहे.

या पुस्तकाने आर्य समाजिस्टांना बोचकारून बोचकारून रक्तबंबाळ केलेले आहे. मी काढलेले निष्कर्ष आणि आर्य समाजिस्टांचा ध्येयवाद यांच्यामध्ये दोन अत्यंत महत्त्वाच्या मुद्यांसंबंधी दुमत झालेले आहे. हिंदी–आर्य समाजाचे चार वर्ण हे त्या समाजाच्या प्रारंभापासून अस्तित्वात होते अशी आर्य समाजिस्टांची श्रद्धा आहे. एक काळ असा होता की; त्यावेळी हिंदी–आर्य समाजात फक्त तीनच वर्ण अस्तित्वात होते, असे हे पुस्तक दाखविते. वेद हे शाश्वत व अपौरुषेय आहेत अशी आर्य समाजिस्टांची श्रद्धा आहे. वेदातील काही भाग, विशेषतः आर्य समाजिस्ट ज्याला अत्यंत महत्त्व देतात तो पुरुषसूक्ताचा भाग हे आपले मतलबी हेतू साध्य करण्याच्या बुद्धीने ब्राह्मणांनी वेदांमध्ये मागाहून घुसडून दिलेले स्वकृत मजकूर आहेत, हे या पुस्तकाने दाखवून दिलेले आहे. हे दोन निष्कर्ष आर्य समाजिस्टांच्या धार्मिक मतांवर अॅटम् बॉंबप्रमाणे येऊन आदळतील हे खास.

याप्रमाणे माझी आर्य समाजिस्टांशी टक्कर होते याबद्दल मला वाईट वाटत नाही. वेद हे शाश्वत, अनाद्यनंत आणि अचूक आहेत व हिंदूंच्या संस्था वेदांवर आधारलेल्या असल्यामुळे त्या संस्थाही शाश्वत, अनाद्यनंत व अचूक आहेत, म्हणून त्यांच्यात काही फेरफार करण्याची जरुरी नाही. अशाप्रकारचा उपदेश–प्रचार करून हिंदु समाज हा कधी न बदलणारा समाज आहे, असा समज आर्य समाजिस्टांनी हिंदूमध्ये प्रस्तुत केला ही त्यांच्या हातून मोठी चूक झालेली आहे. अशाप्रकारची श्रद्धा एखाद्या समाजात रूढ करावयाची म्हणजे त्या समाजाचा पुरा नाश करणारी वस्तू त्याच्या हाती देण्यासारखे आहे वेदासंबंधी आणि हिंदू समाजा-संबंधी आर्यसमाजिस्टांचा जो हा धार्मिक ध्येयवाद आहे तो संपूर्णपणे नष्ट केल्याशिवाय, आपण आपली सुधारणा करणे जरूर आहे असे हिंदू समाजाला वाटणार नाही, अशी माझी खात्री झालेली आहे. या पुस्तकाने दुसरे काही केलेले नसले तरी ही सेवा त्याने केलेली आहे.

या पुस्तकाबद्दल जुन्या मताचा हिंदू कोणता अभिप्राय देईल याची मला पुरी कल्पना आहे; कारण गेली कित्येक वर्षे मी या गृहस्थांबरोबर कुस्ती खेळत आहे. मला जी एकच गोष्ट माहितीची नव्हती ती ही की, नम्रपणे वागणारा आणि निरुपद्रवी दिसणारा हिंदू त्याच्या पवित्र धार्मिक ग्रंथावर जर कोणी हल्ला केला तर तो मारामारी करण्यास कसा प्रवृत्त होतो. मी याच विषयावर गेल्या वर्षी मद्रासमध्ये व्याख्यान दिले होते. तेव्हा माझ्या व्याख्यानामुळे चिडून गेलेल्या पुष्कळ हिंदूंचा समतोलपणा नष्ट झाला व रागारागाने लिहिलेल्या पत्रांचा त्यांनी माझ्यावर भडिमार केला. ही पत्रे वाचल्यानंतर मला त्या गोष्टीची पूर्वी कधीही झाली नव्हती इतकी जाणीव झाली. सांगता येणार नाहीत आणि छापता

येणार नाहीत अशा घाणेरड्या शिव्यांची लाखोली त्या पत्रांमध्ये मला वाहिलेली होती. माझा खून आता करू; मग करू, अशाप्रकारच्या धमक्याही त्या पत्रांमध्ये होत्या. 'या बाबतीत तुमच्या हातून जो गुन्हा झालेला आहे तो तुमचा पहिला गुन्हा आहे म्हणून आम्ही तुम्हाला काही न करता सहीसलामत सोडून देतो' असे त्यांनी गेल्या वेळी मला बजाविले होते. आता ते मला काय करतील, याची मला कल्पना नाही. कारण, हे पुस्तक वाचल्यानंतर त्यांना हे कळून येईल की, ते पवित्र ग्रंथ समजतात त्या ग्रंथांमध्ये राजकीय हेतू साध्य करण्यासाठी व दुसऱ्या वर्गाची कुचंबणा करण्यासाठी ब्राह्मणांनी खोटे नाटे मजकूर तयार करून घुसडून दिलेले आहेत ही गोष्ट मी इकडचे तिकडचे प्रबळ पुरावे घेऊन सिद्ध करून दाखविलेले आहे. हे माझे कृत्य म्हणजे त्यांच्या दृष्टीने पहिल्या गुन्ह्याची वाढविलेल्या स्वरूपाची आवृत्ती होय. पुस्तकातील हा प्रकार पाहून त्यांचा माझ्यावर चांगलाच घुस्सा झाला असेल हे नक्की. अशा लोकांच्या शिवीगाळीची किंवा धमक्यांची मी पर्वा करीत नाही. कारण, लोक म्हणजे आपल्या धर्माची बाजू राखण्याचा आव आणणारे, पण धर्माचा व्यापार करून गबर झालेले नीच कोटीतील मानवप्राणी आहेत याची मला पुरी जाणीव आहे. ते जगातील कोणत्याही इतर प्राणी मात्रापेक्षा जास्त स्वार्थी आहेत आणि आपल्या बुद्धिमत्तेचा वेश्याव्यवसाय करीत आहेत. हिंदूंच्या पवित्र ग्रंथाविरुद्ध बोलण्याचे धैर्य ज्या माणसामध्ये आहे अशा माणसाने प्रामाणिकपणे त्या ग्रंथाबद्दल जर आपले सत्यशोधक विचार प्रदर्शित केले तर त्या माणसावर जीर्णमताची पिसाळलेली कुत्री सोडण्यात येतात. अशावेळी स्वतःला उच्च प्रतीचे सुशिक्षित म्हणून समजणारे आणि मानमान्यतेच्या उच्च प्रतीच्या जागा सुशोभित करणारे असे प्रमुख हिंदू लोक, त्यांना या विषयासंबंधी काही स्वारस्य वाटत नसतानाही आणि ते उघड्या अंतःकरणाने दिलदार लोक आहेत असा त्यांच्याबद्दल समज असताना, या वादात शिरतात आणि जीर्णमतवाद्यांच्या सुरात आपला सुर मिळवितात. ही काही लहान आश्चर्याची गोष्ट नाही. हायकोर्टाचे हिंदू न्यायाधीश आणि संस्थानाचे हिंदू मुख्य प्रधान हे लोकसुद्धा वरील लोकांच्या तांड्यात शिरण्यास मागेपुढे पहात नाहीत. हे लोक यांच्याही पुढे जातात. सत्यशोधक विचार प्रदर्शित करणाऱ्या माणसाच्या विरुद्ध जे काहूर माजविण्यात आलेले असते त्यात हे गृहस्थ अग्रगण्य तर असतातच, शिवाय सदर गृहस्थाचा चक्काचूर करण्यासाठी जो चक्रव्यूह रचण्यात आलेला असतो त्यातही हे गृहस्थ प्रथमपासून सामील झालेले असतात. या सर्व प्रकारात चीड येण्यासारखी गोष्ट ही की, हे महाभाग स्वतःची अशी समजूत करून घेतात की, आपल्या बहुमानाच्या जागांमुळे आपल्याला समाजात जे महत्त्व प्राप्त झालेले आहे त्यामुळे या विषयासंबंधी ते जे जे उद्‌गार काढतील त्या त्या उद्‌गारांना जनता शिरसावंद्य मानेल व याचा परिणाम जीर्णमतवादाला विरोध करणाऱ्या एकूण एक माणसाच्या मनावर होऊन ती माणसे गर्भगळित होतील व विरोध करण्याचे सोडून देतील. या ममताळू महाशयांना मला एवढेच निक्षून सांगावयाचे आहे की, असले दुष्ट चाळे करून मला माझ्या कार्यापासून प्रवृत्त करताना त्यांच्यावर जो प्रसंग गुदरलेला आहे तशाच प्रकारचा प्रसंग डॉ. जॉन्सन यांच्यावर आलेला होता. तेव्हा त्यांनी जे सुंदर व मार्मिक उद्‌गार काढले होते ते या महाशयांना

माहीत नसावेत असे वाटते. ''(मी चोराला पकडणार आहे हे पाहून गुंडांनी मला धमक्या दिलेल्या आहेत; पण) गुंडांच्या धमक्यांनी घाबरून जाऊन मी चोराला पकडण्याचे सोडून देणार नाही,'' हे ते डॉ. जॉन्सनचे उद्गार होत. उच्च पदांवर विराजित झालेल्या या टीकाकारांशी धसळामुसळी करून वागण्याची मला इच्छा नाही किंवा चोराला पळून जाण्याच्या बाबतीत मदत करण्याचे गुंडांचे कार्य हे टीकाकार करीत आहेत असेही मला म्हणावयाचे नाही. परंतु दोन गोष्टी त्यांना सांगण्याची मला प्रबळ इच्छा आहे. पहिली गोष्ट ही की, काहीही होवो, हिंदुधर्माच्या पवित्र ग्रंथांचे संशोधन करताना मला जेवढी ऐतिहासिक सत्ये दिसून येतील तेवढी मी जगाच्या चव्हाट्यावर मांडेन व हे कार्य करताना डॉ. जॉन्सन यांचा दृढ निश्चय मी डोळ्यांपुढे आदर्श म्हणून ठेवीन. हे कार्य हाती घेण्याचा माझा हेतू एवढाच आहे की, पवित्र धर्मग्रंथांत जे आदेश व जे नीतिनियम सांगण्यात आलेले आहेत ते नियम हिंदूंच्या, देशाच्या व समाजाच्या ऱ्हासाला आणि अध:पाताला कारणीभूत झालेले आहेत; ही गोष्ट माझी ऐतिहासिक तत्त्वे समजल्यानंतर हिंदूंना पटून यावी. दुसरी गोष्ट ही की, मला पवित्र ग्रंथांसंबंधी काय म्हणावयाचे आहे हे समजावून घेण्यास जर सध्याच्या पिढीतील हिंदू लोक तयार नसतील तर यांच्या पुढच्या पिढीतील हिंदू लोक तयार होतील याची मला खात्री आहे. या बाबतीत मला यश येणार नाही अशी निराशा माझ्या मनात येतच नाही. या बाबतीत भवभूति कवीच्या एका कवितेची मला आठवण होते व त्या कवितेतील उद्गारांचा प्रांजळपणा पाहून माझे मन शांत होते. ती कविता अशी–

*ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञां ।*
*जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ।।*
*उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा ।।*
*कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ।।*

*मालतीमाधव (१–६)*

(जे कोणी आमची अवहेलना चोहोकडे पसरवितात त्यांनी हे पक्के ध्यानात ठेवावे की, हा माझा प्रयत्न त्यांच्याकरिता मुळीच नाही. मला पूर्ण भरवसा आहे की, ज्यांचे मनोधर्म माझ्या मनोधर्मासारखे आहेत असा कोणी ना कोणी तरी आज ना उद्या निपजेल. कारण, काळ हा अनंत आहे आणि पृथ्वी विस्तीर्ण आहे!)

ते काही का असेना, हे पुस्तक म्हणजे जीर्णमतवादाला आव्हान आहे.

प्रस्तुतच्या समाजव्यवस्थेत सुधारणा होणे हे जरूर आणि अगत्याचे आहे अशी ज्यांची श्रद्धा आहे असा एक हिंदूंचा वर्ग आहे. हिंदूंच्या अनेक वर्गांपैकी फक्त हा एकच वर्ग माझ्या पुस्तकांचे कदाचित स्वागत करील. या पुस्तकात चर्चेस घेतलेला प्रश्न असा आहे की, तो सोडविण्यासाठी अनेक विद्वानांना अनेक पिढ्या प्रयत्न करीत रहावे लागले; परंतु हा इतका बिकट प्रश्न आहे म्हणून त्याचा सांगोपांग विचार करण्याचे पुढे लांबणीवर ढकलावे असे या हिंदूंच्या वर्गाला वाटत नाही. जातीयता ही हिंदू समाजव्यवस्थेतील एक नैसर्गिक पीडा आहे. राजकारणाबद्दल जागृत असलेले हिंदू या पीडेला कमी लेखण्याची किंवा तिला

पुढे ढकलण्याची इच्छा धरतात. परंतु या स्वरूपामुळे जे प्रश्न समाजात उत्पन्न होतात ते प्रश्न या राजकारणी हिंदूला पावलोपावली भेडसावीत असतात; ही गोष्ट राजकारणी हिंदूला, तो जर प्रामाणिक असेल तर, कबूल करावी लागेल. हे प्रश्न म्हणजे या क्षणाला उत्पन्न झालेल्या तात्पुरत्या अडचणी नाहीत, हे प्रश्न म्हणजे आपल्या कायमच्या अडचणी आहेत. म्हणजे क्षणाक्षणाला आपणाला भासणाऱ्या अडचणी आहेत. अशाप्रकारचा हिंदूंचा वर्ग अस्तित्वात आहे हे पाहून मला आनंद वाटतो. हे हिंदू संख्येने जरी कमी आहेत तरी माझी सारी भिस्त त्यांच्यावर आहे आणि म्हणून मी हे पुस्तक त्यांच्यापुढे ठेवीत आहे.

प्रत्येक धर्मातील पवित्र ग्रंथाबद्दल आदरभाव दाखविला पाहिजे. असा आदरभाव हिंदूंच्या धार्मिक पवित्र ग्रंथांबद्दल मी दाखविलेला नाही, असे माझ्याबद्दल म्हणण्यात येईल. हा आरोप जर खरे मानले तर माझ्या बाजूने समर्थन करण्यासाठी दोन गोष्टींचा आधार घेणे मला भाग पडते. सर्व वाङ्मयगम्य लोकांसंबंधीचे वाङ्मय या मूळ अर्थाने हा शब्द मी वापरीत आहे असे समजावयाचे व नंतर त्यांच्यात पवित्र वाङ्मय व अपवित्र वाङ्मय असा भेदभाव अगोदर करावयाचा नाही. पण केवळ सत्य शोधून काढण्याच्या हेतूने त्या वाङ्मयाला रूढ नियमांच्या कसाला लावून त्याची पाहणी व परीक्षा करावयाची अशी इतिहासकारांची एक उत्कृष्ट परंपरा आहे. या विषयावर मी जे संशोधन केलेले आहे ते या परंपरेच्या प्रकाशात केलेले आहे, ही पहिली गोष्ट. दुसरी गोष्ट ही की, पवित्र वाङ्मयाबद्दलचा आदरभाव व भक्तिभाव हे पाहिजे तेव्हा आणि पाहिजे तसे निर्माण करता येत नाहीत; हे भाव काही सामाजिक घटनांमुळे आपोआप उत्पन्न होतात. या सामाजिक घटना असल्या भावनांना एखाद्या बाबतीत साहजिकपणे उत्पन्न करतात, तर दुसऱ्या बाबतीत मारूनमुटकून उत्पन्न करतात. हिंदूंच्या पवित्र वाङ्मयाबद्दल ब्राह्मण विद्वानांमध्ये जे आदरभाव व भक्तिभाव उत्पन्न होतात ते नैसर्गिकपणे होतात. परंतु असले आदरभाव ब्राह्मणेत्तर विद्वानांमध्ये उत्पन्न होणे अगदी अनैसर्गिक आहे. भावनेच्या उत्पत्तीसंबंधी दोन्ही पक्षांत जो भेद दिसतो, त्याचे स्पष्टीकरण अगदी साधे आहे. ब्राह्मण विद्वान गृहस्थ या पवित्र वाङ्मयाकडे शंकाकुशंकाविरहित अशा निर्भेळ पूज्य भावनेने पाहतो आणि त्या वाङ्मयावर जर कोणी प्रहार करू लागला तर तो ब्राह्मण गृहस्थ बुद्धिनिष्ठ माणसाच्या ममत्वरहित वृत्तीने ते प्रकार निमूटपणे पहात राहतो. साधारण शिकलेला माणूस मात्र ते प्रहार ममत्वाच्या बुद्धीने पाहील. बुद्धिनिष्ठ माणसाची ममत्वरहित वृत्ती आणि साधारण शिकलेल्या माणसाची ममत्वपूर्ण वृत्ती यांच्यातील फरक हा असा आहे. या गोष्टीची आपण जरी अपेक्षा करतो त्याप्रमाणेच ती घडून येते. कारण हे पवित्र वाङ्मय म्हणजे तरी काय? हे वाङ्मय म्हणजे जवळ जवळ सर्वस्वी ब्राह्मणांना जे श्रेष्ठपणाचे अधिकार आणि हक्क आहेत त्यांची जोपासना करणे हाच मुख्य हेतू असणारे वाङ्मय आहे. अशी स्थिती असताना ब्राह्मणांनी त्या वाङ्मयाच्या पावित्र्याला उचलून का धरू नये बरे? ते धरणारच! ज्या कारणामुळे ते पावित्र्य उचलून धरावे असे ब्राह्मणाला वाटते त्याच कारणामुळे त्या पावित्र्याचा धिक्कार करावा असे ब्राह्मणेत्तराला वाटते. ज्याला पवित्र वाङ्मय म्हणून मानले जाते त्यामध्ये तिरस्कारणीय सामाजिक तत्त्वज्ञान

सांगण्यात आलेले आहे आणि हेच तत्त्वज्ञान आपल्या सामाजिक अवनतीला कारणीभूत झालेले आहे याचे ज्ञान ब्राह्मणेत्तराला झालेले असल्यामुळे ब्राह्मण ज्या दृष्टीने त्या वाङ्मया-कडे पाहतो, त्याच्या अगदी उलट दृष्टीने ब्राह्मणेत्तर त्या वाङ्मयाकडे पाहतो. मी ब्राह्मणेत्तर आहे. ब्राह्मणेत्तर सुद्धा नव्हे, मी अस्पृश्य आहे. ही गोष्ट जर लक्षात घेतली तर हिंदूंच्या पवित्र वाङ्मयाबद्दल मला आदर व भक्ती का वाटत नाही, या गोष्टीचे आश्चर्य वाटण्याचे कारण रहात नाही. ब्राह्मणेत्तरांना या पवित्र वाङ्मयाचा जितका तिरस्कार वाटतो त्याच्यापेक्षा कमी तिरस्कार मला वाटत नाही हे साहजिक आहे. प्रो. थॉर्नडाईक यांनी म्हटलेले आहे की, माणूस विचार करतो ही प्राणिशास्त्र-सिद्ध बाब आहे आणि माणूस जो काही विचार करतो ती समाजशास्त्रसिद्ध बाब आहे.

हिंदूंच्या सामाजिक इतिहासाचे जे प्रश्न आहेत त्यांचा अभ्यास करावयाची मुख्य साधनसामुग्री म्हणजे हिंदूंचे पवित्र वाङ्मय होय. ब्राह्मण विद्वान् गृहस्थ आणि ब्राह्मणेत्तर विद्वान गृहस्थ यांचे या पवित्र वाङ्मयाकडे पाहण्याचे जे दृष्टिकोन आहेत त्यांच्यात कसा फरक आहे हे वर सांगितलेले आहे. हा फरक ऐतिहासिक संशोधनाला अत्यंत हानिकारक आहे याची मला जाणीव आहे.

ब्राह्मण विद्वान गृहस्थांनी ऐतिहासिक संशोधनाच्या बाबतीत हातचलाखीचे प्रकार केलेले आहेत हे उघड आहे. या वाङ्मयाचे पावित्र्य अबाधितपणे चालू ठेवण्यात ब्राह्मण विद्वान गृहस्थांचे दुहेरी हेतू आहेत. हे वाङ्मय आपल्या बापजाद्यांनी तयार केलेले आहे आणि पितृऋणाची जाणीव ठेवून त्या वाङ्मयाचे संरक्षण प्राण देऊन सुद्धा करणे जरूर आहे हा एक हेतू. ते वाङ्मय ब्राह्मणांच्या हक्क-अधिकारांना उचलून धरते म्हणून त्या वाङ्मयाचे महत्व जेणेकरून कमी होईल असे कोणतेही कृत्य न करण्याबद्दल दक्षता पाळणे हा दुसरा हेतू. या वाङ्मयाने जी सामाजिक पद्धत सांगितलेली आहे ती आपणाला सर्वस्वी अनुकूल आहे व तिच्यामुळे आपले हित होत आहे, म्हणून अशा पद्धतीला उचलून धरणे जरूर आहे; त्याचप्रमाणे ही पद्धत ज्यांनी निर्माण केली ते आपलेच वाडवडील होते म्हणून त्याचे माहात्म्य गात राहणे जरूर आहे, याबद्दलची जाणीव ब्राह्मण पंडित गृहस्थाच्या मनात अष्टो-प्रहर जागृत असते. यामुळे तो या वाङ्मयातील सत्य शोधून काढण्याच्या अगर ते सत्य इतरांना शिकविण्याच्या भानगडीत पडू शकत नाही. एखादी गोष्ट केव्हा घडून आली किंवा एखादा माणूस कोणत्या वंशाचा होता, असल्या गोष्टींचे संशोधन या वाङ्मयावरून करण्यापलीकडे ब्राह्मण पंडितांची फारशी मजल जात नाही. त्यांच्या संशोधनात स्वतंत्र बुद्धीची वीज चमकत असलेली दिसून येत नाही आणि त्यांना ऐतिहासिक संशोधनाच्या कार्यात आपल्या मौलिक विचारांची भर टाकता येत नाही, याचे कारण तेच आहे. ब्राह्मणेत्तर पंडितांच्या बुद्धिला असल्या प्रकारची बंधने नाहीत, म्हणूनच तो पवित्र वाङ्मयातून सत्य शोधून काढण्यासाठी आपल्या बुद्धीचा निर्भयपणे उपयोग करू शकतो. दोन प्रकारच्या पंडितांमध्ये हा जो फरक आढळून येतो तो काही अंदाजाने निर्माण केलेला नाही. याचे उदाहरण म्हणजे हे माझे पुस्तकच होय. ब्राह्मणांनी शूद्रांच्या विरुद्ध कोणते कपटकारस्थान रचलेले आहे, त्याच्या

स्वरूपाचा स्फोट करून दाखविणारे पुस्तक लिहिण्याचे एकाही ब्राह्मणाला धैर्य झाले नसते.

ब्राह्मण पंडिताच्या बुद्धीला जी बंधने आहेत तसली बंधने ब्राह्मणेत्तर पंडिताच्या बुद्धीला नाहीत ही गोष्ट खरी. तरीपण ब्राह्मणेत्तर पंडित स्वतंत्र बुद्धीचा म्हणून तो ब्राह्मणाच्या अगदी विरुद्ध टोकाला जाऊन, हे सर्व वाङ्मय म्हणजे कपोलकल्पित कथांचा व कादंबरीमय वर्णनांचा एक संग्रह आहे आणि असला संग्रह अभ्यासाच्या योग्यतेचा नसून तो उकिरड्यावर फेकून देण्याच्या लायकीचा आहे, असे ब्राह्मणेत्तर पंडित आपले मत बनविण्याचा संभव आहे. हा इतिहास-काराचा बाणा नव्हे. म्हटलेलेच आहे की, इतिहासकार हा काटेकोर, तळमळीचा आणि पंक्तिप्रपंच न करणारा असा असला पाहिजे; तो भावनाविरहित, आपुलकीची भावना, भीती, तिरस्कार किंवा प्रेमाची ओढ यांच्यापासून मुक्त असा असला पाहिजे; आणि इतिहासाची जननी जी सत्यनिष्ठा ती त्याच्या रोमरोमांत भिनलेली असली पाहिजे; महत्कृत्यांना सुरक्षित ठेवणारा, अंधाराचा संहार करणारा, पूर्व-काळाचा साक्षी आणि भावी काळाचा नेता असा तो असला पाहिजे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे अगदी रिकामे नसणारे नव्हे, पण उघडे असणारे असे त्याचे मन पाहिजे आणि खोटेनाटे पुरावे जरी त्याच्या हाती लागले तरी त्या सर्व पुराव्यांची छाननी करण्याची त्याची तयारी पाहिजे. इतिहासकाराचे हे कडक ब्रीद पाळणे ब्राह्मणेत्तर पंडिताला कठीण जाईल हे संभवनीय आहे. जुन्या वाङ्मयात सत्य व असत्य भाग शोधून काढताना तो ब्राह्मणेत्तर राजकारणाचे वारे आपल्या अंगात आणील हे संभवनीय आहे. परंतु त्याचे असे करणे योग्य ठरणार नाही. मी संशोधन करीत असताना असल्या वृत्तीच्या आहारी मी गेलो नाही, याबद्दल मी खात्री देऊ शकतो. शूद्रांसंबंधी लिहिताना माझ्या मनात शुद्ध इतिहासाच्या विचाराशिवाय दुसरा कोणताही विचार आलेला नव्हता. या देशात ब्राह्मणेत्तर चळवळ म्हणून जी एक चळवळ अस्तित्वात आहे ती शूद्रांची राजकीय चळवळ आहे हे सर्वांना माहीत आहे. या चळवळीशी माझा संबंध आहे, हेही सर्वांना माहीत आहे. परंतु हे पुस्तक म्हणजे या ब्राह्मणेत्तरांच्या राजकारणाची प्रस्तावना व्हावी म्हणून लिहिलेले नाही असे वाचकांना आढळून येईल, अशी मला खात्री वाटते.

या विषयाचे विवेचन आणि दिग्दर्शन करताना बऱ्याच चुका झालेल्या आहेत याची मला जाणीव आहे. लांबलचक आणि भरमसाट उताऱ्यांनी हे पुस्तक ओतप्रोत भरलेले आहे. हे पुस्तक म्हणजे एखाद्या कलाकुसरीचे आकर्षक काम नाही आणि म्हणून ते सर्व वाचण्याचा वाचकांना कंटाळा येईल. परंतु हा दोष सर्वस्वी माझा नाही. ही बाब माझ्या हातची असती तर या उताऱ्यांच्या संख्येत मी आनंदाने खूप काटाकाट केली असती. परंतु आपण सध्याच्या अवनत अवस्थेला येऊन कसे पोहोचलो याची ज्यांना माहिती नाही, अशा अज्ञानी आणि बिनमाहितगार शूद्रांच्या उपयोगासाठी मी हे पुस्तक लिहिलेले आहे. हा विषय किती कलात्मक रीतीने मांडलेला आहे हे पाहण्याची शूद्रांना पर्वा नाही. त्यांची या बाबतीत जी एकमेव इच्छा आहे ती ही की, या विषयावरील सर्व साहित्याचा भरपूर समाचार घेतला पाहिजे. मग तो समाचार जेवढा व्यापक असेल तेवढे उत्तम. मी ज्यांना

ज्यांना या पुस्तकाची हस्तलिखिते दाखविली तेवढ्या लोकांनी असा आग्रह धरला की, या पुस्तकात उद्धृत केलेले सर्व उतारे जसेच्या तसे राहू द्या. उताऱ्यांबद्दल त्यांना इतका उत्साह वाटला की, त्यांपैकी काहीजण मला आग्रहाने म्हणाले की, तुम्ही या उताऱ्यांचे इंग्रजी भाषांतर या पुस्तकात द्याच द्या. शिवाय ते मूळचे संस्कृत उतारेही पुस्तकाला परिशिष्ट जोडून त्यामध्ये द्या. परिशिष्टासंबंधीचा त्यांचा आग्रह मला मान्य करणे इष्ट वाटले नाही. परंतु, उताऱ्यांचे इंग्रजी भाषांतर पुस्तकात राहू देण्याबद्दलचा त्यांचा आग्रह मला मान्य करणे इष्ट वाटले; कारण असले साहित्य त्यांना सहजासहजी मिळणे शक्य नाही. शूद्रांची अधोगती घडवून आणण्यात जरी चातुर्वर्ण्याची दुष्कलंकित पद्धत प्रामुख्याने कारणीभूत झाली तरी तिला टिकवून धरण्याचा बराच कार्यभाग शूद्रांनी केलेला आहे. या गोष्टीची ज्याला जाणीव आहे त्याला हे कळून येईल की, मी या पुस्तकात जे भरपूर उतारे घातलेले आहेत ते याच हेतूने की, ते वाचून शूद्र वर्गातील लोकांना स्वतःच्या बुद्धीने त्यासंबंधी सांगोपांग विचार करता यावा आणि हे उतारे कमी करणे किंवा त्यांना संक्षिप्त स्वरूपात ठेवणे हे हा विषय समजण्याच्या दृष्टीने इष्ट नाही, असे स्वतःचे मत त्यांना त्यावरून बनवता यावे.

मला तीन गृहस्थांचे आभार मानावयाचे आहेत. महाभारताच्या शांतीपर्वा-तील ६० वा अध्याय ज्याने लिहिला तो लेखक, हा पहिला गृहस्थ. तो व्यास होता की वैशंपायन, सुत, लोमहर्षण किंवा भृगु होता हे सांगणे कठीण आहे. परंतु तो कोणी का असेना, पैजवन याचे संपूर्ण वर्णन देऊन त्याने मोठी कामगिरी बजावलेली आहे. त्याने पैजवन हा शूद्र होता, असे जर वर्णन सदर अध्यायात दिले नसते तर शूद्रांची उत्पत्ती शोधून काढण्याचा धागादोरा मुळीच हाती लागला नसता. आपल्या पुढील पिढीला उपयुक्त असणारी ही अत्यंत महत्त्वाची अल्पशी माहिती जपून ठेवली म्हणून या लेखकाचा मी ऋणी आहे. हा पुरावा जर अस्तित्वात नसता तर हे पुस्तक मला लिहिता आले नसते. दुसरे गृहस्थ इस्माईल युसूफ कॉलेज, अंधेरी, मुंबई येथील प्राध्यापक कंगले यांचे मला आभार मानले पाहिजेत. त्यांनी मला परोपरीने सहाय्य केले, शिवाय या पुस्तकात जे संस्कृत श्लोक उद्धृत केलेले आहेत त्यांचे भाषांतर त्यांनी तपासून पाहिलेले आहे. मी संस्कृत भाषेचा पंडित नसल्यामुळे त्यांच्याकडून मला जे सहाय्य मिळाले त्यामुळे मला असे खात्रीपूर्वक वाटू लागले की, संस्कृतमधील जी सामुग्री या पुस्तकात वापरलेली आहे तिचा परामर्श घेताना मी अगदीच घसरून पडलेलो नाही. त्यांनी मला सहाय्य केले याचा अर्थ असा नव्हे की, या बाबतीत माझ्या टीकाकारांना जे दोष व ज्या चुका दाखविता येतील त्याबद्दल प्रा. कंगले हे जबाबदार आहेत. सिद्धार्थ कॉलेज, मुंबई येथील प्राध्यापक मनोहर चिटणीस यांनी सूचिपत्र तयार करून दिले त्याबद्दल त्यांचेही मी आभार मानतो.

या पुस्तकाच्या २, ३ व ४ परिशिष्टांत जे तीन नकाशे दिलेले आहेत ते मि. मॅडिसन ग्रँट यांच्या Passing of the Great Race या पुस्तकातून घेतलेले आहेत. M/s Charles Scribner's Sons, Publishers, New York, यांनी हे नकाशे वापरण्याची परवानगी कृपाळूपणे दिली याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

(मूळ ग्रंथातील ही व इतर तीन परिशिष्टे आणि चार नकाशे विस्तारभयास्तव या अनुवादित पुस्तकात दिलेली नाहीत – प्रकाशक)

१० आक्टोंबर १९४६ — भी. रा. आंबेडकर
'राजगृह' प्लॉट नं. १२९,
दादर, मुंबई १४.

प्रकरण १ ले

# शूद्रांचा कूटप्रश्न

शूद्र हे हिंदी आर्य समाजातील चवथा वर्ण होत हे प्रत्येकाला माहीत आहे. परंतु शूद्र हे पूर्वी कोण लोक होते आणि त्यांचा चवथा वर्ण म्हणून कशी गणना करण्यात आली, याबद्दल चौकस बुद्धीने विचार करण्याचे फारच थोड्या लोकांनी मनावर घेतले आहे. अशा प्रकारचे या बाबतीत संशोधन करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे, याबद्दल दुमत नाही. कारण की, हिंदी आर्य समाजात चवथा वर्ण म्हणून शूद्र लोकांना कसे स्थान मिळाले; हिंदू समाजात उत्क्रांती घडून आल्यामुळे की क्रांती घडवून आणल्यामुळे, हे समजावून घेणे अत्यंत हितावह आहे.

शूद्र लोक पूर्वी कोण होते व त्यांची चवथा वर्ण म्हणून कशी गणना करण्यात आली, याबद्दल संशोधन करावयाचे तर त्यासाठी आपणाला प्रथमत: हिंदी आर्य समाजात चातुर्वर्ण्य कसे उत्पन्न झाले, याबद्दल माहिती करून घेतली पाहिजे व त्या माहितीच्या आधाराने शूद्रांच्या उत्पत्तीचे मुळ स्थान शोधून काढले पाहिजे. ऋग्वेदातील दहाव्या मंडळात नव्वदावी ऋचा आहे. ती **पुरुषसूक्त** या नावाने प्रसिद्ध आहे. या पुरुषसूक्ताचा आपण सांगोपांग विचार केला तर चातुर्वर्ण्याचा आपणाला विचार करणे सोपे जाईल.

पुरुषसूक्तात म्हटले अहे की;

(१) पुरुषाला शंभर डोकी, शंभर डोळे, शंभर पाय आहेत. पृथ्वीला सर्व बाजूंनी व्यापल्यानंतर तो दशांगुळे शिल्लक राहील.

(२) जे काही आत्तापर्यंत होते व पुढे होईल ते पुरुष स्वत: हे विश्व होय. तो अन्न सेवन करून प्रसन्न पावतो, म्हणूनच तो अमरत्वाचा भगवान होय.

(३) त्याचे माहात्म्य असे आहे आणि पुरुष यापेक्षाही श्रेष्ठ आहे. त्याचा चवथा भाग म्हणजे जगातील चराचर वस्तू आणि त्याचा तीन चतुर्थांश भाग हा आकाशात अमर होऊन राहिलेला आहे.

(४) आपल्या तीन चतुर्थांश भागाने पुरुष वरती चढत गेला. त्याचा चवथा भाग इष्ट लोकी उत्पन्न केला. त्यानंतर त्याचा सर्व ठिकाणी, सर्व वस्तूंवर, ज्या वस्तू खातात व ज्या वस्तू खात नाहीत, अशांवर प्रसार करण्यात आला.

(५) त्याच्यापासून विराज जन्मला आणि विराजापासून पुरुष जन्मला, तेव्हा तो पृथ्वीच्या मागे व पुढे प्रसृत झाला.

(६) जेव्हा देवांनी यज्ञ केला व त्यात पुरुषाला बळी दिले तेव्हा त्या यज्ञाचे लोणी वसंत ऋतु झाला, उन्हाळा यज्ञाचे सर्पण झाला व हिवाळा यज्ञाचे आदर्श झाला.

(७) हा बळी पुरुष प्रथमतः जन्मला व त्यांनी यज्ञाच्या तृणांवर त्याचे बलिदान दिले. त्याच्याबरोबर देव, संध्या व ऋषी यांचेही बलिदान दिले.

(८) त्या विश्वव्यापक यज्ञापासून दही व लोणी यांचा साठा झाला. त्याच्यापासून आकाशात भ्रमण करणारे प्राणी व माणसाळलेले व जंगली पशू उत्पन्न झाले.

(९) त्या विश्वव्यापक यज्ञापासून ऋचा, सामन्, काव्यचरणे, वृत्ते आणि यजु निर्माण झाली.

(१०) त्याच्यापासून घोडे, ज्यांना दातांच्या दोन पंक्ती आहेत असे पशू उत्पन्न झाले; त्यांच्यापासून गाय उत्पन्न झाली, त्याच्यापासून शेळ्या-मेंढ्या उत्पन्न झाल्या.

(११) जेव्हा देवांनी पुरुषाला तोडले तेव्हा त्यांनी त्याचे किती तुकडे केले? त्या तुकड्यांपैकी कोणता तुकडा त्याचे तोंड होता? कोणते तुकडे त्याचे बाहू होते? कोणते तुकडे त्याच्या मांड्या व पाय होते?

(१२) ब्राह्मण त्याचे तोंड होते, राजन्याला त्याचे बाहू केले., वैश्य म्हणून कोणी होता त्याच्या मांड्या झाल्या. शूद्र त्याच्या पायापासून उत्पन्न झाला.

(१३) चंद्र त्याच्या आत्म्यातून उत्पन्न झाला, सूर्य त्याच्या डोळ्यांपासून, इंद्र व अग्नी त्याच्या मुखातून आणि वायू त्याच्या श्वासोच्छ्वासापासून.

(१४) त्याच्या बेंबीपासून हवा उत्पन्न झाली. त्याच्या डोक्यापासून आकाश, त्याच्या पायापासून जमीन, त्याच्या कानापासून (चार) दिशा, अशारीतीने देवांनी जग उत्पन्न केले.

(१५) यज्ञ करीत असलेल्या देवांनी जेव्हा बळी म्हणून पुरुषाला बांधले तेव्हा अग्नीभोवती सात काठ्या उभ्या रोवलेल्या होत्या. आणि त्या काठ्यांपासून २१ तुकडे सर्पण म्हणून तयार केले.

(१६) या यज्ञात आहुती देऊन देवांनी यज्ञ केला. हे फार प्राचीन कालाचे यज्ञ-विधी होत. या मोठ्या शक्तींनी आकाश व्यापले. तेथे पूर्वी संध्या देवता रहात असे.

(Muir's Original Sankrit Texts, Vol. I., P. 9)

पुरुषसूक्त म्हणजे जगाची उत्पत्ती कशी झाली, हे दाखविणारा एक सिद्धांत आहे. जगाची उत्पत्ती कशी झाली याबद्दलच्या काही ना काही स्वरूपाचा सिद्धांत प्रत्येक पुढारलेल्या देशात पुढे मांडण्यात आलेला आहे. इजिप्तच्या लोकांनी या बाबतीत जो सिद्धांत मांडलेला आहे तो पुरुषसूक्तात मांडलेल्या सिद्धांताच्या स्वरूपाला जुळेल अशा तऱ्हेचा आहे. तो सिद्धांत (Encyclopaedia of Religion & Ethics Vol. IV, p. 145) असे म्हणतो की ख्नुमु या देवाने कुंभाराच्या चाकावर सर्व सजीव प्राण्यांना आकार दिला. जगात जे काही आहे ते सर्व त्याने उत्पन्न केले. तो सर्व जनकांचा जनक व सर्व मातांची माता आहे. त्याने मानव व देव निर्माण (तयार) केला. तो प्रारंभापासूनच सर्वांचा जनक आहे. स्वर्ग, पृथ्वी, पाताळ, पाणी, डोंगर इत्यादींचा तो जनक आहे. सर्व पक्षी, मासे, हिंस्रपशू, जनावरे आणि सर्व कीटक यांच्यात त्याने स्त्री व पुरुष निर्माण केले. इजिप्तच्या लोकांच्या विश्वोत्पत्तीच्या सिद्धांताला सिद्धांताला जुळेल अशा तऱ्हेचा सिद्धांत बायबलच्या जुन्या

करारांतील पहिल्या अध्यायात (विश्वोपत्ती) मांडलेला आहे.

जगाच्या उत्पत्तीसंबंधी जे सिद्धांत मांडण्यात आलेले आहेत त्यांना व्यावहारिक दृष्टीने फारसे महत्त्व नाही. जगाच्या उत्पत्तीसंबंधीची विद्यार्थ्यांची उत्सुकता शांत करणे आणि लहान मुलांच्या मनाची करमणूक करणे, यापलीकडे या सिद्धांताचा काही उपयोग होत नाही. पुरुषसूक्तात जो सिद्धांत माडलेला आहे त्यातील काही भाग कोणत्याही उपयोगाचे नाहीत असे म्हणता येईल. परंतु त्या सिद्धांतांतील सर्व भागांसंबंधी असे म्हणता येणार नाही. कारण पुरुषसूक्तातील सर्व श्लोक सारख्या महत्त्वाचे नाहीत. ११ व १२ हे श्लोक एका प्रकारात येतात व बाकीचे श्लोक दुसऱ्या प्रकारात येतात. ११ व १२ या श्लोकांशिवाय इतर श्लोक आहेत ते अव्यवहार्य वाटतात. त्यांच्यावर कोणाची मदार नाही. ते कोणा हिंदूंच्या स्मरणातही येत नाहीत. परंतु ११ व १२ हे श्लोक यांची गोष्ट निराळी आहे. विश्वजनकापासून (१) ब्राह्मण किंवा पुरोहित (२) क्षत्रिय किंवा योद्धे, (३) वैश्य किंवा व्यापारी, आणि (४) शूद्र किंवा नोकर, हे चार वर्ग कसे उत्पन्न झाले, याबद्दल प्रायः ११ व १२ हे श्लोक स्पष्टीकरण करतात. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, हे श्लोक केवळ विश्वोत्पत्तीचे स्पष्टीकरण करणारे आहेत, असे मानण्यात येत नाही. हे श्लोक म्हणजे कविकल्पनेतून उतरलेल्या भ्रमिष्टपणाच्या वल्गना होत, असे हिंदी आर्य समजत होते, असे मानणे म्हणजे घोडचूक करणे होय. या श्लोकांचा असा अभिप्रेत अर्थ मानण्यात आलेला आहे की, पुरुषसूक्तात जे चार वर्ग सांगितलेले आहेत त्याबरहुकूम समाजाची घटना करण्यात आली पाहिजे, अशी खुद्द परमेश्वराची इच्छा आहे. या श्लोकांमध्ये जी भाषा वापरण्यात आलेली आहे तीवरून शब्दशः वरीलप्रमाणे अर्थ निघत नाही हे खरे. परंतु विचारपरंपरेने हा अर्थ मानण्यात आलेला आहे, याबद्दल शंका नाही. सूक्त रचण्यात सूक्तकारांचा जो हेतू होता त्या हेतूशी विचारपरंपरेने मानलेला ११ व १२ या श्लोकांचा अर्थ जुळतो, असे म्हटले तर खरोखरच चूक होणार नाही. म्हणून हे श्लोक म्हणजे जगाच्या उत्पत्तीचा सिद्धांत स्पष्ट करणारे केवळ श्लोक आहेत, असे समजून स्वस्थ बसणे ठीक नाही. समाजाची रचना एका विशिष्ट स्वरूपात झाली पाहिजे, अशा अर्थाचा स्पष्ट परमेश्वरी संदेश त्या श्लोकांत ग्रथित केलेला आहे, हे या श्लोकांचे वैशिष्ट्यच लक्षात घेतले पाहिजे. पुरुषसूक्तात समाजाची जी रचना सांगितलेली आहे तिला चातुर्वर्ण्य समजले जाते. परमेश्वरी संदेशाप्रमाणे चातुर्वर्ण्य उत्पन्न झालेले आहे म्हणून त्याला हिंदी-आर्य समाजात अढळ स्थान प्राप्त झालेले आहे, हे नैसर्गिक होय. हिंदी-आर्य समाज आपल्या प्राथमिक अवस्थेत होता तेव्हा त्याने आपली रचना चातुर्वर्ण्याच्या मुशीत तयार करून घेतली. हिंदी-आर्य समाजाचा आकार व घडण ही चातुर्वर्ण्यामुळे विशिष्ट स्वरूपात राहिलेली आहेत.

हिंदी-आर्य समाजाला चातुर्वर्ण्याबद्दल जो नितांत आदर उत्पन्न झाला त्याबद्दल जितके बोलावे व लिहावे तितके थोडे आहे. हिंदी-आर्य समाजावर चातुर्वर्ण्याची जी पकड बसली आहे ती सोडविणे दुरापास्त होय. पुरुषसूक्ताने जी समाजाची रचना प्रतिपादिलेली आहे तिच्याविरुद्ध बुद्धाशिवाय कोणीही ब्र काढलेला नाही. खुद्द बुद्धाला ती रचना धरून

गदगदा हालविता आली नाही. याचे साधे कारण असे की, बुद्ध धर्माची चलती असताना आणि त्यानंतरही बरेच समाजनियमक उत्पन्न झाले. पण त्यांनी पुरुषसूक्ताने जी समाजरचना सांगितलेली होती, तिला उचलून धरले. एवढेच नव्हे तर, ती रचना भरभक्कम व्हावी म्हणून त्यांनी तिच्यात अनेक प्रकारच्या भरीव योजना घुसडून दिल्या व त्यांना लोकांचा पाठिंबा मिळविला. पुरुषसूक्तातील समाजरचनेला समाजनियमकांनी कसे उचलून धरले याबद्दलची पुष्कळ उदाहरणे देता येतील. यासंबंधी आपस्तंब धर्मसूत्र आणि वसिष्ठ धर्मसूत्र यातील उदाहरणे देता येतील. आपस्तंब धर्मसूत्रात म्हटले आहे की;

''ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा चार जाती आहेत. यांच्यात प्रत्येक प्रथमची जात तिच्या पुढच्या जातीपेक्षा जन्माने श्रेष्ठ आहे. (प्रश्न १ 'पाताळ १, खंड १, सूत्रे ४-५). शूद्र जात वगळून बाकीच्या सर्व जातींना आणि ज्यांनी वाईट कृत्ये केली असतील अशा ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या लोकांना वगळून बाकीच्या सर्व जातींतील लोकांना (१) उपनयन (२) वेदाभ्यास व (३) यज्ञकर्मे याबद्दल अधिकार आहेत.'' (प्रश्न १, पाताळ १, खंड १, सूत्र ६)

याच गोष्टी वसिष्ठ धर्मसूत्रांत सांगितलेल्या आहेत.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा चार जाती (वर्ण) आहेत.

ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य जातींना द्विज म्हणतात.

त्यांचा पहिला जन्म त्यांच्या मातेपासून; दुसरा जन्म उपनयन विधीपासून. दुसऱ्या जन्मात सावित्री ही त्यांची माता व गुरू हा पिता.

गुरूला पिता म्हणतात कारण तो वेदाभ्यासाला मदत करतो. (अध्याय २, सूत्रे १-४) प्रत्येक जातीची उत्पत्ती आणि विशिष्ट धर्मकृत्ये यामुळे चार जाती परस्परांपासून भिन्न झालेल्या आहेत. वेदांत पुढील भाग आहे, ''ब्राह्मण त्याचे मुख होता, क्षत्रिय त्याचे बाहू होता, वैश्य त्याच्या मांड्या शूद्र त्याच्या पायापासून उत्पन्न झाले.''

पुढील भागात असे म्हटले आहे की, ''शूद्राला धर्मकृत्ये करण्याचा अधिकार नाही.''

पुरुषसूक्तात सांगितलेल्या समाजरचनेच्या पावित्र्याबद्दल, थोडेसे का होईना, प्रतिकूल मत प्रदर्शित केले त्या सर्वांना हिंदू समाजाचा शिल्पकार मनू याने नेस्तनाबूत केलेले आहे. कारण मनूने दोन गोष्टी केल्या. पुरुषसूक्तात सांगितलेली समाजरचना ही परमेश्वराच्या इच्छेनुसार झालेली आहे असे आग्रहपूर्वक प्रतिपादन करण्याचा त्याने सपाटा चालविला, ही पहिली गोष्ट तो म्हणतो;

''तिन्ही लोकांच्या सुखासाठी परमेश्वराने आपल्या मुखापासून, बाहूंपासून, मांड्यांपासून आणि पायांपासून ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य व शूद्र हे उत्पन्न केले (मनुस्मृती अध्याय १, श्लोक ३१).

ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य यांच्यामुळे द्विज जाती उत्पन्न होतात; परंतु चवथा वर्ग जो शूद्र याला एकच जन्म आहे.'' (मनुस्मृती अध्याय १०, श्लोक ४)

अशाप्रकारची विचारसरणी प्रकट करण्यात मनू आपल्या पूर्वीच्या समाजनियमकांचे अनुकरण करीत होता, याबद्दल प्रकट शंका नाही परंतु तो त्यांच्याही पुढे एक पाऊल गेला होता.

''धर्माला अधिकृत आधार देणारी एकुलती एक व शेवटची गोष्ट जर कोणती असेल तर ती वेद होय.'' असा मनूने दुसरा सिद्धांत मांडला. (मनु, अध्याय २, श्लोक २, श्लोक ६) पुरुषसूक्त हे वेदाचेच एक अंग आहे, हे ध्यानात ठेवले तर हे सहज लक्षात येईल की, पुरुषसूक्तात चातुर्वर्ण्य म्हणून समाजरचनेचा जो एक आदर्श मांडलेला होता त्याला मनूने परमेश्वरी इच्छेचा आणि अचूकपणाचा मुलामा दिला. चातुर्वर्ण्याला हा मुलामा मनूच्या पूर्वी कोणी दिलेला नव्हता.

२

पुरुषसूक्ताची निर्विकार मनाने छाननी करणे किती अगत्याचे आहे, हे वरील गोष्टींकडे पाहिले तर दिसून येईल.

हिंदू लोक मोठ्या आग्रहाने सांगतात की, पुरुषसूक्त हे निरुपम आहे. पुरुषसूक्तात निवेदन केलेली समाजरचना ही एक कल्पना आहे. ज्या काळी जगातील अखिल मानवी समाज अगदी मूळच्या वन्य स्थितीत होता व आजच्या सुधारलेल्या जगातील उत्तमोत्तम विचारप्रवाहातील एक थेंबही त्याच्या अंगावर पडलेला नव्हता, तेव्हा पुरुषसूक्तातील समाजरचनेची कल्पना उत्पन्न झाली.

ही कल्पना अद्वितीय अतएव अनुपमेय आहे, असा तिच्याबद्दल दावा करणे म्हणजे निव्वळ थोतांड होय. चातुर्वर्ण्यात निवेदन केलेला समाजरचनेचा आदर्श अनुपमेय आहे व त्या आदर्शाला पुरुषसूक्त उचलून धरते, म्हणून पुरुषसूक्त अनुपमेय होय, अशाप्रकारची मुख्य विचारसरणी 'पुरुषसूक्त अनुपमेय आहे' हे सांगण्यासाठी पुढे मांडण्यात येते. परंतु ही विचारसरणी कितपत टिकू शकते? वर्गहीन समाज हच आदर्शमय समाज होय, अशी भूमिका पुरुषसूक्ताने घेतली असती तर पुरुषसूक्त अनुपमेय आहे, असे म्हणता आले असते. पण पुरुषसूक्त काय करते? निरनिराळ्या वर्गाचा मिळून एक समाज असावा व असला समाज हाच आदर्शभूत होय, अशी पुरुषसूक्ताची शिकवण आहे. अशाप्रकारच्या सूक्ताला अनुपमेय म्हणावे काय' या प्रश्नाचे अस्तिपक्षी उत्तर फक्त स्वतःला राष्ट्रवादी व देशभक्त म्हणविणारेच देऊ शकतील. अगदी वन्यावस्थेत नसलेल्या प्रत्येक समाजाची अशी वस्तुस्थिती आहे की, त्याच्यात निरनिराळे वर्ग असणे हे त्या समाजाच्या अस्तित्वाला जरूर आहे साधारणपणे सुधारलेल्या अवस्थेत जे समाज जगात आहेत त्यांची स्थिती अशीच आहे.

या दृष्टीने जगातील सर्व समाजांकडे पाहिले तर असे दिसून येते की, हिंदी-आर्य समाजात जे वर्ग होते त्यांना मान्यता देऊन निरनिराळ्या वर्गांनी मिळून समाज तयार होतो व असला समाजच आदर्शभूत होय, असे प्रतिपादन करण्यात पुरुषसूक्ताने कोणता अनुपमेयपणा दाखविला आहे?

उपरिनिर्दिष्ट विचारसरणी बाजूला सारली तर पुरुषसूक्त अद्वितीय आहे, असे कबूल करावे लागते. पण त्याची कारणे अगदी निराळी आहेत. पुरुषसूक्त हे अद्वितीय आहे, याची खरी कारणे काय आहेत, याबद्दलची माहिती बऱ्याच लोकांना नाही, ही या बाबतीत एक दुर्दैवाची गोष्ट आहे. परंतु लोकांना या खऱ्या कारणांची एकदा माहिती झाली तर ते पुरुषसूक्त ही मानवी बुद्धीतून उतरलेली एक अजब चीज आहे, हे कबूल करण्यास का कू करणार नाहीत; एवढेच नव्हे तर ती चीज म्हणजे मानवी बुद्धीने निर्माण केलेली एक असाधारण करामत होय, हे ओळखल्यानंतर त्यांच्या मनाला आश्चर्ययुक्त भीतीचा धसकाच बसेल.

पुरुषसूक्ताने जी समाजरचना आदर्शभूत म्हणून सांगितलेली आहे त्याची अशी काही वैशिष्ट्ये असली पाहिजेत की, त्या वैशिष्ट्यांमुळे पुरुषसूक्ताला अद्वितीय समजण्यात येते ती वैशिष्ट्ये कोणती? प्रत्येक समाज निरनिराळ्या वर्गांनी तयार होतो. हे वर्ग म्हणजे प्रत्येक समाजाचे मूलग्राही घटक होत. तरीपण कोणत्याही समाजाने या घटकांचे रूपांतर आपल्या घटनेचे एक कायदेशीर अंग म्हणून केलेले नाही, किंवा हे रूपांतरित घटक समाजरचनेच्या आदर्शाला बळकटी आणणारे आहेत असा दावा कोणत्याही समाजाने मांडलेला नाही. पुरुषसूक्तात सांगितलेली समाजरचना ही वस्तुस्थितनिदर्शक आहे, पण तिला आदर्शभूत स्वरूप दिलेले आहे आणि हेच पुरुषसूक्तांचे एक असाधारण वैशिष्ट्य आहे. दुसरे वैशिष्ट्य असे की, निरनिराळ्या वर्गांचा मिळून समाज तयार होतो, या गोष्टीला कायदेशीरपणा देऊन ती गोष्ट समाजरचनेचा आदर्श म्हणून मानण्याचे कृत्य कोणत्याही जातीने केलेले नाही, ते पुरुषसूक्ताने केलेले आहे. यासंबंधी ग्रीक लोकांचे उदाहरण देता येईल. समाज निरनिराळ्या वर्गांनी तयार केला पाहिजे व अशाप्रकारचा समाजनिर्मितीचा मार्ग हाच समाजघटनेचा आदर्श होय, असा खुद्द प्लेटो याने समाजधारणेबद्दलचा आपला सिद्धांत मांडलेला होता. परंतु या सिद्धांतास कायद्याचा पाठिंबा देऊन त्याचे असितत्व टिकविण्याचा उपद्व्याप ग्रीक लोकांनी कधीच केला नाही. पुरुषसूक्त हे जगात एकच असे उदाहरण दिसते की, त्यात समाजरचनेच्या आदर्शाला कायदेशीरपणा आणून तो आदर्श चिरायू करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. पुरुषसूक्ताचे तिसरे वैशिष्ट्य हे की, निरनिराळ्या वर्गांचा मिळून समाज होतो व हे वर्गमिश्रण समाजरचनेचा आदर्श होय, हे धर्मविहीन तत्त्व होय, असे कोणत्याही समाजाने मान्य केलेले नाही. फारतर वर्गमिश्रण ही समाजरचनेतील एक साहजिक घटना होय, हे सर्व समाजांनी मान्य केलेले आहे. पुरुषसूक्ताने याच्याही पुढे आघाडी मारलेली आहे. वर्गमिश्रण हे समाजरचनेतील एक साहजिक व आदर्शमय घटना आहे, एवढेच पुरुषसूक्त मानीत नाही, तर वर्गमिश्रण ही परमेश्वरी इच्छेनुरूप झालेली घटना आहे व ती पवित्र आहे, असे पुरुषसूक्त मानते. पुरुषसूक्ताचे चवथे वैशिष्ट्य असे की, आत्तापर्यंत जे समाज होऊन गेले त्या समाजात अशी कधीही ठाम समजूत रूढ झालेली नव्हती की, आपल्यातील वर्ग एका मर्यादित संख्येतच असावेत. रोमन लोकांत दोन वर्ग होते, इजिप्तच्या लोकांना तीन वर्ग पुरे वाटत होते. हिंदी-इराणी लोकांमध्येसुद्धा तीनपेक्षा जास्त वर्ग नव्हते – (Geiger, Civilization of the Eastern Iranians in Ancient Times,

Vol. II, p. 64) (१) आथ्रव (पुरोहित), (२) रथेष्ठर (क्षत्रिय) आणि (३) वस्त्य – पशूयाट (शेतकरी) पुरुषसूक्ताने निवेदिलेली समाजरचना समाजाचे चार वर्ग करते. या कृत्याच्या पाठीमागे जी भूमिका आहे ती धर्मविहित तत्त्वावर अधिष्ठित झालेली आहे. म्हणजे हे चार वर्ग होणे हे धर्मानुसार होय, असे पुरुषसूक्ताचे म्हणणे आहे. यापेक्षा कमीजास्त अर्थ पुरुषसूक्तातून काढता येत नाही. पुरुषसूक्ताने पाचवे वैशिष्ट्य असे की, निरनिराळ्या परिस्थितीत प्रत्येक समाजात जी घडामोड होत असते तीप्रमाणे प्रत्येक वर्ग इतर वर्गांशी आपले नाते कोणत्या दर्जाचे आहे हे ठरवीत असतो व हे ठरविण्यास प्रत्येक समाज वर्गांना मुभा देतो. निरनिराळ्या वर्गांसंबंधी आदरभावाची चढती भांजणी आणि तिरस्कारभावाची उतरती भांजणी आपल्यात उत्पन्न करून त्यांना अधिकृत रीतीने पाठिंबा देणे व त्यांना चिरायू करणे ही कृत्ये कोणत्याही समाजाने केलेली नाहीत. पुरुषसूक्त समाजातील निरनिराळ्या वर्गांचा श्रेष्ठ–कनिष्ठ दर्जा ठरविते. अशाप्रकारे ठरविलेले दर्जे कोणत्याही परिस्थितीला किंवा काळाला येत नाहीत. या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या तर पुरुषसूक्त अद्वितीय आहे, असे म्हणावे लागते. निरनिराळे वर्ग एकाच दर्जाचे असू शकत नाहीत, या तत्त्वाला धरूनच ते वर्ग श्रेष्ठ वा कनिष्ठ ठरविलेले आहेत; व त्यांच्या दर्जाच्या पायऱ्या ठरविलेल्या आहेत. या वर्गीकरणाप्रमाणे ब्राह्मणांना सर्व वर्गांपेक्षा श्रेष्ठत्व दिलेले आहे. क्षत्रियांचा दर्जा ब्राह्मणांच्या खाली, पण वैश्यांच्या आणि शूद्रांच्या वर, वैश्यांचा दर्जा क्षत्रियांच्या खाली पण शूद्रांच्या वर आणि शूद्रांचा दर्जा इतर सर्व वर्गांच्या खाली.

३

पुरुषसूक्त हे अद्वितीय का समजावे, याबद्दलची जी वर कारणे सांगितलेली आहेत तीच खरी कारणे धरली पाहिजेत. परंतु पुरुषसूक्त फक्त अद्वितीय आहे असे नव्हे, ते असमान्यही आहे. त्याच्यातून इतके कूट प्रश्न उत्पन्न होतात की सांगता सोय नाही. म्हणूनच त्याला असामान्य म्हणायचे. पुरुषसूक्तातून कोणते कूटप्रश्न उत्पन्न होतात याबद्दलची माहिती बहुतेकांना नाही. परंतु हे कूटप्रश्न कोणते आहेत, याबद्दलची माहिती करून घेण्याचा कोणती प्रयत्न केला तर त्या कूटप्रश्नांत खरा जिवंतपणा आणि मनाला थक्क करून सोडणारा संमिश्रपणा किती ओतप्रोत भरलेला आहे, याचा त्याला प्रत्यय येईल.

पुरुषसूक्तात जो विश्वोत्पत्तीसंबंधीचा सिद्धांत मांडलेला आहे तो तेवढा एकच सिद्धांत ऋग्वेदात आहे, असे नाही. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळाच्या ७२ व्या ऋचेत विश्वोत्पत्तीसंबंधीचा दुसरा एक सिद्धांत निवेदन केलेला आहे. तो असा (Wilson's Rig Veda, Vol, VI.p. 129)-

(१) आपण स्पष्ट आवाजात देवदेवतांची स्तुतिस्तोत्रे गाऊ या. स्तुतिस्तोत्रे गायल्यानंतर देवदेवता आपणावर संतुष्ट होतील.

(२) लोहार आपला भाता जसा हवेने भरतो, तसा ब्राह्मणस्पतीने आपल्या श्वासोच्छ्वासाने देवदेवतांच्या पिढ्या भरून टाकल्या.

(३) देवदेवतांच्या पहिल्या युगात सजीवांचा निर्जीवांतून जन्म झाला. त्यानंतर दिशांचा जन्म झाला, आणि त्याच्यानंतर झाडांचा जन्म झला.

(४) पृथ्वीचा जन्म झाडांपासून झाला, दिशांचा जन्म पृथ्वीपासून झाला, दक्षाचा जन्म अदितीपासून झाला अणि त्यानंतर अदितीचा जन्म दक्षापासून झाला.

(५) हे दक्षा! तुझी कन्या अदिती, तिचा जन्म झाला, तिच्या नंतर देवाचा जन्म झाला. ते देव पूजनीय व मृत्यूपासून सुटका झालेले होते.

(६) हे देवांनो! तुम्ही या उत्तम तऱ्हेने शृंगारलेल्या जलाशयात राहता. तुम्ही नृत्य करीत असता तुमच्या (पाया) पासून तिखट धूळ दूर उडून गेली.

(७) हे देवांनो! ज्याप्रमाणे मेघ पृथ्वीला पावसाने व्यापून टाकतात, त्याप्रमाणे तुम्ही आपल्या अंगकांतीने विश्वे भरून टाकली. तेव्हा तुम्ही महासागरात दडून बसलेला सूर्याला वर काढून आणले.

(८) अदितीला आठ मुलगे झाले. सात पुत्रांना घेऊन ती देवांकडे गेली. मार्तंडाला तिने पुढील उंच डोंगरावर पाठविले.

(९) सात मुलगे घेऊन अदिती पूर्वीच्या पिढीकडे गेली. परंतु तिने मार्तंडाला जो जन्म दिला तो जननमरणाच्या बंधनात तो मनुष्याप्रमाणे राहावा म्हणून.

विश्वोत्पत्तीसंबंधीचे जे दोन सिद्धांत आहेत ते तत्त्वाच्या तपशीलाच्या दृष्टीने परस्परांपासून भिन्न आहेत. निर्जीवातून सजीवांची उत्पत्ती झाली, असा एक सिद्धांत विश्वोत्पत्तीसंबंधी प्रतिपादन करतो आणि विश्वोत्पत्ती पुरुषापासून झाली असे दुसरा सिद्धांत प्रतिपादन करतो.

ऋग्वेदात अशा प्रकारचे विश्वोत्पत्तीसंबंधीचे परस्परभिन्न दोन सिद्धांत का प्रतिपादन करण्यात यावेत? पुरुष हा आदि मूळ जनक होय व त्यापासून सर्व चराचर विश्वाची उत्पत्ती झाली, अशी विचारसरणी मांडायची पुरुषसूक्ताच्या कर्त्याला आवश्यक का वाटले असावे?

पुरुषसूक्त वाचणाऱ्याला हे दिसून येईल की, गाढव, घोडे, बोकडे इत्यादींची उत्पत्ती कशी झाली, याबद्दलचा पहिल्यांदा त्यात उल्लेख केलेला आहे. सूक्ताच्या प्रारंभी मनुष्याच्या उत्पत्तीसंबंधी काही उल्लेख केलेला नाही, असेही त्याला आढळून येईल. निरनिराळ्या वस्तूंच्या व प्राण्यांच्या उत्पत्तीसंबंधी निवेदन करीत असता मनुष्यजातीच्या उत्पत्तीसंबंधीचा उल्लेख सूक्तात येणे क्रमप्राप्त होते. परंतु केवळ हा मुद्दा स्पष्ट करण्याची पाळी आली असताच सूक्तकाराने उत्पत्तीसंबंधीचे आपले निवेदन मध्येच सोडून दिले व एकदम पुढे उडी मारून आर्य समाजातील निरनिराळ्या वर्गांची उत्पत्ती कशी झाली, हे निवेदन करण्यास सुरुवात केली. आर्य समाजात चार वर्ग कसे उत्पन्न झाले, याबद्दल स्पष्टीकरण करणे, हेच खरोखर आपले आद्य कर्तव्य होय, असेच सूक्तकाराला वाटले असावे. पुरुषसूक्ताचा इतिहास अशाप्रकारचा असल्यामुळे सूक्त विश्वोत्तपत्तीच्या इतर सिद्धांतापासून व ऋग्वेदातील इतर भागांपासून काहीसे निराळ्या स्वरूपाचे आहे, हे खचित.

विश्वोत्पत्तीसंबंधी जे जे सिद्धांत अस्तित्वात आहेत यांपैकी एकाही सिद्धांताने

समाजातील निरनिराळे वर्ग कसे उत्पन्न झाले, हे दाखवून देणे हेच आपले कर्तव्य आहे, असे मानले नाही. पुरुषसूक्ताचे जे ध्येय व कार्य आहे, जवळ जवळ तेच ध्येय व कार्य बायबलच्या जुन्या करारातील विश्वोत्पत्तीसंबंधीच्या पहिल्या अध्यायाचे आहे. या अध्यायात मनुष्याची उत्पत्ती कशी झाली याचे वर्णन करण्यापलीकडे फारसा मजकूर नाही. सामाजिक दर्जाने विभागलेले वर्ग जगातील समाजात अस्तित्वात होते. जुन्या ज्यू लोकांच्या समाजातही असले वर्ग अस्तित्वात होते. हिंदी-आर्य समाज या बाबतीत अपवाद नव्हता. तथापि विश्वोत्पत्तीसंबंधीच्या एकाही सिद्धांताला समाजात वर्ग कसे उत्पन्न होतात याचा खुलासा करण्याची गरज वाटली नाही. तर मग सामाजिक वर्गाच्या उत्पत्तीचे स्पष्टीकरण करणे हेच आपले आद्य कर्तव्य आहे, असे पुरुषसूक्तकाराला का वाटले बरे?

विश्वोत्पत्तीसंबंधाचे स्पष्टीकरण करणारे पुरुषसूक्त हा ऋग्वेदातील या विषयासंबंधीचा एकुलता एक भाग नाही. ऋग्वेदातील इतर भागातही हा विषय हाताळलेला आहे. यासंबंधी ऋग्वेदातील इतर पुढील भाग पहा. (Muir, Vol. I, p. 180)

ऋग्वेद, १-९६-२ : प्रारंभीची निविद् यापासून व आयूचे बुद्धिचातुर्य यापासून अग्नीने मनुष्यांची मुले उत्पन्न केली; स्वतःच्या चकचकीत प्रकाशाने अग्नीने पृथ्वी आणि पाणी ही उत्पन्न केली; संपत्ती देणाऱ्या अग्नीला देवांनी वाढविले.''

ऋग्वेदकाळात हिंदी-आर्य समाजात निरनिराळे वर्ग उत्पन्न झालेले होते, याबद्दल काही शंका नाही. तरीपण वरील ऋचांत निरनिराळ्या वर्गांची उत्पत्ती कशी झाली याबद्दलचा उल्लेख आढळत नाही. एवढेच नव्हे तर, ऋग्वेदातील उपरिनिर्दिष्ट ऋचा हिंदी-आर्य समाजातील वर्गाच्या अस्तित्वाबद्दल कानाडोळा करते. परंतु ती ऋचा मनुष्यांची उत्पत्ती कशी झाली, याबद्दल खुलासा करते. एक पाऊल पुढे जाऊन निरनिराळ्या वर्गांची उत्पत्ती कशी झाली, याबद्दल खुलासा करण्याची गरज सूक्तकाराला का वाटली?

पुरुषसूक्त दुसऱ्या एका बाबतीत ऋग्वेदातील मताविरुद्ध मत प्रदर्शित करते. हिंदी-आर्य लोकांची उत्पत्ती कशी झाली, याबद्दल ऋग्वेदाने एक धर्मभावनाविरहित सिद्धांत प्रतिपादन केलेला आहे. तो खालील संदर्भावरून कळून येईल –

(१) ऋग्वेद, १-८०-१६ : ''अथर्वन, जनकमनू आणि दध्यंच यांनी जो समारंभ केला, त्यात आणि इंद्रांत पूर्वी प्रार्थना व स्तोत्रे सामाविलेली होती.'' (Muir, Vol. I, p. 162)

(२) ऋग्वेद १-११४-२ : ''यज्ञ करून जनकमनूने जे वैभव किंवा परमेश्वरी आधार ही मिळविली, ती सर्व, हे रुद्रा! आम्हाला तुझ्या मार्गदर्शनाने मिळोत!'' (Muir, Vol. I. p. 163)

(३) ऋग्वेद, २-३३-१३ : ''हे मरुदेवांनो! तुमची लोकांना उपकारक होणारी पवित्र कर्मसाधने, हे सर्व शक्तिमान देवांनो! सर्वांत जास्त मंगलमय, हितकारक आणि ज्यांचा आमचा जनकमनू याचे स्वीकार केला ती आणि रुद्राचा आशीर्वाद व सहाय्य यांची मी इच्छा करतो.'' (Muir, Vol. I. p. 163)

(४) ऋग्वेद, ८-५२-१ : ''प्राचीन काळचा मित्र सर्वशक्तिमान् देवाच्या सामर्थ्याने युक्त झालेला आहे. देवांच्या सान्निध्यात प्रवेश मिळविण्याचे साधन म्हणून जनकमनू यांनी त्या मित्रासंबंधी स्तोत्रे रचिली आहे.'' (Muir, Vol. I, p. 163)

(५) ऋग्वेद, ३-३-६ : ''अग्नीने देव आणि मनुष्यांची मुले यांच्यासह स्तोत्रे गाऊन अनेक प्रकारचे यज्ञ केले.'' (Muir, Vol. I, p. 165)

(६) ऋग्वेद, ४-३७-१ : ''हे देवांनो! वजांनो! आण रिंभुक्षण हो! ज्या मार्गांनी देव आमच्या यज्ञांकडे आले, त्याच मार्गांनी तुम्हीही आमच्या यज्ञांकडे या. हे आनंददायक देवतांनो! जेवढे म्हणून मंगलमय दिवस आहेत त्या दिवशी मनुष्यांच्या लोकांनी यज्ञ करावेत अशी प्रथा पाडा.'' (Muir, Vol. I, p. 165)

(७) ऋग्वेद, ६-१४-२ : ''मनुष्यांचे लोक आशीर्वाद देणारा अग्नी यांची यज्ञात प्रार्थनामय प्रशंसा करतात.'' (Muir, Vol. I, p. 165)

ऋग्वेदातील ऋचा ज्य ऋषींनी रचिल्या त्यांनी मनू हा हिंदी आर्य समाजाचा आदिपुरुष होय, ही भावना आपल्या हृदयाशी कवटाळलेली होती, हे ऋग्वेदांतील जे संदर्भ वर उद्धृत केलेले आहेत, त्यावरून दिसून येईल. मनू हाही हिंदी-आर्य समाजाचा मूळ पुरुष होय. या सिद्धांताची पाळेमुळे इतकी खोल रूजलेली होती की, ब्राह्मण व पुराणे यांनीही त्या सिद्धांताला आपापल्या काळात उचलून धरले. **ऐतरेय ब्राह्मण (Muir, Vol. I, p. 108) विष्णू पुराण (Muir, Vol. I, pp. 105-107), आणि मत्स्य (Muir, Vol. I, pp. 110-112), यामध्ये या सिद्धांताचे स्पष्टीकरण केलेले आहे. मनूचा जनक ब्रह्मा होय, अशी भूमिका त्या ग्रंथांनी मांडलेली आहे, हे खरे; तरी पण मनू हा मानवजातीचा मूळ पुरुष आहे, हे ऋग्वेदांत मांडलेला सिद्धांत या ग्रंथांनी मान्य केलेला आहे व त्याला त्यांनी उचलून धरलेले आहे.** (तपशीलासंबंधी जास्त चौकशी करताना मात्र असे आढळून येते की या ग्रंथात सदर सिद्धांताबद्दल फार घोटाळे उत्पन्न केलेले आहेत. विष्णू पुराण म्हणते की, ब्रह्मदेवाने आपल्या शरीराचे दोन तुकडे केले. एका तुकड्यातून पुरुषाचे व दुसऱ्यातून स्त्रीचे रूप त्याने धारण केले. त्या स्त्रीला सतरूपा हे नाव दिले. तिने फार दिवस घोर तपश्चर्या करून स्वतःसाठी पती मिळविला. त्याचे नाव मनुस्वयंभू. ब्रह्मदेवाने आपल्या कन्येबरोबर शरीरसंबंध केला, याबद्दलचा उल्लेख विष्णू पुराणात नाही, तथापि आपली कन्या सतरूपा हिच्याबरोबर शरीरसंबंध करून ब्रह्मदेवाने मनूला जन्म दिला, याबद्दलचे उल्लेख ऐतरेय ब्राह्मण व मत्स्य पुराण यामध्ये सापडतात. याशिवाय मत्स्य पुराणात असा उल्लेख सापडतो की, मनूने घोर तपश्चर्या करून स्वतःला सुंदर पत्नी मिळविली. तिचे नाव अनंता, **रामायणात (Muir, Vol. I, p. 117) असा उल्लेख सापडतो की, मनु पुरुष नसून स्त्री होती. ती दक्ष प्रजापतीची मुलगी व काश्यपाची पत्नी होती.** पुरुषसूक्त मनुसंबंधी उल्लेख का करीत नाही? मनूस्वयंभूला विराज अणि विराजाला आदि म्हणून नावे होती, हे सूक्तकाराला माहीत होते; कारण सूक्ताच्या पाचव्या श्लोकात सूक्तकार म्हणतो की, ''विराजो अधि पुरुषः'' अशी वस्तुस्थिती असता सूक्तकाराने सूक्तात मनूसंबंधी काहीच उल्लेख केलेला

नाही, हेच चमत्कारिक दिसते.

ऋग्वेदांत जो विश्वोत्पत्तीचा सिद्धांत मांडलेला आहे त्याच्यापलीकडे पुरुषसूक्तांतील सिद्धांताने मजल मारलेली आहे, हा तिसरा मुद्दा होय. समाजाच्या सुख-सोयींसाठी श्रमविभाग करणे जरूर आहे, एवढे आकलन करण्याइतकी संस्कृती वैदिक काळातील आर्यांमध्ये प्रसृत झालेली होती. वैदिक काळातील आर्यांमध्ये निरनिराळे लोक निरनिराळे उद्योगधंदे करीत असत. प्रत्येकाने निरनिराळे उद्योगधंदे करणे इष्ट आहे, याची जाणीव आर्यांना होती, हे पुढील संदर्भावरून दिसून येईल –

ऋग्वेद, १-११३ -६ ''लोकांनी आपापल्या उद्योग धंद्याला लागावे व स्वतःचे उदरभरण करावे, म्हणून उषा देवीनी लोकांना झोपेतून उठविले आहे. काही लोकांनी उठल्यानंतर सत्ता काबीज करण्यास जावे, काहीनी कीर्ती मिळविण्यास बाहेर पडावे, काहींनी संपत्ती मिळवून आणण्यासाठी जावे आणि काहींनी नोकरी मिळविण्यास जावे.

वरील संदर्भ ऋग्वेदांत मिळतो. पुरुषसूक्ताने त्याच्याही पुढे मजल मारलेली आहे. ऋग्वेदात मांडलेल्या श्रमविभागाच्या कल्पनेला पुरुषसूक्त उचलून धरले. पण त्यानंतर पुरुषसूक्त त्या कल्पनेला अशी कलाटणी देते की, समाजातील काही लोकांनी एका विशिष्ट प्रकारचे, धंदे आपलेसे करून घ्यावेत व ते त्यांनी पिढ्यान् पिढ्या करीत राहिले पाहिजे, एकदा स्वीकारलेले धंदे सदर लोकांनी आधीमधी कधीही बदलता येणार नाहीत. अशाप्रकारची प्रथा समाजात रूढ करण्याचा विक्षिप्त खटाटोप पुरुषसूक्ताने का केला असावा बरे?

ऋग्वेदात मांडलेला सिद्धांत आणि पुरुषसूक्ताने मांडलेला सिद्धांत यांच्यात आणखी एका मुद्द्यासंबंधी फरक आहे. हिंदी-आर्य समाज तसेच हिंदी आर्य राष्ट्र याबद्दल ऋग्वेदात उल्लेख आढळतात. पाच टोळ्यांच्या जमावाने हे राष्ट्र झालेले होते. पाच टोळ्यांचा मिळून हिंदी-आर्य समाज झालेला होता. या पाच टोळ्या परस्परात कशा मिसळलेल्या होत्या व त्यांच्या मिश्रणाने हिंदी-आर्य समाज हा एकच एक समाज म्हणून कसा बळकट झालेला होता, याबद्दलचे उल्लेख खालील ऋचांत सापडतात –

(१) ऋग्वेद, ६-११-४ : ''अग्नीच्या पुढे हवन केलेल्या वस्तूंचे ढिगारे पडलेले आहेत. अग्नी हा जणू काही एक माणूस आहे, अशी कल्पना करून पाच टोळ्यांतील लोकांनी त्याच्यापुढे हवन करण्यास आणलेल्या वस्तूंचे ढीग उभे केले व त्याच्यापुढे साष्टांग प्रणिपात करून त्यांनी त्यांचा सादर सत्कार केला.'' (Muir, Vol. I, p. 177).

(२) ऋग्वेद, ७-१५-२ – ''अग्नी हा शहाणा व तरुण घरमालक झालेला आहे. पाच टोळ्यांतील प्रत्येक घरात त्याने आपले ठाण मांडून घेतलेले आहे.'' (Muir, Vol. I, p. 178).

या पाच टोळ्या कोणत्या त्याबद्दल विद्वान लोकांत काहीसा मतभेद आहे. आपल्या निरुक्तात यास्क म्हणतो की, या पाच टोळ्या महणजे गंधर्व, पितृ, देव, असूर आणि राक्षस हे लोक होत. औपमन्य याच्या मते या पाच टोळ्या म्हणजे चार वर्ण व निषाद लोक हे होत. पाच टोळ्यांसंबंधीचे वरील दोन्ही खुलासे दिशाभूल करणारे आहेत असे दिसते. कारण की,

ऋग्वेदातील काही या ऋचांमध्ये पाच टोळ्यांचा सामुदायिक रीतीने प्रशंसापर उल्लेख केलेला आहे' या बाबतीत खालील संदर्भ पहा –

(१) ऋग्वेद, २-२-१० – "ज्याच्या बरोबर कोणी तुलना करू शकणार नाही असा स्वर्ग ज्याप्रमाणे दीप्तमान भासतो त्याप्रमाणे आम्हा पाच टोळ्यातील लोकांचे वैभव एकसारखे प्रकाशमान होवो!' (Muir, Vol. I, p. 178).

(२) ऋग्वेद, ६-४६-७ – "हे इंद्रा! नहुषाच्या टोळीतील लोकांचा जो जोम व उत्साह आहे तो किंवा पाच टोळ्यांतील लोकांचे जे काही वैभव आहे, ते आम्हाला दे." (Muir, Vol. I, p. 180).

पाच टोळ्यांच्यात शूद्रांचा जर समावेश असता तर या टोळ्यांबद्दल इतकी प्रशंसा ऋग्वेदात कमी नसती. याशिवाय दुसरे कारण असे की, ऋग्वेदातील उपरिनिर्दिष्ट ऋचात 'जन' हा शब्द वापरलेला आहे 'वर्ण' हा शब्द वापरलेला नाही. 'जन' हा शब्द पाच टोळ्यांना उद्देशून वापरलेला आहे तो शब्द चार वर्ण व निषाद यांना उद्देशून वापरलेला नाही. ही वस्तुस्थिती ऋग्वेदातील खालील ऋचांवरून सिद्ध होते –

ऋग्वेद, १-१०८-८ : "हे इंद्र व अग्नी! यदू, तुर्वास, द्रुह्य अनु, पुरु या लोकांमध्ये तुमचा निवास असेल तर तुमी सर्व ठिकाणचे बलशाली वीर घेऊन येथे या व हा आताच तयार केलेला सोमरस प्या." (Muir, Vol. I, p. 179) पाच टोळ्यांचे संमिश्रण होऊन त्यातून आर्य समाजाची घटना झाली, हे अथर्ववेदातील (३-२४-२). संदर्भावरून स्पष्ट होते. तो संदर्भ असा –

'हे पाच प्रदेश, मनूपासून या पाच टोळ्या उत्पन्न झाल्या."

मानवी समाजात ऐक्यभाव आप्तसंबंधीची भावना यांच्या दृष्टिकोनातून पाहिले तरच ऋग्वेदातील ऋचांचे कर्ते जे ऋषी त्यांनी या पाच टोळ्यांसंबंधी वर सांगितलेल्याप्रमाणे जे उल्लेख केलेले आहेत ते का केले, याचा उलगडा होणे शक्य आहे. या बाबतीत काही प्रश्न उपस्थित होतात. पाच टोळ्यांचे संमिश्र एकीकरण झालेले होते ही बाब पुरुषसूक्ताने का मान्य केलेली नाही; आणि त्या टोळ्यांच्या उत्पत्तीसंबंधी शास्त्रीय दृष्टीने स्पष्टीकरण का केलेले नाही? उलट अंशी, पाच टोळ्यांत जे जातीविभाग पडलेले होते त्याच्याबद्दल पुरुषसूक्ताने मान्यता दर्शविली आहे, ती का? राष्ट्रीय भावनेपेक्षा जातीय भावना जास्त महत्त्वाची आहे, असे मत पुरुषसूक्ताने का प्रगट केले?

ऋग्वेदात मांडलेल्या विश्वोत्पत्तीसंबंधीच्या सिद्धांताबरोबर पुरुषसूक्तात मांडलेल्या सिद्धांताची तुलना कोणी करू पाहील तर त्यांच्यापुढे पुरुषसूक्तासंबंधीच वर सांगितलेल्या मासल्याचे काही कूटप्रश्न उभे राहतील. समाजशास्त्राच्या दृष्टीने जर कोणी पुरुषसूक्ताची छाननी करू लागला तर त्याच्यापुढे पुरुषसूक्तासंबंधी दुसरेही कूटप्रश्न उभे राहतील.

एका विशिष्ट प्रकारचा आयुष्याचा दर्जा ध्येय म्हणून पुढे ठेवणे हे चांगले तसेच आवश्यक आहे. असला दर्जा एखाद्या माणसाने किंवा समाजाने पुढे ठेवला नाही तर त्या माणसाचे किंवा समाजाचे जीवन व्यर्थ होय. परंतु हा दर्जा असा असावा की काळ आणि

परिस्थिती यांच्यात जसा फेरबदल होत जाईल त्याप्रमाणे तो बदलत गेला पाहिजे. दर्जा हा कायम स्वरूपात कधीही ठरविलेला नसतो. आपल्या दर्जाचा बरेवाईटपणा कितपत आहे हे ठरविण्यास भरपूर वाव मिळाला पाहिजे. जेव्हा एखाद्या गोष्टीवर पावित्र्याचा रंग चोपडलेला नसतो तेव्हाच त्या गोष्टीचा बरेवाईटपणा पहाण्यास माणूस धजतो. एखाद्या गोष्टीला पवित्रपणा चिकटविला की तो कायमचा चिकटतो. चातुर्वर्ण्याला पवित्रपणा चिकटवून चातुर्वर्ण्य म्हणजे एक पवित्र घटना, परमेश्वरी इच्छेने घडलेली एक समाजघटना होय, असे पुरुषसूक्ताने चातुर्वर्ण्याचे मंडन केलेले आहे. एका विशिष्ट पद्धतीच्या सामाजिक रचनेला इतका पवित्रपणा, पुरुषसूक्ताने दिलेला आहे की त्या समाजरचनेविरुद्ध कोणी अवाक्षर काढू नये किंवा तीत काडीचाही फेरफार कोणी करू नये. पुरुषसूक्ताने हे कशासाठी केले? समाजशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांपुढे पुरुषसूक्ताबाबतचा हा पहिला कूटप्रश्न उभा राहतो.

चातुर्वर्ण्याचा सिद्धांत प्रतिपादन करताना पुरुषसूक्त दुहेरी डाव खेळलेले आहे. हिंदी आर्य समाजात जे चार वर्ग अस्तित्वात होते त्यांची त्याने आदर्शमय ठिकाणी स्थापना पहिल्यांदा केली. सूक्ताचे हे कृत्य शुद्ध फसवणुकीचे आहे. कारण चातुर्वर्ण्याबद्दलची वस्तुस्थिती आणि त्याला दिलेले आदर्शवत स्थान यामध्ये फरक नव्हता. चातुर्वर्ण्याबद्दलच्या परिस्थितीला आदर्शमय ठिकाणी ठेवल्यानंतरसुद्धा सूक्ताने त्या आदर्शवत ठिकाणाचे पुनः पुनः गोडवे गायिलेले आहेत. सूक्ताचे हेही कृत्य फसवणुकीचे आहे. कारण चातुर्वर्ण्याला दिलेले आदर्शवत स्थान हे त्याच्याच वस्तुस्थितीच्या अंतर्यामात बसत होते. वस्तुस्थितीला आदर्शमय स्वरूप देणे आणि आदर्शाची प्रचीती घेणे, याबाबतीत सूक्ताने प्रयत्न केलेला आहे. तो प्रयत्न म्हणजे राजकारणात जो भुलभुलावणीचा खेळ खेळला जातो त्याच स्वरूपाचा होय. या प्रयत्नासारखा एखादा प्रयत्न कोणत्याही धार्मिक ग्रंथात आढळणार नाही, याबद्दल माझी खाली आहे. 'ढोंगी व फसवेबाज' या विशेषणाशिवाय या प्रयत्नाला दुसरे कोणते विशेषण देता येईल? वस्तुस्थितीला अशा आदर्शाचा मुलामा देणे हे कृत्य तर अन्यायी आहेच, शिवाय हे अत्यंत स्वार्थसाधूपणाचे आहे. अशा आदर्शाला समाजात रूढ करणे हे मोठे समाजघातकी कृत्य होय. एखादी बाब समाजात एकदा रूढ झाली की ती कायमचीच रूढ झाली पाहिजे अशी भूमिका स्वीकारून ज्या रीतिभाती समाजात असमानता प्रसृत करतात त्या रीतिभातींना अविनाशी स्वरूप देणे, असा य प्रयत्नाचा अर्थ होतो. अशाप्रकारची विचारसरणी नीतिशास्त्रातील कोणत्याही तत्त्वाशी जुळणारी नाही. ज्या समाजात सामाजिक बऱ्यावाईट गोष्टींबद्दल जागृतभाव आहे तो समाज या विचारसरणीला कधीही पाठिंबा देणार नाही. उलट अंशी आपणाला असे दिसून येईल की, जगाच्या आरंभापासून आतापर्यंत प्रत्येक व्यक्ती आणि समाज यांच्या सामाजिक व्यवहारात जी काही प्रगती झालेली आहे ती एका नैतिक तत्त्वाच्या शिकवणुकीबरहुकूम झालेली आहे. ते नैतिक तत्त्व म्हणजे जी बाब समाजात चुकीने रूढ केली गेली आहे तिला रूढ म्हणून मान्यता देऊ नये; एवढेच नव्हे तर ती रूढ बाब दूर करून तिच्यात योग्य तो फेरफार करून ती बाब सुधारलेल्या स्वरूपात रूढ केली पाहिजे. वरील विवेचनावरून हे कळून येईल की, पुरुषसूक्त लिहिण्याच्या मागे जे

तत्त्व आहे त्याचा हेतू गुन्हेगारी स्वरूपाच आहे व त्याचे परिणाम समाजहिताला बाधक आहेत. कारण की, एका वर्गाने बेकायदेशीर व अन्याय्य मार्गाने मिळविलेल्या हितकारक गोष्टीला आणि दुसऱ्या वर्गावर जबरदस्तीने लादलेल्या अहितकारक गोष्टीला चिरायू करणे हे त्या तत्त्वाचे ध्येय आहे. अशाप्रकारचा भूलभुलावणीचा खेळ खेळण्यात पुरुषसूक्ताचा काय हेतू असावा, हा दुसरा कूटप्रश्न होय.

पुरुषसूक्तासंबंधी समाजशास्त्रीय दृष्टीने उहापोह केला तर जे अनेक कूटप्रश्न उपस्थित होतात त्यातील शेवटचा व सर्वांपेक्षा अधिक महत्त्वाचा एक कूटप्रश्न आहे. पुरुषसूक्तात शूद्रांना जे स्थान दिलेले आहे, त्याबद्दलचा. निरनिराळे वर्ग कसे उत्पन्न झाले, याबद्दल स्पष्टीकरणाची मुख्य भूमिका पुरुषसूक्ताने घेतलेली आहे. ते वर्ग परमेश्वराने उत्पन्न केले असे पुरुषसूक्ताचे म्हणणे अहे. पुरुषसूक्ताने हा जो सिद्धांत मांडलेला आहे, तसला सिद्धांत कोणतेही ब्रह्मज्ञानविषयक शास्त्र मांडणार नाही. ही बाब बरीचशी आश्चर्यकारक आहे. जग निर्माण करणाऱ्या परमेश्वराच्या निरनिराळ्या अवयवांना निरनिराळ्या वर्गांचे उत्पत्तीस्थान चिकटविण्याचा सूक्ताने जो व्यूह रचला तो तर त्यापेक्षा अधिक आश्चर्य उत्पन्न करणारा आहे. हा व्यूह काही आकस्मिक रीतीने आलेला नाही, तर तो विचारपूर्वक व आस्थेवाईक रीतीने तयार केलेला आहे. दोन गहन प्रश्न सोडविण्याची गुरुकिल्ली तयार करणे, ही त्या व्यूहाच्या पाठीमागची मुख्य कल्पना ठरविणे हा एक आणि मनात योजना तयार केल्याप्रमाणे त्या चार वर्गांच्या श्रेष्ठ-कनिष्ठ दर्जाच्या पायऱ्या ठरविणे हा दुसरा, असे हे दोन गहन प्रश्न होत. असे करण्यापासून जो फायदा आहे तो असा. जग उत्पन्न करणाऱ्या परमेश्वराच्या शरीराचे जे भाग चार वर्गांना दिलेले आहेत ते भाग त्या वर्णांचे सामाजिक दर्जे कायमचे ठरवितात. आणि ते सामाजिक दर्जे त्या त्या वर्णाचे धंदे कायमचे ठरवितात. ब्राह्मण वर्णाच्या उत्पत्तीचे स्थान परमेश्वराच्या मुखाला चिकटविलेले आहे; मुख हे शरीरातील प्रमुख भाग होय. त्यातून उत्पन्न झालेला ब्राह्मण वर्ण हा अर्थातच चार वर्णांहून श्रेष्ठ होतो. ब्राह्मण वर्ण हा चारी वर्णात सर्वश्रेष्ठ म्हणून ज्ञानार्जन व ज्ञानभांडारसंरक्षण हा जो सर्व धंद्यातील सर्वश्रेष्ठ धंदा आहे तो ब्राह्मण वर्गाला दिला. क्षत्रिय वर्णाचे उगमस्थान परमेश्वराच्या बाहूंना चिकटविलेले आहे. बाहू हे शरीराच्या सर्व अंगांमध्ये मुखाच्या खालोखालचे प्रमुख अंग होत. म्हणून क्षत्रिय वर्गाला ब्राह्मण वर्गाच्या खालचा दर्जा दिला. (ज्ञानार्जन व ज्ञानदान या धंद्याच्या खालचा महत्त्वाचा धंदा लढण्याचा, तो क्षत्रिय वर्णाला दिला) वैश्य वर्गाचे जन्मस्थान परमेश्वराच्या मांड्यांना चिकटविलेले आहे. मांड्या या बाहूच्या खालच्या महत्त्वाच्या दर्जाच्या होत, म्हणून लढवय्याच्या धंद्यापेक्षा कमी दर्जाचा धंदा जो व्यापार तो वैश्य वर्णाला दिला. शूद्र वर्णाचे उत्पत्तीस्थान परमेश्वराच्या पायांना चिकटविलेले आहे. पाय हे मानवी शरीरातील अगदी खालच्या दर्जाचे व सौंदर्याच्या दृष्टीने कमी दर्जाचे भाग होत. म्हणून शूद्र वर्णाला सामाजिक दर्जातील अगदी शेवटचा हीन दर्जा दिला आणि सेवाचाकरी करणे हा सव धंद्यातील अत्यंत गलिच्छ प्रतीचा धंदा तो त्याला दिला.

चार वर्गांची उत्पत्ती कशी झाली याबद्दलचे स्पष्टीकरण करण्यासाठी पुरुषसूक्ताने

ही पद्धत का स्वीकारली? शरीरात जे स्थान पायांचे ते समाजात शूद्रांचे होय. अशा पद्धतीने सूक्ताने शूद्रांच्या उत्पत्तीचा इतिहास का सांगितला? चार वर्ग कसे उत्पन्न झाले, याचा ऊहापोह पुरुषसूक्ताने निराळ्या पद्धतीने का केला नाही? विश्वोत्पत्तीचे स्पष्टीकरण करण्यासाठी शास्त्रकारांनी फक्त पुरुषसूक्ताचाच अवलंब केलेला आहे असे नाही. वेदांची उत्पत्ती कशी झाली, याचे स्पष्टीकरण छांदोग्य उपनिषदात जे दिलेले आहे त्याची व सूक्ताने चार वर्गांच्या उत्पत्तीसंबंधी जो सिद्धांत मांडलेला आहे त्याची तुलना करून पहा. छांदोग्य उपनिषद (Muir, Vol. I, P. 5) म्हणते –

''प्रजापतीने सर्व जगात उष्णता भरली आणि अशा रीतीने तापलेल्या जगापासून त्याने त्यांची जीवनसत्त्वे बाहेर काढली– उदा. पृथ्वीपासून अग्नी, आकाशपोकळीतून वारा, आकाशातून सूर्य. या तीन देवतांमध्ये प्रजापतीने उष्णता भरली आणि त्यांच्यातून याची जीवनसत्त्वे बाहेर काढली – अग्नीपासून ऋचाचे श्लोक, वाऱ्यापासून यजूचे श्लोक आणि सूर्यापासून सामचे श्लोक. त्यानंतर या तीन शास्त्रांत त्याने उष्णता भरली आणि अशा रीतीने तापलेल्या त्या तीन शास्त्रांतून त्याने त्यांची जीवनसत्त्वे बाहेर काढली – ऋचा श्लोकामधून 'भू' हे व्यंजन, यजूस श्लोकामधून 'भुवः' आणि सामन् श्लोकातून 'स्वर'.''

निरनिराळ्या देवतांपासून वेदांची उत्पत्ती झाली, याबद्दलचे हे स्पष्टीकरण आहे. देवदेवतांचा हिंदी–आर्य समाजात दुष्काळ नव्हता. त्यांची एकंदर संख्या तीस कोटी होती. चार देवतांपासून चार वर्ण उत्पन्न झाले, असे जर वर्णांच्या उत्पत्तीबद्दल स्पष्टीकरण केले असते तर सर्व वर्ण जन्मतःच समान दर्जाचे आहेत, या सिद्धांताला त्याची पुष्टी मिळाली असती. चार वर्गांची उत्पत्ती कशी झाली याचे स्पष्टीकरण करताना पुरुषसूक्ताने वर सांगितलेल्या प्रकारच्या स्पष्टीकरण पद्धतीचा अवलंब का केला नाही?

पुरुषाच्या निरनिराळ्या मुखांपासून निरनिराळे वर्ग उत्पन्न झाले, असा सिद्धांत मांडणे सूक्तकाराला अशक्य होते काय? पुरुषसूक्तातील वर्णिलेल्या पुरुषला एक हजार डोकी होती, म्हणजे त्याला एक हजार मुखे होती. पुरुषाच्या एका मुखातून एक जीवमाणू उत्पन्न झाला, अशी निरनिराळ्या जीवमाणूंच्या उत्पत्तीबद्दल हकिगत देण्यास सूक्तकाराला काहीच अडचण नव्हती; आणि अशा रीतीने विश्वोत्पत्तीबद्दलची हकिगत सांगण्याची कल्पना सूक्तकाराला येणे अशक्य नव्हते. चार वेदांची उत्पत्ती कशी झाली याबद्दलचे स्पष्टीकरण करण्यासाठी विष्णुपुराणाने सदर पद्धतीचा अवलंब केलेला आहे. याबद्दलचा संदर्भ (Muir, Vol. III p. II) खालीलप्रमाणे आहे–

''ब्रह्मदेवाने आपल्या पूर्व बाजूच्या मुखातून गायित्री मंत्र, ऋचांचे श्लोक, त्रिवृत, सामरथांतर, यज्ञ आणि अग्निष्टोम यांना जन्म दिला. आपल्या दक्षिण बाजूच्या मुखातून त्याने यजूस श्लोक, त्रिष्टुभ वृत्त, पंचदश स्तोम, बृहत्सामन आणि उख्य यांना जन्म दिला. आपल्या पश्चिम बाजूच्या मुखातून त्याने सामन श्लोक, जगतिवृत्त सप्तदश स्तोम, वैरूप आणि अतिरात्र यांना जन्म दिला. आपल्या उत्तर बाजूच्या मुखातून त्याने एकविंश अथर्वण, आप्तोर्यामन अनुष्टुभ आणि विराजवृत्ते यांना जन्म दिला.''

वेदांची उत्पत्ती कशी झाली, याचे स्पष्टीकरण हरिवंश निराळ्या रीतीने करतो. ते स्पष्टीकरण (Muir, Vol. III, p. 13) असे–

''परमेश्वराने आपल्या डोळ्यातून ऋग्वेद आणि यजुर्वेद यांना, आपल्या जिभेच्या टोकापासून सामवेद याला, आणि आपल्या डोक्यापासून अथर्ववेद याला जन्म दिला.''

निरनिराळ्या वर्णांची उत्पत्ती कशी झाली व त्यांचे परस्परातील संबंध कशाप्रकारचे होते, याबद्दलचे स्पष्टीकरण करण्यासाठी सूक्तकारालाच परमेश्वराचे शरीर व त्याचे निरनिराळे भाग यांचा उपयोग करावा लागला, याची कारणे काय होती, हे माहीत नाही. परंतु ही कारणे तशीच सबळ होती असे गृहीत धरले तरी एक प्रश्न शिल्लक राहतो. तो हा की, पुरुषाचे निरनिराळे अवयव व निरनिराळे वर्ग यांची सांगड सूक्तकाराने ज्या पद्धतीने घातलेली आहे ती का?

खालील गोष्टी विचारात घेतल्या तर वर सांगितलेला प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे, हे लक्षात येईल. समाजातील निरनिराळ्या वर्गांची उत्पत्ती कशी झाली याचे स्पष्टीकरण करण्यासाठी सूक्तात परमेश्वराच्या निरनिराळ्या अवयवांचा उपयोग केलेला आहे. ही गोष्ट फक्त पुरुषसूक्ताने केलेली आहे, असे नाही. यज्ञ करण्यासाठी ज्या पुरोहितांची नेमणूक होते त्या पुरोहितांतील निरनिराळे वर्ग कसे उत्पन्न झाले, त्याबद्दलचे स्पष्टीकरण करण्यासाठी वैशंपायन ऋषीने त्याच गोष्टीचा अवलंब केलेला आहे. परंतु सूक्तकाराने सांगितलेले स्पष्टीकरण व वैशंपायन ऋषीने त्याच गोष्टीचा अवलंब केलेला आहे. परंतु सूक्तकाराने सांगितलेले स्पष्टीकरण व वैशंपायन ऋषीने सांगितलेले स्पष्टीकरण यामध्ये जमीन अस्माननाचा फरक आहे. वैशंपायनाने सांगितलेले स्पष्टीकरण हरिवंशात (Muir, Vol. I, p. 154-155) दिलेले आहे, ते असे–

''जगात जलप्रलय झाला. सर्व जग म्हणजे एक महासागर झाला. जगात पसरलेल्या पाण्यावर सर्वशक्तिमान प्रभू हरी नारायण यांनी कटाक्ष फेकून ते आपल्या अंकित केले. त्यावर तो झोपला. पाण्याच्या मध्यभागी तो पडलेला होता व तो स्वतः एखाद्या महासागराप्रमाणे दिसत होता. तो आपले बलवान हात पसरून निर्विकार मनाने झोपलेला होता. तो अमर आहे असे ब्राह्मण समजतात. तन्मयावस्थेमुळे त्याच्या शरीरातून प्रकाश बाहेर पडला. यानंतर भूत, वर्तमान व भविष्य अशा तिन्ही काळांची वस्त्रे अंगावर घेऊन तो प्रभू झोपला. जी जी वस्तू श्रेष्ठतम आहे, ती ती तो पुरुषोत्तम (विष्णू) होय. पुरुष किंवा जी जी वस्तू पुरुष या नावाने ओळखली जाते ती यज्ञ म्हणून समजावी. यज्ञात अर्घ्य देण्यासाठी ईश्वराने आपल्या शरीरातून पूर्वी ब्राह्मण उत्पन्न केले होते. ते यज्ञकर्म यथाविधी करीत व त्या व्यतिरिक्त दुसरे काही करत नसत. म्हणून त्यांना ऋत्विज हे नाव प्राप्त झाले. ईश्वराने आपल्या मुखातून ब्राह्मण उत्पन्न केला तो सर्वात प्रमुख होय. सामन मंत्र म्हणणारी 'उद्गात्री' हिलाही ईश्वराने आपल्या बाहूपासून निर्माण केले, तसेच होत्री आणि अध्वर्यू हे उत्पन्न केले. त्यानंतर त्याने प्रस्तोत्रीमैत्रवरुण आणि प्रतिष्ठात्री यांना उत्पन्न केले. त्याने आपल्या बेंबीपासून प्रतिहर्त्री आणि पात्री, आपल्या मांड्यांपासून अच्छवाक आणि नेष्ट्री, आपल्या

हातांपासून अग्निध्रा आणि यज्ञीय ब्राह्मण्य, आपल्या बहूपासून ग्रावण आणि यज्ञ उन्नेत्रा यांना उत्पन्न केले. याप्रमाणे परममंगल भगवंताने सर्व यज्ञात मंत्र म्हणण्यास लायक असे सर्वोत्कृष्ट सोळा ऋत्विज उत्पन्न केले. म्हणून हा पुरुष यज्ञापासून तयार झालेला आहे व त्याला वेद असे म्हणतात. त्याच्या जीवन-सत्त्वांतून सर्व वेद, वेदांगे, उपनिषदे आणि संस्कार समारंभ उत्पन्न झाले.''

एखादा यज्ञ करावयाचा तर त्यासाठी एकंदर सतरा निरनिराळ्या वर्गाच्या पुरोहितांची जरुरी असे. पुरुषाचे अवयव थोडे आणि पुरोहितांची संख्या मोठी यामुळे पुरोहितांच्या उत्पत्तीचे मूळ पुरुषाच्या निरनिराळ्या अवयवांना चिकटविता येणे शक्य नव्हते.

परमेश्वराचे अवयव पुष्कळ, त्यामुळे निरनिराळ्या वर्गाचे उत्पत्तीस्थान परमेश्वराच्या एखाद्या अवयवाला चिकटविता आले. पुरुषाच्या पायांपासून सतरापैकी एखाद्या पुरोहित वर्गाचा जन्म झाला, असे पुरुषसूक्तात प्रतिपादन केलेले नाही. याची कारणे वर सांगितलेली आहेत. या बाबतीत वैशंपायनाने काय केले? एकापेक्षा अधिक पुरोहित वर्गाची उत्पत्ती परमेश्वराच्या एखाद्या विवक्षित अवयवापासून झाली, असे निवेदन करण्यास त्याला काही हरकत वाटत नाही. एखाद्या पुरोहि वर्गाची उत्पत्ती पुरुषाच्या पायांपासून झाली, हे सांगण्याचे त्याने मोठ्या शिताफीने टाळलेले आहे.

शूद्रांची उत्पत्ती कशी झाली हे सांगताना पुरुषसूक्ताने आणि ब्राह्मणांची उत्पत्ती कशी झाली हे सांगताना हरिवंशाने जी वृत्ती दाखविलेली आहे तीही लक्षात घेतली पाहिजे. हरिवंशाने दाखविलेल्या वृत्तीपेक्षा पुरुषसूक्ताने दाखविलेली वृत्ती अधिक कुत्सिपणाची आहे. शूद्र हे पुरुषाच्या पायापासून जन्मलेले आहेत आणि त्यांनी पिढ्यान् पिढ्या इतर वर्णांची सेवाचाकरी केली पाहिजे, हे पुरुषसूक्ताने जे सांगितलेले आहे ते सूत्रकाराला शूद्रांबद्दल जो तीव्र मत्सर वाटत होता त्यामुळे की काय? असे असेल तर या मत्सराचे कारण काय?

## ४

समाजशास्त्रीय दृष्टीने जर पुरुषसूक्ताची बारकाईने छाननी केली तर जे काही त्यातून कूटप्रश्न उपस्थित होतात ते वर सांगितलेले आहेत. चातुर्वर्ण्याची कल्पना पुढील काळात जसजशी वृद्धिंगत होत गेली तसतसे शूद्रांच्या उत्पत्तीसंबंधी आणि त्यांच्या एकंदर अवस्थेसंबंधी दुसरे गूढ प्रश्न उपस्थित होत गेले. पुढील काळात या विषयासंबंधी ज्या घडामोडी उत्पन्न झाल्या त्या लक्षात घेतल्या तर चातुर्वर्ण्य उत्पन्न केल्यामुळे समाजाला कोणते परिणाम भोगावे लागले, याची शहानिशा करता येईल. पुढील काळात चातुर्वर्ण्यासंबंधी मुख्यत: दोन घडामोडी उत्पन्न झाल्या, शूद्राच्या खालोखाल एक पाचवा वर्ग उत्पन्न करण्यात आला, ही पहिली आणि ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या त्रैवर्णिकांपासून शूद्र वर्णाला अलग ठेवण्यात आले ही दुसरी. पुढील काळात हे जे फेरबदल उत्पन्न झाले ते अशी रीतीने की जणू काही त्यांची उत्पत्ती पुरुषसूक्तात सांगितलेल्या समाजरचनेपासून झाली होती, असे वाटते. या परिस्थितीमुळे या फेरबदलातून काही नवे शब्द अस्तित्वात

आले व त्या शब्दांचा अर्थ काही विशिष्ट कल्पना प्रदर्शित करणारा होता. या कल्पना व पुरुषसूक्तातील समाजरचनेची कल्पना जणू काही जुळ्या बहिणी आहेत असे वाटते. ''सवर्ण'', ''अवर्ण'', ''द्विज'', ''अद्विज'' आणि ''त्रैवर्णिक'' हे ते शब्द होत. प्रारंभीचे चार वर्ग होते. त्यांच्यात पुढे जे विभाग झाले आणि प्रत्येक विभागात श्रेष्ठ-कनिष्ठपणाचे संबंध कोणते आहेत, या गोष्टींच्या कल्पना सदर शब्द सूचित करतात. या वर्गाचे संबंध कोणत्या तऱ्हेचे आहेत, याबद्दल विचार करणे जरूर आहे. कारण या परस्परसंबंधातून एक नवा गूढ प्रश्न उपस्थित होतो. या नवा गूढ प्रश्न लोकांच्या लक्षात आला नाही. उपरिनिर्दिष्ट शब्द हे काही विभागाची केवळ नावे सूचित करीत नाहीत, तर ते त्या विभागाचे काही विशिष्ट हक्क व सवलती सूचित करतात, हे पहिले कारण. सदर नावावरून ज्या हक्कांचा व सवलतींचा बोध होतो तो लक्षात घेऊन सदर नावाखाली जे वर्गाचे विभाग करण्यात आले ते विभाग तर्कशुद्ध आहेत काय, हे दुसरे कारण.

OOO

प्रकरण २ रे

# शूद्रांच्या उत्पत्तीबद्दलचा ब्राह्मण ग्रंथांतील सिद्धांत

ब्राह्मण लोकांनी जे धार्मिक ग्रंथ लिहिलेले आहेत त्यात शूद्रांची उत्पत्ती कशी झाली, याबद्दल स्पष्टीकरण आहे काय? जग, मनुष्य आणि निरनिराळे वर्ण ही उत्पन्न कशी झाली, याबद्दलच्या मनोरंजक कथा सदर ग्रंथात खच्चून भरलेल्या आहेत. शूद्रांची उत्पत्ती कशी झाली, याचा शोध लावण्यासाठी या कथांमधून काही धागादोरा मिळतो की काय, हे पाहू या. वास्तविक पहाता शूद्रांची उत्पत्ती कशी झाली, याबद्दलचा ब्राह्मण ग्रंथांत जो सिद्धांत मांडलेला आहे, त्याचे मंडन करण्यासाठी ब्राह्मण ग्रंथांत भरपूर कारणे दिली असली पाहिजेत. पण हीच कारणे तो सिद्धांत सिद्ध करण्यास कितपत समर्थ ठरतात, हे तपासून पहाणे जरूर आहे.

१

या चर्चेला वेदांपासून सुरुवात करू या. ऋग्वेदातील पुरुषसूक्तात शूद्रांच्या उत्पत्तीसंबंधी कोणता सिद्धांत मांडलेला आहे व तो कितपत खरा किंवा खोटा आहे, याबद्दलची सविस्तर चर्चा पहिल्या प्रकरणात दिलेली आहे. याविषयासंबंधी इतर वेदांमध्ये काय प्रतिपादन केलेले आहे, त्याबद्दल विचार करू या.

यजुर्वेदाचे दोन भाग आहेत – शुक्ल यजुर्वेद व कृष्ण यजुर्वेद. पहिल्यांदा शुक्ल यजुर्वेदाकडे वळू या. या वेदांत वाजसनेयी संहिता आहे. तीत शूद्रांच्या उत्पत्तीबद्दल दोन सिद्धांत मांडलेले आहेत. त्यांपैकी जो एक सिद्धांत आहे तो–पुरुष सूक्तात मांडलेला सिद्धांत होय. पुरुषसूक्ताचा सिद्धांत १६ श्लोकांत मांडलेला आहे. ते सोळा श्लोक वाजसनेयी संहितेत जसेच्या तसे उद्धृत केलेले आहेत व त्यात दुसऱ्या सहा श्लोकांची भर टाकलेली आहे. या श्लोकांचे अर्थ खाली दिलेत आहेत –

(१७) त्याला विश्वकर्म्याने प्रथम उत्पन्न केले. पाणी व पृथ्वीची जीवनसत्त्वे यापासून, त्वष्ट्याने त्याला आकार दिला. तो आकार म्हणजेच सर्व बाजूंनी पसरलेले प्रथमचे पुरुषाचे विश्व होय.

(१८) या मोठ्या पुरुषाला मी ओळखतो. त्याचा रंग सूर्याचा म्हणजे तिमिरातीत शुभ्र आहे. त्याला जो जाणतो तोच अमर होतो. त्याला ओळखून घेणे हाच मोक्षाचा मार्ग आहे, त्याशिवाय मार्ग नाही.

(१९) प्रजापती गर्भाशयातील भागात फिरतो. तो स्वतः अजन्म आहे. परंतु तो अनेक रूपांनी जगात वावरतो. त्याचे मूळस्थान कोणते, हे जाणते लोक जाणतात. मरीचीचे

स्थान आपणाला मिळावे, अशी त्याची इच्छा असते.

(२०) जो देवांना प्रकाश देण्यासाठी स्वतः प्रकाशमान होतो, जो देवांचा पुरोहित आहे; जो सर्व देवांच्या अगोदर जन्मला, त्या ब्रह्मदेवाला नमस्कार असे!

(२१) देदीप्यमान ब्रह्मदेवाला उत्पन्न केल्यानंतर देव प्रथम उद्गारले, ''याचे ज्ञान ज्या ब्राह्मणाला झाले, त्याच्या अधीन सर्व देव रहातील.''

(२२) देदीप्यमान ब्रह्मदेवाला उत्पन्न केल्यानंतर देव प्रथम उद्गारले, ''याचे ज्ञान ज्या ब्राह्मणाला झाले, त्याच्या अधीन सर्व देव रहातील.''

(२२) त्याच्या श्री आणि लक्ष्मी या पत्नी होत. दिवस व रात्र या त्याच्या दोन बाजू होत. चांदण्या त्याचे अलंकार होत. अश्विन त्याचे तोंड होय. माझ्या इच्छा पुऱ्या कर. ते दान मला दे. मला माझे सर्व इच्छित दे.

**वाजसनेयी संहितेत** जो दुसरा सिद्धांत मांडलेला आहे, तो पुरुषसूक्तातील सिद्धांतापेक्षा वेगळ्या स्वरूपाचा आहे. तो सिद्धांत असा –

**वाजसनेयी संहिता**, १४-२८ (Muir, Vol. I, p. 18) त्याने एकाबरोबर स्तुती केली, तेव्हा सजीव प्राण्यांची उत्पत्ती झाली. त्याने तिघांबरोबर स्तुती केली, तेव्हा ब्रह्मदेव प्रसन्न झाला. भूतनामपती याला त्यांचा राजा केले. त्याने सात जणांबरोबर स्तुती केली, तेव्हा धात्री याला त्यांचा राजा केले. सप्तर्षि उत्पन्न झाले. त्याने नऊ जणांबरोबर स्तुती केली. तेव्हा ऋतू उत्पन्न झाले. तेव्हा आर्तव याला त्यांचा राजा केले. त्याने तेरा जणांबरोबर स्तुती केली. तेव्हा क्षत्रियांना उत्पन्न केले. तेव्हा बृहस्पती याला त्यांचा राजा केले. त्याने एकोणवीस जणांबरोबर स्तुती केली. तेव्हा शूद्र आणि आर्य (वैश्य) यांना उत्पन्न केले. दिवस व रात्र यांना त्यांचा राजा केले. त्याने एकवीस जणांबरोबर स्तुती केली. तेव्हा ज्यांच्या पायाला अखंड खूर आहेत, अशा जनावरांना उत्पन्न केले. वरुण याला त्यांचा राजा केले. त्याने तेवीस जणांबरोबर स्तुती केली, तेव्हा लहान जनावरांची उत्पत्ती केली. तेव्हा वायू याला त्यांचा राजा केले. (ऋग्वेद १०-९०-८ याच्याशी तुलना करून पहा.) त्याने सत्तावीस जणांबरोबर स्तुती केली, तेव्हा सजीव वस्तूंची उत्पत्ती झाली. तेव्हा प्रत्येक पंधरवड्याला त्यांचा राजा केले. त्याने एकतीस जणांबरोबर स्तुती केली. तेव्हा सजीव वस्तूंना स्थिरपणा दिला. तेव्हा प्रजापती परमेष्ठिन् याला त्यांचा राजा केले.''

कृष्ण यजुर्वेदात काय सांगितलेले आहे, ते पाहू या. या वेदातील तैतरीय संहितेत यासंबंधी एकंदर पाच सिद्धांत मांडलेले आहेत. त्यांपैकी एक ४-३-१० यात सांगितलेला आहे. हा सिद्धांत आणि शुक्ल यजुर्वेदातील वाजसनेयी संहितेत सांगितलेला सिद्धांत (याची माहिती वर दिलेली आहे) हे एकच होत. बाकीचे जे चार सिद्धांत आहेत त्यातून जे शूद्रोत्पत्तीसंबंधी स्पष्टीकरण करतात, त्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे–

(१) तैतरीय संहिता, २-४-१३-१ (Muir, Vol. I, p. 22)

राजन्य जेव्हा गर्भशयात होता तेव्हा त्याच्याबद्दल देवांना भीती उत्पन्न झाली. देवांनी त्याला गर्भशयात बंधनांनी बांधले. म्हणून हा राजन्य बंधनांनी वेष्टिलेला असाच जन्म पावला.

ती जर बंधनविमुक्त असा जन्मला असता तर तो आपल्या शत्रूंची कत्तल करीत सुटला असता. एकदा राजन्य बंधनविमुक्त स्थितीत जन्मावा व जन्मल्यानंतर त्याने आपल्या शत्रूंची कत्तल करीत रहावे असे ज्यांना वाटत असेल त्यांनी त्या राजन्याच्यातर्फे परमेश्वराला ऐंद्र-बार्हस्पत्य नावाने हवन करावे. राजन्य हा इंद्राची प्रतिमा होय व ब्राह्मण ह बृहस्पती होय. राजन्याची त्याच्या बंधनांपासून सुटका कोणाला करावयाची असेल तर ती त्याने ब्राह्मणातर्फेच केली पाहिजे. ज्या बंधनांनी राजन्य बांधला गेलेला असतो त्या बंधनाचे प्रतीक सोन्याचे करावे व ते सोन्याचे प्रतीक ब्राह्मणाला दान द्यावे म्हणजे राजन्याची बंधने तटातट तुटून जातील व राजन्य मुक्त होईल.''

(२) तैतरीय ब्राह्मण, ७-१-१-४ (Muir, Vol. I, P. 16)

''मला काहीतरी संतती व्हावी'' अशी प्रजापतीला इच्छा झाली. त्याने स्वतःच्या तोंडातून त्रिव्रत (स्तोम) उत्पन्न केले. त्यानंतर याने अग्नी, देवता, गायत्री वृत्त सामन् (रथांतर) आणि मनुष्यांपैकी ब्राह्मण व पशूंपैकी बोकड ही उत्पन्न केली. म्हणून ती प्रजापतीची मुख्य संतती होय. कारण ती त्याच्या मुखापासून उत्पन्न झाली. आपल्या छातीपासून व बाहूंपासून त्याने पंचदस (स्तोम) उत्पन्न केले. पंचदसानंतर त्याने देव, इंद्र, त्रिष्टुभ वृत्त, बृहत नावाचे सामन आणि मनुष्यांपैकी राजन्य व जनावरांपैकी मेंढरे ही उत्पन्न केली. म्हणून ही उत्साही आहेत; कारण ती उत्साहापासून उत्पन्न केलेली आहेत. त्याने आपल्या बेंबीपासून सप्तदस (स्तोम) उत्पन्न केला. त्यानंतर विश्वदेव नावाचे देव, जागृती वृत्त, वैरूप नावाचा सामन आणि मनुष्यांपैकी वैश्य व जनावरांपैकी गाय ही उत्पन्न केली. म्हणून यांना खाल्ले पाहिजे, कारण त्यांची उत्पत्ती अन्न साठवून ठेवणाऱ्या भागापासून केलेली आहे. ती इतर संततीच्या मानाने संख्येने अधिक आहेत. म्हणून सप्तदसानंतर बऱ्याच छोट्या देवदेवतांची उत्पत्ती करण्यात आली. त्याने आपल्यापायापासून एकवीस (स्तोम) उत्पन्न केला. त्यानंतर त्याने अनुष्टुभ वृत्त, वैराज नावाचे सामन, मनुष्यांपैकी शूद्र आणि पशूंपैकी घोडा ही निर्माण केली. म्हणून घोडा व शूद्र ही दोन्ही इतरांची वाहने झाली. या कारणामुळे आणि एकविसानंतर कोणतीही देवदेवता उत्पन्न केली नाही, म्हणून शूद्र याला यज्ञाचे अधिकार दिलेले नाहीत. त्याचप्रमाणे घोडा व शूद्र यांची उत्पत्ती पायापासून झालेली असल्यामुळे, ती स्वतःच्या पायांच्या श्रमांवर जगतात.''

अथर्ववेदाकडे दृष्टी फेकली तर त्यात विश्वोत्पत्तीसंबंधीची चार स्पष्टीकरणे दिसून येतात. त्यापैकी एक ऋग्वेदातील पुरुषसूक्तात सांगितलेल्या स्पष्टीकरणाप्रमाणे आहे. ते अथर्ववेद १०-६ मध्ये आहे. दुसरी स्पष्टीकरणे आहेत ती खाली दिली आहेत.

(१) अथर्व वेद, ४-६-१ (Muir, Vol. I, p. 29) ''दहा डोकी व दहा तोंडे स्वरूपाचा ब्राह्मण प्रथमतः जन्मास आला. तो जन्मल्यानंतर प्रथम सोम प्याला. त्याने विषाचे विषारीपण मारून टाकले.''

(२) अथर्व वेद, १५-८-१ (Muir, Vol. I, p. 22) ''तो (व्रात्य) काममोहित झाला व तेथून राजन्य उत्पन्न झाला.''

(३) अथर्व वेद, १५-९-१ (Muir, Vol. I, p. 22) ''याबद्दलचे ज्ञान असलेला व्रात्य जर एखाद्या राजाच्या घरी पाहुणा म्हणून आला तर तो राजापेक्षा श्रेष्ठ आहे, अशी राजाने त्याला जाणीव करून द्यावी व तसे वागण्यास त्याला भाग पाडावे. असे केल्याने राजा स्वतःच्या इभ्रतीला किंवा राज्याला जे बाधक होईल असे काही करीत नाही. त्याच्यापासून ब्राह्मण व क्षत्रिय उत्पन्न झाले. ते म्हणाले, ''आम्ही आता कशात प्रवेश करावा?''

२

आता ब्राह्मण या नावाने ओळखले जाणारे जे ग्रंथ आहेत, त्यांच्याकडे आपण वळू या. शतपथ ब्राह्मणात विश्वोत्पत्तीसंबंधीची सहा स्पष्टीकरणे आहेत. त्यातील दोन स्पष्टीकरणे वर्णांची उत्पत्ती कशी झाली, याबद्दल खुलासा करतात. तो खुलासा खालीलप्रमाणे आहे -

शतपथ ब्राह्मण, १४-४-२-२३ (Muir, Vol. I. p. 20)

''ब्रह्मदेव (टीकाकाराच्या मते या शब्दाचा अर्थ अग्नीमध्ये राहणारा व ब्राह्मण जातीचे प्रतीक असा देव, असा होतो) पूर्वी हे विश्व होते व ते विश्व एकुलते एक होते. एकुलते एक असल्यामुळे त्याची वाढ झाली नाही. त्याने मोठ्या उत्साहाने क्षात्र उत्पन्न केले. क्षात्र म्हणजे बलशाली देवांचा समूह. ते बलशाही देव म्हणजे इंद्र, वरुण, सोम, रुद्र, पर्जन्य, यम, मृत्यू व इसान. म्हणून क्षात्रापेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही. म्हणून राजसूय यज्ञ करण्याच्या वेळी ब्राह्मण हा क्षत्रियाच्या खालच्या मानाच्या जागेवर बसतो. ब्राह्मण क्षत्रियाच्या डोक्यावर राज्याधिकाराचा अभिषेक करतो. ब्रह्मदेव हा क्षात्राचे उत्पत्तीस्थान होय. म्हणून राजा जरी सर्वाधिकारी होता तरी ब्रह्मदेव हाच आपला मूळपुरुष होय, या गोष्टींचा त्याला शेवटी आश्रय करावा लागतो. जो ब्रह्मदेवाचा नाश करतो, तो स्वतःच्या मूळस्थानाचा नाश करतो. आपल्या वरिष्ठाला दुखापत करणाऱ्या माणसाची शोचनीय स्थिती होते, तशीच स्थिती ब्रह्मदेवाचा नाश करणाऱ्याची होती. त्याची वाढ झाली नाही. वसू, रुद्र, आदित्य, विश्वदेव, मरुत इत्यादी नावांनी ओळखले जाणाऱ्या देव-देवतांची जी लढाऊ पथके ज्यात भरलेली आहेत, असे विश्व त्याने उत्पन्न केले; त्याची वाढ झाली नाही, पुषान् या नावाने ओळखली जाणारी शूद्रांची जात त्याने उत्पन्न केली. ही पृथ्वी पुषान् आहे; कारण ती सर्व चराचर वस्तुमात्रांचे संगोपन करते. त्याची वाढ झाली नाही. त्याने मोठ्या उत्साहाने न्याय (धर्म) या नावाची अत्युत्कृष्ट आकृती उत्पन्न केली. राज्यकर्ता क्षात्र तो हाच न्याय होय. म्हणून न्यायापेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही. म्हणून न्यायाचा आश्रय घेऊन आशक्त मनुष्य सशक्त माणसाला नमवतो. हा न्याय म्हणजेच सत्य होय. जो मनुष्य सत्य बोलतो त्याला लोक असे म्हणतात की, ''हा न्याय बोलतो,'' हे पर्यायाने आपल्या ऐकण्यात येते. कारण न्याय व सत्य ही दोन्ही ब्रह्मदेवाची अंगे आहेत. ब्रह्म, क्षात्र, विश व शूद्र ही ब्रह्मदेवाची अंगे होत. अग्नीच्या आश्रयाने ते देवांमध्ये ब्रह्म झाले, माणसांमध्ये ब्राह्मण झाले; विशच्या आश्रयाने ते मानवी वैश्य झाले आणि शूद्रांच्या आश्रयाने ते मानवी शूद्र झाले. म्हणून देव-देवतांना जर चिरस्थान मिळवावयाचे असेल तर ते अग्नीमध्ये राहाणाऱ्या ब्रह्मदेवाची प्रार्थना करतात.

विश्वोत्पत्तीसंबंधी तैत्तिरीय ब्राह्मणात खालील स्पष्टीकरणे सापडतात –

(१) तैत्तिरीय ब्राह्मण, १-२-६-७ (Muir, Vol. I, p. 21) ''ब्राह्मण जात देवांपासून उत्पन्न झाली; शूद्र असुरांपासून उत्पन्न झाले.

(२) तैत्तिरीय ब्राह्मण, ३-२-३-९ हा शूद्र नास्तित्वातून उत्पन्न झाला.''

## ३

चार वर्णांची व शूद्रांची उत्पत्ती कशी झाली, याबद्दल जेवढी तर्कटे ''ब्राह्मण'' या नावाने ओळखलेल्या धर्मग्रंथात रचलेली आहेत, त्या सर्वांचा एकत्रित संग्रह वरील स्तंभात मांडलेला आहे. चार वर्णांच्या उत्पत्तीसंबंधी जी विचारसरणी मांडण्यात आलेली आहे ती सामाजिक दृष्टीने पाहिली तर अननुभूत व असामान्य अशा स्वरूपाची आहे; या विचारसरणीत शूद्राला जे स्थान देण्यात आलेले आहे तेही फार अनैसर्गिक रीतीने. या गोष्टीची जाणीव फार प्राचीन काळच्या ब्राह्मणांना झाली होती. म्हणूनच चातुर्वर्ण्य व शूद्र यांची उत्पत्ती कशी झाली, याचे स्पष्टीकरण त्यांनी निरनिराळ्या तऱ्हेने केलेले आहे. चातुर्वर्ण्य व शूद्र यांच्या उत्पत्तीसंबंधी मांडलेला आपला सिद्धांत हा स्वकपोलकल्पित आहे, याची जाणीव त्यांना होती, म्हणून त्यांनी आपल्या सिद्धांताला पोषक अशी अनेक स्पष्टीकरणे आपल्या धार्मिक ग्रंथांतून मांडली. एरव्ही, इतकी निरनिराळी स्पष्टीकरणे मांडण्याची त्यांना का जरुरी भासली असावी?

भिन्न भिन्न स्वरूपाची ही अनेक स्पष्टीकरणे पाहून कोणाचेही मन भांबावून जाईल. चार वर्ण पुरुषापासून उत्पन्न झाले, असे काही स्पष्टीकरणे सांगतात; तर काही स्पष्टीकरणे असे सांगतात की चार वर्ण ब्रह्मदेवापासून उत्पन्न झाले. चार वर्ण प्रजापतीपासून उत्पन्न झाले, असे काही स्पष्टीकरणे म्हणतात; तर काही स्पष्टीकरणे असे म्हणतात की, चार वर्ण व्रात्यांपासून उत्पन्न झाले. एकाच ग्रंथात उत्पत्तीसंबंधी एकच स्पष्टीकरण असते तर त्याबद्दल शंका घेण्यास कारण मिळाले नसते. परंतु एकाच ग्रंथात उत्पत्तीसंबंधी निरनिराळ्या स्वरूपाची स्पष्टीकरणे आढळतात, म्हणून याबद्दल शंका उत्पन्न होणे साहजिक आहे. शुक्ल यजुर्वेदात दोन स्पष्टीकरणे आहेत. एकाच्या मते पुरुष तर दुसऱ्याच्या मते प्रजापती हे चार वर्णांचे व शूद्रांचे उत्पत्तीस्थान होय. कृष्ण यजुर्वेदात तीन स्पष्टीकरणे आहेत. त्यांतील दोन्हींच्या मते प्रजापती तर एकाच्या मते ब्रह्मदेव हे चौथा वर्ण व शूद्र यांच्या उत्पत्तीचे स्थान होय. अथर्ववेदात चार स्पष्टीकरणे आहेत. त्यातील एक पुरुषाला, दुसरे ब्रह्मदेवाला व तिसरे व्रात्याला चार वर्ण व शूद्र यांचे उत्पत्तीस्थान मानतात. चवथे स्पष्टीकरण हे तिन्हीपेक्षा जास्थ निराळ्या स्वरुपाचे आहे. उत्पत्तीसंबंधी जरी एकच प्रमेय या ग्रंथात मांडलेले दिसले तरी त्यासंबंधीचे तपशील निरनिराळ्या ग्रंथांत निरनिराळे दिसून येतात. ज्या स्पष्टीकरणांत प्रजापती किंवा ब्रह्मदेव याला उत्पत्तीस्थान मानण्यात आलेले आहे, ती स्पष्टीकरणे वेदांतस्वरूपी होत. दुसरी स्पष्टीकरणे मानवी-धर्मगुरूची होत. दोन्ही प्रकारची स्पष्टीकरणे म्हणजे कल्पनेच्या विश्वव्यापी भराऱ्या होत. त्यांच्यात इतिहास किंवा मनाला उमज पाडील असा काहीसा

बोध, याचा मागमूसही दिसत नाही. ''ब्राह्मण'' या नावाने जे ग्रंथ संबोधिले जातात, त्याबद्दल प्रो. मॅक्स मुल्लर यांनी खालील उद्गार काढलेले आहेत–

''हिंदी मनोवृत्तीच्या ज्या काही घटना आहेत त्यातील एक अत्यंत मनोरंजक घटना ब्राह्मण ग्रंथांवरून दिग्दर्शित केली जाते, यात शंका नाही. परंतु वाङ्मयाच्या कसाला जर हे ग्रंथ लावले तर त्या कसाला ते उतरत नाहीत, असे आपणाला दिसून येते. हिंदी समाज ज्यावेळी अत्यंत मागासलेल्या अवस्थेत होता, अशा काळात असंबद्ध विचार आणि अहंकारी भाव यांनी परिप्लुत असलेले वाङ्मय त्या समाजात उत्पन्न झाले, अशी कोणीही स्वतःची समजूत करून घेणार नाही. कार, अशा तऱ्हेचे वाङ्मय पुढारेल्या समाजात सुद्धा उत्पन्न होणे मुष्किल आहे. अगदी प्राचीन काळी जे हिंदी वाङ्मय उत्पन्न झालेले आहे त्यात चित्तवेधक विचार, धाडसीपणाने निवेदन केलेली विधाने, तर्कशुद्धपणाने मांडलेली कारणे आणि आश्चर्यकारक पूर्वपरंपरा यांची उणीव दिसत नाही. परंतु, या ग्रंथात इतस्ततः विखुरलेले विचार म्हणजे जणू काही तांब्याच्या आणि शिश्याच्या कोंदणात अत्यंत मोल्यवान हिरे बसविलेले आहेत असे वाटते. उथळ विचार, लंगडी भव्यता, पुरोहितांचे लबाडीचे डावपेच आणि अस्थानी अहंभावीपणा ही सदर ग्रंथात  भरपूर विखुरलेली आहेत आणि याच बाबी त्या ग्रंथांची सर्वसधारण रूपरेषा दिग्दर्शित करतात. समाजात पुरोहित वर्गाची अनियंत्रित सत्ता चालू लागली व लोकांत अंधधर्म श्रद्धाळूपणा पसरला तर नव्या जोमाने सर्व बाजूंनी होणारी राष्ट्राची प्रगती किती लौकर धुळीस मिळून जाईल, याची शहानिशा लावण्याची दृष्टी इतिहासकारामध्ये असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. राष्ट्रे भरभराटीच्या  काळात असोत किंवा अवनतीच्या काळात असोत, त्यांना पुरोहितांची अनियंत्रित कारवाई आणि जनतेचा अंधश्रद्धाळूपणा यांच्या साथीला बळी पडावे लागते, हे नीटपणे समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शतमूर्ख आणि पिसाट आजाऱ्यांची बडबड ध्यानात घेऊन एखादा वैद्य त्याचया आजाराचे मूळ ज्याप्रमाणे शोधून काढतो, त्याप्रमाणे हिंदी धार्मिक ग्रंथात जे भारूड भरकटलेले आहे, त्याचा अभ्यास करून ते ग्रंथ कोणत्या हेतूनी लिहिले गेले अहेत, हे शोधून काढणे जरूर आहे.'' (Max Muller : Ancient Sanskrit Literature-Panini Office Edition, p. 200).

चार वर्ण आणि विशेषतः शूद्र यांची उत्पत्ती कशी झाली, याबद्दल ब्राह्मण ग्रंथांत जी अनुमाने मांडण्यात आलेली आहेत ती वाचल्यानंतर मॅक्स मुल्लर यांच्या उपरिनिर्दिष्ट शब्दांचे महत्त्व पूर्णपणे मनाला पटते. ही सर्व अनुमाने म्हणजे शतमूर्खांची बडबड किंवा माथेफिरूची आरडाओरड होय, यात शंका नाही. ती अनुमाने अशा स्वरूपाची आहेत म्हणूनच ज्याला एखाद्या मानवी घटनेची कोडे सरळपणे उकलण्यासाठी त्या घटनेचा अभ्यास करण्याची इच्छा होईल त्याला ते कोडे सरळ रीतीने सोडविण्यास या अनुमानांचा काहीच उपयोग होणार नाही. इतिहासाच्या विद्यार्थ्याला तर त्यांचा कवडीमात्रही उपयोग होणार नाही, कारण त्यांना ऐतिहासिक पुरावा या दृष्टीने काहीच महत्त्व नाही.

०००

# शूद्रांचा दर्जा कोणता, याबद्दलचे ब्राह्मणग्रंथांतील प्रमेय

शूद्रांची उत्पत्ती कशी झाली, याबद्दलची स्पष्टीकरणे सांगताना ब्राह्मण ग्रंथात कोणता दृष्टिकोन दिसून येतो, याबद्दलची आतापर्यंत चर्चा केली. आता शूद्रांचा समाजिक दर्जा ठरवून देताना ब्राह्मण ग्रंथात कोणता दृष्टिकोन ठेवण्यात आला होता, याची चर्चा करू या. या बाबतीत पहिल्यांदा ठळकपणे दिसणारी गोष्ट म्हणजे ब्राह्मण शास्त्रकारांनी शूद्रांवर लादलेली अपात्रतादर्शक बंधने व त्या बंधनांचा भंग केला तर त्याबद्दल सांगितलेल्या शिक्षा. ही बंधने व या शिक्ष यांची शास्त्रकारांनी एक लांबलचक यादी तयार केलेली आहे. सर्व संहिता आणि ब्राह्मण ग्रंथ यात आढळून येणारी बंधने व शिक्षा थोड्या आहेत. त्यांची यादी खाली दिली आहे -

(१) कथक संहिता (२१-२) आणि मैत्रयाणी संहिता (४-१-३; १-८३) - "अग्निहोमासाठी ज्या गाईच्या दुधाचा उपयोग करावयाचा आहे, ते दूध शूद्राला मिळू देऊ नये."

(२) शतपथ ब्राह्मण (३-१-१-१०), मैत्रयाणी संहिता (७-१-१-६) आणि पंचवीस ब्राह्मण (६-१-११) - "यज्ञ करीत असता शूद्रांशी बोलू नये आणि यज्ञाच्या वेळी शूद्राने उपस्थित होऊ नये."

(३) शतपथ ब्राह्मण (१४-१-३१) आणि कथक संहिता (११-१०) - "सोमरस पिण्याच्या वेळी शूद्राला जवळ येऊ देऊ नये. सोमरस पिऊ देऊ नये."

(४) ऐतरेय ब्राह्मण (७-१२-४) आणि पंचवीस ब्राह्मण (७-१-११) - "शूद्र हा दुसऱ्यांचा नोकर आहे. (आणि नोकराच्या कामा शिवाय त्याला कोणतेही काम करता येणे शक्य नाही)"

बंधन व शिक्षा यांची यादी मारुतीच्या शेपटीप्रमाणे वाढत वाढत इतकी वाढली की शूद्रांच्या मानवी जीवनाला पूर्णपणे घरून तिने त्यांचे जीवन अक्षरशः मातीमोल करून टाकले. आपस्तंब, बौधायन इत्यादी सूत्रकार आणि मनू वगैरे स्मृतिकार यांनी सदर यादीत पुढे जी भर टाकली व ती यादी पुढे पुढे अतर्क्य वायुवेगाने वाढत गेली, ही वस्तुस्थिती लक्षात धरली तर वर केलेल्या विधानाचे स्वरूप नीटपणे कळून येईल.

जी अपात्रतादर्शक बंधने शूद्रांवर लादलेली आहेत त्यांची जंत्री डोळ्यांसमोर धरली तरच त्या बंधनांचा घातकीपणा किती तीव्र स्वरूपाचा आहे हे कळून येईल. ती बंधने

संख्येने इतकी आहेत व इतक्या भिन्न स्वरूपांची आहेत की, त्यांचे सत्यस्वरूप संपूर्णपणे उघड करून दाखविणे दुरापास्त होऊन बसलेले आहे. या बंधनांच्याबद्दल ज्यांना काही कल्पना नाही त्यांच्या माहितीसाठी मी निरनिराळे सूत्रकार व स्मृतिकार यांच्या ग्रंथांतून ती माहिती जमा करून खाली देत आहे.

२

**(I) (अ) आपस्तंब धर्मसूत्र**

'ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा चार जाती आहेत.

यातील प्रत्येक जात जन्मतः दुसऱ्या जातीपेक्षा क्रमानुसार श्रेष्ठ आहे. (प्रश्न १, पाताळ १, खंड १, सूत्रे ४-५). सर्व शूद्र व इतर जातींतील ज्यांनी दुष्कृत्ये केलीत ते लोक, हे बाद करून बाकीच्या सर्व जातींतील लोकांना (१) उपनयन विधी, (२) वेदाभ्यास आणि पवित्र अग्नी पेटविणे (यज्ञ करण्याचे अधिकार) ही कृत्ये करण्याचे अधिकार आहेत.'' (प्रश्न १, पाताळ १, खंड, सूत्र ६)

**(ब) वसिष्ठ धर्मसूत्र**

''ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशा चार जाती (वर्ण आहेत.)

ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन जातींतील लोकांना द्विज म्हणतात.

त्यांचा पहिला जन्म त्यांच्या मातेपासून; दुसरा जन्म यज्ञोपवीत विधीपासून. या विधीत सावित्री माता असते, पण गुरुजीला बाप म्हणून समजतात.

गुरुजीला बाप म्हणून एवढ्याचसाठी समजतात की, तो वेदाभ्यासाची दीक्षा देतो. (अभ्यास २, श्लोक १-४).

वेदांत म्हटले आहे की, ''ब्राह्मण त्याचे मुख होता; क्षत्रिय त्याचे बाहू झाला; वैश्य त्याच्या मांड्या झाला; शूद्र त्याच्या पायापासून जन्मला.''

''ब्राह्मण व गायत्री (वृत्ती) यांना बरोबर, क्षत्रिय आणि त्रिष्टभ् यांना बरोबर, वैश्य आणि जागति यांना बरोबर आणि शूद्र वृत्तविरहित यांना त्याने उत्पन्न केले.'' (प्रकरण ४, श्लोक ३.)

**(क) मनुस्मृती**

''जग निर्माण करणाऱ्या परमेश्वराने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांना अनुक्रमे स्वतःच्या मुखापासून, बाहूंपासून, मांड्यांपासून व पायांपासून जगाच्या सुखसमृद्धीसाठी निर्माण केले. (अध्याय १, श्लोक ३१).

ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन द्विज जाती होत; परंतु चौथी जात शूद्र हिला एकच जन्म आहे.'' (अध्याय १०, श्लोक ४)

**(II) (अ) आपस्तंब धर्मसूत्र**

स्मशानात किंवा स्मशानाजवळ अथवा स्मशानापासून हाकेवरच्या अंतरावर त्रैवर्णिक कधीही वेदांचा अभ्यास करणार नाही.

ते ठिकाण स्मशानभूमी म्हणून त्याला माहीत असेल त्याने त्या ठिकाणी वेदांचा अभ्यास करू नये.

शूद्र व जातिबहिष्कृत माणूस या दोघांना स्मशानभूमीप्रमाणे समजावे, सहाव्या सूत्रात दिलेला नियम त्यांना लागू आहे.

काहींचे असे मत आहे की, ज्या घरात ते एकत्र राहातात, त्यांनी तेथे एकत्रपणे वेदांचा अभ्यास करण्याचे टाळावे.

परंतु वेदाभ्यासी विद्यार्थी आणि शूद्र वा स्त्री यांची सहज नजरभेट झाली तरी त्या विद्यार्थ्याने वेदघोष बंद केले पाहिजेत. (प्रश्न १ - पाताळ ३, खंड ९, सूत्रे ६-११)

अस्वच्छ ब्राह्मण किंवा इतर द्विज जातीतील अस्वच्छ माणूस यांनी अन्नाला स्पर्श केला तर ते अन्न अस्वच्छ होते, पण ते खाण्यास अयोग्य होत नाही. परंतु अस्वच्छ शूद्राने काहीही आणलेले असो - मग त्याला त्याचा प्रत्यक्ष स्पर्श झालेला असो वा नसो - ते कदापिही खाऊ नये.

एखाद्याला शूद्राचा स्पर्श झाला तर त्याने जेवण घेऊ नये'' (प्रश्न १, पाताळ ५, खंड १६, सूत्रे २१-२२)

**(ब) विष्णुस्मृती**

द्विज जातीतील मृत मनुष्याला स्मशानात नेण्यासाठी शूद्राला मग तो शूद्र मृत मनुष्याचा नातेवाईक असला तरी, कोणीही हात लावू देऊ नये.

उलटपक्षी कोणत्याही द्विजाने मृत शूद्राला उचलून स्मशानात नेऊ नये.

मृत आईबापांना उचलून त्याच्या पुत्रांनी स्मशानात न्यावे. (अशा पुत्रांची व मृत आईबापांची एकच जात असली पाहिजे)

शूद्रांनी द्विज जातीतील मृत मनुष्याला, मग तो मृत मनुष्य जरी त्या शूद्राचा बाप असला तरी, उचलून स्मशानात नेऊ नये.'' (अध्याय १९, सूत्रे १-४)

**(क) वसिष्ठ धर्मसूत्र**

''म्हणून, काय खावे व काय खाऊ नये, याबद्दल आता आम्ही सांगतो.

वैद्य, शिकारी, बदफैली स्त्री, राज-दंड वाहणारा, चोर, अभिशास्ता, हिजडा आणि जातिबहिष्कृत माणूस यांनी दिलेले अन्न खाऊ नये.

त्याचप्रमाणे कवडीचुंबक, श्रौत यज्ञाचा पहिला विधी ज्याने केलेला आहे असा माणूस, कैदी, आजारी, सोमवृक्षाच्या वेली विकणारा, सुतार, परीट, कुलाल, हेर, व्याजाने कर्ज देणारा सावकार आणि पायताणे शिवणारा चांभार यांनी दिलेले अन्न खाऊ नये.

त्याचप्रमाणे, शूद्राने दिलेले अन्न खाऊ नये. (अध्याय १४, श्लोक १-४)

यमाने यासंबंधी जे उद्गार काढलेले आहेत ते खालील श्लोकांत दिलेले आहेत. लोक या श्लोकांचा आता आधार घेतात.

दुष्ट शूद्रवंश ही स्मशानभूमी होय हे उघड आहे. म्हणून शूद्रांच्या सान्निध्यात वेदघोष कधीही करू नये. (अध्याय १८, श्लोक ११-१५).

काही जण पवित्र विद्याभ्यास करून व काही घोर तपश्चर्या करून दान स्वीकारण्यास योग्य झाले. परंतु ज्याच्या पोटात शूद्राने दिलेले अन्न गेलेले नाही, असा ब्राह्मण दान स्वीकारण्यास सर्वांपेक्षा योग्य होय. (अध्याय ६, श्लोक – २६).

शूद्राने दिलेले अन्न पोटात असता जर ब्राह्मण मेला तर पुढच्या जन्मात तो एखाद्या गावातील डुक्कर म्हणून जन्मेल; किंवा ज्या शूद्रचे अन्न त्याच्या पोटात होते त्या शूद्राच्या कुटुंबात तो ब्राह्मण पुढील जन्म घेईल.

कारण शूद्रांचे अन्न खाल्ल्यामुळे त्या अन्नाची सत्वे ब्राह्मणाच्या रक्तामांसात मिसळलेली असतील, अशा स्थितीत त्याने वेदमंत्रांचा घोष दररोज केला किंवा त्याने दररोज अग्नीची पूजा केली किंवा परमेश्वराची प्रार्थना केली, तरी तो स्वर्गाच्या मार्गाला जाऊ शकणार नाही.

परंतु, जर ब्राह्मण शूद्राचे अन्न खाल्ल्यानंतर सजातीय पत्नीबरोबर रममाण झाला व त्यापासून त्याला मुलगे झाले तर ते मुलगे शूद्र जातीचे मानण्यात येतील; व अशा तऱ्हेच्या ब्राह्मणाला स्वर्गप्राप्ती होणार नाही.'' (अध्याय ६, श्लोक २७–२९)

**(ड) मनुस्मृती**

''शूद्रांचे राज्य, किंवा अधार्मिक लोकांनी चालविलेले राज्य, अथवा धर्मलंड लोकांनी हल्ला करून घेरलेले राज्य किंवा हलक्या कुळीत जन्मलेल्या लोकांनी काबीज केलेले राज्य यात ब्राह्मणाने वास्तव्य करू नये. (अध्याय ४, श्लोक ६१).

जो ब्राह्मण शूद्रासाठी यज्ञकर्मे करतो त्याला श्राद्धविधीसाठी आमंत्रण देऊ नये. श्राद्धाच्या जेवणापासून जे काही फायदे होणार असतील ते अशा ब्रह्मणाच्या उपस्थितीमुळे नष्ट होतील. (अध्याय ३, श्लोक १७८).

शूद्राचे प्रेत गावाच्या दक्षिण वेशीतून स्मशानाकडे न्यावे; परंतु द्विजांची प्रेते अनुक्रमे पश्चिम, उत्तर व पूर्व वेशीतून स्मशानाकडे न्यावीत.'' (अध्याय ५, श्लोक ९२).

**(III) (अ) आपस्तंब धर्मसूत्र**

''उजवा हात पुढे करून व तो कानाच्या समांतर रेषेत धरून ब्राह्मणाने नमस्कार करावा. उजवा हात छातीच्या पुढे आडवा धरून क्षत्रियाने नमस्कार करावा. उजवा हात कमरेच्या समांतर रेषेत करून वैश्याने नमस्कार करावा. दोन्ही हात जोडून व ते खाली लववून व पुढे करून शूद्राने नमस्कार करावा.'' (प्रश्न १, पाताळ २, खंड ५, सूत्र १६)

द्विज जातीच्या माणसाने केलेल्या नमस्काराला प्रतिनमस्कार करावयाचा तर ज्याला तो प्रतिनमस्कार करावयाचा त्याच्या नावातील शेवटले अक्षर असे उच्चारले पाहिजे की, ते दूरवर ऐकू जाईल. (प्रश्न १, पाताळ २, खंड ५, सूत्र १६).

ब्राह्मणाच्या घरी जर शूद्र पाहुणा म्हणून आला तर पहिल्यांदा त्या शूद्र पाहुण्याला ब्राह्मणाने काहीतरी काम करावयास लावावे व त्यानंतर वाटल्यास त्याला जेवण द्यावे. शूद्राकडून काही काम करून न घेता त्याला जर ब्राह्मणाने जेवण दिले तर ब्राह्मणाने त्या शूद्राचा आदरसत्कार केला, असे होईल.

अथवा, ब्राह्मणाच्या घरात जे चाकर असतील त्यांनी राज-कोठारातून तांदूळ आणावेत व त्याचे शूद्र पाहुण्याला पक्वान्न घालू त्याचे आदरातिथ्य करावे.'' (प्रश्न १, पाताळ २, खंड ४, सूत्रे १९-२०)

**(ब) विष्णुस्मृती**

आपल्या घरी एखाद्या शूद्राचा जे आदरसत्कार करील किंवा जो दवासाठी तयार केलेले हवनपदार्थ अथवा श्राद्धाचे अन्न एखाद्या धर्मिक तपस्व्याला देईल त्याला १०० पण दंड भरावा लागेल. (अध्याय ५, सूत्र ११५).

**(क) मनुस्मृती**

'एखाद्याला ब्राह्मण भेटला तर तो ब्राह्मण आपल्यापेक्षा १० वर्षांनी वडील आहे असे त्याने समजून वागावे. हे लोक आपले वडील होत व आपण त्यांचा मुलगा होय, असे त्याने समजावे. त्याला ब्राह्मण व क्षत्रिय हे एकाच वेळी भेटले तर ब्राह्मण यालाच स्वत: वडील मानावे.

संपत्ती, नातेवाईक, वयोमान, धर्मपंथ व ज्ञान या पाच कारणांनी समाजात आदर मिळतो. शेवटचे कारण हे सर्वांत अत्यंत महत्त्वाचे आहे.

पहिल्या तीन वर्गातील ज्या एखाद्या वर्गाच्या मनुष्यामधे या पाच कारणांचे अस्तित्व उत्कटपणे बघावयास मिळते तो या पृथ्वीतलावर आदरास जास्त पात्र होतो. परंतु एखाद्या शूद्राजवळ संपत्ती व ज्ञान याचे केवढेही भांडार असले तरी तो केवळ त्या कारणांमुळे आदरास पात्र ठरत नाही. शूद्र आपल्या वयोमानाने मात्र आदरास पात्र होतो; मात्र तो जेव्हा १०० वर्षांचा होतो तेव्हाच, त्यापूर्वी नाही. (अध्याय २, श्लोक १३५-१३७).

जो ब्राह्मण आपल्या वर्णात ज्ञानाने समृद्ध असेल तो सर्व ब्राह्मणांपेक्षा श्रेष्ठ होय. जो वैश्य आपल्या वर्णात संपत्तीने समृद्ध असेल तो सर्व क्षत्रियांपेक्षा श्रेष्ठ होय. जो वैश्य आपल्या वर्णात संपत्तीने समृद्ध असेल तो सर्व वैश्यांपेक्षा श्रेष्ठ होय. जो शूद्र आपल्या वर्णात वयोमानाने जास्त असेल तो सर्व शूद्रांपेक्षा श्रेष्ठ होय.

म्हणून एखाद्याचे डोके पांढरे झालेले असेल त्याला वयोवृद्ध समजू नये. वयाने लहान असला तरी ज्याला वेदांचे ज्ञान झालेले आहे त्याला देव वयोवृद्ध समजतात. (अध्याय २, श्लोक १५४-५६).

ब्राह्मणाच्या घरात जर क्षत्रिय, वैश्य अगर शूद्र राहिला तर त्या ब्राह्मणाचा तो पाहुणा मित्र किंवा नातेवाईक अथवा गुरू म्हणून होत नाही. (म्हणजे फक्त ब्राह्मण दुसऱ्या ब्राह्मणाच्या घरात पाहुणा होतो. दुसऱ्या कोणाला होता येत नाही.)

ब्राह्मणाच्या घरचे जेवण आटोपल्यावर त्या घरात जर एखादा क्षत्रिय पाहुणा म्हणून आला तर सदर ब्राह्मणाने त्याला त्याने मागितले तर अन्न द्यावे.

जर वैश्य अगर शूद्र ब्राह्मणाच्या घरी पाहुणा म्हणून आला तर त्या ब्राह्मणाने पाहुण्याला आपल्या नोकरांच्या हस्ते अन्न द्यावे व गोडगोड बोलावे'' (अध्याय ३, श्लोक ११०-११२).

**(IV) (अ) आपस्तंब धर्मसूत्र**

एखाद्याने क्षत्रियाला ठार मारले तर त्याने पापक्षालनार्थ ब्राह्मणास एक हजार गाई दान द्याव्यात.

एखाद्याने जर वैश्याला ठार मारले असेल तर त्याने पापक्षालनार्थ ब्राह्मणाला शंभर गाई दान द्याव्यात.

एखाद्याने जर शूद्राला ठार मारले असेल तर त्याने पापक्षालनार्थ ब्राह्मणाला दहा गाई द्याव्यात. (प्रश्न १, पाताळ ९, खंड २४, सूत्रे १-३).

**(ब) गौतम धर्मसूत्र**

"क्षत्रियाने ब्राह्मणाला शिवीगाळ केली तर त्या क्षत्रियाला शंभर पणांचा दंड करावा.

क्षत्रियाने ब्राह्मणाला मारहाण केली तर त्याला दोनशे पणांचा दंड करावा.

वैश्याने ब्राह्मणाला शिवीगाळ केली तर वैश्याला दीडशे पणांचा दंड करावा.

परंतु ब्राह्मणाने क्षत्रियाला शिवीगाळ केली तर ब्राह्मणाला पन्नास पणांचा दंड करावा.

ब्राह्मणाने वैश्याला शिवीगाळ केली तर ब्राह्मणाला पंचवीस पणांचा दंड करावा.

ब्राह्मणाने शूद्राला शिवीगाळ केली तर त्याला कोणत्याही प्रकारची शिक्षा करू नये."

(प्रश्न १, पाताळ ९, खंड २४, सूत्रे १-३)

**(क) बृहस्पती धर्मसूत्र**

"ब्राह्मणाने क्षत्रियाला शिवीगाळ केली तर त्या ब्राह्मणाला पन्नास पणांचा दंड करावा; त्याने जर वैश्याला शिवीगळ केली तर त्याला पंचवीस पणांचा दंड करावा; आणि त्याने शूद्राला शिवीगाळ केली तर त्याला साडेबारा पणांची शिक्षा करावी.

जो शूद्र आपल्या धर्मानुसार वर्तन करतो त्याला जर ब्राह्मणाने शिवीगाळ केली, तरच या बाबतीत सांगितलेली शिक्षा ब्राह्मणाला देता येते. पण जर तो शूद्र शुद्धाचरणी नसेल तर अशा शूद्राला ब्राह्मणाने शिवीगाळ केली तर तो ब्राह्मणाचा गुन्हा होत नही." (अध्याय २०, श्लोक ७-११).

**(ड) मनुस्मृती**

"क्षत्रियाने ब्राह्मणाला शिवीगाळ केली तर क्षत्रियाला शंभर पणांचा दंड केला पाहिजे. वैश्याने ब्राह्मणाला शिवीगाळ केली तर वैश्याला अडीचशे पणांचा दंड करावा परंतु शूद्राने ब्राह्मणाला शिवीगाळ केली तर शूद्राला देहदंडाची शिक्षा दिली पाहिजे.

ब्राह्मणाने क्षत्रियाचा अपमान केला तर ब्राह्मणाला पन्नास पणांचा दंड करवा,

ब्राह्मणाने वैश्यांचा अपमान केला तर त्याला पंचवीस पणांचा दंड करावा. ब्राह्मणाने शूद्राचा अपमान केला तर त्याला बारा पणांचा दंड करावा." (अध्याय ८, श्लोक २६७-६८)

ब्राह्मणाने ब्राह्मणाला ठार मारले तर त्याचे सर्व तपःसामर्थ्य नष्ट झाले असे समजावे. ब्राह्मणाने क्षत्रियाला ठार मारले तर त्याचे एक चतुर्थांश तपःसामर्थ्य नष्ट झाले असे समजावे.

ब्राह्मणाने शूद्राला ठार मारले तर त्याचे एक अष्टमांश तपःसामर्थ्य नष्ट झाले असे समजावे. ब्राह्मणाने शूद्राला ठार मारले तर, तो शूद्र जर शुद्धाचरणी असेल तर, त्या ब्राह्मणाचे एक सोळांश तपःसामर्थ्य नष्ट झाले, असे समजावे.

परंतु जर ब्राह्मणाने क्षत्रियाला अनैच्छिकपणे ठार केले तर पापक्षालनार्थ त्या ब्राह्मणाने एक हजार गाई व एक बैल यांचे दान (वाटल्यास) करावे.

अथवा, ज्या ब्राह्मणाने क्षत्रियाला ठार केले आहे, त्याने शहरापासून दूर अंतरावर झाडाखाली तीन वर्षे रहावे व त्या अवधीत सर्व इंद्रियांचे दमन करून व जटा वाढवून ब्राह्मणाला ठार मारल्यानंतर पापक्षालनार्थ जे तपश्चरण करावे लागते ते तपश्चरण करावे.

ब्राह्मणाने वैश्याला ठार मारले असेल तर त्याने पापक्षालनार्थ असले तपश्चरण एक वर्ष करावे व एकशे एक गुरांचे दान करावे. मात्र तो वैश्य शुद्धाचरणी असला पाहिजे.

शूद्राला ठार मारणाऱ्या ब्राह्मणाने सदर तऱ्हेचे तपश्चरण सहा महिने करावे. किंवा त्याने पुरोहिताला दहा पांढऱ्या गाई व एक बैल यांचे दान करावे.'' (अध्याय ९, श्लोक १२७-१३१).

**(इ) विष्णुस्मृती**

''खालच्या जातीचा माणूस वरच्या जातीच्या माणसाचा जर अपमान करील अगर त्याला इजा करील तर यासाठी खालच्या जातीचा माणूस आपल्या ज्या अवयवांचा उपयोग करील ते अवयव राजाने तोडून टाकले पाहिजेत.

जर खालच्या जातीचा माणूस वरच्या जातीच्या माणसाबरोबर समानतेच्या भावनेने बसला तर त्याच्या ढुंगणावर डाग देऊन त्याला हद्दपार करावे.

खालच्या जातीचा माणूस वरच्या जातीच्या माणसाच्या अंगावर थुंकला तर खालच्या जातीच्या माणसाचे दोन्ही ओठ कापून टाकावेत.

खालच्या जातीचा माणूस जर वरच्या जातीच्या माणसाकडे जाणारा वारा अडवून धरेल तर त्याचे कुल्ले कापून टाकावेत.

जर त्याने शिवीगाळ (वरच्या जातीच्या माणसाबद्दल) केली तर त्याची जीभ छाटून काढावी.

नीच जातीत जन्मलेला माणूस वरिष्ठ जातीत जन्मलेल्या माणसाला त्याच्या कर्तव्याबद्दल उपदेश करू लागला तर राजाने त्या नीच जातीतील माणसाच्या तोंडात कढत तेल ओतण्याची शिक्षा द्यावी.

वरिष्ठ वर्गातील एखाद्या मनुष्याच्या नावाच्या किंवा जातीचा एखाद्या शूद्राने चेष्टेने उल्लेख केला तर तापवून लालबुंद झालेली लोखंडाची सळी त्या शूद्रच्या तोंडात दहा अंगुळे कोंबावी.'' (अध्याय ५, सूत्रे १९-२५).

**(V) (अ) बृहस्पती स्मृती**

''जो शूद्र धार्मिक तत्त्वांची शिकवण दुसऱ्याला देईल, किंवा वेदमंत्रांचा उच्चार करील, अथवा एखाद्या ब्राह्मणाचा अपमान करील त्याची जीभ कापून टाकली पाहिजे.''

(अध्याय १२, श्लोक १२).

**(ब) गौतम धर्मसूत्र**

''एखादा शूद्र जर स्वेच्छेने वेदमंत्रांचा घोष ऐकत राहिला तर कथिल व लाख यांचे तापवलेले रस त्याच्या कानात ओतावे.

तो जर वेद वाचू लागला तर त्याची जीभ छाटून टाकावी.

वेद जर त्याला मुखोद्गत झाले असतील तर त्याला मधोमध उभे चिरून टाकावे.'' (अध्याय २०, सूत्रे ४०६)

**(क) मनुस्मृती**

''जो पैसे घेऊन विद्या शिकवितो, त्याचप्रमाणे जो पैसे देऊन शिकतो, जो शूद्र शिक्षकाचा पेशा करतो व जो अशा शूद्रापासून शिक्षण घेतो, अशा माणसाला देव पितृ यांच्या सन्मानार्थ जे विधी करतात त्या विधीला उपस्थित राहण्याचे आमंत्रण देऊ नये. (अध्याय ३, श्लोक १५६).

शूद्राला कोणी सल्लामसलत देऊ नये. किंवा त्याला देवाला वाहून राहिलेले अन्न अथवा लोणीही कोणी देऊ नये.

शूद्राला कायदाकानून कोणी शिकवू नये किंवा त्याला धार्मिक विधी करण्याबद्दलची माहिती कोणी देऊ नये. ही आज्ञा जो पाळणार नाही, तो त्या शूद्राबरोबर असमव्रत नावाच्या नरकाच्या घोर अंधारात खितपत पडेल. (अध्याय ४, श्लोक ७८-८१).

वेदमंत्रांचा घोष अस्पष्टपणे कोणीही करू नये; किंवा वेदमंत्रांचा घोष शूद्रांच्या सान्निध्यात कोणीही करू नये, वेदमंत्रांचा घोष रात्रीपासून सूर्योदयापर्यंत करून थकवा आला तरी कोणी पुनः झोपू नये.'' (अध्याय ४, श्लोक ९९).

**(VI) मनुस्मृती**

''मनात कोणत्याही प्रकारचा किंतु न आणता ब्राह्मणाने शूद्राच्या वस्तू आपल्या ताब्यात घ्याव्यात. कारण स्वतःची चीजवस्तू शुद्राला नसते. तो गुलाम आहे व त्याची जी काही चीजवस्तू असेल तिच्यावर त्याचा हक्क नसतो, तर त्याच्या धन्याचा. (अध्याय ८, श्लोक ४१७)

शूद्र धनसंचय करण्यास समर्थ असला तरी त्याने संपत्ती कमवू नये. कारण शूद्राजवळ असलेली संपत्ती पाहिल्याबरोबर ब्राह्मणाच्या चित्ताला वेदना होतात.'' (अध्याय १०, श्लोक १२९)

**(VII) मनुस्मृतीचा राजाला उपदेश**

''स्वतःच्या जन्माच्या आधारे जो आपल्याला ब्राह्मण म्हणवून घेतो किंवा जो स्वतःला कोणत्याही गोष्टींचा आधार न घेता ब्राह्मण म्हणवून घेतो, तो राजाची इच्छा असेल तर, कायदेकानूची घोषणा करील. शूद्राला असली घोषणा करण्याचा कधीही अधिकार नसतो.

शूद्र न्यायनिवाडा करीत असता राजा जर नुसता त्या शूद्राकडे पाहात राहील तर

दलदलीत चिखलात गाय जशी बुडते तसे त्या राजाचे राज्य दुर्दैवाच्या खाईत बुडून जाईल.

ज्या राज्यात शूद्रांचा प्रामुख्याने भरणा आहे आणि ज्यात धर्मलंड लोकांचा बुजबुजाट झालेला आहे व ज्यात द्विज वर्णाचा एकही माणूस नाही असले राज्य दुष्काळ आणि निरनिराळ्या साथी यांच्या तडाख्यांनी समूळ नष्ट होईल.'' (अध्याय ८, श्लोक २०-२२).

**(VIII) (अ) आपस्तंब धर्मसूत्र**

पवित्र धार्मिक आदेश पाळण्याच्या बुद्धीने जे घोर तपश्चरणे करतात, ब्राह्मणांचे पाय धुऊन जे शूद्र आपले जीवन घालवितात आणि जे आंधळे, मुके, बहिरे आणि व्याधिग्रस्त आहेत, अशा लोकांना सरकारी कर माफ असावा. (प्रश्न २, पाताळ १०, खंड २६, सूत्रे १४-१६)

त्रैवर्णिकांची सेवा-चाकरी करणे, हे शास्त्राने विदित केलेले आहे. शूद्र जसजशी उच्च जातीतील माणसांची सेवाचाकरी करील तसतशी त्याला जास्त दर्जाची पुण्याई लाभेल.'' (प्रश्न १, पाताळ १, खंड १, सूत्रे ७-८)

**(ब) मनुस्मृती**

''या विश्वाचे संरक्षण करण्यासाठी देदीप्यमान् देवाधिदेव ब्रह्मदेव याने आपल्या मुखातून, बाहुंपासून, मांड्यांपासून आणि पायांपासून जन्म घेतलेल्यांची कर्तव्यकर्मे काय आहेत, याबद्दल वाटणी करून दिली आहे.

अध्यापन, अभ्यास, यज्ञयाग करणे, पुरोहितपणा करणे, दान देणे व घेणे ही कर्तव्यकर्मे ब्राह्मणाला वाटून दिली.

जनता संरक्षण, दान करणे, यज्ञयाग करणे, अभ्यास करणे आणि उपभोग्य वस्तूंपासून परावृत्ती ठेवणे ही कर्तव्ये क्षत्रियाला वाटून दिली.

गुरे पाळणे, दान करणे, यज्ञयाग करणे, अभ्यास करणे, व्यापार करणे, व्याजाने पैसे लावणे आणि शेतकी करणे ही कामे वैश्याला वाटून दिली.

उपरिनिर्दिष्ट जातींची बिनभोबाट सेवाचाकरी करणे हे एकच काम परमेश्वराने शूद्राला दिले. (अध्याय १, श्लोक ८७-९१).

**(IX) (अ) आपस्तंब धर्मसूत्र**

''त्रैवर्णिकांतील एखाद्या माणसाने शूद्र जातीच्या स्त्रीशी व्यभिचार केला तर त्याला हद्दपार करावे.

एखाद्या शूद्राने त्रैवर्णिक जातीतील स्त्रीशी व्यभिचार केला तर त्याला देहांताची शिक्षा केली पाहिजे.'' (प्रश्न २, पाताळ १०, खंड २७, सूत्रे ७-९)

**(ब) गौतम धर्मसूत्र**

''एखाद्या शूद्राने आर्य स्त्रीशी जर जबरी संभोग केला तर त्याचे लिंग तोडून टाकावे आणि त्याची मालमत्ता जप्त करावी.

ज्या आर्य स्त्रीबरोबर शूद्राने जबरी-संभोग केला असेल, तिला जर कोणी पालक असेल तर त्या शूद्राला प्रथम उपरिनिर्दिष्ट शिक्षा भोगू द्यावी व त्यानंतर त्याला ठार मारावे.''

(अध्याय १२, सूत्रे-२-३)

(क) मनुस्मृती

''एखाद्या शूद्राने सर्वात वरिष्ठ जी जात आहे त्याच जातीतील मुलीच्या (ब्राह्मण मुलीच्या) प्रेमाची याचना केली तर त्याला देहांताची शिक्षा द्यावी. (अध्याय ८, श्लोक ३६६).

त्रैवर्णिक जातीत जन्मलेल्या स्त्रीबरोबर एखाद्या शूद्राने संभोग केला तर त्या स्त्रीला पालक असो वा नसो, त्या शूद्राचे लिंग कापून टाकावे. त्या स्त्रीला पालक असेल तर त्या शूद्राची सर्व मालमत्ता जप्त करावी व त्याला देहांताची शिक्षा द्यावी. (अध्याय ८, श्लोक ३७४).

त्रैवर्णिक जातीत जन्मलेल्या पुरुषांनी पहिल्यांदा त्यांच्या जातीत जन्मलेल्या स्त्रीला लग्नासाठी योग्य म्हणून निवडावी; परंतु त्रैवर्णिक जातीतील जे पुरुष कामांधपणामुळे लग्नाची इच्छा करतात त्यांना खालील जातीतील स्त्रिया लग्नाला योग्य होत.

शूद्र स्त्री ही शूद्र माणसाचीच बायको होण्यास योग्य आहे; वैश्याला आपल्या जातीतील व शूद्र या जातीतील स्त्रिया यांची बायको म्हणून निवड करता येते. ब्राह्मणाला आपल्या जातीतील स्त्री व वैश्य व शूद्र या जातींतील स्त्रिया यांची बायको म्हणून निवड करता येते.

ब्राह्मण व क्षत्रिय हे आपत्काळात जरी असले तरी ते शूद्र स्त्रीला बायको करीत नाहीत.

शूद्र स्त्रीच्या स्वरूपाला मोहून जाऊन त्रैवर्णिक जातीतील जे पुरुष तिला बायको करतात ते आपले कुळ व भावी पिढी यांना शूद्रांच्या अवस्थेला लौकर नेऊन पोहोचवितात. (अध्याय ३, श्लोक १२-१५).

जो ब्राह्मण शूद्र स्त्रीबरोबर संभोग करतो तो नीच अवस्थेला जातो. त्या स्त्रीला त्याच्यापासून मुलगा झाला तर त्याचे ब्राह्मणत्व खरोखर नष्ट होते.

देव, पितृ आणि अतिथी यांना हव्य-कव्य देऊन त्यांचा सत्कार करणे हे जर शूद्र स्त्रीच्या सर्वस्वी स्वाधीन असेल तर त्या हव्य-कव्याचा देव व पितृ स्वीकार करीत नाहीत व शूद्र स्त्री ज्या त्रैवर्णिकाजवळ आहे त्यालाही स्वर्गप्राप्ती होत नाही.

शूद्रा स्त्रीच्या ओठावरील धर्मबिंदू जो प्यालेला आहे, तिच्या श्वासोच्छ्वासाने जो पूर्ण घेरलेला आहे आणि ज्यालाल त्या शूद्र स्त्रीपासून मुलगा झालेला आहे, अशा माणसासाठी कोणतेही प्रायश्चित सांगितलेले नाही.'' (अध्याय ३, श्लोक १७-१९).

(X) (अ) वसिष्ठ धर्मसूत्र

''वाईट वासना करणे, मत्सर करणे, असत्य बोलणे, ब्राह्मणांबद्दल वाईट रीतीने बोलणे, पाठीमागे निंदा करणे आणि कौर्य ही शूद्रांची लक्षणे होत.'' (अध्याय ६, श्लोक २४)

(ब) विष्णुस्मृती

"ब्राह्मणाच्या मुलाला जे नाव ठेवावण्याचे ते मंगलकारक असावे; क्षत्रियाच्या मुलाला जे नाव ठेवावयाचे ते अधिकारदर्शक असावे, वैश्याच्या मुलाला जे नाव ठेवावयाचे ते संपत्तीदर्शक असावे आणि शूद्राच्या मुलाला जे नाव ठेवावयाचे ते तिरस्कारदर्शक असावे." (अध्याय २७, सूत्रे ६-९).

(क) गौतम धर्मसूत्र

फक्त एकदाच जिच्यामध्ये मनुष्याचा जन्म होतो अशा चवथ्या जातीत शूद्राचा जन्म होतो. तो वरिष्ठ जातींची सेवाचाकरी करतो. सेवाचाकरीचा मोबदला जो वरिष्ठ जातीकडून मिळेल त्यावर त्याने गुजराण करावी. वरिष्ठ जातीतील लोकांनी वापरून टाकलेले जोडे त्याने घालावेत. वरिष्ठ जातीतील लोकांनी खाऊन जे शिल्लक राहिलेले असेल तेच अन्न त्याने खावे.

दुष्ट बुद्धीने शिव्या देऊन त्रैवर्णिक जातीतील लोकांची जाणूनबुजून हेटाळणी करणे, किंवा दुष्ट बुद्धीने त्यांना हाणमार करणे, असे वर्तन जे शूद्र करतात त्यांचे अवयव (सदर वर्तन करताना वापरलेले अवयव) छाटून टाकावेत.

द्विज जातीत जन्मलेल्या माणसाबरोबर समानतेच्या भावनेने बसणे, झोपणे, संभाषण करणे किंवा रस्त्याने चालणे, असले वर्तन जो शूद्र करतो त्याला ठार मारावे." (अध्याय १०, सूत्रे ५०, ५८-५९ आणि अध्याय १२, सूत्रे १-७)

(ड) मनुस्मृती

मुंजीचा विधी होऊन ज्यांना द्विजत्व प्राप्त झालेले आहे, अशा लोकांकडून त्यांच्या इच्छेविरुद्ध जो ब्राह्मण सत्तांधपणाने आणि दुष्ट बुद्धीने गुलामांची कामे जबरदस्तीने करवून घेतो, अशा ब्राह्मणाला राजाने सहाशे पणांचा दंड करावा.

परंतु एखाद्या शूद्राला, मग तो शूद्र गुलाम म्हणून विकत घेतलेला असो व नसो, एखाद्या ब्राह्मणाने गुलामपणाची कामे करावयास भाग पाडले तर त्या ब्राह्मणाला कोणतीही शिक्षा करू नये. कारण ब्राह्मणांची सेवा करण्यासाठीच स्वयंभूत परमेश्वराने शूद्राला जन्माला घातले आहे.

धन्याने शूद्राला स्वतःच्या नोकरीतून मोकळे केलेले असले तरी तो शूद्र आपल्या गुलामगिरीतून मुक्त होऊ शकत नाही. कारण गुलामगिरी ही त्याच्या जन्माची सोबतीण आहे. मग त्याच्यापासून तिला कोण मुक्त करू शकेल? (अध्याय ८, श्लोक ४१२-४१४).

जो माणूस सन्मार्गानी आपले आयुष्य चांगल्या रीतीने घालवील किंवा जितके निष्कलंक राखील तितक्या चांगल्या रीतीने त्याला ऐहिक व पारलौकिक सुख मिळेल. (अध्याय १०, श्लोक १२८).

नावलौकिक कमावलेले, वेदांचा अर्थबोध जाणणारे आणि कुटुंबवाले जे ब्राह्मण आहेत त्यांची आज्ञा पाळणे हेच शूद्रांचे श्रेष्ठतम कर्तव्यकर्म होय. हे कर्तव्यकर्म करण्यानेच शूद्र आपल्या कल्याणाची तरतूद करून ठेवतो.

जो शूद्र मनाने निर्मळ राहील, वरिष्ठ जातीतील लोकांची आज्ञा पालन करील, सौम्य भाषण करील, घमेंडखोरपणा दाखविणार नाही आणि ब्राह्मणांशी सदैव नम्रतेने वागेल तो पुढील जन्मी उच्च जातीत जन्म घेईल. (अध्याय ९, श्लोक ३३४-३३५).

उपजीविकेचे काही साधन हाती असावे, अशी इच्छा करणाऱ्या शूद्राने क्षत्रियाची चाकरी करावी किंवा ज्या शूद्राला आपल्या जीवनाचे संगोपन करण्याची इच्छा असेल त्याने श्रीमंत वैश्याची चाकरी करावी.

ज्या शूद्राला जीवनाचे संगोपन आणि स्वर्गप्राप्ती यांची इच्छा असेल त्याने ब्राह्मणाची चाकरी करावी. कारण तो चाकरी करताना त्याच्याकडून 'ब्राह्मण' हा शब्द वेहोवेळी उच्चारला जाईल आणि त्यामुळे त्या शूद्राला जे काही कर्तव्यकर्म करावयाचे आहे त्याची पूर्ती झाली, असे होईल.

ब्राह्मणांची सेवा करणे हाच शूद्रांचा उत्तमोत्तम धंदा होय, असे सर्वांचे मत आहे. कारण या व्यतिरिक्त त्याने दुसरा धंदा केला तर त्यामुळे त्याचा काही फायदा होणार नाही.

जो शूद्र आपली सेवाचाकरी करतो त्याची कुवत, हुशारी आणि कुटुंबस्थिती याबद्दल चौकशी करून त्या मानाने ब्राह्मणांनी आपल्या घरातील वस्तूंतून काही वस्तू त्या शूद्राचे संगोपन करण्यासाठी दिल्या पाहिजेत.

घरात शिल्लक राहिलेले अन्न, जुने कपडे, कुजके धान्य आणि जुनी लाकडी आसने ही ब्राह्मणांनी आपल्या शूद्र नोकरास द्यावीत. (अध्याय १०, श्लोक १२१-१२५.)

ब्राह्मणाचा मंगलसूचक, क्षत्रियाचा सत्तासूचक, वैश्याचा संपत्ती सूचक आणि शूद्राचा सेवादर्शक, असा प्रत्येकाचा उत्कृष्ट गुण असावा. (अध्याय २, श्लोक ३१-३२).

द्विज जातीत जन्मलेल्या माणसाची अत्यंत घाणेरड्या शब्दांची जो विटंबना करतो त्याची जीभ कापून टाकावी, कारण विटंबना करणारा कनिष्ठ जातीचा समजला पाहिजे.

जर तो द्विज जातीचा उल्लेख अत्यंत अपमानकारक रीतीने करीत असेल तर तापवून लाल केलेली लोखंडाची दहा बोटे लांबीची सळी त्याच्या तोंडात खुपसावी.

माणूस अहंकाराच्या भरात पुरोहिताला त्याच्या कर्तव्य-कर्माबद्दल काही सूचना देऊ लागला तर राजाने अशा माणसाच्या कानात व तोंडात कडक तापविलेले तेल ओतवावे. (अध्याय ८, श्लोक २७०-७२).

जर एखादा माणूस आपल्या अवयवाने वरिष्ठ जातीतील माणसाला दुखापत करील तर त्या माणसाचा तो अवयव कापून टाकावा, हा मनूचा दंडक अहे.

जर तो माणूस वरिष्ठ जातीतील माणसावर हात अगर काठी उगारील तर त्याचा हात छाटून टाकावा. आणि रागाने तो जर वरिष्ठ जातीतील माणसाला लाथेने मारील तर त्या माणसाचे दोन्ही पाय छाटून टाकावेत.

कनिष्ठ जातीत जन्मलेला माणूस वरिष्ठ जातीत जन्मलेल्या माणसाबरोबर बसला तर, त्याच्या ढुंगणावर डाग देऊन त्याला हद्दपार करावे, किंवा राजाने त्याचे ढुंगण कापवावे.

कनिष्ठ जातीतील माणूस वरिष्ठ जातीतील माणसावर जर मगरूरपणाने थुंकला तर

राजाने त्याचे दोन्ही ओठ कापवावेत. त्याने जर वरिष्ठ जातीच्या माणसावर लघवी केली तर त्याच्या शिस्नाचा पुढचा भाग कापवावा, आणि वरिष्ठ जातीच्या माणसावर वाहणारा वारा अडवून धरला तर त्याचे गुदद्वार कापवावे.

कनिष्ठ जातीतील माणसाने जर वरिष्ठ जातीच्या माणसाचे केस पकडून धरले, तर राजाने काही विचार न करता त्याचे दोन्ही हात कापवावेत; त्याने जर वरिष्ठ जातीच्या माणसाचे पाय, दाढी, मान किंवा दंड पकडले तर त्याचे दोन्ही हात कापवावेत.

जर एका माणसाने दुसऱ्या माणसाची कातडी फाडली किंवा त्याच्या अंगातून रक्त काढले तर त्याला पाचशे पण दंड करावा; जर त्याने दुसऱ्याचे मांस तोडले तर त्याला सहा निष्कांचा दंड करावा. परंतु जर त्याने दुसऱ्याचे हाड मोडले असेल तर त्याला हद्दपार करावे. (अध्याय ८, श्लोक २७९-२८४).

**(इ) नारदस्मृती**

शूद्र जातीत जन्मलेल्या लोकांनी द्विज जातीत जन्मलेल्या आर्य लोकांविरुद्ध जर खोटे आरोप केले तर सरकारी अधिकाऱ्यांनी त्या शूद्र लोकांच्या जिभा मधोमध चिराव्यात आणि त्यांना खोड्यात बसवावे.

एखाद्या शूद्राने द्विज जातीतील माणसाचा जर घाणेरड्या शब्दांनी अपमान केला तर त्याची जीभ छाटून टाकावी. कारण तो जन्मतःच कनिष्ठ दर्जाचा आहे.

जर एखादा शूद्र वरिष्ठ जातीतील लोकांची नावे किंवा जाती यांचा उल्लेख तिरस्कारदर्शक शब्दांनी करीत असला तर तापवून लालबुंद केलेली दशांगुळे लांबीची लोखंडाची कांब त्याच्या तोंडात कोंबावी.

तो जर ब्राह्मणांना त्यांच्या कर्तव्यकर्माबद्दल आढ्यतेने धडे शिकवू लागला तर राजाने कडक तापविलेले तेल त्याच्या तोंडात व कानात ओतवावे.

आपल्या ज्या अवयवाने शूद्र ब्राह्मणाला त्रास देईल त्याचा तो अवयव कापून टाकावा. हीच शिक्षा त्याच्या अपराधाला पुरी आहे.

जो शूद्र वरिष्ठ जातीतील माणसांबरोबर त्याच आसनावर बसतो त्याच्या ढुंगणावर डाग द्यावेत व त्याला हद्दपार करावे किंवा राजाने त्याचे ढुंगण कापवावे.

जो शूद्र अहंकाराच्या भरात वरिष्ठ जातीतील जमाणसांच्या अंगावर थुंकतो, त्याचे दोन्ही ओठ राजाने कापवावेत. त्याने जर वरिष्ठ जातीच्या माणसांवर लघवी केली तर त्याच्या शिस्नाचा पुढचा भाग कापावा. त्याने जर वरिष्ठ जातीच्या माणसावर जाणारा वारा थोपवून धरला तर त्याचे कुल्ले कापवावेत. (अध्याय १, श्लोक २२, २७).

३

वर सांगितलेल्या प्रकाराचे कायदेकानू शूद्रांच्या विरुद्ध ब्राह्मणांनी तयार केले होते. त्यांचा सारांश खालीलप्रमाणे देता येईल.

(१) सामाजिक रचनेत शूद्रांचा दर्जा शेवटचा ठरविण्यात आला.

(२) शूद्र हा घाणेरडा असल्यामुळे त्याला दिसेल किंवा त्याला ऐकू जाईल अशा रीतीने कोणतेही पवित्र कार्य करू नये.

(३) इतर जातींतील लोकांना ज्या आदराने वागविण्यात येते तसला आदर शूद्रांबद्दल दाखवू नये.

(४) शूद्राचे प्राण म्हणजे क:पदार्थ. शूद्राला कोणीही ठार मारावे, त्याबद्दल त्याला कोणी नुकसानभरपाई मागणार नाही. नुकसानभरपाई देण्याची वेळ आली तर ती इतकी अल्पशी की, ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांना ठार मारल्यानंतर जी नुकसानभरपाई घेण्यात येते तिच्या ती पासंगालाही पुरणार नाही.

(५) शूद्राने ज्ञान संपादन करू नये. त्याला शिक्षण देणे हे पाप आहे; तसेच तो गुन्हा होतो.

(६) शूद्राने स्थावरजंगम मालमत्ता जमवू नये. ब्राह्मणाला इच्छा होईल तेव्हा तो शूद्राची मालमत्ता आपल्या ताब्यात घेऊ शकतो.

(७) शूद्र कोणत्याही दर्जाचा अधिकारी होऊ शकत नाही.

(८) वरिष्ठ वर्गातील लोकांची सेवाचाकरी करणे हेच शूद्राचे कर्तव्यकर्म आहे व त्यामुळेच त्याला मोक्ष मिळतो.

(९) वरिष्ठ जातींतील लोकांनी शूद्रांशी मिश्रविवाह करू नये. तथापि शूद्र स्त्रीला रखेली म्हणून ठेवण्याची मुभा त्यांना आहे. परंतु शूद्राने वरिष्ठ जातीतील स्त्रीच्या अंगाला स्पर्श केला तरी तो घोर शिक्षेस पात्र होतो.

(१०) शूद्र गुलामगिरीत जन्मतो व त्याला मरेपर्यंत गुलामगिरीतच ठेवले पाहिजे.

वरील सारांश विचारात घेतले तर त्यातून दोन मुद्दे प्रामुख्याने लक्षात येतात. ब्राह्मणांनी स्वत:चे कायदेकानू करण्याचे अधिकार गाजविण्यासाठी शूद्राला निवडून काढलेले आहे, हा एक मुद्दा. फार प्राचीन काळचे ब्राह्मणी वड्मय वाचले तर असे दिसून येईल की, वैश्य यांचा हिंदी-आर्य समाजात अत्यंत छळ झालेला आहे; शूद्रांचा नव्हे. असे असताही फक्त शूद्रांच्या विरुद्ध ब्रह्मणांनी आपले अधिकार कायदेकानू करून गाजविले, हे अत्यंत आश्चर्यकारक आहे. या बाबतीत ऐतरेय ब्राह्मण हा ग्रंथ वाचून पहावा. विश्वंतारा आणि श्यापर्ण ब्राह्मण यांची कथा या ग्रंथात आहे. यज्ञात सोमरस कोणत्या वर्गांनी घ्यावा, याबद्दलचा खुलासा या कथेत आहे. वैश्य वर्गाबद्दल सदर कथेत खालील उल्लेख आहे -

"त्यानंतर, पुरोहिताने जर दही आणले तर ते वैश्याचे पेय होय. दह्याने तू वैश्याला संतुष्ट कर. तुझ्या कुळात वैश्यासारखा माणूस जन्म घेईल. तो दुसऱ्याला मदत करणारा आणि दुसऱ्याचे भक्ष्य म्हणून राहील. सदर माणसाचा केव्हाही व कोणीही हवा तसा छळ करावा." (Muir, Vol. I, pp. 436-40)

वैश्याबद्दल ब्राह्मणाची इतकी कडक दृष्टी असता त्यांच्याविरुद्ध फारसे कायदेकानू ब्राह्मणांनी केलेले नाहीत. ब्राह्मणांनी हे काही विरुद्ध कायदेकानू तयार केलेले आहेत त्यातील

जास्त कायदेकानू फक्त शूद्रांच्या विरुद्ध तयार केलेले आहेत. याचे कारण काय असावे?

ब्राह्मणांनी शूद्रांच्या विरुद्ध जे कायदेकानू तयार केले आणि ब्राह्मणांसाठी जे सर्वस्वी अनुकूल कायदे तयार केलेले आहेत त्यांची तुलना केली तर त्यांच्या स्वरूपाचे व हेतूंचे फरक जमीन–अस्मानाचे आहेत, हे कोणाच्याही सहज लक्षात येईल. शूद्रांच्या विरुद्ध केलेल्या कायदेकानूंची जंत्री पाहिली तर वरील मुद्दा लक्षात येतो. समाजरचनेतील शूद्रांचा दर्जा त्रैवर्णिक जातीच्या दर्जाच्या खालचा आहे. एवढेच नव्हे तर हे दोन्ही दर्जे अगदी विरुद्ध स्वरूपाचे आहेत, असे दाखविण्यात आलेले आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर कोणालाही असे वाटेल की, शूद्रांच्या विरुद्ध जे त्रैवर्णिक जातींना हक्क देण्यात आलेले आहेत ते एका स्वरूपाचे असावेत. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. खरी वस्तुस्थिती अशी आहे की, शूद्रांच्या विरुद्ध क्षत्रिय व वैश्य यांना जे हक्क देण्यात आलेले आहेत ते मामुल स्वरूपाचे आहेत. परंतु शूद्रांच्या विरुद्ध ब्राह्मणाला जे हक्क व अधिकर देण्यात आलेले आहेत ते विशेष स्वरूपाचे आहेत. उदाहरणार्थ, ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्या बाबतीत शूद्राने एखादा गुन्हा केला तर क्षत्रिय व वैश्य हे ज्या स्वरूपाची शिक्षा शूद्राला द्यावी असे सांगतील तिच्यापेक्षा अधिक कडक स्वरूपाची शिक्षा शूद्राला द्यावी, असे ब्राह्मण सांगेल. यज्ञयाग करण्यासाठी ब्राह्मणाला शूद्राच्या मालमत्तेची जरुरी भासली तर ब्राह्मण ती मालमत्ता हवी तेव्हा आपल्या ताब्यात घेऊ शकतो व असे करण्याने ब्राह्मणाकडून कोणत्याही स्वरूपाचा गुन्हा होत नाही. शूद्राने मालमत्ता संपादन केली तर ती ब्राह्मणाच्या डोळ्यात खुपते; म्हणून शूद्राने मालमत्ता कधीच संपादन करू नये. ज्या देशाचा राजा शूद्र आहे त्या राज्यात ब्राह्मणाने वस्ती करू नये. शूद्राच्या बाबतीत ब्राह्मणाला इतक्या तीव्र स्वरूपाचे हक्क व अधिकार का दिलेले आहेत? शूद्र हा आपला जन्माचा वैरी आहे असे समजून वागण्यास ब्राह्मणाला काही विशेष कारण होते काय?

वर सांगितलेल्या मुद्द्यांपेक्षा अधिक महत्त्वाचा आणखी एक मुद्दा आहे. शूद्रांसंबंधी अनेक प्रकारचे विरुद्ध स्वरूपाचे कायदेकानू धार्मिक ग्रंथांत जे सांगितलेले आहेत त्याबद्दल सामान्य दर्जाच्या ब्राह्मण गृहस्थाला काय वाटत असावे? हे कायदेकानू करताना ग्रंथकारांनी असामान्य बुद्धिमत्ता दाखविली आहे. तसेच त्यावेळी त्यांची वृत्ती लज्जास्पद स्वरूपाची होती, हे कोणीही कबूल करील. सामान्य दर्जाचा ब्राह्मण गृहस्थ ही वस्तुस्थिती मान्य करील काय? शूद्रासंबंधी धर्मग्रंथात जे विरुद्ध स्वरूपाचे कायदेकानू सांगितलेले आहेत त्यांची जंत्री सदर ब्राह्मणांपुढे धरली तर त्याच्या मनात शूद्रांसंबंधी कसलाही अनुकूल भाव उत्पन्न होणार नाही, हे साहजिक आहे. याचे पहिले कारण असे की, सदर कायदेकानू प्राचीन काळापासून समाजात रूढ झालेले आहेत व परंपरेने त्यांना समाजात कायमचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. म्हणून या बाबतीत ब्राह्मणांची नैतिक भावना पूर्णपणे नष्ट झालेली आहे; त्यामुळे हे कायदेकानू नैतिक दृष्टीने बरे आहेत का वाईट आहेत, ते कोणी तयार केले, केव्हा व का केले, असल्या प्रकारचे प्रश्न त्यांच्या मनात कधीच उद्भवणार नाहीत. दुसरे कारण असे की, शूद्रासंबंधी जे विरुद्ध स्वरूपाचे कायदेकानू धर्मग्रंथांत सांगितलेले

आहेत, त्याबद्दलची जाणीव ज्या ब्राह्मणांना आहे ते असे म्हणतात की, अशा स्वरूपाच्या कायदेकानूबद्दल आपणाला विशेष काय वाटावे किंवा त्यात लाज बाळगण्यासारखे तरी काय आहे? ब्राह्मणांमधील ही मनोवृत्ती किती दांभिक आहे, हे स्पष्ट करून दाखविणे जरूर आहे.

स्वतःची अब्रू आणि सदसद्विवेकबुद्धी यांची बाजू सावरून धरण्यासाठीच ब्राह्मण लोक वर सांगितलेली मनोवृत्ती दाखवितात. एरव्ही ती मनोवृत्ती कुचकामाची आहे. परंतु या मनोवृत्तीचा समाचार घेणे जरूर आहे. शूद्रासंबंधी जे कायदेकानू अस्तित्वात आहेत तशा स्वरूपाचे कायदेकानू जगातील कोणत्याही भागात अस्तित्वात नाहीत, हे स्पष्ट करून सांगणे अत्यंत जरूर आहे. हक्क आणि अपात्रता यांच्या बाबतीत ब्राह्मणांनी तयार केलेले कायदेकानू आणि जगातील इतर देशांत चालू असलेले कायदेकानू यांची तुलना करणे शक्य नाही. ब्राह्मणी कायदेकानू आणि रोमन कायदेकानू यांची तुलना केली तर वरील विधानाची सत्यता पटून येईल.

## ४

रोमन कायदेकानूंच्या अन्वये कोणत्या वर्गाला हक्क प्रदर्शक अधिकार व कोणत्या वर्गाला अपात्रतादर्शक अधिकार देण्यात आले होते, याबद्दल प्रथमतः तुलनात्मक दृष्टीने विचार करू या.रोमन कायदेपंडितांनी मनुष्यांचे पाच वर्ग केलेले होते- (१) अमीर उमराव आणि सामान्य लोक, (२) स्वतंत्र लोक व गुलाम लोक, (३) नागरिक लोक आणि परदेशी लोक, (४) जन्मतःच हक्क मिळविणारे लोक आणि जन्मानंतर काही मार्गांनी हक्क मिळविणारे लोक आणि (५) ख्रिस्ती लोक आणि धर्महीन लोक.

रोमन कायदेकानूप्रमाणे पुढील लोकांना अधिकार देण्यात आलेले आहे- (१) अमीर उमराव, (२) स्वतंत्र लोक, (३) नागरिक, (४) जन्मतः हक्क मिळविणारे लोक आणि (५) ख्रिस्ती लोक. रोमन कायदेकानूप्रमाणे पुढील लोकांना अपात्रतादर्शक अधिकार देण्यात आले होते - (१) सामान्य लोक, (२) गुलाम लोक, (३) परदेशी लोक, (४) जन्मल्यानंतर काही मार्गांनी हक्क मिळविणारे लोक, आणि (५) धर्महीन लोक.

रोमन कायदेकानूप्रमाणे जो स्वतंत्र माणूस नागरिक समजला जात होता त्याला नागरिक व राजकीय हक्क होते. नागरिक हक्कापासून विवाह आणि व्यापार करण्याचे हक्क मिळत असत. विवाह करण्याचे जे हक्क असत त्यामुळे नागरिक कायदेशीर विवाह करीत असत. असे विवाह केलेल्या नागरिकाला पितृत्वाचे अधिकार मिळत. मृत्युपत्र न करता जो मेलेला असतो अशा नातलगाची स्थावरजंगम मिळकत विवाहित नागरिकाला मिळत असे. रोमन कायद्याप्रमाणे व्यापार करण्याचे जे मार्ग होते ते सर्व नागरिकाला मोकळे होते. निवडणुकीत मतदान करणे आणि एखाद्या अधिकार गाजविण्याच्या जागेचा स्वीकार करणे, असले हक्क रोमन नागरिकाला राजकीय हक्क म्हणून उपभोगता येत असत.

गुलाम हा आपल्या धन्याची मालमत्ता म्हणून समजला जाई. त्याला कोणत्याही

प्रकारचे हक्क उपभोगण्याची शक्यता नव्हती. स्वतंत्र माणूस व गुलाम यांच्या दर्जात जी तफावत आहे ती अतुलनीय आहे.

परदेशी लोकांना नागरिकत्वाचे हक्क नव्हते म्हणून त्यांना राजकीय किंवा नागरिक हक्क नव्हते. एखादा नागरिक एखाद्या परदेशी माणसाचा पालक असला तर त्या परदेशी माणसाला कायद्याची मदत व संरक्षण मिळू शकत असे.

जन्मल्यानंतर काही मार्गांनी हक्क मिळविणारे जे लोक असतात त्यांचा पालक कोणीतरी असतो. या वर्गात (१) गुलाम, (२) मुले, (३) पत्नी, (४) कोर्टाने धनकोच्या स्वाधीन केलेला ऋणको आणि (५) भाडोत्री पेहेलवान यांचा समावेश होतो. या लोकांना (१) स्वतंत्रपणे राहता येत नसे, (२) दुसऱ्याची मालमत्ता मिळू शकत नसे व (३) त्यांच्यावर कोणी अन्याय केला किंवा त्यांना कोणी इजा केली तर त्याबद्दल स्वतंत्रपणे त्यांना त्याची दाद लावून घेता येत नसे.

पहिल्यांदा रोमन लोक धर्महीन होते. धार्मिक भेदामुळे कोणाला कमी व कोणाला अधिक धार्मिक भावनेच्या कसोटीवर सामाजिक अधिकार व हक्क वाटण्यात आले. जे ख्रिस्ती धर्म पाळू लागले त्यांना हे अधिकार व हक्क देण्यात आले. ख्रिस्ती बादशहांच्या कारकीर्दीत धर्महीन म्हणून जे बडे, निरनिराळ्या पंथाचे लोक होते. त्यातील लोकांवर आणि ज्यू लोकांवर अत्यंत त्रासदायक नियंत्रणे लादण्यात आली. त्यांना वारसा हक्क देण्यात आला नव्हता, तसेच त्यांना (कोर्टात) न्यायालयात साक्षीदार होऊ देत नसत. जे जुन्या मताचे आणि अत्यंत सोवळे ख्रिस्ती होते त्यांनाच सामाजिक हक्कांचा संपूर्ण पणे उपभोग घेता येत असे.

रोमन कायदेकानूखाली जे अधिकार व हक्क देण्यात आले होते व अपात्रतादर्शक बंधने निरनिराळ्या लोकांवर लादण्यात आली होती त्यांची थोडीशी माहिती वर दिली आहे, ती लक्षात घेऊन हिंदू लोक असे म्हणतील की, हिंदू धर्मग्रंथात जे अधिकार व हक्क तसेच अपात्रतादर्शक अधिकार सांगण्यात आलेले आहेत त्यांना जगातील इतर देशांत जोड मिळते व रोमन लोकांचे उदाहरण लक्षात घेता हिंदूंचे वरील विधान खरे वाटू लागते. परंतु हिंदू धर्मग्रंथांत सांगितलेली अपात्रतादर्शक बंधने रोमन कायद्याने सांगितलेल्या अपत्रतादर्शक बंधनांपेक्षा अधिक घोर, निर्दय स्वरूपाची आहेत, ही बाब हिंदूंना कबूल करावी लागेल. अपात्र तादर्शक बंधने लादणाऱ्या रोमन कायद्यांची उभारणी काही तत्त्वांवर केलेली आहे. त्याचप्रमाणे अपात्रतादर्शक बंधने लादणाऱ्या हिंदू धर्मग्रंथातील कायद्यांची उभारणी काही तत्त्वांवर केलेली आहे. या तत्त्वांची परस्परांशी तुलना केली तर हिंदू धर्मग्रंथातील उपरोक्त तत्त्वे अत्यंत हीन दर्जाची आहेत, हे कोणाच्याही सहज लक्षात येईल. रोमन कायद्यान्वये जे पात्रतादर्शक हक्क व अपात्रतादर्शक बंधने सांगण्यात आलेली आहेत ती कोणत्या पायावर उभारलेली आहेत? रोमन कायद्याचा ज्याने बरवर अभ्यास केलेला आहे असा एखादा माणूस सांगू शकेल की, पात्रतादर्शक हक्क व अपात्रतादर्शक बंधने यांचा पाया (१) मनुष्याचा सामाजिक दर्जा आणि (२) मनुष्याचा कायद्याच्या दृष्टीने असणारा नावलौकिक यावर

अवलंबून होता. रोमन कायद्यान्वये मनुष्याचा सामाजिक दर्जा स्वतंत्रता, नागरिकपणा आणि कुटुंबसंबंध या तीन गोष्टींवर अवलंबून असे. स्वतंत्रता या वर्गात स्वतंत्र लोक येत, गुलाम येत नसत. स्वतंत्र माणूस जर रोमन नागरिक असेल तर तो सामाजिक दर्जाचे हक्क भोगू शकत असे. कुटुंबसंबंधी या वर्गात काही विशेष दर्जाची कुटुंबे असतात, त्या कुटुंबातील लोकांना काही विशेष प्रकारचे हक्क असत. जो नागरिक या कुटुंबापैकी असे त्याला त्या कुटुंबाचे सर्व हक्क उपभोगता येत असत.

एखाद्या रोमन गृहस्थाचा सामाजिक दर्जा काही कारणामुळे कमी होत असे, किंवा संपूर्ण नष्ट होत असे. त्याला जर युद्धात कैदी म्हणून पकडून नेले किंवा त्याच्यावर गुलामगिरी लादली गेली तर त्याचे स्वातंत्र्य, नागरिकत्व आणि कुटुंबबंधन ही संपूर्णपणे नष्ट होत असे परंतु तो शत्रूच्या सुटकेतून सुटून परत आला तर त्याला त्याचे स्वातंत्र्य, नागरिकत्व आणि कुटुंबसंबंध ही तिन्ही पुनः परत देण्यात येत असत.

एखाद्या नागरिकाने स्वतःवर दुसऱ्या राज्याचे नियंत्रण कबूल केले तर त्याचे नागरिकत्व आणि कुटुंबसंबंध याबद्दलचे हक्क नष्ट होत असत; त्याचे वैयक्तिक स्वातंत्र्य अबाधित राहात असे. अशा परिस्थितीत त्याला इतर नागरिकांबरोबर सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरू देत नसत किंवा त्याला कोणी विस्तव देत नसत. त्याच्यावर असला बहिष्कार घालण्याचा हेतू हा की, त्याने रोमन राज्याच्या बाहेर जाऊन रहावे. तो स्वतः रोमन राज्याच्या बाहेर निघून गेला नाही तर त्याला रोमन साम्राज्याबाहेर हद्दपार करण्यात येत असे. एखाद्या माणसाचे कुटुंबसंबंध नष्ट झाले तर त्याचे वैयक्तिक स्वातंत्र्य व नागरिकत्व यांना काही बाधा येत नसे. उदाहरणार्थ, एखादा माणूस दुसऱ्या गृहस्थाच्या पालकत्वाखाली गेला किंवा एखाद्या गृहस्थाने आपल्या मुलाचे पालकत्व सोडले तर त्या माणसाचे किंवा मुलाचे वैयक्तिक स्वातंत्र्य व नागरिकत्व नष्ट होत नसत.

नागरिकत्व हे प्रथम जन्मावरून मिळत असे. एखाद्या गृहस्थाने कायदेशीर लग्न केले व त्याची पत्नी गरोदर झाली, आणि तेव्हा ते जर नागरिक असेल, त्याच्या पत्नीला जर मुलगा झाला तर त्याला त्याच्या बापाचे नागरिकत्व प्राप्त होत असे. बेकायदेशीर लग्न झालेल्या जोडप्याला जर मूल झाले तर त्या मुलाला त्याच्या आईचे हक्क प्राप्त होत असत. एखाद्या रोमन नागरिकाच्या गुलामाला काही विशिष्ट विधी करून नागरिकत्व देता येत असे. हा नियम पुढे बदलण्यात आला. या बदललेल्या नियमाप्रमाणे गुलामगिरीतून मुक्त केलेला गुलाम काही विधी केल्यानंतर संपूर्णपणे नागरिक होत नसे, तर त्याला परदेशी माणसाचा दर्जा प्राप्त होत असे. जसनियन बादशहाने उपरिनिर्दिष्ट बदललेला नियम नष्ट केला. त्याने पूर्वीचा नियम चालू केला. या नियमाप्रमाणे गुलामगिरीतून मुक्त केलेला गुलाम रोमन नागरिकत्वाचे सर्व हक्क उपभोगू शकत असे. नागरिकत्वाचे हक्क बहुधा मेहरबानी - खातर देण्यात येत असत. एखादी व्यक्ती किंवा सबंध जात यांना असले हक्क देण्याचा ठराव रोमन लोकांची सार्वजनिक सभा किंवा कायदेमंडळ अथवा रोमन बादशहा मंजूर करीत असत. नागरिकत्वाचे हक्क देण्याची पद्धत आणि अलीकडची परदेशी माणसांना नागरिकत्व देण्याची पद्धत या सारख्या स्वरूपाच्या होत.

एखाद्याचे नागरिकत्व तीन तऱ्हेनी नष्ट होत असे. (१) वैयक्तिक स्वातंत्र्य नष्ट झाल्यामुळे, उदाहरणार्थ, एखादा रोमन गृहस्थ युद्धात कैदी म्हणून पकडून नेला गेला तर, (२) एखाद्याने रोमन नागरिकत्व सोडून दिले व दुसऱ्या राज्याचे नागरिकत्व मिळवले तर आणि (३) कोणी काही अपराध केला असेल तर त्याला शिक्षा म्हणून काही दिवस किंवा कायमचेच हद्दपार करणे.

रोमन कायद्यान्वये एखाद्याला सामाजिक दर्जा असला तर त्याला सर्व सामाजिक व राजकीय हक्क उपभोगता येत असत. म्हणजे त्याला मतदान करता येत असे किंवा त्याला एखाद्या सरकारी पदाचा अधिकार स्वीकारता येत असे. कायद्याच्या दृष्टीने एखाद्याचा दर्जा काय आहे, यावर त्याचे राजकीय हक्क अलंबून असत. ज्याला सामाजिक दर्जा व कायद्याच्या दृष्टीने असलेला दर्जा ही दोन्ही असत त्याला सामाजिक व राजकीय हक्क उपभोगता येत असत. ज्याला फक्त सामाजिक दर्जा असे त्याला फक्त सामाजिक हक्क उपभोगता येत असत. त्याला राजकीय हक्क नसत. ज्याला कयद्याच्या दृष्टीने दर्जा असे त्याला राजकीय हक्क असत.

कायद्याच्या दृष्टीने असलेला दर्जा दोन तऱ्हेने नष्ट होत असे. वैयक्तिक स्वातंत्र्य नष्ट झाले तर व एखाद्या गुन्ह्याबद्दल शिक्षा झाली तर, वैयक्तिक स्वातंत्र्य नष्ट झाले तर कायद्याच्या दृष्टीने असलेला दर्जा संपूर्णपणे नष्ट होत असे. केलेल्या गुन्ह्याचे स्वरूप जसे कमीअधिक गंभीर असेल त्या मानाने गुन्हेगाराला कमीअधिक स्वरूपाची शिक्षा देण्यात येत असे. दिलेली शिक्षा ज्या स्वरूपाची असेल त्या मानाने गुन्हेगाराचा कायद्याच्या दृष्टीने असलेला दर्जा कमी करण्यात येईल. रोमन कायद्याप्रमाणे प्रतिवादीला निरनिराळ्या स्वरूपाची नुकसान भरपाई द्यावी लागत असे, त्याचप्रमाणे त्याचे राजकीय हक्क नष्ट करण्यात येत असत. यामुळे त्याला मतदान करता येत नसे किंवा एखाद्या पदाचा अधिकार स्वीकारता येत नसे.

रोमन कायद्यान्वये निरनिराळ्या लोकांना जे हक्क दिले होते व काहींवर जे अपात्रतादर्शक निर्बंध लादलेले होते याची जी वर माहिती दिली आहे तीवरून दिसून येईल की सदर हक्क व निर्बंध एकाच पायावर आधारलेले होते. म्हणजे एका जातीचे हक्क एका पायावर व दुसऱ्या जातीचे हक्क निरनिराळ्या पायांवर आधारलेले नव्हते. हीच गोष्ट अपात्रतादर्शक निर्बंधांबद्दलची. हे हक्क व निर्बंध अमलात आणण्याच्या अगर न आणण्याच्या काही मर्यादा कायद्याने ठरविलेल्या होत्या. अशाप्रकारची रेखीव व्यवस्था ब्राह्मणी धर्मग्रंथात आढळत नाही. अधिकार, हक्क व अपात्रतादर्शक निर्बंध यांची उभारणी जातीय पायावर केलेली आहे, असे ब्राह्मणी धर्मग्रंथांवरून दिसून येते. एवढेच नव्हे तर, सर्वप्रकारचे अधिकार व हक्क त्रैवर्णिक जातींना देण्यात आलेले आहेत व सर्वप्रकारचे अपात्रतादर्शक निर्बंध फक्त शूद्र जातीच्या वाट्याला टाकलेले आहेत. हे ब्राह्मणी धर्मग्रंथांचे वैशिष्ट्य आहे.

वरील स्तंभात मांडलेले विचार ब्राह्मणी धर्मग्रंथाला मानणारे लोक मान्य करणार नाहीत. रोमन कायद्यान्वये अधिकार, हक्क व अपात्रतादर्शक निर्बंध यांची उभारणी जातीय पायावर केलेली आहे, असे ते प्रतिपादन करतील. त्यांचे हे म्हणणे अमीर-उमराव लोक व सामान्य लोक यांच्या बाबतीत खरे आहे. तथापि इतर बाबतीत त्यांचे म्हणणे खरे ठरत

नाही; हे पुढील विवेचनावरून दिसून येईल.

पहिल्या प्रथम हे लक्षात ठेवले पाहिजे की सामान्य लोक हे गुलाम नव्हते, त्यांना सामाजिक व राजकीय हक्क असत. त्यांच्याकडून काही स्वरूपाचे गुन्हे झाले तर त्या हक्कात फेरबदल होत असत. परंतु ते फेरबदल कायमच्या स्वरूपाचे नसत. सामाजिक बाबतीत त्यांच्यावर दोन निर्बंध होते. अमीर-उमरावांच्या मुलामुलींशी त्यांच्या मुलीमुलांची लग्ने बेकायफा ठरविलेली होती. हा सामान्य लोकांवरील निर्बंध इ.स. पू. ४४५ मध्ये दूर करण्यात आला. या बाबतीत जो कायदा करण्यात आला त्यान्वये अमीर-उमराव व सामान्य लोक यांचे विवाह कायदेशीर ठरविण्यात आले. सामान्य लोकांवर दुसरा एक निर्बंध होता. या निर्बंधान्वये सामान्य लोकांना रोमच्या देवळात पुरोहित आणि धर्माधिकारी होता येत नसे. हा निर्बंध इ.स. पू. ३०० मध्ये दूर करण्यात आला.

पहिल्यांदा सामान्य लोकांना मताधिकार आणि पदाधिकार नव्हते. रोमचा सहावा राजा सर्विथस टुलियस याच्या कारकीर्दीत सामान्य लोकांना मताधिकार देण्यात आला. रोममध्ये प्रजासत्ताक राज्यपद्धती इ.स. पू. ५०९ साली सुरू झाली. नंतर काही वर्षांनी सामान्य लोकांना पदाधिकार मिळाल्यानंतर इ.स. पू. ४९४ मध्ये सामान्य लोकांची न्यायालये स्थापन करण्यात आली. इ.स. पू. ४२१ पासून इ.स. पू. ३३६ पर्यंतच्या काळात मोठमोठ्या दर्जाच्या सर्व जागा सामान्य लोकांना मिळाल्या. इ. स. पू. २८७ साली होर्टेनसियन कायदा पास करण्यात आला. या कायद्यान्वये असे जाहीर करण्यात आले की, सामान्य कायदेमंडळात जे कायदे मंजूर करण्यात येत ते सर्व रोमन लोकांना लागू होत. सामान्य लोक व अमीर-उमराव यांच्यामधील सामाजिक व राजकीय बाबीतीतील भेदाभेद या कायद्याने संपूर्णपणे नष्ट केले.

अमीर-उमराव लोक व सामान्य लोक हे राजकीय हक्कांच्या बाबतीत समानतेच्या भूमिकेवर कसे आले याचा थोडासा इतिहास वर सांगितला.

अमीर उमराव लोक व सामान्य लोक हे सामाजिक व राजकीय हक्कांच्या बाबतीत समान पायरीवर आले एवढेच नव्हे, तर सामान्य लोकांना अमीरपद मिळविण्याचा मार्ग मोकळा झाला. उत्तम कुळींत जन्म होणे आणि जवळ खूप पैसा असणे, या दोन गोष्टींमुळे रोमन समाजात दर्जा व वैयक्तिक प्रतिष्ठा मिळत असे. न्यायाधीशाच्या उच्च प्रतीच्या जागा ज्यांना मिळत त्यांचे वैयक्तिक महत्त्व त्या जागेमुळे वाढत असे. जो गृहस्थ न्यायाधीश असे त्याचे त्या पदामुळे मिळालेले महत्त्व त्याच्या मुलांना मिळत असे व ते महत्त्व त्याच्या घराण्यात चालू राहत असे. सामान्य लोकांना न्यायाधीशाच्या जागा मिळू लागल्यामुळे त्यातील न्यायाधीश व त्यांची घराणी ही महतपदाला चढली. कित्येकांनी अमीरपद मिळविले. काहींनी अमीरपणाच्या बाबतीत मूळच्या अमीरांच्यावर ताण केली.

पात्रतादर्शक अधिकार व अपात्रतादर्शक अधिकार यांची विभागणी रोमन कायद्याने जातीय पायावर केलेली होती असे जरी गृहीत धरले तरी हे लक्षात ठेवले पाहिजे की, सामान्य लोकांवर अपात्रतादर्शक असे जे निर्बंध लादलेले होते ते कायमचे नव्हते. ते निर्बंध काही काळ अस्तित्वात होते, पण ते कालानुक्रमे नाहीसे झाले. ही वस्तुस्थिती लक्षात

घेतल्यानंतर ब्राह्मणी धर्मग्रंथाला उचलून धरणाऱ्या लोकांना हे कबूल करावे लागेल की, हक्क, अधिकार आणि निर्बंध यांची वाटणी, ब्राह्मणी धर्मग्रंथांप्रमाणेच, रोमन कायद्याचीही जातीय पायावर केलेली आहे, हे मत सपशेल चुकीचे आहे. रोमन कायद्यात अमीर लोक व सामान्य लोक यांच्यामधील सामाजिक व राजकीय बाबतीत भेद नष्ट करून त्यांना एका पायरीवर आणून ठेवले. त्याप्रमाणे, त्रैवर्णिक जाती व शूद्र जात यांच्यात असलेले भेद ब्राह्मणी धर्मग्रंथकरांनी नष्ट करून त्रैवर्णिक जाती व शूद्र यांना एका समान पायरीवर आणून का सोडले नाही? या प्रश्नाचे उत्तर देण्याची जबाबदारी ब्राह्मणी धर्मग्रंथांना उचलून धरणाऱ्या लोकांवर आहे.

वरील विवेचनावरून दिसून येईल की, अधिकार, हक्क व निर्बंध यांची जी वाटणी जातीय पायावर केलेली आहे ती ब्राह्मणी धर्मग्रंथांतील कायद्यांनी; रोमन कायद्यांनी नव्हे. ब्राह्मणी कायदे आणि रोमन कायदे यांच्यात दुसरे दोन महत्त्वाचे भेद आहेत. फौजदारी खटल्याच्या बाबतीत रोमन कायदे सर्व नागरिकांना समानतेने वागवीत असत. म्हणजे फौजदारी खटल्याच्या बाबतीत अमीर व सामान्य लोक यांना समसमान हक्क होते. गुन्हेगार कोणताही नागरिक असो, अमीर असो वा सामान्य दर्जाचा असो, त्याला त्याच्या गुन्ह्याप्रमाणे दंड व शिक्षा होत असे. एकाच तऱ्हेचा गुन्हा असला व तो अमीराने केलेला असला तर त्याबद्दल एक शिक्षा व तोच गुन्हा सामान्य नागरिकाने केलेला असला तर त्याला निराळ्या तऱ्हेची शिक्षा, ही पद्धत रोमन कायद्याने मान्य केलेली नव्हती. ब्राह्मणी कायद्यांनी ही पद्धत मान्य केलेली होती, हे धर्मसूत्रे व अनेक स्मृती यांच्यावरून दिसून येते. वादी व प्रतिवादी ज्या श्रेष्ठ व कनिष्ठ जातीचे असतील त्यांच्या जातीच्या श्रेष्ठ-कनिष्ठपणावर गुन्ह्याबद्दल कमी-जास्त शिक्षा ब्राह्मणी कायद्यांनी सांगितलेली अहे. वादी शूद्र असला व प्रतिवादी त्रैवर्णिक जातीतील एका जातीचा असला तर जी शिक्षा ब्राह्मणी कायदे अशा प्रतिवादीला देतात तिच्यापेक्षा जास्त कडक शिक्षा ते शूद्र प्रतिवादीला देतात. जर त्रैवर्णिक जातीचा वादी व शूद्र प्रतिवादी असेल तर, एवढेच नव्हे तर गुन्हा एका स्वरूपाचा असला व तो त्रैवर्णिकांपैकी एका जातीतील गृहस्थाने आणि शूद्राने केलेला असला तर त्रैवर्णिक जातीतील गुन्हेगाराला जी शिक्षा ब्राह्मणी कायदे सांगतात त्याच्या अनेक पटीने शिक्षा ते शूद्र गुन्हेगाराला सांगतात. फक्त शूद्र गुन्हेगारांना ब्राह्मणी कायद्यात अमानुष शिक्षा सांगितलेल्या आहेत. ब्राह्मणी व रोमन कायदे यातील हा दुसरा महत्त्वाचा फरक आहे.

याशिवाय ब्राह्मणी कायदे व रोमन कायदे यांच्यात असलेला एक विशेष स्वरूपाचा फरक आहे. तो म्हणजे अपात्रतादर्शक निर्बंध नष्ट करण्याबद्दलचा. रोमन कायद्याने निर्माण केलेले निर्बंध कायम स्वरूपाचे नव्हते. काही विशिष्ट परिस्थिती अस्तित्वात असेपर्यंत त्या निर्बंधांची अंमलबजावणी होत असे. ती विशिष्ट परिस्थिती नष्ट झाली की ते निर्बंध आपोआप नष्ट होत असत आणि निर्बंध नष्ट झाले की ज्यावर ते लादण्यात आलेले होते त्या माणसाला आपली स्वतःची प्रगती घडवून आणून समाजात मानाचा दर्जा प्राप्त करून घेण्यास मोकळीक मिळत असे. ज्या विशिष्ट परिस्थितीमुळे निर्बंध अस्तित्वात आले ती परिस्थिती कायम स्वरूपाची रहावी, अशी खटपट रोमन कायद्याने कधीच केली नाही. उलटअंशी ज्या

परिस्थितीवर निर्बंध टिकून रहात ती परिस्थिती दूर करण्याचे रोमन कायद्याने प्रयत्न केले व ते प्रयत्न अयशस्वी झाले. ही गोष्ट सामान्य लोक, गुलाम, परदेशी लोक आणि धर्महीन लोक यांना रोमन कायद्याने जे वेळोवेळी निरनिराळे हक्क दिले, त्यावरून दिसून येते.

रोमन कायद्याने अपात्रतादर्शक निर्बंध प्रथम जरी काही लोकांवर लादले तरी ते त्यांनीच कालांतराने नष्ट केले. धर्मसूत्रे व स्मृती यांनी शूद्र लोकांवर अपात्रतादर्शक निर्बंध एकदा जे लादले ते कायमचेच, त्या निर्बंधांत कधीकाळी काही फेरफार करावा, अशी त्यांनी मुळीच तरतूद केलेली नाही. या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या तर धर्मसूत्रे व स्मृती यांनी शूद्रांनी कायमचेच गुलामगिरीत खितपत पडावे, अशी जी तरतूद केलेली आहे ती किती अमानुष आहे, हे कळून येईल. याहीपेक्षा कठोर कसाईकरणी धर्मसूत्रे आणि स्मृती यांनी केलेली आहे. ती ही की, शूद्रांवर जे निर्बंध लादलेले आहेत ते कोणत्या रीतीने पाळावेत, याबद्दलच्या काही अटी सांगितलेल्या आहेत, या अटींला बाधक असे जर कोणी काही कृत्य केले तर ते कृत्य गुन्हेगारीचे ठरविलेले आहे व त्या गुन्ह्याबद्दल जबरदस्त शिक्षा सांगितलेली आहे. उदाहरणार्थ, वैदिक मंत्र म्हणण्याची शूद्राची योग्यता नाही म्हणून त्याला वैदिक यज्ञ करण्याचा अधिकार नाही. धर्मसूत्रांनी हा जो निर्बंध घातलेला आहे तो फारसा घातक नाही व त्याबद्दल कोणी निषेधही करणार नाही. परंतु धर्मसूत्रांनी या निर्बंधापेक्षा भयंकर घातक असे दूसरे निर्बंध लादलेले आहेत. वेदाध्ययन करणे किंवा वेदमंत्राचे घोष ऐकणे, हे शूद्राला निषिद्ध आहे व हे कृत्य गुन्हेगारीचे आहे. शूद्राने वेदाध्ययनाचा गुन्हा केला तर त्याची जीभ तोडावी आणि त्याने वेदमंत्राचे घोष ऐकले तर त्याच्या कानात तापवून वितळविलेल्या शिसाचा रस ओतावा. शूद्राने आपल्यावरील निर्बंध झुगारून देण्यास धडपडू नये, म्हणून त्याला जबरदस्त दहशत घालण्यासाठीच धर्मसूत्रांनी वरील प्रकारच्या रानटी शिक्षा शूद्रांना सांगितलेल्या आहेत.

ब्राह्मणी धर्मग्रंथाकारांनी शूद्रांवर इतक्या रानटी स्वरूपाचे निर्बंध कोणत्या कारणास्तव लादले असतील बरे? शूद्रांबद्दल यांचा इतका खुनशी दृष्टिकोन का होता? दुसरे असे की, ब्राह्मणी धर्मग्रंथ शूद्रांवर कोणते निर्बंध लादलेले आहेत, याबद्दल पाढा वाचतात. ते म्हणतात शूद्रांना उपनयनविधीचे अधिकारीपद स्वीकारण्याचा आणि मालमत्ता जमविण्याचा अधिकार नाही. पण हे कोणत्या कारणास्तव, याबद्दल ब्राह्मणी ग्रंथ कधी उलगडा करीत नाहीत. त्यांचा सर्व जमाना तिस्मारखांचा आहे. शूद्रांचे वैयक्तिक वर्तन व चालरीत समाजाला घातक आहे म्हणून त्यांच्यावर निर्बंध लादलेले आहेत, अशातला काही प्रकार नाही. शूद्र हा 'शूद्र' आहे म्हणून तो सर्व गोष्टीला अपात्र व त्याबद्दल त्याला शिक्षा ही केलीच पाहिजे, अशाप्रकारची मनोवृत्ती ब्राह्मणी ग्रंथांनी दाखविलेली आहे. पण ही मनोवृत्ती गूढ वाटते. हे गूढ उकलण्यासाठी आपणाला ब्राह्मणी ग्रंथांची काही मदत होणार नाही. ती मदत दुसरीकडून मिळविली पाहिजे.

OOO

प्रकरण ४ थे

# शूद्र आणि आर्य यांचा झगडा

## १

मागील प्रकरणात जी माहिती दिलेली आहे तीवरून असे दिसून येईल की, शूद्र हे पूर्वी कोण होते आणि त्यांना वर्णसंस्थेत चवथे स्थान कसे प्राप्त झाले, हे शोधून काढण्यास ब्राह्मणी ग्रंथकार आपले मार्गदर्शक होऊ शकत नाहीत. युरोपियन ग्रंथकारांनी शूद्रोत्पत्तीसंबंधी एक ठाम सिद्धांत बसविलेला अहे. या सिद्धांताची अंगे आहेत. त्याबद्दल सर्व युरोपियन ग्रंथकारांचे एकमत आहे, असे नाही. उलट अंशी सदर ग्रंथकारांमध्ये सदर सिद्धांताच्या काही अंगाबद्दल बराच मतभेद आहे. तथापि सदर सिद्धांताच्या काही अंगाबद्दल त्यांच्यात पूर्ण एकमत आहे ते येणेप्रमाणे–

(१) ज्यांनी वैदिक वाङ्मय तयार केले ते लोक आर्य वंशाचे होते.

(२) हे लोक मूळचे हिंदुस्थानाबाहेरचे. त्यांनी हिंदुस्थानावर स्वारी केली.

(३) हिंदुस्थानचे मूळ रहिवासी **दास** व **दस्यू** या नावाने ओळखले जात असत. त्यांचा वंश व आर्यांचा वंश यांच्यात फरक होता.

(४) आर्यांचा रंग गोरा होता. **दास** व **दस्यू** यांचा रंग काळा होता.

(५) आर्यांनी **दास** व **दस्यू** यांना जिंकून अंकित केले.

(६) **दास** व **दस्यू** यांना जिंकल्यानंतर त्यांना आर्यांनी गुलाम केले व शूद्र हे नाव दिले.

(७) आर्यांना काळ्या वंशातील लोकांबद्दल तिरस्कार उत्पन्न झाला व वर्णभेदाच्या पायावर त्यांनी चातुर्वर्ण्य उभारले. हेतू हा की, आर्यांचा गोरा वंश आणि **दास** व **दस्यू** यांचा काळा वंश हे परस्परांपासून भिन्न राहावेत.

हिंदी आर्य समाजात शूद्र कसे उत्पन्न झाले व त्यांना कोणते स्थान मिळाले, याबद्दलचा युरोपियन लोकांचा जो सिद्धांत आहे, त्यातील मूलभूत तत्त्वे वरच्या स्तंभात सांगितलेली आहेत. हा सिद्धांत खरा आहे की खोटा आहे, हे आताच सांगता येत नाही. याच बाबतीत ब्राह्मणी ग्रंथकारांनी अनेक सिद्धांत मांडलेले आहेत. शूद्रोत्पत्ती ही एक सामाजिक बाब आहे असे युरोपियन ग्रंथकार मानतात. उलटपक्षी, ती एक परमेश्वरी इच्छेनुसार झालेली घटना आहे असे ठरविण्यासाठी ब्राह्मणी ग्रंथकार आपल्या सर्व सिद्धांताची उभारणी करतात व ते सिद्धांत लोकांच्या मनावर चांगले ठसवून देण्यासाठी त्यांनी बरीच लांबलचक व कंटाळवाणी खुलासेवजा तर्कटे मांडलेली आहेत. शूद्रोत्पत्ती ही एक सामाजिक घटना आहे, हा युरोपियन ग्रंथकारांचा सिद्धांत आपणापुढे आहे ही समाधानाची गोष्ट आहे.

कारण तो सिद्धांत सामाजिक घटनेबद्दल जे तर्कशुद्ध स्पष्टीकरण हवे असते ते स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करीत आहे. उलटपक्षी, ब्राह्मणी ग्रंथकारांचे सिद्धांत म्हणजे मूर्ख माणसाच्या बाष्कळ बडबडण्याचा अर्क वाटतात. शूद्रोत्पत्ती हा एक मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे, ही दृष्टी ब्राह्मणी ग्रंथकारांत नाही. म्हणून ते त्या प्रश्नाला मुळी स्पर्शही करीत नाहीत. युरोपियन ग्रंथकारात ती दृष्टी आहे व त्या दृष्टीनेच त्यांनी तो प्रश्न हाताळलेला आहे. म्हणून त्यांचा सिद्धांत शूद्रोत्पत्तीचे संशोधन करण्यास बराच मार्गदर्शक वाटतो.

युरोपियन ग्रंथकारांचा सिद्धांत कितपत खरा किंवा खोटा आहे, हे पाहण्यासाठी त्यातील एकूण एक मुद्दा पुराव्यानिशी अभ्यासून पाहणे इष्ट आहे.आर्यवंश या नावाचा एक वंश अस्तित्वात होता, या पायावर युरोपियन ग्रंथकारांच्या सिद्धांताची उभारणी केलेली आहे, या मुद्द्याचा प्रथम विचार करणे जरूर आहे.

'हा आर्यवंश म्हणजे काय?' या प्रश्नाची छाननी करण्याच्या अगोदर 'वंश' म्हणजे काय?' हे आपण प्रथम समजावून घेतले पाहिजे. हा मुद्दा समजाबून घेण्याचे कारण असे की, ''वंश' व 'लोक' या दोन शब्दांनी काही लोकांना ओळखण्यात येते, ती चूक आपल्या हातून होऊ नये. कारण, ज्यू यांना बरेच ग्रंथकार, ते 'लोक' या सदरात असले तरी, त्यांना 'वंश' सदरात धरतात. वास्तविक ज्यू या शब्दाने 'वंश' याचा बोध होत नाही. तरी पण तसा समज प्रचारात आहे. या बाबतीत ज्यांची मते अधिकृत समजली जातात त्यांत प्रो. रिप्ले हा एक ग्रंथकार आहे. ज्यूंबद्दल ते म्हणतात–

''ज्यू' या शब्दाने लोक याबद्दल बोध होतो, वंश असा बोध होत नाही. आपल्या एकंदर विवेचनाचा हाच शेवटचा मथितार्थ होय. हा मथितार्थ काहीसा परस्परभिन्न स्वरूपाचा आहे, असे वाटते. तरी पण तोच मथितार्थ खरा आहे, असे आपण ठाम समजून चालू या. हा मथितार्थ खरा आहे, याचा पुरावा आपणाला ज्यू लोकांच्या चेहऱ्यांच्या आकारात मिळतो. त्यांच्यामध्ये इतर काही विशिष्ट गुण दिसून येतात. पण ते गुण ज्यू लोकांनी पिढ्यान् पिढ्या खस्ता खाऊन आत्मसात केलेले आहेत. आपले रक्त निर्भेळ राखून ठेवले म्हणून त्यांच्यात सदर गुण उत्पन्न झाले, हे खरे नव्हे. म्हणजे असे की, सदर गुण त्यांना आनुवांशिक रीतीने प्राप्त झालेले नाहीत.''

वंश म्हणजे काय? आनुवंशिकपणे मिळालेले काही विशिष्ट गुणधर्म ज्यांच्यामध्ये दिसून येतात अशा लोकांचा समाज, अशी 'वंश' शब्दाची व्याख्या करता येईल. एकेकाळी अशी समजूत होती की, एखाद्या वंशाची पहाणी करावयाची तर त्या वंशातील काही विशिष्ट गुणधर्म लक्षात घेतले पाहिजेत– (१) डोक्याचा आकार (२) केस व डोळे यांचा रंग (३) अंगाच्या कातडीचा रंग आणि (४) शरीराचा बांधा, हे ते विशिष्ट गुणधर्म होत. अलीकडील विद्वानांचे सर्वसाधारणपणे असे मत ग्राह्य मानले जाते की, शरीराच्या कातडीचा रंग आणि शरीराचा बांधा हे शरीराचे गुणधर्म हवा व प्रदेश यांच्यावर अवलंबून असतात. म्हणून शरीराचा रंग व बांधा ही एखाद्या लोकांचा वंश ठरविण्याच्या बाबतीत उपयोगी पडत नाहीत. कोणत्या हवेत व प्रदेशात रहाणारे लोक कोणत्या वंशाचे आहेत, हे शोधून

काढण्यास त्यांच्या डोक्याचा आकार उपयोगी पडतो, डोक्याचा आकार म्हणजे डोक्याची लांबी, रुंदी आणि उंची यांचे सर्वसाधारण प्रमाण एखाद्या समाजातील लोकांचा वंश कोणता आहे, हे ठामपणे ठरविण्यास उपयोगी पडते. म्हणून वंश ठरविण्याचा खात्रीलायक उपाय हाच होय, असे मानवशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ समजतात.

डोक्याच्या आकारावरून एखाद्या माणसाचा वंश कसा शोधून काढावा याबद्दलचे एक अचूक शास्त्र मानवशास्त्रज्ञांनी तयार केलेले आहे. त्याला 'वंशदिग्दर्शक शास्त्र' म्हणतात. डोक्याचा आकार मोजण्याचे दोन प्रकार या शास्त्राने शोधून काढलेले आहेत (१) शीर्षसूची आणि (२) वदनसूची असे हे प्रकार होत. सूची मानवांचा वंश ठरविते.

(१) कानाच्या वरची डोक्याची रुंदी आणि कपाळापासून खोचीपर्यंत डोक्याची लांबी, यांचे शांताशांत जे प्रमाण येते ते शीर्षसूची होय. आणि (२) डोके आणि चेहरा यांच्यामधील अंतर म्हणजे वदनसूची होय. या प्रमाणाच्या संबंधी या दोन प्रकारांवरून बरेच निष्कर्ष काढलेले आहेत. "दुसऱ्या प्रकारावरून एक असा निष्कर्ष काढलेला आहे की, ज्याचे डोके रूढ आहे त्याचा चेहरा गोल असतो. म्हणजे त्याच्या गालाच्या हाडाच्या मागल्या बाजूपर्यंतची रुंदी त्याच्या हनुवटीपासून कपाळापर्यंतच्या लांबीपेक्षा जास्त असते लांब डोके, उभट चेहरा आणि आखूड डोके - गोल चेहरा असा सर्वसाधारण ठोकताळा शास्त्रज्ञांनी बसविलेला आहे.

प्रोफेसर रिप्ले वंशशास्त्रावरचे अद्वितीय अधिकारी आहेत. त्यांच्या मते युरोपियन लोक तीन वंशाचे आहेत. या बाबतीत त्यांनी निष्कर्ष काढलेले आहेत ते खालील कोष्टकात दिलेले आहेत.

**युरोपियन लोकांच्या वंशांचे प्रकार**

| | डोके | तोंड | केस | डोळे | शरीरबांधा | नाक |
|---|---|---|---|---|---|---|
| ट्युटॉनिक | लांब | लांब | साधारण काळे | निळे | उंच | साधारण अणकुचीदार |
| अल्पाईन (सेल्टिक) | गोल | रुंद | साधारण तांबडे | करडे | मध्यम दणकट | रुंद व जाड |
| मेडिटॅरियन | लांब | उभट | गडद पिंगट किंवा काळे | काळे | मध्यम नाजूक | साधारण रूंद |

शारीरिक दृष्टीने पाहिले तर आर्य वंश अस्तित्वात आहे, असे वाटते काय? या विषयावर दोन प्रकारची मते प्रदर्शित केली जातात. एक मत आर्य वंश अस्तित्वात आहे, असे मानते. ते मत असे—

"डोळ्यांत भरणाऱ्या अशा आर्य वंशातील लोकांच्या शारीरिक खुणा म्हणजे चाफेकळीसारखे नाक, लांबट आणि प्रमाणबद्ध अरुंद चेहरा, पूर्णपणे वाढ झाल्यामुळे उठावदारपणे दिसणारे सर्व अवयव आणि चेहऱ्याची सुबक व मनोवेधक ठेवण. त्यांचा बांधा बराच उंच असतो व त्यांच्या शरीराची एकुंदर ठेवण प्रमाणबद्ध असते. त्यांच्या

शरीरात स्थूलपणापेक्षा सडपातळपणा जास्त असतो.''

या बाबतीतले दुसरे मत प्रोफेसर मॅक्स मुल्लर यांचे आहे. वाङ्मयशास्त्रावर त्यांनी जी भाषणे केली, यात त्यांनी असे मत मांडले की, 'आर्य' हा शब्द निरनिराळ्या तीन अर्थांनी वैदिक वाङ्मयात वापरलेला आहे. (Ripleys Races of Europe, p. 121) ते म्हणतात, 'अरे किंवा आर हे जगातील फार जुने नाव पृथ्वीला देण्यात आलेले होते, असे या शब्दांवरून मला वाटते. या शब्दांचा अर्थ नांगरलेली जमीन असा होतो. हे शब्द संस्कृत वाङ्मयातून लुप्त झालेले आहेत, पण ग्रीक वाङ्मयाने त्यांना जपून ठेवलेले आहे. ग्रीक वाङ्मयांत इरा हा शब्द आहे. जमीन धारणा करणारा किंवा जमीन पेरणारा, या अर्थांनी ते शब्द आर्यांनी वापरलेले असावेत. विस् या शब्दापासून वैश्य हा शब्द झाला. त्याचा अर्थ घरवाला माणूस. इडा ही मनूची कन्या. नांगरलेल्या जमिनीला इडा असेही म्हणत असत. कदाचित् इडा हा शब्द आर याचा अपभ्रंश असावा.''

जमीन नांगरणे किंवा पेरणे या अर्थाने आर्य या शब्दाचा दुसरा उपयोग केलेला आहे. त्याबद्दल प्रो. मॅक्स मुल्लर म्हणतात –

''जो नांगरतो किंवा पेरतो, असा आर्य या शब्दाचा धातुवाचक अर्थ होतो असे माझे मत आहे. आर्य लोकांचे शेजारी तुराणियन लोक होते. तुराणियन यांचे नाव तुरा म्हणजे घोडेस्वाराचे चापल्यपासून पडले. तुराणियन लोकांपासून आपण वेगळे आहोत, हे दाखविण्याच्या बुद्धीने आर्यांनी आर्य या शब्दाची योजना जमीन नांगरणारे किंवा पेरणारे, या अर्थाने स्वतःसाठी केली.''

आर्य लोकांत वैश्यांचा फार भरणा होता. आर्य हा शब्द वैश्यांना लावीत असत. हा तिसरा अर्थ प्रो. मॅक्स मुल्लर यांनी पाणिनीच्या (३-१-१०३) आधारावरून काढलेला आहे. याचा चवथा अर्थ ''उत्तम जन्माचा.'' हा बऱ्याच पुढील काळात रूढ झाला.

आर्य वंश याबद्दल प्रो. मॅक्स मुल्लर यांचे मत आपणाला समजावून घ्यावयचे आहे. त्याचे मत (Biograph of Words, pp. 89 & 120-21) खालीलप्रमाणे आहे–

''निर्भेळ रक्तावरून आर्य वंश पाहू म्हटले तर तसा आर्य वंश मुळी अस्तित्वातच नाही. शास्त्रशब्द भाषेच्या दृष्टीने पाहिले तर आर्य हा शब्द कोणत्याही वंशाला लागू करता येत नाही. आर्य या शब्दाने फक्त भाषेचा बोध होतो, वंशाचा नाही. आपण कधी कधी आर्य वंश या अर्थाने बोलतो तेव्हा त्याचा अभिप्रेत अर्थ असा होतो की, आपण आर्य भाषा य अर्थाने बोलत आहोत. हा फरक आपण समजून घेतला पाहिजे.

पुनःपुनः सांगितलेले आहे की, मी जेव्हा आर्यांच्याबद्दल बोलतो तेव्हा माझ्या बोलण्याचा रोख आर्यांचे रक्त, त्यांची हाडके, त्यांचे केस व डोक्याची कवटी या गोष्टींकडे नसतो. तर जे लोक आर्य भाषा बोलतात ते लोक होत. हिंदू, ग्रीक, रोमन, जर्मन, सेल्टस् आणि स्लाव्हज इत्यदी लोकांच्या बाबतीत हाच नियम लागू पडतो. त्यांच्यासंबंधी मी जेव्हा बोलतो तेव्हा मी त्यांच्या शारीरिक वैशिष्टांबद्दल बोलत नसतो. निळ्या डोळ्यांचे आणि रेशमी केसांचे स्कँडिनेव्हियन यांनी इतर लोकांना जिंकले असेल किंवा इतर लेकांनी

त्यांना जिंकले असेल व त्यांच्यावर आपली भाषा लादली असेल, हिंदू, ग्रीक, रोमन, सेल्टस् आणि स्लाव्हज ही नावे मी जेव्हा उच्चारतो तेव्हा मी त्यांच्या भाषेला अनुलक्षून बोलतो- माणसांना अनुलक्षून नाही. हा एकच अर्थ मनात ठेवून मी असे म्हणतो की, आर्य भाषा व चालचलणूक यांचा जुन्या काळचा जो एक टप्पा होता त्याचे प्रतिबिंब गोरेगोमटे दिसणारे स्कँडिनेव्हियन लोकांत जितके दिसते त्यापेक्षा जास्त प्रमाणात काळेकुट्ट दिसणारे हिंदू लोक यांच्यात दिसते. ही माझी भाषा जरा कडक वाटेल, परंतु असल्या महत्त्वाच्या बाबीसंबंधी भाषा तोलून मोजून वापरणे शक्य नसते. एखादा मानववंशशास्त्रज्ञ आर्यरक्त, आर्यनेत्र, केस इत्यादी गोष्टींबद्दल बोलू लागला तर तो एक महापातक करीत आहे असे मला वाटते. आपल्या भाषेतील निरनिराळ्या वर्गांमध्ये भर टाकून उपयोगी पडणारी नवी शब्दसंपत्ती आपण निर्माण करून ठेवलेली आहे. तशीच शब्दसंपत्ती मानववंशशास्त्रज्ञांनी तयार करावी, म्हणजे डोक्याची कवटी, केस व रक्त यांच्या निरनिराळ्या वर्गभेदांना लागू पडणारे योग्य ते शब्द अस्तित्वात येतील.''

प्रो. मॅक्स मुल्लर आर्य वंशाचे अस्तित्व एकेकाळी मान्य करीत होते व त्या मताचा प्रसारही ते प्रामुख्याने करीत होते. ही गोष्ट लक्षात धरली तर वरील स्तंभात त्यांचे जे उद्‌गार दिलेले आहेत, ते अत्यंत महत्त्वाचे आहेत, यात शंका नाही.

विशिष्ट प्रकारचे अवयव असलेल्या आर्य लोकांचा वंश आणि सर्वसाधारण एक भाषा बोलणाऱ्या अर्य लोकांचा वंश या दोन्ही अर्थाने आर्यवंशाचे अस्तित्व प्रो. मॅक्स मुल्लर यांनी कबूल केलेले आहे. त्यांची ही दोन्ही मते परस्परविरुद्ध व भिन्न आहेत, हे उघड आहे.

वैदिक वाङ्‌मयाचा अभ्यास करणाऱ्या पंडितांना आर्य वंश म्हणजे काय याचा एक ठाम निष्कर्ष काढता आलेला नाही हे प्रो. मॅक्स मुल्लर यांच्या वरील परस्परविरुद्ध दोन मतावरून दिसून येते. या परस्परविरुद्ध मतांतील झगडा पाहिल्यानंतर कोणालाही असे विचारावेसे वाटते की, या मतांना वैदिक वाङ्‌मयात काही पुरावा मिळतो काय? या मतांना पुरावा शोधण्यासाठी आपण वैदिक वाङ्‌मय चाळून पाहिले तर असे दिसते की, 'अर्य' व 'आर्य' हे दोन शब्द ऋग्वेदात सापडतात. 'आर्य' हा शब्द ऋग्वेदात ८८ ठिकाणी वापरलेला आहे. (१) शत्रू (२) सभ्य माणूस (३) हिंदुस्थानचे नाव आणि (४) मालक, वैश्य किंवा रहिवाशी, अशा निरनिराळ्या अर्थांनी 'अर्य' हा शब्द ऋग्वेदात वापरलेला आहे.

'आर्य' हा शब्द ऋग्वेदात ३१ ठिकाणी वापरलेला आहे. परंतु तो आर्य वंश या अर्थाने एकाही ठिकाणी वापरलेला नाही.

वर केलेल्या विवेचनावरून असे स्पष्ट होते की, 'अर्य' व 'आर्य' हे शब्द वंशवाचक अर्थाने ऋग्वेदात मुळीच वापरलेले नाहीत.

आर्य वंशातील लोकांची डोकी लांब असतात असे वर्णन मानववंशशास्त्रज्ञ करतात. आर्य वंशाचे अस्तित्व सिद्ध करण्यास हे वर्णन पुरेसे दिसत नाही. याशिवाय दुसरे सबळ पुरावे पुढे आणले पाहिजेत. कारण लांब डोक्याचे लोक दुसऱ्याही वंशात आहेत, हे प्रो. रिप्ले यांनी दिलेल्या कोष्टकावरून दिसून येईल. या कोष्टकात दिलेले जे दोन वंश आहेत, की

ज्यांचे लोक लांब डोक्याचे असतात असे समजले जाते, त्यांपैकी कोणता वंश आहे हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

## २

आर्य वंशाबद्दल युरोपियन ग्रंथकारांचे दुसरे असे सिद्धांत आहेत की, (१) आर्य लोक बाहेरून हिंदुस्थानात आले आणि (२) त्यांनी मूळच्या रहिवाशांवर स्वाऱ्या करून त्यांना जिंकले. या दोन सिद्धांतांचा विचार पृथक्‌पणे करणे बरे होईल.

आर्य वंशाचे लोक कोणत्या प्रदेशातून हिंदुस्थानात आले असावेत? आर्य लोकांचे मूळस्थान कोणत्या प्रदेशात होते हे शोधून काढण्यासाठी अनेक प्रकारची मते व दृष्टिकोन पुढे मांडण्यात आलेले आहेत. त्यांची संख्या पाहून कोणाचेही मन भांबावून जाईल. आर्यांचे मूळस्थान शोधून काढावयाचे तर ते मानववंशाची प्राथमिक भाषा असेल तीवरून शोधून काढावे लागेल, असे मत प्रो. बेनफे यांनी मांडलेले आहे. या प्रश्नासंबंधी प्रो. बेनफे यांचे जे विचार आहेत त्यांचा सारांश प्रो. आयझॅक टेलर यांनी पुढील शब्दांत दिलेला आहे.

"आर्य वंशाचे जेवढे लोक जगात पसरलेले आहेत व ते हल्ली ज्या भाषा बोलतात त्या सर्वांची मातृभाषा एक असली पाहिजे. या मातृभाषेचा कोष तपासून पाहिला तर त्यातील काही शब्दांवरून आर्य वंशाचे मूळस्थान कोणते हे शोधून काढता येईल." अशाप्रकारचे प्रो. बेनफे यांचे मत आहे. या मताला पुष्टी देण्यासाठी त्यांनी पुढीलप्रमाणे मुद्दा मांडलेला आहे. अस्वल व लांडगा यासारखी काही जनावरे आणि बीच व बर्च यासारखी काही झाडे आर्य वंशातील अगदी पहिल्या प्रथमच्या लोकांना माहीत असली पाहिजेत. ही जनावरे व झाडे समशितोष्ण प्रदेशात म्हणजे युरोपात उत्पन्न होतात. ही जनावरे व पाम वगैरे झाडे, ही दक्षिण आशियाच्या हवेतच उत्पन्न होतात; व ती हिंदी व इराणी या लोकांनाच माहीत आहेत. सिंह, वाघ व उंट ही जनावरे व पाम वगैरे झाडे ही आशियात उत्पन्न होतात. त्यांची नावे आर्य वंशाच्या मातृभाषेत आढळत नाहीत. यावरून असे दिसते की, कास्पियन समुद्राच्या पूर्वेकडील प्रदेशातून आर्य लोक वसाहतीसाठी दुसरीकडे गेले, हा सिद्धांत सबळ वाटत नाही. ग्रीक व हिंदी लोकांनी सिंहाला जे नाव दिले त्या नावाचे आर्यांच्या मातृभाषेतील एकाही शब्दाशी साम्य जुळत नाही. ग्रीक व हिंदी हे जर आर्य वंशाचे धरले तर त्यांच्या भाषेत सिंहाचे जे नाव आहे ते आर्यांच्या मूळ भाषेतील शब्दांशी जुळावयास पाहिजे.

प्रो. बेनफे यांच्या सिद्धांताला अनेक विद्वानांनी पाठिंबा दिला. त्यापैकी गीगर हा प्रमुख होता. मात्र प्रो. बेनफे यांचे मत असे होते की आर्यांचे मूळस्थान काळ्या समुद्राच्या उत्तरेकडील प्रदेश होय, आणि गीगर यांनी असे मत प्रदर्शित केले की आर्यांचे मूळस्थान जर्मनीचा मध्यप्रदेश किंवा पश्चिम प्रदेश होता. गीगर यांनी बेनफेच्या सिद्धांतात बरीच महत्त्वाची भर टाकली आहे यात शंका नाही. आर्यांच्या मातृभाषेत काही झाडांना जी नावे आहेत त्या नावांशी जुळणारे शब्द व सदर झाडांना नावे आर्य भाषेत सापडतात. यावरून गीगरने आपला सिद्धांत बळकट केला. याशिवाय फर, लोहाळे, राख, बर्च, बीच, ओक

यांची जी नावे आहेत त्यांचा संबंध आर्य भाषेतील मूळ धातूकडे पोहोचतो...''

कॉकेशस पर्वताचा प्रदेश हा आर्यांचे मूळस्थान होय, असे मत मांडणाऱ्या विद्वानांचा दुसरा पक्ष आहे. त्याचे म्हणणे असे आहे की, कॉकेशस पर्वताच्या प्रदेशात राहणारे लोक आर्यांप्रमाणेच मऊ व कुरळ्या केसांचे, सरळ व अणकुचीदार नाकाचे आणि मनोवेधक चेहऱ्याचे आहेत. म्हणूनच कॉकेशस पर्वताचा प्रदेश हे आर्यांचा मूळस्थान असले पाहिजे. या मुद्द्यासंबंधी प्रो. रिप्ले यांचे खालीलप्रमाणे म्हणणे आहे. (Ripley's Race of Europe, pp. 436-37)* * * * *

''निळ्या डोळ्यांचे, सुंदर आकाराची डोकी असणारे जे आर्य लोक आहेत त्यांचे मूळ पूर्वज कॉकेशियन प्रदेशात रहात होते असे म्हणणे गैर आहे, हे दोन गोष्टींवरून सिद्ध करता येते. पहिली गोष्ट अशी की, काळ्या व कुरळ्या केसांच्या व सुंदर चेहऱ्याच्या आर्यांचे पुढील वंशज ओसेटेस असावेत. ओसेटस् हे आर्य असोत वा नसोत, एवढी गोष्ट खरी की ते आसपासच्या इतर लोकांच्या मानाने फारसे महत्त्वाचे व वजनदार लोक नाहीत. कॉकेशियन प्रदेश सौंदर्ययुक्त स्त्री-पुरुष उत्पन्न करतो अशी त्यांची ख्याती आहे. ओसेटस लोक सुंदर तर नाहीतच, पण लढवय्येही नाहीत. ते जर लढवय्ये असते तर रशियन गुलामगिरीच्या साखळ्या तोडून स्वतंत्र होण्याचा एकतरी प्रयत्न त्यांनी केला असता.''

* * * * *

कॉकेशियन लोक हे विशेष चेहऱ्यामोहऱ्याचे व बांध्याचे लोक आहेत असे कोणी समजू नये. डोळ्यात भरण्यासारखे त्यांच्यात काही नाही. आर्य लोकांत दिसून येणारा चेहरामोहरा कॉकेशियन लोकांत कसा आढळेल बरे? कॉकेशियन लोक म्हणजे निरनिराळ्या भाषा बोलणारे, अनेक धर्म पाळणारे आणि भिन्न भिन्न रीती पाळणारे लोक आहेत. ते एका प्रकारचे लोक नाहीत, तर ते अनेक लोकांची खिचडी आहेत. अशी वस्तुस्थिती असता कॅकेशस प्रदेश हा एखाद्या लोकांचा मूळचा प्रदेश होय असे कसे म्हणता येईल? उलटअंशी या प्रदेशात अनेक लोक येऊन राहिले व मेले आणि त्यांच्याबरोबर त्यांच्या भाषा व रीतीभाती मातीत गाडल्या गेल्या. या सर्व गोष्टींवरून हेच सिद्ध होते की, ''कॉकेशियन प्रदेश हा एखाद्या लोकांचे मूळस्थान नसून कबरस्थान झालेला आहे. मग तो आर्यांचे मूळस्थान कसा होऊ शकेल?''

आर्यांचे मूळस्थान आर्क्टिक प्रदेशात होते, असे श्री. टिळक यांनी आपले मत मांडलेले आहे. उत्तर ध्रुवाकडील प्रदेशात खगोलाची आणि हवामानाची जी परिस्थिती आहे, ती लक्षात घेऊन श्री. टिळक यांनी आपला वरील सिद्धांत मांडलेला आहे. ते म्हणतात (The Arctic Home in the Vedas, Mr. B. G. Tilak, pp. 58-60)

''ही दोन प्रकारची दृश्ये आपणापुढे उभी राहतात. उत्तर ध्रुवाच्या प्रदेशात उभे राहणाऱ्या माणसापुढील दृश्ये - आणि उत्तर ध्रुव व आर्क्टिक वर्तुळ यांच्यापुढील दृश्य.''

या दोन दृश्यांची वर्णने श्री. टिळक पुढीलप्रमाणे देतात --

**(I) उत्तर ध्रुव**

(१) सूर्योदय दक्षिणेस होतो.

(२) तारे उगवत व मावळत नाहीत; ते समपातळीत स्वतः:भोवतीच फिरतात; त्यांची एक फेरी २४ तासांची असते. आकाशाचा उत्तरेकडील अर्धा भाग हा सरळ डोकीवर येतो, तो सर्व वर्षभर दृश्य असतो. आकाशाचा दक्षिणेकडील अर्धा भाग सदोदित अदृश्य असतो.

(३) एक रात्र एक दिवस मिळून वर्ष होते. रात्र व दिवस सहा-सहा महिन्यांचे असतात.

(४) वर्षातून फक्त एक सकाळ व एक सायंकाळ असते-म्हणजे वर्षातून सूर्य फक्त एकदा उगवतो व एकदाच मावळतो. परंतु संध्याकाळचा प्रकाश सुमारे दोन महिने टिकतो. सकाळचा व सायंकाळचा हा तांबूस प्रकाश एकाच दिशेला पसरलेला असतो असे नाही. कुंभाराच्या चाकाप्रमाणे तो फिरतो. त्याची एक फिरकी २४ तासांची असते. सूर्याचा अस क्षितिजावर येईपर्यंत सकाळच्या प्रकाशाचे फिरणे चालू असते. त्यानंतर सूर्याचे फिरणे सहा महिने चालते. म्हणजे असे की, उत्तर ध्रुवावर उभे राहिलेल्या माणसाभोवती सूर्य फिरत राहतो. त्याची एक फेरी २४ तासांची असते.

**(II) उत्तर ध्रुव व आर्क्टिक वर्तुळ यांच्या मधील प्रदेश**

(१) उभे राहिलेल्या माणसाच्या डोक्याच्या दक्षिणेस सूर्य नेहमी राहील. हाच प्रकार समशीतोष्ण प्रदेशात उभा राहिलेला माणूस पाहू शकेल. म्हणून हा प्रकार काही विशिष्ट स्वरूपाचा आहे, असे म्हणता येणार नाही.

(२) बहुतेक तारे क्षितिजाच्यावर असतात व तेथेच स्वतः भोवती फिरत असतात. म्हणून ते नेहमी दृश्य असतात. बाकीचे तारे समशीतोष्ण प्रदेशातील ताऱ्यांप्रमाणे उगवतात व मावळतात. परंतु ते स्वतःभोवती जास्त तिरपे फिरतात.

(३) वर्षाचे तीन भाग केलेले आहेत (अ) दक्षिणायनान्तापासून सुरू होणारी एकच लांबलचक अखंड रात्र. ती २४ तासांहून जास्त व सहा महिन्यांहून कमी चालत असते. हे कालप्रमाण विषववृत्तापासून स्थळ जसे जवळ वा दूर असेल त्या मानाने बदलते. (ब) उत्तरायनान्तापासून सुरू होणारा एकच लांबलचक दिवस. (क) वर्षाच्या बाकीच्या भगात रात्र व दिवस यांचे रहाटगाडगे चालू होते. त्या दोघांचा मिळून काल २४ तासांपेक्षा कमी होत नाही. लांबलचक रात्रीनंतर जो दिवस उगवतो तो पहिल्यांदा रात्रीपेक्षा कमी वेळेचा असतो; परंतु त्याची वेळ वाढत वाढत जाऊन शेवटी तो दिवस दीर्घकालाचा होतो. दीर्घकालाचा दिवस संपल्यानंतर रात्र सुरू होते. परंतु रात्रीचा काळ वाढत वाढत जाऊन शेवटी ती रात्र दिवसापेक्षा लांबलचक होते आणि ती संपली की वर्ष पुरे होते.

(४) लांब व अखंड रात्र संपत येत असता उषःकाल सुरू होतो. उषःकाल पुष्कळ दिवस उगवत राहतो. उत्तर ध्रुवाकडील प्रदेशात त्याचे वयोमान व महत्त्व कमी असते. हे सर्व तो प्रदेश विषुववृत्तापासून दूर आहे की जवळ आहे याच्या प्रमाणावर अवलंबून असते.

उषःकालाच्या प्रकाशाचे परिभ्रमण उत्तर ध्रुवाकडील प्रदेशात बराच वेळ दिसू शकेल. साधारण दिवस व रात्र यांच्या दरम्यान उगवणारे उषःकाल हे समशीतोष्ण कटिबंधातील प्रदेशात दिसणाऱ्या उषःकालाप्रमाणे फक्त काही तास चालू असतात. क्षितिजावर पूर्णपणे आल्यानंतर सूर्य एखाद्या ध्रुवावर उभे राहिलेल्या माणसाभोवती दिवसभर फिरत राहील; तो रात्री क्षितिजाच्या पूर्णपणे खाली राहील. वर्षाच्या बाकीच्या भागात सूर्य उगवेल व मावळेल. तो क्षितिजाच्या वर २४ तासांपैकी काही तास राहील. सूर्य क्रांतिमंडळापासून जसा लांब वा जवळ असेल तसा त्याचा क्षितिजावरचा काळ बदलत राहील.

श्री. टिळक यांनी शेवटी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढलेला आहे.

"येणेप्रमाणे आपणापुढे दोन्ही प्रकारची दृश्ये उभी राहतात. ही दृश्ये ध्रुवाकडील प्रदेशात आणि उत्तर ध्रुव व आर्क्टिक वर्तुळ यांच्यामधील प्रदेश यामूधन पहावयास मिळतात. ती पृथ्वीच्या कोणत्याही भागातून पहावयास मिळत नाहीत. ध्रुवाजवळच्या प्रदेशात लाखो वर्षांपूर्वी जे हमामान होते ते आज कदाचित तसेच मूळच्या स्वरूपात राहिलेले नसेल. परंतु पृथ्वीचे ध्रुव लाखो वर्षांपूर्वी ज्या स्थितीत होते त्याच स्थितीत आजही आहेत. म्हणून लाखो वर्षांपूर्वी त्यांच्यामधून खगोलातील जी दृश्ये दिसत होती ती आजही दिसू शकतील व पुढेही अनंत काळ दिसू शकतील."

आर्क्टिक प्रदेशात खगोलातील दृश्ये कशाप्रकारे दिसत होती याची माहिती श्री. टिळकांनी सांगितली आहे. त्या माहितीला उचलून धरण्यासाठी त्यांनी पुढीलप्रमाणे विचारसरणी मांडलेली आहे –

"वर वर्णन केलेली दृश्ये वैदिक वाङ्मयात आढळून आली तर ती दृश्ये ध्रुवाकडील प्रदेश किंवा उत्तर ध्रुव व आर्क्टिक वर्तुळ यांच्यामधील प्रदेश यांच्यातून ती दिसत होती, असे समजण्यास काही प्रत्यवाय नाही. वैदिक ऋचा रचणाऱ्या कवींना जरी ही दृश्ये प्रत्यक्ष पहावयास मिळाली नाहीत तरी ती वंशपरंपरेने आर्य समाजात दंतककथेच्या स्वरूपात वावरत होती. म्हणूनच कवींनी त्यावर कवने रचून त्यांना वैदिक वाङ्मयात अढळ स्थान देऊन टाकले. वाङ्मयात याबद्दलचे बरेच उल्लेख मिळतात. आपल्या सोयीसाठी ते सर्व उल्लेख दोन वर्गात टाकू या. जे उल्लेख व संदर्भ, लांब रात्र व लांब उषा यांची वर्णने करणारे आहेत ते एका वर्गात, व जे उल्लेख व संदर्भ लांब रात्र व उषा यांच्याबद्दलच्या ज्या आख्यायिका व दंतकथा आहेत यांच्याबद्दल वर्णन करणारे आहेत ते दुसऱ्या धर्मात, दुसऱ्या वर्गात येणारे उल्लेख व संदर्भ पहिल्या वर्गात येणाऱ्या उल्लेखांना व संदर्भांना अप्रत्यक्षपणे दुजारा देणारे आहेत."

नैसर्गिक दृश्ये, अलौकिक कथा व दंतकथा यांची जी वर्णने वैदिक वाङ्मयात पाहावयास मिळतात ती उत्तर ध्रुवाजवळच्या प्रदेशात जी नैसर्गिक दृश्ये पहावयास मिळतात त्यांच्याशी हुबेहूब जुळतात, अशी श्री. टिळकांची समजूत झालेली दिसते. या मुद्द्यावरून त्यांनी असा निष्कर्ष काढलेला आहे की, आर्क्टिक प्रदेश हाच वैदिक कवीचा म्हणजे वैदिक आर्यांचा मूळचा प्रदेश असला पाहिजे.

श्री. टिळकांचा सिद्धांत मौलिक आहे हे खरे, तथापि त्यात एक न्यून राहिलेले आहे. ते न्यून पुढे सांगितले आहे. घोडा हे वैदिक आर्यांचे आवडते जनावर होय. हे जनावर आर्यांचे आयुष्य व धर्म यांच्याशी जाम जखडले गेले होते. अश्वमेध यज्ञातील घोड्याशी संभोग करण्याकरिता राजांच्या राण्यांमध्ये नेहमी चुरस चालू असे. (यजुर्वेद आणि माधवाचार्यांचे भाष्य पहा.) या गोष्टीवरूनच असे दिसते की, घोड्याला वैदिक आर्य लोकात अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले होते. आर्क्टिक प्रदेश हा जर वैदिक आर्यांचा मूळचा प्रदेश धरला तर तेथे घोडे अस्तित्वात असले पाहिजेत. परंतु आर्क्टिक प्रदेशात घोडे होते काय, असा प्रश्न येथे उत्पन्न होतो. या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी मिळाले तर आर्यांचे मूळस्थान आर्क्टिक प्रदेशात होते, हा श्री. टिळकांचा सिद्धांत लंगडा पडतो.

३

युरोपियन ग्रंथकारांचा दुसरा मुद्दा असा की, आर्य लोकांनी हिंदुस्थानवर स्वारी केली व मूळच्या रानटी रहिवाशांना त्यांनी जिंकून आपले गुलाम केले. या मुद्द्याला कोणता आधार आहे, असा प्रश्न उपस्थित होतो. ऋग्वेदात या मुद्द्याला यत्किंचितही पुरावा मिळत नाही. या बाबतीत श्री. पी.टी. श्रीनिवास अय्यंगर यांचे मत खालीलप्रमाणे आहे. (Life in Ancient India in the age of the Mantras, pp. 11-12) -

''आर्य, दास व दस्यू हे शब्द ज्या मंत्रांमध्ये वापरलेले आहेत, त्या मंत्रांची विचारपूर्वक छाननी केली तर असे दिसून येते की, हे शब्द वंशवाचक अर्थाने वापरलेले नाहीत, तर धार्मिक पंथवाचक अर्थाने वापरलेले आहेत. हे शब्द बहुधा ऋग्वेदसंहितेत वापरलेले आहेत. ऋग्वेदसंहितेतील मंत्रांची शब्दसंख्या १,५३,९७२ आहे. त्यात आर्य हा शब्द फक्त ३३ वेळा वापरलेला आहे. हा शब्द अगदी कमी प्रमाणात ऋग्वेदसंहितेत वापरला गेलेला आहे, ही एकच गोष्ट असे दाखविते की, आर्यांनी हिंदुस्थानवर स्वारी करून तेथील मूळ रहिवाशांचा संपूर्णपणे नाश केला, ही गोष्ट खरी नसावी. ती जर गोष्ट खरी असती तर आर्यांनी तिचा आत्मश्लाघापर उल्लेख अनेक वेळा ऋग्वेदसंहितेत केला असता. कारण, जित लोक आपल्या पराक्रमाचे नेहमी पोवाडे गातात, हे मशहूर आहे.''

आर्यांचा मूळ प्रदेश हिंदुस्थानच्या बाहेर होता, या सिद्धांताला उचलून धरणारा पुरावा वैदिक वाङ्मयात मिळत नाही. ऋग्वेदात सत नद्यांबद्दलचा उल्लेख (१०-७५-५). या उल्लेखातील भाषा विशेष महत्त्वाची आहे. याबाबतीत प्रो. डी.एस. त्रिवेदी (The Original Home of the Aryans by D. S. Trivedi Annuals of the Bhandarkar Oriental Research Institute, Vol XX, p. 62) म्हणतात की, वैदिक वाङ्मयात नद्यांचा उल्लेख ''माझी गंगा, माझी यमुना, माझी सरस्वती'' अशा शब्दांनी केलेले आहेत. परका माणूस नद्यांना इतक्या प्रेमळ व जिव्हाळ्याच्या शब्दांनी कधी संबोधील काय? मात्र तो जर नद्यांच्या सहवासात पुष्कळ काळ राहिलेला असेल तरा त्याला नद्यांबद्दल आपुलकी वाटेल. एकूण काय की, वैदिक आर्यांचे मूळस्थान हिंदुस्थानाबाहेर आहे हे सिद्ध करण्यास भरपूर पुरावा

वैदिक वाङ्मयात मिळत नाही. उलटपक्षी, वैदिक आर्यांचे मूळस्थान हिंदुस्थानातच असावे हे सिद्ध करण्यास पुरावे वैदिक वाङ्मयात मिळतात.

दास आणि दस्यू हे आर्यांचे शत्रू आहेत, असे ऋग्वेदात बरेच उल्लेख मिळतात. या शत्रूंना ठार करण्यास आणि त्यांचे निर्दालन करण्यास या, अशी देवांना प्रार्थना ऋषी करीत होते, याबद्दलचे उल्लेख कित्येक वेदमंत्रांत मिळतात. या सर्व उल्लेखांवरून असे वाटण्याचा संभव आहे की, आर्यांनी हिंदुस्थानावर स्वारी करून तो देश जिंकला आणि दास व दस्यू या मूळच्या रहिवाशांना जिंकून आपले गुलाम केले. पण हा संभव खरा धरण्याच्या अगोदर खालील मुद्द्यांचा विचार केला पाहिजे.

पहिला मुद्दा असा की, वैदिक आर्य एका बाजूला राहून त्यांच्यात मोठ्या लढाया झाल्या, अशाप्रकारचा उल्लेख ऋग्वेदात मुळीच सापडत नाही. आर्य हा शब्द ऋग्वेदात ३३ ठिकाणी वापरलेला आहे. त्यातून ८ ठिकाणी तो शब्द दास या शब्दाच्या विरुद्ध वापरलेला आहे व ७ ठिकाणी तो शब्द दस्यू या शब्दच्या विरुद्ध वापरलेला आहे. यावरून असे दिसते की, आर्य व दास आणि दस्यू यांच्यात एकाएकी दंगेधोपे उत्पन्न झाले असतील. आर्य, दास व दस्यू हे शब्द ऋग्वेदात जेथे वापरलेले आहेत त्या ठिकाणच्या संदर्भावरून असे अनुमान मुळीच काढता येत नाही की, आर्यांनी दास व दस्यू यांच्यावर स्वाऱ्या करून त्यांना पादाक्रांत केले व आपले गुलाम बनविले.

दुसरा मुद्दा असा की, आर्य व दास यांच्यातील झगडा कसल्याही प्रकारचा असो, सन्मानपूर्वक शांतता प्रस्थापित करण्याच्या हेतूने त्यांनी आपापसात समझोता घडवून आणला असावा. हा मुद्दा सिद्ध करणारे बरेच उल्लेख ऋग्वेदात मिळतात. या उल्लेखांचा सारांश असा की, आर्य व दास यांना समान असा कोणी शत्रू मिळाला की, त्याचा पाडाव करण्यासाठी आर्य व दास एक होत असत व एकजुटीने शूत्रशी लढाई करीत असत. यासंबंधी ऋग्वेदातील खालील ऋचा लक्षात घ्याव्यात –

(१)६-३३-३ (२) ७-८३-१ (३) ८-५१-९ (४) १०-१०२-३

तिसरा मुद्दा असा की, आर्य व दास यांच्यातील झगडा कितीही तीव्र स्वरूपाचा असला तरी तो वंशवाचक स्वरूपाचा नव्हता; तो झगडा धार्मिक भिन्नतेमुळे उत्पन्न झालेला होता. तो झगडा वंशवाचक स्वरूपाचा नसून धार्मिक स्वरूपाचा होता, ही गोष्ट ऋग्वेदावरून स्पष्ट होते. दस्यूंबद्दल ऋग्वेदात खालीलप्रमाणे म्हटले आहे. (Iyyengar, Life in Ancient India in the age of the Mantras, p. 13)

दस्यू अव्रत आर्य जे विधि करतात ते विधी करण्यास अपात्र आहेत. (ऋग्वेद १-५१-८-९; १-१३२-४; ४-४१-२; ६-१४-३) ते अपव्रत (ऋग्वेद ५-४२-२) व अन्यव्रत (ऋग्वेद ७-५९-११; १०-२२-८) म्हणजे आर्य लोकांच्या विधींहून निराळे विधी करणारे आहेत. ते अनाग्नित (ऋग्वेद ५-१८९-३) म्हणजे व्रताचरणात अग्नी न पुजणारे आहेत. ते अयज्यू, अयज्वन (ऋग्वेद १-१३१-४४; १-३३-४; ८-५९-११) म्हणजे यज्ञ न करणारे आहेत. ते अब्रह्म (ऋग्वेद ४-१५-९, १०-१०५-८) म्हणजे प्रार्थना

न करणारे किंवा यज्ञात पुरोहित न आणणारे असे आहेत. ते अनृचा (ऋग्वेद १०-१०५-८) म्हणजे ऋचा न जाणणारे असे आहेत. ते ब्रह्मद्विष (ऋग्वेद ५-४२-९) म्हणजे प्रार्थना करण्याचा कंटाळा करणारे किंवा ब्राह्मणांचा द्वेष करणारे असे आहेत. ते अनिंद्र (ऋग्वेद १-१३३-१; ५-२३; ७-१८-६; १०-२७-६; १०-४८-७) म्हणजे त्यांना इंद्र नाही किंवा ते इंद्राचा तिरस्कार करणारे आहेत. ते दुधाची धार काढणारे आणि विस्तवावर अन्न शिजवणारे नाहीत (ऋग्वेद ३-५३-४). ते ब्राह्मणांना दान देत नाहीत (ऋग्वेद ५-७-१०).''

याशिवाय ऋग्वेद १०-२२-८ मधील उल्लेख विशेष महत्त्वाचा आहे. तो असा -

''जे यज्ञ करीत नाहीत किंवा ज्यांच्यावर इतर धार्मिक गोष्टी करण्याबद्दल काडीइतकाही विश्वास नाही, असा दस्यूंमध्ये आपण रहात आहोत. त्यांचे धार्मिक विधी अगदी निराळ्या स्वरूपाचे आहेत. मनुष्य या पदवीला ते लायक नाहीत. शत्रूचा नाश करणाऱ्या परमेश्वरा! दासांचा सत्यानाश करून टाक.''

ऋग्वेदातील निरनिराळे जे उल्लेख वर सांगितलेले आहेत त्यावरून हेच सिद्ध होते की, आर्यांनी अनार्य, दास व दस्यू यांच्यावर स्वारी करून त्यांना आपले गुलाम केले, या सिद्धांताला ऋग्वेदात सबळ पुरावा मिळत नाही.

## ४

आर्य लोक, त्यांची हिंदुस्थानावरील स्वारी, व त्यांनी दास व दस्यू यांच्यावर लादलेली गुलामगिरी, याबद्दल आतापर्यंत माहिती दिली. आर्य लोकांच्या बाजूला प्रामुख्य देऊन ही माहिती दिलेले आहे. दास व दस्यू यांच्या बाजूला प्राधान्य देऊन वरील मुद्द्यांसंबंधी विचार करणे इष्ट आहे. दास व दस्यू ही नावे कोणत्या अर्थानी वापरलेली आहेत? ती नावे वंशवाचक अर्थाने वापरलेली आहेत काय?

दास व दस्यू हे शब्द वंशवाचक अर्थाने वापरलेले आहेत, असे ज्यांचे मत आहे ते पुढील गोष्टीवर भर देतात - **(मृध्रवाक्)** आणि **अनस** हे दोन शब्द दस्यूंची विशेषणे म्हणून ऋग्वेदात वापरलेले आहेत. (२) दास हे कृष्ण वर्णाचे आहेत, असे ऋग्वेदात आलेले दासांचे वर्णन.

मृध्रवाक् हा शब्द ऋग्वेदात चार ठिकाणी वापरलेला आहे. ती ठिकाणे खालीलप्रमाणे-

(१) १-१७४-२ (२) ५-३२-८ (३) ७-६-३ (४) ७-१८-३

मृध्रवाक् या विशेषणाचा अर्थ रांगडी भाषा बोलणारा असा आहे. रांगडी भाषा ही वंशभिन्नता दाखविणारी खूण धरता येईल काय? रांगडी बोली वंशभिन्नता प्रस्थापित करते, असे मानणे म्हणजे शुद्ध पोरखेळ होय.

**अनस** हा शब्द ऋग्वेदात (५-२९-१०) वापरलेला आहे. या शब्दाचे भिन्न अर्थ करणारे दोन पंथ आहेत. एक पंथ प्रो. मॅक्स मुल्लरचा, दुसरा सायनाचार्यांचा. प्रो. मॅक्स

मुल्लरच्या मते अनस या चा अर्थ 'नाक नसलेला, किंवा चपटे नाक असलेला माणूस' असा होतो. आर्य वंश व दास वंश हे परस्परांपासून भिन्न होते. या सिद्धांताला पुरावा म्हणून अनस हा शब्द व त्याचा वरील अर्थ पुढे मांडण्यात येतात. सायनाचार्यांच्या मते अनस म्हणजे 'बिनतोंडाचा' म्हणजे चांगली बोली न बोलणारा. प्रो. मुल्लर व सायनाचार्य हे अनस हा शब्द निरनिराळ्या पद्धतीने उच्चारतात, म्हणून त्यांचे अर्थ भिन्न झालेले आहेत. 'अ+नस' असा उच्चार प्रो. मुल्लर करतो; तर 'अन्+अस' असा उच्चर सायनाचार्य करतो. प्रो. मुल्लरच्या उच्चाराप्रमाणे अनसचा अर्थ 'नाक नसलेला' असा होतो. प्रो. मुल्लर व सायनाचार्य यांच्या उच्चारांपैकी कोणाचा उच्चार बरोबर धरावा? सायनाचार्यांचा उच्चार चुकीचा आहे, असे अनुमान करण्यास काही कारण नाही. उलटअंशी त्याचाच उच्चार बरोबर आहे, असे मानण्यास बरेच पुरावे आहेत. एक पुरावा असा की, सायनाचार्यांच्या उच्चाराप्रमाणे अनस या शब्दाचा अर्थ अर्थहीन वाटत नाही. दुसरे कारण असे की, दस्यू हे बिननाकाचे लोक आहेत, असा उल्लेख वैदिक वाङ्मयात कोठेही सापडत नाही. असे असता बिननाकाचे लोक असा अर्थ होईल, अशा हेतूने अनस या शब्दाचा उच्चार करणे रास्त नाही. अनस हा शब्द मृध्रवाक् या शब्दाचा समानार्थी शब्द आहे असे समजूनच अनसचा उच्चार केला पाहिजे. वरील विवेचनावरून हेच दिसून येते की, दस्यू हे आर्य वंशापेक्षा इतर वंशाचे लोक होते असा निष्कर्ष काढता येत नाही.

दास हे कृष्णयोनी आहेत, असे ऋग्वेदात वर्णन आहे. (६-४८-२१). या वर्णनावरून काही निष्कर्ष काढण्याच्या अगोदर इतर काही गोष्टींचा विचार करणे जरूर आहे. पहिली गोष्ट अशी की, कृष्णयोनी हे दासांचे वर्णन ऋग्वेदात फक्त एकाच ठिकाणी (६-४८-२१) आलेले आहे. दुसरी गोष्ट अशी की, हे वर्णन खरेखुरे आहे की, केवळ अलंकारिक स्वरूपाचे आहे हे समजून घेतले पाहिजे.

तिसरी गोष्ट अशी की, कृष्णयोनी हे शब्द ऋग्वेदात वापरलेत ते दास हे खरोखरच काळ्या रंगाचे होते ही वस्तुस्थिती दाखविण्यासाठी, की दास कृष्णवर्णी नसताही त्यांना ते शब्द अपमान करण्याच्या हेतूने वापरले होते हे समजणे कठीण आहे. वरील सर्व मुद्द्यांची बरोबर फोड करून सांगितल्याशिवाय 'दास हे कृष्णयोनी आहेत असे ऋग्वेदात म्हटले आहे.' केवळ यावरून ते कृष्णवर्णी वंशाचे असावेत, असा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही.

या बाबतीत ऋग्वेदातील खालील ऋचा लक्षात घ्याव्यात –

(१) ऋग्वेद ६-२२-१० "हे वज्रि, तू तुझ्या शक्तीने दासांना आर्य करून टाकलेस. दुष्ट लोकांना तू सुष्ट केलेस. ती तुझी शक्ती आम्हाला दे, म्हणजे तिच्या प्रभावाने आम्ही आमच्या शत्रूंना पादाक्रांत करू."

(२) ऋग्वेद १०-४९-३ (इंद्र म्हणतो) "मी दस्यूंचे आर्यत्व नष्ट केले आहे."

(३) ऋग्वेद १-१५१-८ "हे इंद्रा! आर्य कोण आहेत व दस्यू कोण आहेत हे तू शोधून काढ आणि आर्य व दस्यू यांना परस्परांपासून दूर ठेव."

वरील ऋचांवरून हे स्पष्ट होते की, आर्य व दास आणि दस्यू यांच्यात जो भेद होतो तो शारीरिक स्वरूपाचा किंवा वंशसूचक वर्णाचा नव्हता. अशी वस्तुस्थिती होती म्हणून दास व दस्यू यांना आर्य होता येत असे. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर आर्य व दास यांना परस्परांपासून दूर ठेवण्याचे काम इंद्राला दिले होते त्याचे औचित्य कळून येते.

५

युरोपियन ग्रंथकारांचा आर्यवंशाबद्दल जो सिद्धांत आहे, त्याचे विवेचन वरील भागात केलेले आहे. त्यावरून असे दिसून येईल की, हा सिद्धांत सर्व बाजूंनी लंगडा पडतो. एखादा सिद्धांत मांडावयाचा तर त्याबद्दल युरोपियन ग्रंथकार किती कसोशीने संशोधन करतात व संशोधित मुद्द्यांचे पृथःकरण किती बारकाईने करतात, हे मशहूर आहे. असे असताही आर्य वंशाबद्दल त्यांनी जो सिद्धांत मांडलेला आहे तो सर्व बाजूंनी लंगडा कसा ठरला, याचे कोणालाही आश्चर्य वाटेल. हा सिद्धांत सर्व बाजूंनी चुकीचा का ठरला, याबद्दलची महत्त्वाची कारणे देणे जरूर आहे. या सिद्धांताची जो कोणी बारकाईने तपासणी करील त्याला हे दिसून येईल की, हा सिद्धांत मुळातच दोन रोगांनी पछाडलेला आहे. काही गोष्टी गृहीत धरावयाच्या व त्या गृहीत गोष्टींवरून काही अनुमाने काढावयाची अशी रीतीने त्या सिद्धांताची उभारणी केलेली आहे. अशा तऱ्हेची उभारणी हा त्या सिद्धांताचा पहिला रोग होय. वरील सांगितलेल्या रीतीने या सिद्धांताची उभारणी केलेली असल्यामुळे ती उभारणी शास्त्रीय पद्धतीने केलेल्या संशोधनाच्या कसोटीस लागत नाही, हा त्या सिद्धांताचा दुसरा रोग होय. सत्य गोष्टीची रचना करून त्या रचनेतून या सिद्धांताची उत्क्रांती होऊ दिलेली नाही. उलटअंशी, सिद्धांताचे स्वरूप अगोदर आखण्यात आले व त्यानंतर ते स्वरूप सिद्ध करण्यासाठी सत्य गोष्टींची निवड करण्यात आली.

युरोपियन ग्रंथकारांचा आर्य वंशाबद्दलचा सिद्धांत म्हणजे केवळ एक गृहीत गोष्ट आहे. यापेक्षा त्याला जास्त महत्त्व देता येत नाही. डॉ. बॉप यांनी ''तुलनात्मक व्याकरण'' या नावाचे एक युगप्रवर्तक पुस्तक लिहून १८३५ साली प्रसिद्ध केले. आपल्या भाषाविषयक गाढ अभ्यासानंतर डॉ. बॉप यांनी जे एक भाषाविषयक अनुमान काढले ते त्यांनी या पुस्तकात ग्रथित केलेले आहे. युरोपियन ग्रंथकारांचा आर्य वंशाबद्दलचा सिद्धांत डॉ. बॉप यांच्या वरील अनुमानावर आधारलेला आहे. युरोप खंडात बोलल्या जाणाऱ्या भाषांपैकी बऱ्याचशा भाषा आणि आशिया खंडात बोलल्या जाणाऱ्या भाषांपैकी काही भाषा यांचे मूळस्थान कोणत्यातरी एका जुन्या भाषेत असले पाहिजे, असे अनुमान डॉ. बॉप यांनी आपल्या पुस्तकात मांडलेले होते. डॉ. बॉप यांचे अनुमान ज्या युरोपियन व आशियन भाषांना लागू पडते त्या भाषांना हिंदी-जर्मन भाषा असे नाव दिलेले आहे. सांघिक दृष्टीने त्या भाषांना आर्यन भाषा असेच संबोधण्यात येते. कारण, वैदिक भाषा म्हणजे आर्यांची भाषा आणि आर्य लोक म्हणजे हिंदी-जर्मन लोकांचा मूळचा वंश, असा सर्वसाधारणपणे समज दृढ झालेला आहे. हा समज युरोपियन ग्रंथकारांच्या सिद्धांताचे प्रमुख अंग होऊन

बसलेला आहे.

आर्य वंश अस्तित्वात होता व त्या वंशात ऐक्यभाव जाज्ज्वल्य होता असे दोन निष्कर्ष सदर सर्वसाधारण समाजापासून काढण्यात आलेले आहेत. जर एका मूळच्या भाषेपासून इतर भाषा उत्पन्न झाल्या असे मानण्यात येते तर त्या भाषा बोलणारे लोकही एकाच वंशापासून उत्पन्न झाले असावेत; कारण तो वंश मूळची भाषा बोलत असला पाहिजे; आणि ज्या अर्थी मूळची भाषा बोलणारे लोक आर्यवंशाचे होते त्या अर्थी इतर भाषा बोलणारे लोकही आर्यवंशाचेच ठरतात. यावरून असे ठरते की, आर्यवंशाचे अस्तित्व शोधून काढलेले आहे. ते केवळ अनुमान धपक्याने, भरीव पुराव्यावरून नव्हे. या अनुमानावरून दुसरे अनुमान असे काढण्यात आलेले आहे की, आर्यवंशातील लोकांचे मूळस्थान एक असावे. कारण, आर्यांचे वसतिस्थान एकच होते म्हणूनच मूळची भाषा व्यवहारात वापरता येत असावी, असे मानण्यात येते. वरील विवेचनावरून असे दिसून येईल की, आर्यांचे मूळस्थान हे एक अनुमान आहे व ते इतर अनुमानांच्या आधाराने उभारलेले आहे.

आर्यांनी हिंदुस्थानावर स्वारी केली हे युरोपियन ग्रंथकारांच्या सिद्धांताचे एक अंग आहे. ते अंगसुद्धा भरपूर पुराव्यावरून अस्तित्वात आणविलेले नाही. पुराव्याच्या अभावी ते अंग एक कल्पित भाग वाटतो. हिंदी–जर्मन लोक हे मूळच्या आर्यवंशाचे शुद्ध रक्ताचे वंशज होते, असे एक अनुमान युरोपियन ग्रंथकारांचे आहे. या अनुमानाला पुष्टी देण्यासाठी हिंदुस्थानावरील आर्यांची स्वारी कल्पनेने निर्माण करणे जरूर पडले. कारण स्वारी करून आर्यांनी दास व दस्यू यांना गुलाम केले व आपल्या आर्यवंशाची रक्तशुद्धी अबाधित ठेवली, असे त्यांना पटवून द्यावयाचे होते. आर्यांचे मूळस्थान युरोपमध्ये कोठेतरी आहे, असे प्रथम अनुमान काढण्यात आले होते. ही सर्व अनुमाने लक्षात घेतल्यानंतर असा प्रश्न उपस्थित होतो की, आर्य भाषा हिंदूस्थानात कशी आली असावी? आर्य लोक हिंदुस्थानात दुसरीकडून येऊन राहिले, असे सांगून वरील प्रश्नाचे उत्तर देता येते. आर्यांनी हिंदुस्थानावर स्वारी केली, ही कल्पना निर्माण करणे युरोपियन ग्रंथकारांना कसे जरूर पडले, हे वरील विवेचनावरून दिसून येईल.

युरोपियन ग्रंथकारांचे तिसरे अनुमान असे आहे की, आर्य लोक इतर वंशांतील लोकांपेक्षा श्रेष्ठ दर्जाचे होते. आर्य लोक म्हणजे युरोपात जन्मलेले लोक व ते आशियातील लोकांपेक्षा श्रेष्ठ दर्जाचे आहेत असे भासविणे युरोपिन ग्रंथकारांना जरूर पडेल. युरोपियन आर्य आशियातील लोकांपेक्षा श्रेष्ठ कसे हे दाखवायचे, तर पहिल्यांनी दुसऱ्यांना लढाईत जिंकले हे दाखविणे इष्ट वाटले. म्हणूनच आर्यांनी हिंदुस्थानावर स्वारी केली व तेथील दास व दस्यू यांना त्यांनी जिंकून गुलाम केले, ही कल्पना निर्माण करावी लागली.

युरोपियन ग्रंथकारांचे चौथे अनुमान असे आहे की, युरोपियन लोक हे अत्यंत गोरे असल्यामुळे काळ्या वर्णाच्या लोकांबद्दल त्यांना तिटकारा होता. आर्य हे युरोपियन होते असे गृहीत धरल्यानंतर त्यांना काळ्या वर्णाबद्दल तिरस्कार होता, हे ओघानेच येते. हिंदुस्थानात जे आर्य आले त्यांना काळ्या वर्णांचा तिरस्कार वाटत होता. हे आपल्या सिद्धांतात युरोपियन

ग्रंथकारांनी दाखविलेले आहे. हिंदी आर्य हिंदुस्थानात येऊन स्थायिक झाल्यानंतर त्यांनी चातुर्वर्ण्याची उभारणी वर्ण म्हणजे रंग या भावनेवर केली आहे, अशी युरोपियन ग्रंथकारांची समजूत आहे.

युरोपियन ग्रंथकारांची उपरिनिर्दिष्ट अनुमाने कशी चुकीची आहेत, याबद्दल स्पष्ट खुलासा केलेला आहे. शारीरिक दृष्टीने आर्यवंशाची पहाणी करावयाची आणि भाषाविषयक दृष्टीने आर्यवंशाची पहाणी करावयाची या दोन गोष्टी भिन्न आहेत. शारीरिक दृष्टीने पहाता आर्य वंशाचे मूळस्थान एका ठिकाणी होते आणि भाषाविषयक दृष्टीने पहाता आर्यवंशाचे मूळस्थान निरनिराळ्या ठिकाणी होते, अशा गोष्टी असणे शक्य आहे. आर्य वंशाचे लोक ज्या भाषा बोलतात त्यांची रचना सर्वसाधारणपणे सारख्या स्वरूपाची आहे व त्या भाषांची मूळ जननी एक भाषा होती, या पायावर युरोपियन ग्रंथकारांनी आपल्या सिद्धांताची उभारणी केलेली आहे. आर्य बाहेरच्या देशातून हिंदुस्थानात आले व त्यांनी हिंदुस्थानावर स्वारी केली, ही विधाने भरपूर पुरावे देऊन युरोपियन ग्रंथकारांनी सिद्ध करून दाखविलेली नाहीत. दास व दस्यू हे हिंदुस्थानातील रानटी लोक होते, हे युरोपियन ग्रंथकारांचे जे म्हणणे आहे, ते सपशेल खोटे आहे.

वर्णभेदाने पछाडल्यामुळेच आर्यांनी चातुर्वर्ण्य निर्माण केले, हे युरोपियन ग्रंथकारांचे विधान तर धादांत खोटे आहे. वर्णभेदामुळेच वर्णभेद करण्यात आले असे मानले तर चातुर्वर्ण्यात जे चार वर्ग आहेत त्या चारी वर्गांचे चार निरनिराळे रंग असावयास पाहिजे होते. हे चार रंग धारण करणारे चार वर्ग कोणते व त्यांची चातुर्वर्ण्यात कशी गणना केली गेली, याबद्दल कोणत्याही ग्रंथकाराने स्पष्ट खुलासा केलेला नाही. आर्य हे शुद्र वर्णाचे व दास हे कृष्ण वर्णाचे आहेत, असे गृहीत धरूनच युरोपियन ग्रंथकारांनी आपल्या सिद्धांताची उभारणी केलेली आहे.

आर्य वंशाचे अस्तित्व सिद्ध करणारा सिद्धांत मांडणारे ग्रंथकार आपली बाजू सबळ करण्यासाठी इतके उतावीळ झालेले आहेत की, आपण या बाबतीत कोणत्या घोडचुका करीत आहोत हे पहाण्याचेही त्यांना भान राहिलेले नाही. जी गोष्ट सिद्ध करावयाची आहे ती सिद्ध करण्यासाठीच त्यांनी त्या गोष्टीला पुष्टीदायक असे पुरावे वेदांमधून निवडून घेऊन त्यांचा उपयोग केलेला आहे.

'पक्षप्रतिज्ञा उत्तम रीतीने मांडणे हा शास्त्रशुद्ध पद्धतीचा आत्मा आहे.' असे प्रो. मायकेल फॉस्टर यांनी कोठे तरी म्हटलेले आहे. पक्षप्रतिज्ञा बरोबर मांडली नाही तर पुढील संशोधन योग्य रीतीने होणे शक्यच नाही. परंतु हेही तितकेच खरे आहे, की जेथे एखादी पक्षप्रतिज्ञा सिद्ध करण्याची तीव्र इच्छा आहे तेथे पक्षप्रतिज्ञा शास्त्रशुद्ध पद्धतीला विषसमान होऊन बसते, याचे उत्तम उदाहरण आर्यवंशाबद्दल मांडलेला युरोपियन ग्रंथकारांचा सिद्धांत होय.

आर्य वंशाबद्दल जो सिद्धांत मांडलेला आहे तो इतका खुळचट आहे की वास्तविक तो फार दिवसांपूर्वीच नष्ट व्हावयास पाहिजे होता. असे न होता सदर सिद्धांताची लोकांवर

इतकी छाप पडलेली आहे की सांगता सोय नाही. याची दोन कारणे आहेत. या सिद्धांताला ब्राह्मण ग्रंथकारांनी उचलून धरले, हे एक कारण. एशियन लोकांपेक्षा युरोपियन लोक श्रेष्ठ आहेत असे या सिद्धांतात म्हटलेले आहे. ब्राह्मण ग्रंथकार हिंदू असून सुद्धा सदर सिद्धांत मान्य करण्यास ते कसे तयार झाले, हे एक मोठे आश्चर्य आहे. सदर सिद्धांत मान्य केल्यामुळे ब्राह्मण लोक युरोपियन लोकांपेक्षा कनिष्ठ आहेत अशी पर्यायाने ब्राह्मण ग्रंथकारांनी कबुली दिलेली आहे. सदर सिद्धांताला विरोध न करता ब्राह्मण ग्रंथकारांनी त्याला मोठ्या खुशीने उचलून धरले याची कारणे उघड आहेत. ब्राह्मणांची द्विराष्ट्रवादाला मान्यता आहे. आपण आर्य वंशाचे आहोत आणि बाकीचे हिंदू अनार्य वंशाचे आहेत, असा ब्राह्मणांचा दावा आहे. युरोपियन ग्रंथकारांचा सिद्धांत आपण उचलून धरला तर त्यामुळे आपण युरोपियन वंशाचे नातलग ठरतो व त्या मानाने युरोपियन लोकांप्रमाणे इतर अनार्यांवर अनियंत्रित सत्ता गाजवायला आपणाला अधिकार मिळतो, असा ब्राह्मणांचा समज झालेला असावा, म्हणून त्यांनी युरोपियनांचा सिद्धांत शिरोधार्य मानला असावा. आर्यांनी हिंदुस्थानावर स्वारी करून तेथील रानटी अनार्यांना जिंकले, हा जो सिद्धांताचा एक भाग आहे तो तर ब्राह्मणांना फारच आवडलेला आहे. कारण, ब्राह्मणेतरांवर पूर्वी ब्राह्मणांचे जे श्रेष्ठत्व अनेक वर्षांपासून स्थापन झालेले आहे, त्याला पुष्टिदायक पुरावा या भागात मिळतो; म्हणून त्या भागाला ब्राह्मण लोक विशेष महत्त्व देतात.

आर्य वंशाबद्दलचा सिद्धांत या पूर्वीच का नष्ट झालेला नाही, याचे दुसरे कारण असे की, वर्ण म्हणजे रंग असे मत युरोपियन ग्रंथकारांनी वेळोवेळी प्रगट केले, व त्या मताला ब्राह्मण ग्रंथकारांनी उचलून धरले. हा सिद्धांत बळकट होण्याचे मुख्य कारण हेच आहे. वर्ण म्हणजे रंग असे जोपर्यंत मत प्रचलित राहील तोपर्यंत युरोपियन ग्रंथकारांचा सिद्धांत अबाधित राहील याबद्दल शंका नाही. आर्य वंशाच्या सिद्धांताचा हा जो भाग आहे तो अत्यंत महत्त्वाचा आहे व म्हणून त्याबद्दल जास्त खोल विचार करणे जरूर आहे. या भागाचा विचार तीन निरनिराळ्या दृष्टींनी केला पाहिजे – (१) युरोपियन वंशाचे लोक गोरे होते की काळे? (२) हिंदी–आर्य लोक गोरे होते काय? आणि (३) वर्ण याचा मूळचा अर्थ काय?

फार प्राचीन काळच्या युरोपियन लोकांचा वर्ण कोणता होता, याबद्दल साधकबाधकपणे विचार करून प्रो. रिप्ले यांनी आपले असे ठाम मत बनविलेले आहे की, तो काळा होता. ते म्हणतात (Races of Europe, by Prof. Ripley, p. 466)-

''आतापर्यंत अनेक पुराव्यांची छाननी करून आपली अशी खात्री पटली आहे की, प्राचीन काळचे युरोपियन लोक लांब डोक्याचे व कृष्ण वर्णाचे होते. दक्षिण फ्रान्समध्ये क्रोमॅग्नॉन जातीचे जे लोक सध्या राहतात त्यांचे इतिहासपूर्व जुनाटपण आपण सिद्ध केलेले आहे. या जातीतील जे शेतकरी आहेत त्यांचे काळे केस व डोळे उठावदारपणे लक्षात भरतात. या लोकांची व ब्रिटीश बेटातील लोकांची तुलना करून पाहिले तर असे दिसून येते की, वेल्स, आयर्लंड आणि स्कॉटलंड या देशांतील भुरक्या केसांचे लोक हेच ब्रिटनच्या प्राचीन काळच्या लोकांचे वंशज असावेत, असे वाटते. याशिवाय गारफॅग्नॉन या विचित्र

प्रदेशाकडे पाहिले तर आपणाला तेच दिसून येते. उत्तर इटलीत पूर्वी होऊन गेलेले लिगुरियन नावाचे लोक गारफॅम्रॉन येथेच फार दिवस राहिले होते. या प्रदेशातील रहिवाशांचा रंग गरगरीत काळा होता. सर्वसधारण दृष्टीने पाहिले किंवा प्रोदशिक परिस्थितीप्रमाणे पाहिले तरी असे दिसते की, युरोपातील फार प्राचीन काळचे लिगुरियन लोक हे रंगाने काळे असले पाहिजेत... या लोकांत भूमध्य समुद्राच्या रहिवाशांच्या रंगरूपाची छटा होती, स्कँडिनेव्हियन रहिवाशांच्या रंगरूपातील छटा नव्हती.''

आर्य लोकांत वर्णभेदाचा भाव होता, हे दाखविणारे काही पुरावे वेदात मिळतात की नाही, हे पाहू गेलो तर ऋग्वेदातील काही भागातच याबद्दल काही उल्लेख आढळतात.

श्याव्य आणि रुशती यांचे लग्न अश्विनीकुमारांनी जुळविले, असा उल्लेख ऋग्वेदात (१-११७-८) आहे. शाव्य हा काळा होता व रुशती ही निमगोरी होती.

वंदन याचे प्राण वाचवावे म्हणून अश्विनीकुमारांनी ऋग्वेदात (१-११७-५) प्रार्थना केलेली आहे. वंदन याचा रंग पिवळा होता.

काही विशिष्ट गुणांनी युक्त आणि तांबडसर-पिंगट रंग असणारा असा मुलगा मला दे, अशी देवाची प्रार्थना एक आर्य करीत आहे, असा उल्लेख ऋग्वेदात (२-३-९) सापडतो.

वर दिलेल्या उल्लेखांवरून दिसून येईल की, वैदिक आर्यांमध्ये वर्णभेदाचा भाव उत्पन्न झालेला नव्हता. वैदिक आर्य स्वतः एका विशिष्ट रंगाचे नव्हते, तर मग त्यांच्यात वर्णभेदभाव कोठून उत्पन्न होणार? वैदिक आर्यांचे रंग निरनिराळे होते. काहींचे रंग तांबूस होते, काहींचे पांढरे आणि काहींचे काळे. दशरथाचा मुलगा राम याचे वर्णन श्याम म्हणजे काळ्या रंगाचा असे केलेले आहे. यादव वंशातील कृष्ण याचेही तसेच वर्णन केलेले आहे. राम व कृष्ण हे दोघेही वेगवेगळ्या आर्य वंशाचे होते. ऋग्वेदातील पुष्कळ ऋचा दीर्घतमस ऋषीने रचलेल्या आहेत. त्याच्या नावावरून असे वाटते की, तो काळा असावा व त्याच्या काळ्या रंगावरून त्याला दीर्घतमस हे नाव पडले असावे. कण्वऋषी आर्य होता. त्याची कीर्ती दिगंत पसरलेली होती. ऋग्वेदात (१०-३१-११) त्याचे जे वर्णन आलेले आहे त्यावरून असे वाटते की, तो रंगाने काळा असावा.

आता शेवटचा मुद्दा वर्ण याचा अर्थ काय होतो ते पाहू या. हा शब्द ऋग्वेदात कोणत्या अर्थाने वापरलेला आहे, ते आपण प्रथम पाहू या. वर्ण शब्द ऋग्वेदात २२ ठिकाणी वापरलेला आहे त्यापैकी १७ ठिकाणी तो शब्द उषा, अग्नी, सोम इत्यादी देवतांना उद्देशून तेज, अंगे किंवा रंग या अर्थांनी वापरलेला आहे. तो शब्द ऋग्वेदात देवतांना उद्देशून वापरलेला असल्यामुळे तो शब्द मनुष्यप्राण्याला उद्देशून वापरला तर त्याचा अर्थ काय होईल, हे पडताळून पाहणे धोक्याचे आहे. मनुष्यप्राण्याला उद्देशून वर्ण हा शब्द ऋग्वेदात चार-पाच ठिकाणी वापरलेला आहे ती ठिकाणे खाली दिली आहेत-

(१) ऋग्वेद, १-१०४-२. (२) ऋग्वेद, १-१७९-६ (३) ऋग्वेद, २-१२-४. (४) ऋग्वेद, ३-३४-५ (५) ऋग्वेद, ९-७१-२.

वर्ण हा शब्द शरीराचा रंग किंवा कांती ही दाखविण्याच्या हेतूने ऋग्वेदात वापरलेला

आहे, असे वरील संदर्भावरून दिसते काय? ऋग्वेदातील ३-३४-५ ही ऋचा काहीशी संशयास्पद स्वरूपाची दिसते. ''शुक्लवर्ण वाढविला गेला'' असे शब्द या ऋचेत आहेत. या शब्दाचे अर्थ दोन्ही तऱ्हेने करता येतील. आपले तेज दूर फेकून, त्यामुळे पांढरा रंग वाढविण्यास इंद्राने उषेला भाग पाडले हा एक अर्थ होईल; किंवा ऋचा रचणारा ऋषी गोऱ्या रंगाचा होता म्हणून त्याचे श्वेतवर्णी लोक संख्येने वाढले. दुसरा अर्थ ओढून ताणून आणावा लागतो, कारण तो सर्वांशी संयुक्तिक वाटत नाही. उषेचे तेज हे कारण व त्यामुळे झालेली गोऱ्या रंगाची वाढ हे कार्य, हे संयुक्तिक वाटते, म्हणून पहिला अर्थ जास्त संयुक्तिक वाटतो.

''असुर वर्ण टाकतो'' हा शब्दप्रयोग ऋग्वेदातील ९-७१-२ या ऋचेत आहे. पुरुषसूक्तातील इतर ऋचांच्या संदर्भाशी तोडून ही ऋचा वाचली तर, तिचा अर्थ स्पष्ट होत नाही. पुरुषसूक्त हे सोम पवनापैकी आहे. ही गोष्ट लक्षात धरली तर ''असुर वर्ण टाकतो'' या शब्दप्रयोगाचा अर्थ सोमरसासंबंधी असला पाहिजे. वर्ण हा शब्द या ठिकाणी ''रूप'' या अर्थाने वापरलेला आहे. ऋचेतील दुसऱ्या भागात असे म्हटले आहे की, 'तो आपल्या अंगावरील काळ्या रंगाचे पांघरूण फेकून देतो आणि त्याऐवजी चकचकणारे पांघरूण अंगावर घेतो' यावरून हे स्पष्ट होते की वर्ण हा शब्द अंधार सुचविण्याच्या हेतूने वापरलेला आहे.

ऋग्वेदातील १-१७९-६ ही ऋचा आपणाला या बाबतीत बरीच मार्गदर्शक आहे. प्रजा, मुलेबाळे आणि शक्ती मिळविण्याच्या हेतूने अगस्त्य ऋषीने लोपामुद्रेशी संभोग केला आणि त्यानंतर दोन वर्णांची भरभराट होत गेली, असा या ऋचेत उल्लेख आहे. दोन वर्ण कोणते, याबद्दल या ऋचेपासून काही बोध होत नाही. तथापि आर्य व दास हेच ते दोन वर्ण या ऋचेत गृहीत धरलेले असावेत असे वाटते. ते काही का असेना, वर्ग या अर्थाने, रंग या अर्थाने नव्हे, वर्ण हा शब्द या ऋचेत वापरलेला आहे, यात शंका नाही.

ऋग्वेदातील १-१०४-२ व २-१२-४ या दोन ऋचांत वर्ण हा शब्द दास याला उद्देशून वापरलेला आहे. येथे असा प्रश्न उपस्थित होतो, की दास याला उद्देशून वर्ण हा शब्द वापरला तर तो कोणत्या अर्थी? वर्ण या शब्दावरून दासांच्या स्वतंत्र अंगकांतीचा बोध होतो की दासांच्या स्वतंत्र वर्गाचा बोध होतो? या दोन्हींपैकी कोणता अर्थ जास्त अधिकृत समजावा हे ओळखण्यास काही साधन नाही.

वर्ण हा शब्द ऋग्वेदात वापरलेला आहे. पण त्याचे निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे अर्थ होतात व त्यामुळे ऋग्वेदातील त्या शब्दाचा आपल्या संशोधनाला काही उपयोग होत नाही. तो शब्द हिंदी-इराणी वाङ्मयात वापरलेला आहे काय व असल्यास कोणत्या अर्थाने, याबद्दल आपण आता विचार करू या. (या मुद्द्याबद्दलची माहिती माझे मित्र दस्तुर बोड यांनी दिलेली आहे. हिंदी-इराणी वाङ्मयाचे ते तज्ज्ञ आहेत.)

वर्ण हा शब्द झेंद् अवेस्तामध्ये वापरलेला आहे, हे एक सुदैव होय. पण त्याचे रूपांतर 'वरण' किंवा 'वरेण' असे झेंद् अवेस्तांत आढळते. 'श्रद्धा, धार्मिक तत्त्व,

धर्मपंथाबद्दलची आवडनिवड' या अर्थांनी तो शब्द झेंद् अवेस्तांत वापरलेला आहे. 'वरण' किंवा 'वरेण' हे शब्द 'वार' या धातुपासून उत्पन्न झालेले आहेत. 'वार' म्हणजे श्रद्धा बाळगणे, विश्वास ठेवणे. 'वरण' किंवा 'वरेण' हे शब्द गाथेमध्ये सहा वेळा वापरलेले अहेत. त्यांचा अर्थ श्रद्धा, धर्मतत्त्व, धर्मपंथ किंवा धर्मश्रद्धा.

तो शब्द गाथा अथुनवैती-यास्न हा ३०, 'श्लोक' २ यात वापरलेला आहे. त्या श्लोकाचा अर्थ खालीलप्रमाणे आहे–

'मी जे श्रेष्ठतम सत्य जाहीर करीत आहे, ते लक्षपूर्वक ऐका व त्याचे मनन करा. प्रकाशित झालेल्या मनाने तुम्ही आत्मचिंतन करा. प्रत्येक माणसाने स्वतःसाठी धर्मतत्त्व (अवरेनौ) शोधून घ्यावे. आम्ही जे सत्य शिकवीत आहोत त्याबद्दल प्रत्येकाने व्यक्तिशः मृत्युपूर्वी जागरूकता दाखविली पाहिजे.'

एखाद्या पुरुषाने अगर स्त्रीने आपल्या सदसद्विवेक बुद्धीला आणि तर्कशक्तीला जी धर्मतत्त्वे पटतील ती धर्मतत्ते स्वतः निवडून काढावीत व ती नीटपणे पाळावीत, अशा आशयाचे उपदेश झरतुष्ट्र यांनी केलेले आहेत व ते उपदेश अनेक गाथांमध्ये ग्रथित केलेले आहेत. अशा प्रसिद्ध उपदेशांपैकी वर सांगितलेला एक उपदेश आहे. सदर गाथेत वापरलेला शब्द 'अवतरणेनौ विचिथाह्या' असे आहेत. 'अवतरणेनौ' या शब्दाचा अर्थ धर्मश्रद्धा असा आहे. 'विचिथाह्या ' या शब्दाचा अर्थ तर्काला पटून निवडलेला, योग्य प्रकारची निवड करण्याची शक्ती, असा आहे.

वर्ण हा शब्द गाथा अहुनावैती-यास्न हा ३१, श्लोक ११ यातही वापरलेला आहे. या श्लोकात प्रत्यक्ष असलेला शब्द 'वरेणेंग' हा आहे. 'वरेण' (धर्म) श्रद्धा या शब्दाचे द्वितीयेचे अनेकवचन 'वरेणेंग' असे होते. मनुष्याची उत्पत्ती कशी झाली, याबद्दलचा सिद्धांत झरतुष्ट्र याने या श्लोकात मांडलेला आहे. मनुष्याच्या उत्पत्तीचे कार्य पूर्ण कसे झाले हे सांगितल्यानंतर झरतुष्ट्र याने या श्लोकाच्या शेवटच्या ओळीत असे म्हटले आहे की, 'धर्मश्रद्धा स्वेच्छेने निवडून तिचे ग्रहण करण्याची शक्ती माणसाला (परमेश्वराने) दिलेली आहे.'

हा शब्द गाथा उष्टवैती-यास्न हा ४५, श्लोक १ यातही वापरलेला आहे. प्रत्यक्ष शब्द 'वरेण' असा आहे. या श्लोकाच्या शेवटच्या ओळीत झरतुष्ट्र म्हणतो की, 'दुष्टपणा म्हणजे दुष्ट जीभ दुष्ट हेतूने प्रेरित होऊन जर दुष्ट धर्मश्रद्धा एखाद्याने निवडली तर त्याची जीभ दुष्ट होते (जिभेतून दुष्टपणा बहेर पडतो.)'

वर्ण हा शब्द गाथा उष्टवैती-यास्न हा ४५, श्लोक २ यातही वापरलेला आहे. प्रत्यक्ष शब्द 'वरेण' म्हणजे धर्मश्रद्धा असा आहे. बरे आणि वाईट म्हणजे काय याबद्दलचे झरतुष्ट्र यांचे तत्त्वज्ञान आणि मानवी मनाची दुहेरी घडण कशी झालेली आहे याबद्दलचा त्याचा खुलासा या श्लोकात ग्रथित केलेला आहे. सुष्ट मनोवृत्ती आणि दुष्ट मनोवृत्ती यांचा परस्परांत संवाद चालला आहे. याची माहिती या श्लोकात दिलेली आहे. त्या दोन मनोवृत्ती संवादांत म्हणतात की, ''विचार, बोलणे, चालणे, बुद्धिमत्ता, धर्मश्रद्धा, कृती, सदसद्विवेक

बुद्धी, आत्मज्ञान- यापैकी एकाही गोष्टीत आपणा दोघांचे एकमत कधीच होत नाही.''

वर्ण हा शब्द गाथा स्पेंत मैन्यू-यास्न हा ४८, श्लोक ४ यातही वापरलेला आहे. प्रत्यक्ष शब्द 'वरेणेंग' म्हणजे धर्म, धर्मश्रद्धा (मूळ धातू वेरे, पर्शियन शब्द 'गेर्विदन' - एखाद्या गोष्टींवर श्रद्धा ठेवणे) हा आहे. या श्लोकांत झरतुष्ट्र म्हणतो, ''जो मनुष्य आपले मन जास्त शुद्ध व पवित्र ठेवील व कृतीने व वाचेने आपली सदसद्विवेक बुद्धी निर्मळ ठेवील अशा मनुष्याची धर्मश्रद्धा जशी असेल त्याप्रमाणे त्याची इच्छा राहील.

वर्ण हा शब्द गाथा स्पेंत मैन्यू-यास्न हा ४९, श्लोक ३ यातही वापरलेला आहे. प्रत्यक्ष शब्द 'वरेणाई' असा चतुर्थी विभक्तीतला आहे, त्याचा अर्थ असा आहे. त्याच श्लोकात 'त्काइशाई' हा शब्द धर्म, धर्मपंथ, धर्मबंधन या अर्थी वापरलेला आहे. 'वरेणाई' आणि 'त्काइशाई' हे दोन शब्द याच श्लोकात धर्म या अर्थाने वापरलेले आहेत.

'अहुरात्काइशा' म्हणजे 'अहुरी' हा शब्दप्रयोग या श्लोकात आहे. यावरून असे स्पष्ट होते की, 'त्काईशाइ' हा शब्द धर्म या अर्थाने वापरलेला आहे. 'त्काइशाई' याचे पाहलवी भाषेत 'किश' म्हणजे धर्म असे भाषांतर केलेले आहे.

वेदीदाद हे पुस्तक अवेस्ता भाषेत लिहिलेले आहे. स्वच्छता पाळण्याबद्दल झरतुष्ट्राने जे नियम सांगितलेले आहेत ते या पुस्तकात ग्रथित केलेले आहेत. या पुस्तकात, 'अन्यो वरेण' असे शब्द आढळतात. 'अन्यो' म्हणजे दुसरा व 'वरेण' म्हणजे धर्म असे या शब्दांचे अर्थ आहेत. दुसऱ्या धर्मश्रद्धेचा माणूस म्हणजे 'अन्योवरेण' असे या पुस्तकात म्हटलेले आहे. 'अन्यो-त्काईशा' म्हणजे दुसऱ्या धर्माचा माणूस असे शब्द याच पुस्तकात वापरलेले आढळतात.

'वेरे' या धतूपासून अनेक रूपे घेतलेले शब्द गाथेत आढळतात. उदाहरणार्थ, अहुनावैती गाथा यास्न हा ३१, श्लोक ३. झरतुष्ट्र म्हणतो, ''या ज्वंती व्हिस्पेंग वाउराय.' 'वाउराय' हे क्रियापद आहे. परमेश्वरावर श्रद्धा ठेवण्याबद्दल मी सर्व प्राणिमात्रांची मनधरणी करीन, असा 'वाउराय' याचा अर्थ आहे. यास्न हा २८, श्लोक ५ यात 'वाउरोई-मैदी' म्हणजे 'आपण श्रद्धा शक्य तर द्यावी' या अर्थाने क्रियापद वापरलेले आहे. 'दुझ-वरनैश' हे एक 'वरेण' याचे मनोरंजक रूप गाथा वहिश्टैश्टिश, यास्न हा ५३, श्लोक ९ यात वापरलेले आढळते. ते तृतीयेचे अनेकवचन आहे. 'दुझ' म्हणजे दुष्ट, खोटा आणि 'वरेणाई' म्हणजे श्रद्धाळू. 'दुझ-वेरनैश' या शब्दांचा अर्थ 'खोट्या किंवा दुष्ट धर्माचा अनुयायी, अथवा खोटा किंवा दुष्ट श्रद्धावान माणूस' असा होतो.

यास्न हा १२ यात झरतुष्ट्राची धर्मश्रद्धेबद्दल काय प्रचीती होती, हे सांगितलेले आहे. यास्न हा १२ याचा 'माझ्दयास्नी झरतुष्ट्रिश' हा एक भाग आहे. त्याचा अर्थ (माझ्द म्हणजे पूजा करणारा) झरतुष्ट्रप्रणीत धर्माची पूजा करणारा असा आहे. या भागात 'फ्रावरणे' म्हणजे 'मी माझी धर्मश्रद्धा जाहीर करतो.' असा शब्द आढळतो. हा शब्दप्रयोग बहुतेक सर्व झरतुष्ट्रप्रणीत प्रार्थनेत आढळतो. यास्न १२ मध्ये 'या-वरेण' हे रुप दुसरे रुप आढळते 'या' म्हणजे जो, आणि 'वरेण' म्हणजे धर्म 'या-वरेण' हे रूप यास्न १२ मध्ये ९ वेळा

वापरलेले आहे आणि प्रत्येकवेळी ते धर्म. किंवा धर्मश्रद्धा या स्पष्ट अर्थाने वापरलेले आहे. 'वरेण' आणि 'त्काइशा' हे शब्द धर्म या अर्थाने एकत्रपणे वापरलेले आहेत.

'झरतुष्ट्र हे वरेनेमच त्काइशेमच याझ मैदे' असा यास्न १६ मध्ये एक मनोरंजक संदर्भ आढळतो. झरतुष्ट्राचा 'वरेण' आणि 'त्काइशा' यांची या संदर्भात पूजा केलेली आहे. समानार्थाचे आणि परस्परावलंबी असे हे दोन शब्द या संदर्भात वापरलेले आहेत. ते झरतुष्ट्र यांची श्रद्धा व धर्मभावना व्यक्त करण्याकरिता होय, हे त्या शब्दांच्या उपयोगावरून दिसून येते. वरील संदर्भाचा अर्थ असा आहे की, 'आम्ही झरतुष्ट्राच्या श्रद्धेची आणि धर्माची पूजा करतो.''

वर्ण या शब्दाचे उपयोग झेंद् अवेस्तामध्ये कसकसे केलेले आहेत याचे वर पुरावे दिलेले आहेत. एका विशिष्ट धर्माची पूजा करणारा वर्ग या अर्थाने वर्ण हा शब्द झेंद् अवेस्तामध्ये वापरलेला आहे, हे सदर संदर्भावरून स्पष्ट होते. रंग किंवा अंगकांती सुचविण्याच्या हेतूने वर्ण हा शब्द झेंद् अवेस्तामध्ये वापरलेला नाही, हे ओघानेच सिद्ध होते.

युरोपियन ग्रंथकारांनी आर्य वंश, दास, दस्यू, इत्यादी संबंधी जो सिद्धांत मांडला व त्याला ब्राह्मण ग्रंथकारांनी शिरोधार्य मानले त्या सिद्धांताचे सांगोपांग विवेचन वरील स्तंभात केलेले आहे. त्या विवेचनावरून जे निष्कर्ष निघतात त्यांचा सारांश खालीलप्रमाणे निघतो –

(१) आर्य वंश अस्तित्वात होता, याबद्दल वेदांमध्ये काही पुरावे मिळत नाहीत.

(२) आर्यवंशीय लोकांनी हिंदुस्थानावर स्वारी केली व तेथील मूळचे रहिवाशी दास वदस्यू यांना आर्यांनी जिंकले, याबद्दल वेदांत काही पुरावा मिळत नाही.

(३) आर्य, दास व दस्यू यांच्यात वांशिक भेद होता, हे दाखविणारा पुरावा वेदांमध्ये नाही.

(४) आर्य रंगाने दास व दस्यू यांच्याहून निराळे होते असे दाखविणारा पुरावा वेदांमध्ये नाही.

ooo

वापरलेले आहे आणि प्रत्येकवेळी ते धर्म. किंवा धर्मश्रद्धा या स्पष्ट अर्थाने वापरलेले आहे. 'वरेण' आणि 'त्काइशा' हे शब्द धर्म या अर्थाने एकत्रपणे वापरलेले आहेत.

'झरतुष्ट्र हे वरेनेमच त्काइशेमच याझ मैदे' असा यास्न १६ मध्ये एक मनोरंजक संदर्भ आढळतो. झरतुष्ट्राचा 'वरेण' आणि 'त्काइशा' यांची या संदर्भात पूजा केलेली आहे. समानार्थाचे आणि परस्परावलंबी असे हे दोन शब्द या संदर्भात वापरलेले आहेत. ते झरतुष्ट्र यांची श्रद्धा व धर्मभावना व्यक्त करण्याकरिता होय, हे त्या शब्दांच्या उपयोगावरून दिसून येते. वरील संदर्भाचा अर्थ असा आहे की, 'आम्ही झरतुष्ट्राच्या श्रद्धेची आणि धर्माची पूजा करतो.''

वर्ण या शब्दाचे उपयोग झेंद् अवेस्तामध्ये कसकसे केलेले आहेत याचे वर पुरावे दिलेले आहेत. एका विशिष्ट धर्माची पूजा करणारा वर्ग या अर्थाने वर्ण हा शब्द झेंद् अवेस्तामध्ये वापरलेला आहे, हे सदर संदर्भावरून स्पष्ट होते. रंग किंवा अंगकांती सुचविण्याच्या हेतूने वर्ण हा शब्द झेंद् अवेस्तामध्ये वापरलेला नाही, हे ओघानेच सिद्ध होते.

युरोपियन ग्रंथकारांनी आर्य वंश, दास, दस्यू, इत्यादी संबंधी जो सिद्धांत मांडला व त्याला ब्राह्मण ग्रंथकारांनी शिरोधार्य मानले त्या सिद्धांताचे सांगोपांग विवेचन वरील स्तंभात केलेले आहे. त्या विवेचनावरून जे निष्कर्ष निघतात त्यांचा सारांश खालीलप्रमाणे निघतो –

(१) आर्य वंश अस्तित्वात होता, याबद्दल वेदांमध्ये काही पुरावे मिळत नाहीत.

(२) आर्यवंशीय लोकांनी हिंदुस्थानावर स्वारी केली व तेथील मूळचे रहिवाशी दास वदस्यू यांना आर्यांनी जिंकले, याबद्दल वेदांत काही पुरावा मिळत नाही.

(३) आर्य, दास व दस्यू यांच्यात वांशिक भेद होता, हे दाखविणारा पुरावा वेदांमध्ये नाही.

(४) आर्य रंगाने दास व दस्यू यांच्याहून निराळे होते असे दाखविणारा पुरावा वेदांमध्ये नाही.

OOO

प्रकरण ५ वे

# आर्यांचा परस्परांतील झगडा

१

आर्यांच्या एकंदर परिस्थितीबद्दल युरोपियन विद्वानांनी जो सिद्धांत मांडलेला आहे व त्या सिद्धांताला मोठ्या खुशीने ब्राह्मण ग्रंथकारांनी उचलून धरलेले आहे, या बाबतीत पुष्कळ पुरावे मांडून आपण असे सिद्ध केलेले आहे की, ते सिद्धांत सर्व बाजूंनी लंगडा आहे. तथापि लोकांच्या मनावर या सिद्धांताची अशी काही जबरदस्त पकड बसलेली आहे की, सिद्धांताच्या विरुद्ध असलेली सर्व माहिती जरी पुराव्यानिशी त्या लोकांच्या पुढे ठेवली तरी त्यांची मने तो सिद्धांत खोटा आहे असे कबूल करण्यास तयार होणार नाहीत. उलटअंशी, त्या लोकांची अशी समजूत होईल की सिद्धांत खोटा ठरविण्याचा हा सारा खटाटोप तो सिद्धांत हाणून पाडण्याच्या प्रेरणेमुळे केलेला आहे. पण तो सिद्धांत म्हणजे एक काळसर्प आहे असे समजून त्याला ठार करणे जरूर आहे. तो सिद्धांत म्हणजे 'बडा घर पोकळ वासा' अशा स्वरूपांचा आहे, हे सर्व बाजूंनी दाखविणे जरूर आहे. म्हणून त्या सिद्धांताचे आणखी जास्त विवेचन करणे इष्ट आहे.

आर्यांनी हिंदुस्थानावर स्वारी केली व दास व दस्यू यांना जिंकले या सिद्धांताला जे लोक उचलून धरतात त्यांनी ऋग्वेदातील काही ऋचांकडे कानाडोळा केलेला आहे, त्या ऋचा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या ऋचा लक्षात न घेता त्या सिद्धांताची ज्यांनी उभारणी केली त्यांचा सारा खटाटोप व्यर्थ आहे, असे त्या ऋचा वाचल्यानंतर लक्षात येते. त्या ऋचा खाली देत आहे –

**(१) ऋग्वेद, ६–३३–३** – ''हे इंद्रा! आमचे शत्रू (विरोधक) दास व आर्य या दोघांनाही तू ठार केले आहेस.''

**(२) ऋग्वेद, ६–६०–३** – ''सन्मार्ग आणि सद्धर्म यांचे पालन करणारे इंद्र व अग्नी यांनी आम्हाला घायाळ (दुपाखत) करणारे दास व आर्य यांना नेस्तनाबूत केले.''

**(३) ऋग्वेद, ७–८१–१** – ''सुदामाचे शत्रू दास व आर्य यांना इंद्र व वरुण यांनी ठार मारले व (याप्रमाणे) त्यांनी दास व आर्य यांच्यापासून सुदामाचे रक्षण केले.''

**(४) ऋग्वेद, ७–२४–२७** – ''हे इंद्रा! सिंधू नदीच्या तीरावर राहाणाऱ्या क्रूर राक्षसांच्या आणि आर्यांच्या तावडीतून तू आम्हाला मुक्त केलेस. तू दासांच्या हातातून त्यांची शस्त्रे हिरावून घे.''

**(५) ऋग्वेद, १०–३८–३** – ''हे परमपूज्य इंद्रा! धर्मलंड दास व आर्य हे आमचे शत्रू आहेत. त्यांचा सहजपणे पाडाव करण्याचे सामर्थ्य आमच्यात येवो, असा तू आम्हाला

आशीर्वाद दे. तुझ्या सहाय्याने आमही त्या शत्रूंना ठार करू.''

**(६) ऋग्वेद, १०-८६-१९ -** ''हे ममेयू! जो तुझी प्रार्थना करतो त्याला तू सर्वप्रकारचे सामर्थ्य देतोस. आपले शत्रू आय व दस्यू यांचा आम्ही तुझ्या मदतीने संहार करू.''

वरील ऋचांतील स्पष्ट अर्थ ज्याच्या मनात उतरेल त्याची पूर्णपणे खात्री पटेल की, युरोपियन ग्रंथकारांचा जो सिद्धांत आहे तो या ऋचांतील अर्थामुळे सपशेल चुकीचा ठरतो. वरील ऋचा आर्य ऋर्षीनी तयार केलेल्या असल्या पाहिजेत. त्या ऋचांतील अर्थ आर्य वंशाविरुद्ध आहेत. या दोन गोष्टी लक्षात घेतल्या तर असे अनुमान काढता येते की आर्यांचे दोन वर्ग होते व ते परस्परांपासून सर्व दृष्टीने भिन्न होते व म्हणूनच ते वैरभावाने परस्परांशी वागत व झगडत होते. आर्यांचे दोन वेगवेगळे वर्ग अस्तित्वात होते, ही काही कपोलकल्पित गोष्ट नाही किंवा वरील ऋचांतील शब्दांचे अर्थ फिरवून ती गोष्ट सिद्ध केलेली नाही. आर्यांचे दोन वेगवेगळे वर्ग अस्तित्वात होते हे सत्य आहे व ते सत्य सिद्ध करणारे अनेक पुरावे आहेत.

२

आर्यांचे दोन वेगवेगळे वर्ग अस्तित्वात होते त्याचा एक पुरावा असा की, निरनिराळ्या वेदांना पवित्र मानण्याबद्दल आर्यांत पुष्कळ दिवस वितंडवाद चालला होता. वेदांचा ज्यांनी कसून अभ्यास केलेला आहे त्यांची खात्री झालेली आहे की, खरे पाहिले असता ऋग्वेद व अथर्ववेद हे दोनच ग्रंथ वेद या पदवीला योग्य आहेत. सामवेद व यजुर्वेद हे ऋग्वेदाचे केवळ निरनिराळे भाग होते. ऋग्वेदाला जितके पवित्र मानावे, तितकेच यजुर्वेदाला पवित्र मानावे, या गोष्टीला ब्राह्मण लोकांनी पुष्कळ वर्षे विरोध केलेला होता, ही गोष्ट वेदाभ्यासी पंडितांना माहीत आहे. ऋग्वेद व यजुर्वेद यांना समसमान पवित्रपणा देण्यास ब्राह्मण का तयार नव्हते? अथर्ववेदाला अपवित्र मानून ऋग्वेदाला पवित्र मानण्याकडे ब्राह्मणांची मनोवृत्ती का धावत होती? माझ्या मते या प्रश्नांचे उत्तर असे आहे की, ऋग्वेद हा एका वर्गातील आर्यांनी रचला व यजुर्वेद हा दुसऱ्या वर्गातील आर्यांनी रचला, आणि हे दोन्ही वर्ग परस्परांत मिसळून आर्यांचा एकच वर्ग झाला, तेव्हा ऋग्वेद व अथर्ववेद यांना समसमान पवित्रपणा देण्यात आला.

याशिवाय दुसरे पुरावे सर्व ब्राह्मणी वाङ्मयात इतस्ततः विखुरलेले आढळून येतात. हे पुरावे विशेषतः विश्वोत्पत्तीसंबंधी जे दोन सिद्धांत मांडण्यात आलेले आहेत त्यात दिसून येतात. या दोन सिद्धांतांवरून असे सूचित होते की, ते आर्यांच्या दोन वर्गांनी मांडलेले असावेत. म्हणजे आर्यांचे दोन वर्ग अस्तित्वात होते, असे पर्यायाने या दोन सिद्धांतांवरून ध्वनित होते. विश्वोत्पत्तीसंबंधीचा जो एक सिद्धांत ब्राह्मणी वाङ्मयात आढळतो त्याची माहिती दुसऱ्या प्रकरणात दिलेली आहे. आता दुसऱ्या प्रकारचा जो सिद्धांत आहे त्याचे विवेचन करू या.

प्रथमतः वेदापासून सुरुवात करू या. तैत्तिरीय संहितेत खालील उल्लेख आहे -

तैत्तिरीय संहिता ६-५-६-१ - (Muir, Vol. I, p. 26) - ''आपल्याला पुत्र व्हावेत अशी अदितीला इच्छा झाली, तेव्हा साध्यादि देवतांना नैवेद्य दाखविण्यासाठी तिने ब्रह्मौदन भात शिजवून तयार केला. देवतांनी तो भात खाऊन त्यातील थोडासा भात अदितीसाठी शिल्लक ठेवला. देवतांचा प्रसाद म्हणून तो भात तिने खाल्ला. तिला गर्भ राहिला. ती प्रसूत झाली, तेव्हा तिला चार आदित्य झाले. तिने दुसऱ्यांदा ब्रह्मोदन भात भिजवून तयार केला. ती मनात म्हणाली, 'पूर्वी देवतांनी दिलेल्या भाताच्या प्रसादामुळे मला चार मुलगे झाले. आता हा जो भात मी शिजवून तयार केलेला आहे, त्यातील एक भाग मी जर प्रथम खाल्ला (देवतांना नैवेद्य दाखविण्याच्या आगोदर) तर मला जास्त उत्तम प्रकारचे मुलगे होतील.' असा विचार करून तिने तो भात देवतांना दाखविण्याच्या अगोदर खाल्ला. तिला गर्भ राहिला, पण तो अपूर्णावस्थेतच बाहेर पडला. तिने आदित्यांसाठी तिसऱ्यांदा भात तयार केला तो भात शिजवीत असता ती मनात असा मंत्रोच्चार करीत होती की, 'हे जे धर्मकृत्य मी करीत आहे त्याची फळे मला उपभोगण्यास मिळोत!' आदित्य म्हणाले, 'आपण वर मागू या. या भातापासून ज्याची उत्पत्ती होईल तो सर्वस्वी आमचा राहो. त्याच्यापासून ज्याची उत्पत्ती होईल तो भरभराटीत राहील. तो आमच्या सुखाचे मूळ होवो.' या घटनेनंतर आदित्य विवस्वात याचा जन्म झाला. हा त्याचा वंशज होय. ते वंशज म्हणजे मानव. मानवांपैकी जो कोणी यज्ञकर्म करील तो भरभराटीत राहील आणि तो देवतांना नैवेद्य वगैरे समर्पण करून संपुष्ट करील.''

आर्यांचे दोन वेगवेगळे वर्ग होते, याबद्दलचे बरेच पुरावे ब्राह्मण ग्रंथांतही आहेत. ते पुरावे म्हणजे विश्वोत्पत्तीसंबंधी या ग्रंथांत मांडलेले सिद्धांत. विश्वोत्पत्तीसंबंधी शतपथ ब्राह्मण या ग्रंथात खालील कथा आढळतात -

**(१) शतपत ब्राह्मण, १-८-१-१ (Muir, Vol. I, pp. 181+184)** ''सकाळी मनूसाठी त्यांनी हात धुवावयास पाणी आणले, कारण पाण्याने हात धुण्याची मनुष्यांना सवय असते. मनू पाण्याने हात धूत असता त्याच्या हातात मासा आला. मासा मनूला म्हणाला, 'मला जपून ठेव. मी तुला एखाद्या संकटातून वाचवीन.' मनूने त्याला विचारले, 'तू मला कसल्या संकटातून वाचवशील?' माशाने उत्तर दिले, 'पुढे जलप्रलय होणार आहे. त्यात सर्व प्राणिमात्रांचा सत्यानाश होईल. त्या जलप्रलयापासून मी तुझे रक्षण करीन.' मनूने विचारले, 'तुला मी जपून कसे ठेवू?' मासा म्हणाला, 'आम्ही मासे जोपर्यंत लहान असतो तोपर्यंत आमचे जीवित मोठ्या धोक्यात असते, कारण मोठा मासा लहान माशाला खातो. प्रथम तू मला घटात जपून ठेव. मी वाढत वाढत मोठा झालो व घटात मावेनासा झालो म्हणजे मला घटातून काढ व एक खंदक खणून त्यात मला जपून ठेव. मी खंदकात न मावण्याइतका मोठा झालो तर तू मला महासागरात नेऊन सोड. त्यानंतर मी संकटातून मुक्त झालो असे होईल.' लगेच मासा मोठा झाला. कारण तो स्वतःचे अंग हवे तेवढे फुगवू शकतो. तो मासा म्हणाला, 'अमुक एका वर्षी जलप्रलय होईल. जलप्रलयाचे पाणी वर चढू लागले की तू एका होडीत जाऊन बैस. त्या होडीतून मी तुझी सुटका करीन.' माशाने

सांगितलेल्या रीतीने मनूने माशाला जपून ठेवले व नंतर त्याने माशाला महासागरात नेऊन सोडले. माशाने सांगितलेल्या वर्षी जलप्रलय झाला व त्याच वर्षी मनूने होडी तयार केली आणि तीत तो बसला. जलप्रलयाचे पाणी वर वर चढू लागेल तेव्हा मनूने होडी चालू केली. मासा होडीकडे पोहत आला. मनूने होडीची पुढची बाजू माशाच्या शिंगाला बांधली. या कृतीमुळे मनू होडीसह उत्तरेकडील पर्वत ओलांडून पुढे गेला. मासा मनूला म्हणाला, 'मी तुझी संकटातून मुक्तता केली आहे. आता तू होडी एखाद्या झाडाला बांध. जलप्रलयाचे पाणी जसजसे ओसरत जाईल, त्या मानाने तू होडीचा दोरखंड झाडापासून खाली बाली सरकवत नेऊन बांध. तो दोरखंड तू जर झाडापासून सोडलास तर तू होडीसकट लांब वाहात जाशील. झाडाला दोरखंड तसाच ठेवून तू सरकवत खाली आणलास तर तू होटीसकट पाणी पूर्ण खाली ओसरत आल्यावर डोंगरमाथ्यावर येशील.' माशाने सूचना दिल्याप्रमाणे मनूने आपली होडी पाणी जसजसे खाली होत गेले तसतशी खाली आणली. मनूचे हे अवरोहण त्या उत्तर दिशेकडील पर्वताचे नाव होऊन बसले. जलप्रलयात सर्व प्राणी मात्रांचा संहार झालेला होता, तेव्हा मनू हा एकटाच पर्वतावर राहिला. आपल्याला संतती व्हावी, अशी त्याला इच्छा झाली. म्हणून त्याने संततीप्राप्तीसाठी अनेक धार्मिक कृत्ये, प्रार्थना केल्या व घोर तपश्चर्या केली. त्याने पाक या नावाचा नैवेद्य तयार करून तो यज्ञात देवाला अर्पण केला. 'शुद्र लोणी, घट्ट दूध, दही तयार होण्याच्या अगोदरचे दुधाचे पाणी व दही यांचे अर्घ्य' मनूने सागराच्या पाण्यात दिले. त्यानंतर एका वर्षात एक स्त्री उत्पन्न झाली. तिचा देह तेलकटपणाने चकचकत होता, तिच्या पायाला शुद्ध लोणी चिकटलेली होते. तिला मित्र आणि वरुण भेटले. ते तिला म्हणाले, 'तू कोण आहेस?, ती उत्तरली, 'मनूची मुलगी'. ते म्हणाले, 'तू आमची आहेस असे म्हण.' ती म्हणाली, 'नाही, ज्याने मला जन्म दिला त्याची मी.' तिच्यात आपला वाटा असावा, अशी त्यांनी इच्छा धरली. त्याबद्दल तिने वचन दिले, किंवा त्याबद्दल तिने वचन दिले नाही याबद्दल उल्लेख नाही; परंतु ती पुढे निघून गेली. ती मनूजवळ आली. मनू तिला म्हणाला, 'तू कोण आहेस?' ती उत्तरली, 'तुझी मुलगी'. मनू म्हणाला, 'हे माझ्या देदीप्यमान मुली! तू ठीक आहेस ना?' ती म्हणाली, 'लोणी, घट्ट दूध, दही होण्यापूर्वीचे दुधाचे पाणी, दही यांचे अर्घ्य महासागराच्या पाण्यात देऊन तू मला जन्म दिलास. तू उच्चारलेला आशीर्वाद म्हणजे मी. तू माझा यज्ञात उपभोग कर. तू माझा यज्ञात उपयोग केलास तर तुला अगणित संतती व गुरेढोरे मिळतील. माझ्यातर्फे तू जो काही आशीर्वाद मागशील तो तुला मिळेल.' तिने सांगितल्याप्रमाणे मनूने तिला यज्ञविधी चालू असताच मध्यंतरी यज्ञात नेऊन सोडले. संततीची इच्छा मनात धरून ते तिच्यासह प्रार्थना करीत अनेक धर्मकृत्ये आणि घोर तपश्चर्या करीत राहिला. तिच्यापासून त्याला जी संतती झाली ती मनूची संतती होय. तिच्याबरोबर त्याने जे जे आशीर्वाद देवाजवळ मागितले ते ते त्याला मिळाले. ती म्हणजे इडा होय! ज्याला ही माहिती आहे तो इडाबरोबर जर राहिला तर मनूला जशी संतती झाली तशी संतती त्याला होईल. ते तिच्याबरोबर जे आशीर्वाद देवाजवळ मागेल ते सर्व त्याला मिळतील.

**(२) शतपथ ब्राह्मण, ६–१–२–११ (Muir, Vol. I, p. 30)** ''यावरून ते म्हणतात, 'प्रजापतीने सर्व जग निर्माण केल्यानंतर तो पृथ्वीतलावर उभा राहिला. पृथ्वीतलावरील ही झुडपे शिजवून त्याच्यासाठी अन्न तयार केले. त्याने तेच अन्न खाल्ले. त्यामुळे त्याला गर्भ राहिला. त्याच्या शरीरच्या वरच्या भागातून बाहेर पडत असलेल्या वाऱ्यापासुन प्रजापतीने देव उत्पन्न केले आणि शरीराच्या खालच्या भागातुन बाहेर पडत असलेल्या वाऱ्यापासून त्याने मर्त्य संतती उत्पन्न केली. त्याने हव्या त्या रीतीने विश्वाची व त्यातील चराचर वस्तुमात्रांची उत्पत्ती केली. या जगत जे काही आहे त्या सर्वांची उत्पत्ती प्रजापतीने केली.''

**(३) शतपथ ब्राह्मण, ६–५–२–६ (Muir, Vol. I, p. 24)** – ''प्रथम प्रजापती हाच सर्व जग होता. कारण तोच प्रथम अस्तित्वात होता. 'मी आता अन्न उत्पन्न करावे आणि मला संतती व्हावी,' अशी त्याला इच्छा झाली. त्याने आपल्या श्वासोच्छ्वासापासून जनावरे, आत्म्यापासून मनुष्य, डोळ्यांपासून घोडा, श्वासोच्छ्वासापासून बैल, कानापासून मेंढी व आवाजमासून बकरे उत्पन्न केले. त्याने आपल्या श्वासोच्छ्वासापासून जनावरे उत्पन्न केली. त्यावरून माणसे म्हणतात, हे श्वासोच्छ्वास म्हणजे जनावरे होत. आत्मा हा पहिला श्वासोच्छ्वास होय, त्याने आत्म्यापासून मनुष्याची उत्पत्ती केलेली आहे, ते म्हणतात, 'मनुष्य हा जनावरांपैकी पहिले व सर्वात अधिक बळकट जनावर होय.' आत्मा हाच संपूर्ण श्वासोच्छ्वास होय, कारण सर्व श्वासोच्छ्स आत्म्यावर अवलंबून असतात. त्याने आपल्या आत्म्यापासून मनुष्य निर्माण केला, त्यावरून ते म्हणतात, मनुष्य हा सर्व जनावर होय; कारण ती सर्व मनुष्याची आहे.''

**(४) शतपथ ब्राह्मण, १०–१–३–१ (Muir, Vol. I, p. 31)** – ''प्रजापतीने सजीव वस्तूंची उत्पत्ती केली. त्याने आपल्या शरीराच्या वरच्या भागातून बाहेर पडत असलेल्या वाऱ्यापासून देव उत्पन्न केले. खालच्या भागातून बाहेर पडत असलेल्या वाऱ्यापासून मर्त्य प्राणी उत्पन्न केले. त्यानंतर त्याने प्राणिमात्रांचे भक्षण करणारा मृत्यू उत्पन्न केला.''

**(५) शतपथ ब्राह्मण, १४–४–२–१ (Muir, Vol. I, p. 25)** – ''हे विश्व प्रथम पुरुषाच्या रूपाने आत्मा म्हणून आपण स्वतःच होय. तो प्रथम म्हणाला, 'हा मी आहे.' त्यानंतर त्याचे नाव 'मी' झाले. म्हणून जेव्हा जेव्हा माणसाला कोणी विचारले तर तो 'हा मी आहे', असे म्हणतो. त्यानंतर त्याला जे दुसरे नाव असते त्याचा ते उच्चार करतो. ज्याअर्थी त्याने याच्यापूर्वी सर्व पापे जाळून नष्ट केली त्याअर्थी त्याला पुरुष असे संबोधण्यात येऊ लागले. हे ज्याला माहीत आहे तो माणूस प्रजापतीच्या अगोदरपासून असण्याची इच्छा धरणाऱ्या माणसाला जाळून नष्ट करील. प्रजापती भ्याला, म्हणून मनुष्य एकटाच असला की भिती. यावरून असा अर्थ काढण्यात येतो की, 'माझ्या व्यतिरिक्त दुसरी कोणतीही गोष्ट नाही. मी कोणाला भ्यावे?' त्यानंतर त्याचे भय दूर पळाले. कारण त्याने का भ्यायला हवे होते? लोक दुसऱ्या माणसाबद्दल भीती बाळगतात. तो सुखी झाला नाही म्हणून. माणूस एकटा असतो तेव्हा तो सुखी होत नसतो. त्याने दुसऱ्या माणसांच्या संगतीची इच्छा धरली. तेव्हा त्याचे रूप असे झाले की, जणू काही स्त्री व पुरुष हे परस्पराला घट्ट मिठी मारून

बसलेले आहेत. त्याने आपल्या शरीरापासून त्या रूपाला दूर होण्यास लावले व त्या रूपाचे दोन भाग वेगवेगळे झाले. याप्रमाणे पती व पत्नी हे उत्पन्न झाले. यावरून याज्ञवल्क्य याने म्हटले आहे की, आपले हे शरीर म्हणजे दुभंगलेल्या बियाचा एक भाग होय. म्हणून ती पोकळी स्त्रीने भरून काढली. त्याने तिला संभोग दिला. त्यांच्यापासून पुरुष उत्पन्न झाले. ती मनात म्हणाली, 'मला आपल्यापासून उत्पन्न करणारा प्रजापती हा मजबरोबर संभोग कसा काय करू शकला? अरेरे! मी अदृश्य होणे बरे.' ती गाय झाली आणि दुसरा भाग बैल झाला. त्याने तिच्याशी संभोग केला. ज्याची पायनखे अखंड आहेत अशा जनावरांची पैदास त्यांच्यापासून झाली. एक शेळी झाली, दुसरा बोकडा झाला; एक मेंढी, दुसरा मेंढा झाला. त्याने तिच्याशी संभोग केला. ज्याची पायनखे अखंड आहेत अशा जनावरांची पैदास त्यांच्यापासून झाली. एक शेळी झाली, दुसरा बोकडा झाला; एक मेंढी, दुसरा मेंढा झाला. त्याने तिच्याशी संभोग केला. बकरी, मेंढ्या यांची पैदास त्यांच्यापासून झाली. अशा रीतीने किडा-मुंगीपर्यंतच्या सर्व प्राण्यांची उत्पत्ती नर-मादीच्या जोडीने झाली.''

तैत्तिरीय ब्राह्मणात विश्वोत्पत्तीसंबंधी खालील उल्लेख आहे -

**(१) तैत्तिरीय ब्राह्मण - २-२-९-१ (Muir, Vol. I, pp. 28-29)** - ''प्रथम हे विश्व काहीच नव्हते. आकाश, पृथ्वी, हवा यांपैकी काहीच अस्तित्वात नव्हते. त्याला नास्तिकाच्या अवस्थेतून बाहेर पडण्याची इच्छा झाली तेव्हा त्याने निश्चय केला, ''मी अस्तित्वात येऊ दे.'' ते संतप्त झाले. त्यांच्या संतप्तपणापासून धूर निघाला. ते पुनः संतप्त झाले. त्यांच्या संतप्पपणापासून अग्नी तयार झाला. ते पुनः संतप्त झाले. त्याच्या संतप्तपणपासून प्रकाश तयार झाला. ते पुनः संतप्त झाले. त्यांच्या संतप्तपणापासून ज्योत तयार झाली.ते पुनः संतप्त झाले. त्याच्या संतप्तपणापासून किरणे तयार झाली. ते पुनः संतप्त झाले. त्याच्या संतप्तपणापासून ज्वाला तयार झाल्या. ते पुनः संतप्त झाले. ते मेघाप्रमाणे गोठून गेले. त्याने आपले मूत्राशय रिकामे केले. त्यामुळे समुद्र उत्पन्न झाला. म्हणून माणसे समुद्राचे पाणी पीत नाहीत. कारण ते समुद्राला जन्मस्थानाप्रमाणे लेखतात. म्हणून प्राणी उत्पन्न होण्याच्या अगोदर प्रथम पाणी बाहेर पडते. त्यानंतर दशहोत्री उत्पन्न झाला. प्रजापती हा दशहोत्री आहे. त्याच्या संतप्तपणाची शक्ती थोर आहे व त्यामुळेच प्राणी मात्रांची उत्पत्ती झाली. याबद्दलचे ज्ञान ज्याला आहे व जो त्या शक्तीची आराधना करतो तो आयुष्यात यशस्वी होतो पाणी म्हणजेच ते. प्रजापती रडत रडत म्हणाला, 'जर माझा जन्म कोणत्याही प्रकारचा आधार नसलेल्यांपासून झाला असेल तर माझा जन्म कोणत्या कार्याकरता झाला?' जे पाण्यात पडले त्याची पृथ्वी झाली. ज्याला त्याने पुसून टाकले त्याची हवा झाली. ज्याला त्याने पुसून वर फेकले त्याचे आकाश झाले. ज्या परिस्थितीमुळे तो रडला त्यापासून दोन जगाला रोदसी हे नाव प्राप्त झाले. याचे ज्ञान ज्याला आहे, त्याच्या घरात ती रडत नाहीत. हा या जगाचा जन्म होय. या जगाचा असा जन्म झाला, याचे ज्याला ज्ञान आहे त्याला दुःखाची पीडा होत नाही. त्याने पृथ्वीला आपला आधार केले. पृथ्वीला आधार केल्यानंतर त्याला इच्छा झाली, 'मला संतती होवो.' त्याने घोर तपश्चर्या केली. त्याला गर्भ

राहिला. त्याने आपल्या पोटापासून असुर उत्पन्न केले. त्याने असुरांना मातीच्या भांड्यांतून दूध प्यायला दिले. त्याने आपले शरीर दूर भिरकावून दिले. अंधार उत्पन्न झाला. त्याला इच्छा झाली 'मला संतती होवो.' त्याने घोर तपश्चर्या केली. त्याला गर्भ राहिला. त्याने आपल्या लिंगापासून सजीव प्राणी उत्पन्न केले, म्हणून त्यांची संख्या फार आहे. कारण त्याने त्यांना आपल्या लिंगापासून उत्पन्न केले. त्याने त्यांना लाकडाच्या भांड्यांतून दूध पाजले. त्याने आपले शरीर दूर भिरकावून दिले. चंद्रप्रकाश पडला. त्याला इच्छा झाली, 'मला संतती होवो.' त्याने घोर तपश्चर्या केली. त्याला गर्भ राहिला. त्याने आपल्या काखेतून ऋतू उत्पन्न केले. त्याने चांदीच्या भांड्यांतून त्यांना लोणी पाजले. त्याने आपले शरीर दूर भिरकावून दिले. दिवस-रात्र यांना जोडणारा काळ म्हणजे सकाळ व संध्याकाळ उत्पन्न झाली. त्याला इच्छा झाली, 'मला संतती होवो.' त्याने घोर तपश्चर्या केली. त्याला गर्भ राहिला- त्याने आपल्या मुखापासून देव उत्पन्न केले. त्याने त्यांना सोनेरी भांड्यांतून दूध पाजले. त्याने आपले शरीर दूर भिरकावून दिले. दिवस उत्पन्न झाला. ही प्रजापतीची दूध पिणारी मुले होत. याचे ज्ञान ज्याला आहे तो संततीपासून दूध काढतो. 'दिवस आमच्याकडे आला आहे.' या उद्‌गाराचा अर्थ असा की, देवांचा प्रमुख देव याप्रमाणे जो देवांचा प्रमुख देव ओळखतो त्याला देवप्राप्ती होते. ही दिवस व रात्र यांची जन्मकथा होय. हे जो जाणतो त्याला दिवस व रात्र यापैकी कशाचीही पीडा होत नाही. नास्तित्वातून मन (आत्मा) उत्पन्न केले. मनाने प्रजापतीला उत्पन्न केले. प्रजापतीने संतती उत्पन्न केली. हे जे काही अस्तित्वात आहे हे सर्वस्वी मनावर आधारलेले आहे. हे तो ब्रह्म आहे. त्याला स्वोवस्यास म्हणतात. ज्याला हे माहीत आहे, त्याला उषा जास्त प्रकाशमान होत असलेल्या दिसतील; त्याला मनसोक्त संतती होते आणि ज्यांच्या जवळ जनावरांची संतती खूप होते, तो परमेष्ठिन हे पद मिळवितो.''

**(२) तैत्तिरीय ब्राह्मण २-३-८-१ (Muir, Vol. I, p. 23)** - ''प्रजापतीला इच्छा झाली, मला संतती होवो.' त्याने घोर तपश्चर्या केली. त्याला गर्भ राहिला. त्याचा रंग पिवळसर-तांबूस झाला. म्हणून गरोदर असलेल्या स्त्रीचा मूळच पिवळा रंग तांबूस होतो. गरोदरपणात तो थकून गेला. थकल्यामुळे त्याचा रंग काळसर तांबूस झाला. म्हणून थकलेला माणूस काळसर-तांबूस होतो. त्याचा श्वास चपळ झाला. त्याने श्वासातून असुर उत्पन्न केले. त्यामध्ये असुरांचा असुर स्वभाव झाला. असुरांचा असुर स्वभाव ज्याला याप्रमाणे माहीत होतो, त्याचा श्वास चांगला चालतो. श्वास त्याला सोडून जात नाही. असुरांची उत्पत्ती केल्यानंतर तो स्वतःला पिता समजू लागला. त्यानंतर त्याने पितृ उत्पन्न केले. त्यामुळे तो पित्यांचा पिता झाला. पित्यांचे पितृत्व याप्रमाणे जो जाणतो, तो स्वतःचाच पिता होतो. पितृ त्याचे अर्घ्य सेवन करतात. पितृ निर्माण केल्यानंतर तो मनात विचार करू लागला. त्यानंतर त्याने पुरुष निर्माण केले. याप्रमाणे पुरुषांचे पौरुष उत्पन्न झाले. पुरुषांचे पौरुष जो जाणतो तो हुशार होतो. मन त्याला सोडून जात नाही. तो पुरुष निर्माण करीत असता त्याला आकाशात दिवस दिसला. त्यानंतर त्याने देव निर्माण केले. हे देवांचे आदिदेवत्व जो देवांचा

प्रमुख देव जाणतो त्याला आकाशात दिवस दिसतो. देव, पुरुष, पितृ आणि असुर हे उत्पत्तीचे चार प्रवाह आहेत, या सर्वात जे पाणी आहे ते हवेप्रमाणे आहे.''

**(३) तैत्तिरीय ब्राह्मण, ३-२-३-९ (Muir, Vol. I, p. 21)** ''हा शूद्र नास्तित्वातून उत्पन्न झालेला आहे.''

विश्वोत्पत्तीबद्दलचा खालील तैतिरीय आरण्यकात मिळतो -

**तैत्तिरीय आरण्यक, १-१२-३-१ (Muir, Vol. I, p. 21) -** ''हे प्रवाही पाणी आहे. फक्त प्रजापतीचा जन्म कमळाच्या पानावर झाला. त्याच्या मनात इच्छा उत्पन्न झाली, 'मी हे उत्पन्न करू दे.' म्हणून मनुष्य जे मनात योजतो ते तो भाषेने स्पष्ट करून सांगतो आणि कृतीने करून दाखवितो. म्हणून हा श्लोक म्हटलेला आहे, ''इच्छा प्रथम त्यांच्यात उत्पन्न झाली ते म्हणजे मनाचे मूळबीज. ते बीज मनुष्याच्या हृदयात आहे, असा शोध आपल्या शोधक बुद्धीने ऋषींनी लावला. अस्तित्व आणि नास्तित्व यांना मनुष्याच्या हृदयात सांधणारा बंध, ते म्हणजे मनाचे मूळबीज होय.'' (ऋग्वेद, १०-१२९-४). याप्रमाणे ज्याला ही माहिती आहे त्याच्याकडे त्याची इच्छा होताच तो येतो. त्याने घोर तपश्चर्या केल्यानंतर याने आपले शरीर हालविले. त्याच्या मांसापासून अरुण, केतू आणि वातारासन ऋषी उत्पन्न झाले. त्याची नखे वैखानस आणि केस वालखिल्य झाले. त्याच्या शरीराचे प्रवाही पाणी कासव झाले व ते कासव पाण्यात फिरू लागले. तो कासवाला म्हणाला, ''तू माझ्या कातडीतून व मांसातून उत्पन्न झालेला आहेस.'' कासव उत्तरले, 'नाही, मी पूर्वी येथे होतो.' त्याच्या पूर्वीच्या अस्तित्वात पुरुषाचे पुरुषत्व असते. 'तो हजार डोक्यांचा, हजार डोळ्यांचा, हजार पयांचा असा पुरुष झाला.' (ऋग्वेद, १०-९०-१). प्रजापती त्याला म्हणाला, 'तुला माझ्या अगोदर उत्पन्न केले आहे. तू प्रथम हे कर.' त्याने तेथून आपल्या ओंजळीत पाणी घेतले आणि ते पाणी 'हे सूर्य! ते असे असू दे' असा मंत्र म्हणून पूर्व दिशेला ठेवले. तेथून सूर्य उत्पन्न झाला. ती पूर्व दिशा होती. नंतर अरुण केतूने ते पाणी, 'हे अग्नी! ते असे असू दे' असा मंत्र महणत दक्षिण दिशेला ठेवले. तेथून अग्नी उत्पन्न झाला, ती दक्षिण दिशा होती. नंतर अरुण केतूने ते पाणी 'हे वायो! ते असे असू दे' असा मंत्र म्हणत पश्चिम दिशेला ठेवले, तेथून वायू उत्पन्न झाला ती पश्चिम दिशा होती. नंतर अरुण केतूने ते पाणी 'हे इंद्रा! ते असे असू दे' असा मंत्र म्हणत उत्तर दिशेला ठेवले. नंतर इंद्र उत्पन्न झाला ती उत्तर दिशा होती. नंतर अरुण केतूने ते पाणी, 'हे पुशान! ते असे असू दे' असा मंत्र म्हणत मध्यभागी ठेवले. तेथून पुशान उत्पन्न झाला. ती हीच दिशा. नंतर अरुण केतूने ते पाणी, 'हे देवा! ते असे असू दे' असा मंत्र म्हणत वरती ठेवाले. तेथून देव व पुरुष, पितृ, गंधर्व आणि अप्सरा ही उत्पन्न झाली, ती हीच वरची दिशा. त्या पाण्याचे जे थेंब निरनिराळ्या ठिकाणी पडले त्यातून असुर, राक्षस आणि पिशाच्च उत्पन्न झाले. म्हणून असा त्यांचा नाश झाला. कारण त्यांना पाण्याच्या थेंबापासून उत्पन्न केले. म्हणून असा श्लोक म्हणतात की, 'जेव्हा या पाण्यात ज्ञानसंपन्न आणि स्वयंभूला निर्माण करणारा गर्भ राहिला तेव्हा त्या पाण्यापासून हे चराचर प्राणिमात्र उत्पन्न केले, ते सर्व पाण्यापासून उत्पन्न केले; म्हणून हे सर्व

ब्रह्म स्वयंभू आहे. म्हणून हे सर्व जणू काही मुक्त, जणू काही अस्थिर होते. तो प्रजापती होता. स्वतःमधून स्वतःची उत्पत्ती केल्यानंतर तो त्यांच्यात शिरला. म्हणून हा श्लोक म्हणतात, ''विश्व उत्पन्न केल्यानंतर सजीव प्राणी, मध्यंतरीच्या दिशा व दिशा उत्पन्न केल्यानंतर सर्व वस्तुमात्रांच्या अगोदर उत्पन्न झालेला प्रजापती स्वतःला बरोबर घेऊन स्वतःमध्ये शिरला.''

६

आर्यांचे दोन निरनिराळे वर्ग होते, या बाबतीत पुष्टिदायक पुरावे महाभारतातही सापडतात. ते पुरावे म्हणजे विश्वोत्पत्तीसंबंधी या ग्रंथात मांडलेले सिद्धांत होत. विश्वोत्पत्तीसंबंधी मनूने जो सिद्धांत तयार केलेला आहे, तो महाभारतात ग्रथित केलेला आहे. तो वनपर्वात आहे. तो खालीलप्रमाणे (Muir, Vol. I, pp. 199-201) –

''विवस्वताचे तपःसामर्थ्य प्रजापतीच्या तपःसामर्थ्याप्रमाणे मोठे होते. विवस्वताचा मुलगा मनू हा एक मोठा ऋषी होता. उत्साह, तडफदारपणा, वैभव व तपोनिष्ठा या बाबतीत तो आपला बाप व आजोबा यांच्यापेक्षा श्रेष्ठ होता. एका पायावर उभे राहून, एक हात वर करून, मस्तक खाली नमवून आणि पापणीला पापणी व लावता डोळे अचलपणे उघडे ठेवून त्याने दहा हजार वर्षे घोर तपश्चर्या केली. त्याच्या अंगावर चिंध्यांची वस्त्रे होती, त्याच्या केसांच्या जट वर बांधलेल्या होत्या. अशा अवस्थेत मनू तपश्चर्या करीत असता चिरिणी नदीच्या तीरावर एक मासा आला व तो मनूला म्हणाला 'भगवान! मी एक लहान मासा आहो, मोठ्या माशांची मला फार भीती वाटते. तुम्ही त्यांच्यापासून माझे संरक्षण केले पाहिजे. कारण, मोठा मासा लहान माशाला खाऊन टाकतो. लहान मासा मोठ्या माशाचे अन्न आहे, हा सिद्धांत अनादिकालापासून चालत आलेला आहे. मोठ्या माशांच्या भीतीच्या पुरात मी बुडत आहे. त्यातून तुम्ही मला तारा. मी तुमचे उपकार फेडीन.' माशाचे हे भाषण ऐकून मनूला फार दया आली. त्याने माशाला उचलून हातात घेतले. चंद्रज्योतीप्रमाणे चकचकणाऱ्या घटात पाणी ओतून मनूने माशाला घटात घातले. मनूने त्या माशाची पोटच्या मुलाप्रमाणे जोपासन केली. तो मासा घटात दिवसेंदिवस मोठा होऊ लागला. बराच काळ लोटल्यानंतर तो इतका मोठा झाला की तो घटात मावेना. तेव्हा मनूला पाहून तो म्हणाला, 'मी याच्याहीपेक्षा मोठे व्हावे असे मला वाटते. तर तुम्ही मला कोठे तरी नेऊन ठेवा.' तेव्हा मनूने माशाला घटातून बाहेर काढले आणि एका मोठ्या तळ्यात नेऊन सोडले. तेथे कित्येक वर्षे गेल्यानंतर मासा बराच मोठा झाला. तो इतका मोठा झाला की, ते तथे दोन योजने लांब व एक योजन रुंद होते तरी त्या कमलनयन माशाला त्या तळ्यात स्वैर संचार करण्यास अडचणी भासू लागली. तो मनूला पुनः म्हणाला, 'सागरसम्राटाची आवडती राणी गंगा हिच्याकडे मला घेऊन चला. मी तिच्यात राहीन किंवा तुम्हाला जे योग्य वाटेल ते करा. कारण, मी तुमची आज्ञा स्वखुशीने पाळली पाहिजे. कारण, केवळ तुमच्या कृपात्राखाली मी इतका अवाढव्य वाढलो आहे.' माशाचे भाषण ऐकून मनूने त्याला नेऊन गंगा नदीत

सोडले. तेथेही तो काही दिवसांनी खूप मोठा झाला. तेव्हा तो मनूला म्हणाला, 'मी आता इतका जाडजूड झालो आहे की, मला गंगेच्या पाण्यात जास्त हालचाल करता येत नाही. तरी कृपा करून तुम्ही मला येथून उचलून समुद्रात नेऊन सोडा.' माशाचे हे भाषण ऐकून मनूने त्याला उचलून नेऊन समुद्रात सोडले. मासा इतका मोठा झालेला होता तरी मनूच्या हस्तस्पर्शाने त्याचे वजन कमी झाले, त्याला स्पर्श करण्यास योग्य अशी त्याची अंगकांती झाली व त्याच्या शरीराची दुर्गंधी नाहीशी झाली. मनूने माशाला समुद्रात नेऊन सोडले. तेव्हा तो मनूला म्हणाला, 'हे प्रभुवरा! तुम्ही मला हरएक प्रयत्न करून वाचविलेत व वाढविलेत. पुढे जो संकटकाळ येणार आहे, तेव्हा तुम्ही कसे वागावे, याबद्दल मी तुम्हाला काही माहिती देत आहे, ती आता तुम्ही लक्षपूर्वक ऐका. लौकरच असा काळ येणार आहे की तेव्हा जगातील सर्व चराचर, वस्तुमात्र यांचा सत्यानाश होईल. जगातील पापे धुऊन काढून जगाला शुद्ध करण्यची वेळ आता जवळ येत आहे. म्हणून तुमच्या हिताची जी गोष्ट आहे ती मी तुम्हाला सांगत आहे. चराचर विश्वाला भीतिदायक असा काळ आलेला आहे. तुम्ही स्वतःसाठी एक मजबूत जहाज तयार करा. त्याला एक दोरखंड बांधून ठेवा. त्यात सात ऋषींबरोबर तुम्ही बसा. प्राचीन काळच्या ब्राह्मणांनी वर्णन केलेली जी बी-बियाणे आहेत त्यातून काही बी-बियाणे निवडून घेऊन ती जपून ठेवा, व नंतर ती जहाजात बरोबर घ्या. जहाजात बसून जहाज चालू लागले की तुम्ही चोहोकडे न्याहाळत बसा. मी जेव्हा तुम्हाकडे येईल तेव्हा माझ्या डोकीवर एक शिंग तुम्हाला दिसेल. मी सांगितल्याप्रमाणे सर्वकाही व्यवस्थितपणे करा. मी आता तुमचा सादर निरोप घेतो. पुढे जो जलप्रलय होणार आहे, त्यातील लाटा माझ्या सहाय्याशिवाय तुम्हाला उल्लंघता येणार नाहीत. मी जे काही आता सांगितले त्यांच्यावर संपूर्ण विश्वास ठेवा.' मनू उत्तरला, 'तू जे सांगितले आहेस त्याप्रमाणे मी करीन.' परस्परांचा निरोप घेऊन ते आपापल्या मर्गाला लागले. माशाने सांगितल्याप्रमाणे मनूने स्वतःसाठी सुंदर जहाज तयार केले व त्यात बी-बियाणे घेऊन तो सप्तर्षींबरोबर बसला व त्याने आपले जहाज प्रचंड लाटा असलेल्या महासागरात चालू केले. मनूने मनात माशाचे स्मरण केले. मनू आपली आठवण करीत आहे हे जाणून मासा मनूकडे अतिशय वेगाने धावत आला. त्याच्या डोकीवर एक शिंग होते. पर्वताप्रमाणे अंग असलेला व एक शिंग असलेला तो मासा पाहून मनूने ओळखले की तोच तो आपला मासा होय. मनूने आपल्या जहाजाचे दोरखंड माशाच्या शिंगाला बांधले. त्या महासागरात पर्वतप्राय लाटांचे थैमान सुरू झाले होते. आघातांमुळे कर्णभेदक आवाज सर्वत्र पसरत होता. अशा परिस्थितीत मासा मनूचे जहाज सहज लीलेने महासागराच्या पृष्ठभागावरून ओढू लागला. दारू पिऊन झिंगलेली स्त्री जशी गरगर फिरते त्याप्रमाणे वादळाच्या माऱ्यामुळे ते जहाज झिंगत व गरगर फिरत होते. पृथ्वी व दिशा यापैकी कोणी डोळ्यांना दिसत नव्हते. पाणी, हवा आणि आकाश याशिवाय जगात काही दिसत नव्हते. अशा अवस्थेत असलेल्या जगात सात ऋषी, मनू आणि मासा हेच फक्त दिसत होते. मासा पुष्कळ वर्षे ते जहाज न थकता समुद्राच्या पाण्यावरून ओढत होतो. शेवटी ते जहाज हिमावताच्या अत्यंत उंचशा पठारावर आणले.

नंतर तो हळूच हसून ऋषींना म्हणाला, 'विलंब न लावता हे जहज तुम्ही या पठाराच्या सुळक्याला बांधा.' त्यांनी तसे केले. हिमावताचे ते अत्यंत उंच सुळके अजून नौबंधन या नावाने ओळखले जातात. नंतर तो देवमासा (अनिमिश) ऋषींना म्हणाला, 'मी प्रजापती ब्रह्मा आहे. माझ्यापेक्षा श्रेष्ठ कोणी नाही. मी माशाचे स्वरूप धारण करून आलो व तुम्हाला या मोठ्या संकटातून वाचविले. सजीव प्राणी, देव, असुर, पुरुष, विश्वे आणि चराचर वस्तू यांना मनू उत्पन्न करील. माझ्या आशीर्वादाने आणि त्याच्या स्वतःच्या घोर तपश्चर्येमुळे मनूला विश्वनिर्मितीच्या बाबतीत अचूक दृष्टी प्राप्त होईल आणि ते विश्व निर्माण करताना ते गोंधळून जाणार नाहीत.' असे म्हणून तो मासा क्षणात अदृश्य झाला. मनूला विश्व उत्पन्न करण्याची अच्छा झाली. पण तो मनात गोंधळून गेला. तेव्हा त्याने घोर तपश्चर्या केली. लगेच त्याला विश्वनिर्मितीची पूर्ण कल्पना झाली व तो विश्वनिर्मितीच्या कामाला लागला.''

महाभारताच्या आदिपर्वात जी विश्वोत्पत्तीची कथा दिली आहे ती काहीशा निराळ्या स्वरूपाची आहे. ती खालीलप्रमाणे आहे. (Muir, Vol. I, pp. 122-126)–

''वैशंपायन म्हणाला, 'स्वयंभूला नमस्कार केल्यानंतर देव आणि इतर वस्तुमात्र ही कशी निर्माण केली व त्यांचा नाश कसा होतो, याबद्दलची नक्की माहिती मी तुला सांगतो. मरीची, अत्री, अंगीरस, पुलस्त्य, पुलह आणि ऋतू हे ब्रह्मदेवाचे सहा मानसपुत्र होत. कश्यप मरीचीचा मुलगा होता. विश्वातील जीव–जीवाणू कश्यपापासून उत्पन्न झाले. दक्षाला अत्यंत श्रेष्ठ दर्जाच्या तेरा कन्या झाल्या. अदिती, दिती, दानू, कला, दानायू, सिमुका, क्रोधा, प्रधा, विस्वा, विनता, कपिला, मुनी, कद्रू. या मुलींना असंख्य वीर पुत्र आणि नातू झाले.'

''वृत्तीने शांत व तपाने महातेजस्वी असा कीर्तिवंत ऋशी दक्ष याचा जन्म ब्रह्मदेवाच्या उजव्या हाताच्या अंगठ्यापासून झाला. त्या मनुच्या पत्नीचा जन्म ब्रह्मदेवाच्या डाव्या हाताच्या अंगठ्यापासून झाला. दक्षाला त्या पत्नीपासून पन्नास कन्या झाल्या. त्यांपैकी दहा कन्या त्याने धर्माला दिल्या, सत्तावीस कन्या इंदूला (सोमाला) दिल्या आणि स्वर्गीय पद्धतीप्रमाणे तेरा कन्या कश्यपाला दिल्या.'' पितामहाचा वंशज मनू हा देव व सर्व वस्तुमात्रांचा शास्त होता. तो त्याचा (कोणाचा हे स्पष्ट म्हटलेले नाही) मुलगा होता. आठ वसू त्याचे पुत्र होत. त्या आठ पुत्रांची माहिती सांगतो. ब्रह्मदेवाची उजवीकडील छाती विभागून तीतून तेजस्वी धर्म (सत्प्रवृत्ती) मनुष्याचे रूप घेऊन उत्पन्न झाला. धर्माने अखिल मानवजातीसाठी आपल्याबरोबर सुख आणले. त्याला तीन तेजस्वी पुत्र होते. ते म्हणजे सम, काम आणि हर्ष (शांती, प्रेम व आनंद) ते सर्व प्राणिमात्रांना आनंद देतात आणि आपल्या शक्तीच्या जोरावर ते जगाचे पालन करतात. मनूची मुलगी अरुषा ही त्या ऋषीची (च्यवन, भृगूचा मुलगा) पत्नी होती... ज्यांच्या कर्तृत्वाची छाप जगावर पडली होती असे ब्रह्मदेवाचे आणखी दोन मुलगे होते. धात्री व विधात्री ही त्यांची नावे होत. ते मनूजवळ राहात होते. सौंदर्यशाली देवता लक्ष्मी ही त्यांची बहीण. कमळ हे तिचे घर. आकाशात भ्रमण करणारे घोडे हे तिचे मानसपुत्र होत. चराचर वस्तूंना अन्न खाण्याची इच्छा झाली तेव्हा त्यांनी परस्परांना खाल्ले.

त्यामुळे चराचर वस्तूंचा नाश करणारा अधर्म उत्पन्न झाला. त्याची बायको निरित्ती. आणि म्हणून राक्षसांना निरित्त म्हणजे निरित्तीची संतती असे म्हणतात. तिला भयानक स्वरूपाचे तीन मुलगे होते. ते दुष्कृत्ये करण्यास सक्कलेले होते. भय, महाभय (भीती आणि भीतिजन्य भावना) आणि चराचरांचा शेवट करणारा मृत्यू (मरण) – त्याला ना पत्नी, ना एखादा पुत्र; कारण तो अंत करणारा आहे.''

'प्रचेतसाचे दहा मुलगे मोठ्या ऋषीप्रमाणे मोठ्या वैभवात जन्मलेले होते. ते फार सद्‌गुणी व पवित्र होते, अशी त्यांची कीर्ती होती. त्यांच्या तोंडातून बाहेर निघत असलेल्या अग्नीने त्यांनी तेजस्वी प्राणी पूर्वी जाळलेले होते. त्यांच्यापासून दक्ष प्रचेतस उत्पन्न झाला. दक्षापासून जगाचे पितर आणि हे प्राणी उत्पन्न झाले. मुनी दक्षाने विरीणीबरोबर संभोग केला तेव्हा त्याला आपल्याप्रमाणे धर्माचरणात निष्ठावंत असलेले आपणासारखे एक हजार मुलगे झाले. सांख्याचे अद्वितीय तत्त्वज्ञान जे निर्माण ते नारदाने त्यांना सांगितले. संतती उत्पन्न करण्याची इच्छा झाल्यावरून प्रजापती दक्षाने पुढे पन्नास कन्यांना जन्म दिला. त्याने त्यापैकी दहा कन्या धर्माला दिल्या, तेरा कन्या कश्यपाला दिल्या आणि सत्तावीस कन्या, की ज्या वक्तशीरपणा पाळण्यात फार काळजी घेत होत्या, त्या इंदूला (सोमाला) दिल्या. त्याच्या तेरा पत्नींमध्ये अत्यंत श्रेष्ठ दर्जाची त्याची पत्नी दाक्षायणी हिच्यापासून मरीचीचा मुलगा काश्यप याला इंद्र, अत्यंत उत्साही आदित्य आणि विवस्वत् हे झाले. बलिष्ठ यम वैवास्वत या नावाचा मुलगा विवस्वताला झाला. ज्ञानी व सामर्थ्यवान मनू आणि कीर्तिवंत यम असे दोन मुलगे मार्तंडाला (म्हणजे विवस्वताला–सूर्याला) झाले. हा शहाणा मनू सन्मार्गी होता. त्याच्या नावाने वंश चालू झाला. म्हणून हे मनुष्याचे कुटुंब म्हणजे मनूचा वंश या नावाने ओळखण्यात येऊ लागले. ब्राह्मण, क्षत्रिय आणि इतर मनुष्येही या मनूपासून उत्पन्न झाले. हे राजा! क्षत्रियांशी संलग्न असे ब्राह्मण त्याच्यापासून (मनूपासून) उत्पन्न झाले. मनूच्या मुलांपैकी जे ब्राह्मण त्यांनी वेद व वेदांगे यांना कवटाळले. वेन, धृिष्णु, नरिश्यांत, नभग, इक्ष्वाकु, करुष, सर्याति, इला, प्रिशद आणि नभगरिष्ट अशी दहा मुले मनूला होती. प्रिशद्र हे नववे मूल क्षत्रियकर्माची आवड असणारे होते. मनुला आणखी पन्नास मुलगे होते. पण आपणाला माहीतच आहे की ते सर्व मुलगे आपापसात झगडून नाश पावले. सरतेशेवटी शहाणा पुरुरव इलापासून जन्मला. आपणाला माहीत आहे की, इला ही पुरुरवाची आई व बाप अशी दोन्ही होती.''

## ८

या बाबतीत पुराणांचे मत काय आहे, हे समजून यावे म्हणून मी पुराणातील काही संदर्भ खाली देत आहे, (Muir, Vol. I, pp. 220-221) –

''या विश्वाचे अंडे उत्पन्न होण्याच्या अगोदर प्रभू ब्रह्मण हिरण्यगर्भ अस्तित्वात होता. तो सर्व जगाचा शाश्वत, निर्माता आणि ब्रह्मचा साकार व निराकार अवतार आहे. त्याच्यात परमेश्वर विष्णू याचे वास्तव्य आहे. व तो ऋक्, यजुस्, साम आणि अथर्ववेद

यांच्याशी समरूप होणारा आहे. ब्रह्माच्या उजव्या अंगठ्यापासून प्रजापती दक्ष उत्पन्न झाला. दक्षाला अदिती ही कन्या होती. तिच्यापासून विवस्तव् उत्पन्न झाला. विवस्वतापासून मनू झाला. इक्ष्वाकु, नृग, धृष्ट, शर्याति, नरीश्यन्त, प्रमसू, नभोगणेदिष्ट, करुष आणि प्रीशध्र असे पुत्र मनूला झाले. पुत्र व्हावा या इच्छेने मनूने मित्र आणि वरुण यांना यज्ञ केला, परंतु अग्निहोत्री पुरोहिताच्या चुकीने यज्ञाचा समारंभ शास्त्रोक्त झाला नाही. चुकीचे वेदमंत्र यज्ञात म्हटल्यामुळे मनूला पुत्र होण्याऐवजी कन्या झाली. तिचे नाव इला ठेवले. त्यानंतर मित्र व वरुण यांच्या कृपाप्रसादाने इलाचे रूपांतर मुलात झाले व त्या मुलाचे नाव सुद्युम्न ठेवले. परंतु ईश्वराचा (महादेवाला) कोप सुद्युम्नावर झाल्यामुळे त्याचे मुलीत पुनः रूपांतर झाले व ती सोमाचा (चंद्राचा) मुलगा बुध याच्या आश्रयाजवळ भटकू लागली. तिचे रूप पाहून बुध तिच्यावर मोहित झाला. बुधाला तिच्यापासून मुलगा झाला. त्याचे नाव पुरुरवस् ठेवले. अगणित तपोबळ असणारे व इलाचे सुद्युम्न म्हणून पुनः रूपांतर व्हावे अशी इच्छा धरणारे ऋषी हे पुरुरवसाच्या जन्मानंतर यज्ञ, ऋक, यजुस, सामन आणि अथर्ववेद, सर्व वस्तुमात्र, मन, नास्तित्व इत्यादीपासून उत्पन्न केलेल्या देवाची पूजा करू लागले. या देवाच्या कृपेमुळे इलाचे सुद्युम्न असे पुनः रूपांतर झाले.''

मनूच्या पुत्रांची तपशीलवार माहिती विष्णुपुराणात खालीलप्रमाणे दिलेली आहे–

(१) ''आपल्या धर्मगुरूची गय मारली म्हणून प्रिशध्र शूद्र झाल.''

(२) ''करुषापासून करुष हे अत्यंत सामर्थ्यवान क्षत्रिय झाले.''

(३) ''नेदिष्ठ याचा मुलगा नभग हा वैश्य झाला.''

वर सांगितलेली गोष्ट सूर्यवंशी लोकांची आहे. सूर्यवंशी लोक मनूपासून जन्मले. सोमवंशी लोक अत्रीपासून जन्मले. सूर्यवंशी लोकांसंबंधी विष्णुपुराणात जशी गोष्ट आहे तशाच स्वरूपाची गोष्ट सोमवंशी लोकांसंबंधी विष्णुपुराणात सांगितलेली आहे. ती खाली देत आहे – (Muir, Vol. I, pp. 225-225) –

''अत्री हा ब्रह्माचा मुलगा व सोमाचा (चंद्राचा) बाप होता. लता, ब्राह्मण आणि तारे यांचा सम्राट म्हणून ब्रह्माने अत्रीची योजना केली होती.'' राजसूय यज्ञ केल्यानंतर सोम गर्वाने धुंद झाला. त्याने देवांचा धर्मगुरू बृहस्पती याची पत्नी तारा हिला दूर पळवून नेले. ब्रह्मा, देव व ऋषी यांनी अत्रीला परोपरीने समजावून सांगितले, धमक्या दिल्या व विनंत्या केल्या तरी त्याने तारेला परत करण्याचे नाकारले. उसानस याने सोमाचे रूप घेतले. रुद्राने अंगीरसाच्या हाताखाली अभ्यास केला होता. त्याने बृहस्पतीला सहाय्य केले. एका बाजूला देवांचे सहाय्य व दुसऱ्या बाजूला दैत्यादिकांचे सहाय्य, अशा स्थितीत दोन्ही बाजूंचे तुंबळ युद्ध जुंपले. ब्रह्माने मध्यस्थी केली आणि तारेला आपल्या नवऱ्याकडे परत पाठविण्यास त्याने सोमाला भाग पाडले. मध्यंतरीच्या काळात तारा गरोदर झाली होती. तिला बुध या नावाचा पुत्र झाला. बुधाचा बाप कोण याबद्दल इतरांनी जेव्हा जास्त कसोशीने विचारपूस केली तेव्हा तारेने सोमाचे नाव सांगितले. बुधाला मनूची मुलगी इला हिच्यापासून पुरुरवस हा मुलगा झाला. (पुरुरवस आणि अप्सरा उर्वशी यांच्यातील प्रेमसंबंधाचे वर्णन शतपथ

ब्राह्मण, ११-५-१-११; विष्णुपराण, ४-६-१९-११; भागवत पुराण, ९-१४; हरिवंश अध्याय २६ यात आलेले आहे. पुरुवसाने ब्राह्मणांच्या बरोबर स्पर्धा केली, अशाप्रकारची माहिती महाभारत, आदिपर्व; अध्याय ७५ यात दिलेल्या आहे. ही माहिती पुढे येईलच.) पुरुवसाला साहा मुलगे होते. सर्वांत मोठा मुलगा आयुस हा होता. आयुसाला पाच मुलगे होते. नहुष, क्षात्रवृद्ध, रंभा, राजी आणि अनेनास.''

''क्षात्रवृद्धाला सुनहोत्र या नावाचा एक मुलगा होता. कास, लेस व ग्रितसमद असे तीन मुलगे सुनहोत्र याला होते. ग्रितसमदाला सौनक हा मुलगा झाला. सौनकाने चातुर्वर्ण्याची पद्धत उत्पन्न केली. कासला काशिराजा हा मुलगा होता. काशिराजाला दीर्घतमस हा मुलगा होता. दीर्घतमसाला धनवंतराई हा मुलगा होता.

विश्वोत्पत्तीसंबंधीचे उपनिर्दिष्ट खुलासेवजा सिद्धांत याची दुसऱ्या प्रकरणात दिलेली सिद्धांताबरोबर तुलना केली तर आपणाला काय दिसून येते? मला असे वाटते की, या तुलनेतून पुढील मुद्दे उपस्थित होतात –

(१) विश्वोत्पत्तीसंबंधीचा एक सिद्धांत धार्मिक स्वरूपाचा आहे, तर दुसरा सिद्धांत धर्मातीत स्वरूपाचा आहे.

(२) मनू हा मानव असून तो सृष्टीचा कर्ता होय असे एक सिद्धांत मानतो; तर दुसरा सिद्धांत असे मानतो की, सृष्टीचा निर्माता ब्रह्मदेव किंवा प्रजापती आहे.

(३) एक सिद्धांत ऐतिहासिक घटना सांगणारा आहे; तर दुसरा सिद्धांत अलौकिक घटनांची कथा सांगणारा आहे.

(४) एक सिद्धांत जलप्रलयाची कथा सांगतो; तर दुसरा सिद्धांत त्याबद्दल ब्रसुद्धा काढीत नाही.

(५) एक सिद्धांत चार वर्णांचे स्पष्टीकरण करण्याची मनीषा दाखवितो; तर दुसरा सिद्धांत समाजाची उत्पत्ती कशी झाली, याचेच स्पष्टीकरण करण्याची मनीषा दाखवितो.

दोन प्रकारच्या सिद्धांतांमध्ये असलेले उपरिनिर्दिष्ट फरक हे संख्येने बरेच व स्वरूपाने प्रमुख दर्जाचे आहेत हे स्पष्ट होते. चातुर्वर्ण्यासंबंधी जे निरनिराळे स्पष्टीकरण या दोन सिद्धांतांनी दिलेले आहे त्यातील फरक हा विशेषतः स्थूल मानाचा आहे. धार्मिक स्वरूपाचा जो सिद्धांत आहे त्यात चातुर्वर्ण्याला महत्त्व दिलेले आहे. धर्मविरहित स्वरूपाचा जो सिद्धांत आहे त्यात चातुर्वर्ण्याचे नावही नाही. मनूच्या संततीचे स्थित्यंतर चार वर्णात कसे झाले हे दाखविण्याच्या हेतूने दोन्ही प्रकारच्या सिद्धांताची एकजूट करण्याचे प्रयत्न झाले, हे खरे आहे. ही गोष्ट रामायण व पुराणे यातील सिद्धांत लक्षात घेतले तर कळून येते. परंतु दोन्ही ध्येयवादी सिद्धांत एकत्र करण्याचा हा प्रयत्न होता हे स्पष्ट आहे. हा प्रयत्न जाणूनबुजून आणि पूर्वनियोजनानुसार झालेला आहे. परंतु या दोन्ही प्रकारच्या ध्येयवादी सिद्धांतांत एवढा स्थूल मानाचा फरक आहे की, ते सिद्धांत एकत्र करण्याचा प्रयत्न झालेला असताही तो फरक स्पष्टपणे दृगोदर होतो. या बाबतीत अशी गंमत झालेली आहे की, चातुर्वर्ण्याबद्दलचे एकच स्पष्टीकरण असण्याऐवजी दोन स्पष्टीकरणे झालेली आहेत. एक पुरुषाने उत्पन्न केलेले

चातुर्वर्ण्य व दुसरे मनूच्या पुत्रांनी पायरीपायरीने तयार केलेले चातुर्वर्ण्य. दोन्ही ध्येयवादी सिद्धांत एक करण्याचा जो प्रयत्न झाला त्याचा परिणाम अगदी ओंगळ स्वरूपाचा झाला. यावरून हेच सिद्ध होते की, ते सिद्धांत मूलतः वेगळ्या स्वरूपाचे आणि परस्परांशी न जुळणारे असे आहेत. हे भिन्न स्वरूपाचे दोन प्रकारचे सिद्धांत ब्राह्मणी वाङ्मयात असतानासुद्धा या विषयाचा ज्यांनी अभ्यास केलेला आहे, अशा पंडितांनी त्याची दखल घेतलेली नाही, ही एक शोचनीय गोष्ट आहे. परंतु ते सिद्धांत अस्तित्वात आहेत व ते विशेष प्रकारचे महत्त्वाचे आहेत ही बाब डोळ्याआड करता येणार नाही. या सिद्धांतांच्या अस्तित्वाचे जे महत्त्व आहे ते कोणते? मला असे वाटते की, परस्परभिन्न अशा स्वरूपाचे जे हे दोन्ही प्रकारचे सिद्धांत आहेत ते निरनिराळ्या दोन आर्यवंशीयांनी मांडलेले असावेत. एक आर्य वंश चातुर्वर्ण्याला मानणारा असावा व दुसरा आर्य वंश चातुर्वर्ण्याला मानणारा नसावा. हे दोन्ही आर्य वंश काही काळानंतर परस्परात मिसळले असावेत व त्यांना एकाच आर्य वंशाचे लोक म्हणून संबोधण्यात आले असावे. ही तर्कपद्धती जर सबळ वाटली तर दोन्ही प्रकारच्या सिद्धांतांतील स्थूल भेद जो ब्राह्मणी वाङ्मयात दाखविण्यात आलेला आहे तो आपल्या नव्या सिद्धांताला (आर्य वंशाचे दोन पंथ होते) पोषक असाच पुरावा होतो.

९

हिंदुस्थानातील लोकांची पाहाणी मानववंशशोधक शास्त्राच्या दृष्टिकोनातून जेव्हा केली तेव्हा जी वस्तुस्थिती दिसून आली ती वस्तुस्थिती माझ्या सिद्धांताला पोषक असा भरभक्कम पुरावा देते. ही पाहाणी सर हर्बर्ट रिस्ले यांनी प्रथम १९०१ मध्ये केली. लोकांच्या चेहरेपट्टीची व इतर अवयवांची मोजमापे घेऊन त्याने जे निष्कर्ष काढले ते येणेप्रमाणे - हिंदुस्थानातील लोक म्हणजे चार भिन्न भिन्न वंशीय लोकांचे मिश्रण होत. ते चार भिन्न वंशीय लोक म्हणजे- (१) आर्य (२) द्रविड, (३) मोगल (४) सिथियन लोक हे होत. हिंदुस्थानातील कोणत्या भागात कोणत्या वंशाचे लोक जास्त राहतात हेही सिद्ध करण्याचा प्रयत्न सर हर्बर्ट रिस्ले यांनी केला. परंतु त्यांनी १९०१ साली जी पहाणी केली ती अगदी मामुली स्वरूपाची होती. पाहाणीतून त्यांनी जे निष्कर्ष काढले ते डॉ. गुहा यांनी १९३६ मध्ये कसाला लावून पाहिले. या विषयासंबंधी डॉ. गुहा यांचा जो अहवाल प्रसिद्ध झालेला आहे तो हिंदी मानववंशशोधक शास्त्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा व मोलाचा आहे. हिंदी लोकांच्या डोक्यांची मोजमापे लक्षात घेऊन त्यान्वये समान मोजमापे असणारे हिंदी लोक कोणकोणत्या भागात राहतात हे दर्शविणारा हिंदुस्थानचा एक नकाशा डॉ. गुहा यांनी तयार केलेला आहे. (परिशिष्ट ५ पहा.) निरनिराळ्या वंशाच्या लोकांच्या संमिश्रणाने हिंदी लोकांचा समाज तयार झालेला आहे; या मुद्यावर हा नकाशा झगझगीत प्रकाश टाकतो. (१) लांब डोक्याचे व (२) आखूड डोक्याचे असे जे दोन निराळे मानववंश आहेत त्या मानववंशांच्या संमिश्रणाने हिंदी समाज तयार झालेला आहे; आणि लांब डोक्याचे हिंदी लोक हे हिंदुस्थानाच्या मधल्या प्रदेशात राहतात व आखूड डोक्याचे हिंदी लोक हे

हिंदुस्थानाच्या सरहद्दीजवळच्या प्रदेशात राहतात, असा डॉ. गुहा यांचा निष्कर्ष आहे.

हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागात ज्या डोक्याच्या कवट्या सापडलेल्या आहेत त्यावरून वरील निष्कर्षालाच बळकटी येते. या मुद्द्यावर डॉ. गुहा खालीलप्रमाणे विचारप्रदर्शन करतात–

"इतिहासपूर्व काळी जे प्रदेश होते त्यामध्ये जे मानवी शरीराचे अवशेष सापडलेले आहेत त्यांची वर्णने वर दिली आहेत. ही वर्णने अगदीच अल्पशी आहेत. सिंधू नदीच्या दरीतील प्रदेशात जे मानवी शरीराचे अवशेष सापडलेले आहेत त्यांची वर्णने भरपूर आहेत. या काळातील हिंदुस्थानाचा वांशिक इतिहास कसा हेता याची सर्वसाधारण रूपरेषा आकलन करण्यास सदर वर्णने आपणाला साहाय्य करतात. ख्रिस्त शकापूर्वीच्या चार हजार वर्षांपासून हिंदुस्थानाचा वायव्य प्रदेश लांब डोक्याच्या व अरूंद ठसठशीत नाकाच्या लोकांच्या ताब्यात असावा, असे वाटते. दुसऱ्या वंशाचेही लोक या लोकांबरोबर रहात असावेत. ते शरीराने मजबूत व लांब डोक्याचे होते, परंतु त्यांची मान उंच होती. ते लांबट चेहऱ्याचे व अरूंद नाकाचे होते. तथापि त्यांचे अरुंद नाक जितके झपकन डोळ्यात भरत असे, तितके त्यांचे लांबट तोंड डोळ्यात भरत नसे.

लोकांच्या वंशाचा तिसरा प्रकारही हिंदुस्थानात अस्तित्वात होता. या प्रकारातील लोकांची डोकी जास्त रुंद होती. त्यांच्यात आणि आर्मेनियन प्रकारचे लोक यांच्यात पुष्कळ बाबतीत साम्य होते. या प्रकारचे लोक बहुधा बऱ्याच पुढील काळात वावरत असावेत. या लोकांच्या डोक्यांच्या आकाराला जुळणाऱ्या डोक्यांच्या काही कवट्या हराप्पा या प्रदेशात सापडल्या. यावरून वरील गोष्टीला म्हणजे या प्रकारचे लोक बऱ्याच पुढील काळात वावरत असावेत हिला पुष्टी मिळते."

अल्पाईन आणि मेडिटरॅनियन (भूमध्ये समुद्र) या दोन वंशांचा संदर्भ घेऊन बोलावयाचे म्हटले तर कोणालाही असे म्हणता येईल की, हिंदी समाज दोन वंशांच्या मिश्रणाने तयार झालेला आहे. (१) मेडिटरॅनियन (भूमध्य समुद्र) किंवा लांब डोक्याच्या लोकांचा वंश आणि (२) अल्पाईन किंवा आखूड डोक्याच्या लोकांचा वंश हे ते दोन वंश होत.

मेडिटरॅनियन वंशाबद्दलच्या काही गोष्टी मान्य करण्यात आलेल्या आहेत. तो वंश आर्य भाषा बोलत होता, असे मान्य करण्यात आलेले आहे. या वंशाचे मूळस्थान युरोपमध्ये भूमध्य समुद्राच्या लगतच्या प्रदेशात होते व या मूळस्थानापासून तो वंश हिंदुस्थानात आला, असे मानण्यात आलेले आहे. या वंशाचे मूळस्थान लक्षात घेतले तर असे स्पष्ट दिसते की, हा वंश अल्पाईन वंशाच्या अगोदर हिंदुस्थानात आलेला असावा.

अल्पाईन वंशाबद्दलच्या अशाप्रकारच्या गोष्टी कोणत्या आहेत ते पहाणे जरूर आहे. या वंशाचे मूळस्थान कोणते होते ही एक गोष्ट व हा वंश कोणती मूळ भाषा बोलत होता ही दुसरी गोष्ट, पडताळून पहाणे जरूर आहे. या वंशाचे मूळस्थान आशियात–हिमालयाच्या कोणत्यातरी भागात होते, असे प्रो. रिप्ले यांचे मत आहे. या मुद्द्याला त्यांनी जी संयुक्तिक कारणे दिलेली आहेत ती येथे उद्धृत करणे इष्ट आहे. प्रो. रिप्ले म्हणतात–

''पूर्वेकडून जे लोक आले ते स्वारी करण्याच्या उद्देशाने आले नाहीत, तर स्थलांतर व देशांतर करण्याच्या उद्देशाने ते लोक हळूहळू पूर्वेकडून येऊन निर्वासित प्रदेशात वसाहती तयार करून स्थायिक झाले. पूर्वेकडून आलेल्या लोकांचा देशांतराचा हा जो क्रम एकसारखा चालू होता तो पुढे आशियामधून ज्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी एकसारख्या येत राहिल्या त्याला वाट करून देणारा होता, असे विधान करण्याचा आपणाला काय हक्क आहे? त्या खंडात, विशेषतः पामीरचा प्रदेश, पूर्व हिमालयाचे उंचवट्याचे प्रदेश यात राहणाऱ्या लोकांबद्दल आपणाला जी माहिती आहे तिच्या आधारावर आपणाला वरील प्रकारचे विधान करणे शक्य नाही. हा प्रदेश म्हणजे 'जगाचे छप्पर' आहे. आर्य संस्कृतीचे मूळ घर हाच प्रदेश होय असे मॅक्स मुल्लर आणि पूर्वीचे भाषाकोविद यांनी ठरविलेले होते. या प्रदेशातील मानवी आकृती आणि युरोपात आढळणारी आदर्शमय मानवी आकृती – की जी अल्पाईन किंवा सेल्टिक या नावाने ओळखली जाते – या दोन्ही आकृत्या अगदी एका सांच्यातून काढलेल्या आहेत की काय, इतक्या त्या एकस्वरूपी आहेत. डॉ. उज्फाल्वी टोपीनार्ड आणि इतर विद्वान लोक यांनी या बाबतीत संशोधन करून असे दाखविले आहे की, या मानवी आकृतीचे विशिष्ट गुणावगुण या प्रदेशात राहणाऱ्या लोकांमध्ये उठावदारपणे दिसून येतात. गाल्चास, डोंगराळ प्रदेशात राहणारे ताड्जिक्स आणि त्यांचे भाऊबंद हे करड्या डोळ्यांचे, काळ्या केसांचे, बांध्याने धष्टपुष्ट असे आहेत; व त्यांच्या डोक्यांचा आकार म्हणजे डोक्याच्या लांबीपेक्षा रुंदी जास्त, अशा स्वरूपाचे लोक या प्रदेशापासून पश्चिमेकडील प्रदेशावर म्हणजे आशिया, मायनर आणि युरोपातसुद्धा पसरलेले आढळतात. पश्चिम आशियातील बऱ्याच मोठ्या प्रदेशात आदर्शमय अल्पाईन प्रकारचे लोक रहातात ही गोष्ट जेव्हा विद्वानांच्या लक्षात आली तेव्हा या प्रकारच्या लोकांतील गुणावगुणांबद्दलची त्यांची कल्पना ठाम ठरली. टॅपीनर यांचे असे मत आहे की, हे लोक आशियातून येऊन तेथे राहिले. ही गोष्ट सिद्ध करण्यासारखी आहे. परंतु केवळ या प्रदेशातील लोकांतील गुणावगुण जुळतात यावरून हे लोक आशियातून येऊन येथे राहिले असे समजणे बरोबर नाही. परंतु यावरून आपणाला असे खचित म्हणता येईल की, रुंद डोक्याच्या लोकांचा प्रकार पूर्वेकडे उत्पन्न झाला. या बाबतीत जी काही माहिती उपलब्ध झालेली आहे तिच्यावरून असे, भीत का होईना, अनुमान काढावयास हरकत नाही की, मानववंशाच्या शास्त्राला भरपूर माहिती पुरविणारी खाण म्हणजे पूर्वेकडेच आहे. ही खाण पश्चिमेकडे मिळत नाही, कारण या प्रकारचा मानववंश अटलांटिक समुद्राच्या किनाऱ्याजवळील प्रदेशातून पाहण्यात येत नाही. आशिया खंडात जे लक्षावधी लोक राहतात, त्यांच्या डोक्याचा आकार आणि अल्पाईन प्रकारच्या लोकांच्या डोक्याचा आकार यांच्यात विशेष साधर्म्य आहे. केस, रंग, बांधा वगैरे बाबतीतही या दोन्ही प्रकारच्या लोकांचे साम्य आहे. या परिस्थितीमुळे आपण मानववंशशास्त्राच्या दृष्टीने या लोकांच्या बाबतीत कोणता निष्कर्ष काढावा याचे आपणाला गूढ पडते. भूमध्य समुद्रात राहणाऱ्या वंशातील लोकांचे डोके लांबट आणि त्यांचे केस काळेभोर होते. यावरू पूर्वी आपण असा निष्कर्ष काढला होता की, या वंशाचे मूळ

आफ्रिकेतील निग्रो लोकांत असावे. हा निष्कर्ष जसा आता चुकीचा वाटतो तसाच आपण अल्पाईन वंशाचे लोक व आशियातील राहणारे लोका यांच्यातील साधर्म्य स्थळे पाहून त्यांच्या बाबतीत काही निष्कर्ष काढला तर तो चुकीचा ठरण्याचा संभव आहे. या सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर आपणाला असे छातीठोकपणे सांगता येते की, अल्पाईन वंशाचे मूळस्थान पूर्वेकडे होते आणि मेडिटरॅनियन (भूमध्य समुद्र) प्रकारच्या लोकांचे मूळस्थान दक्षिणेकडे होते.

अल्पाईन वंशाची मूळ भाषा कोणती होती आणि आर्य भाषा युरोपात प्रथम कोणी सुरू केली-नॉडिक लोकांनी (अगदी खऱ्या हाडामासांचे इन्डो-जर्मन लोक) का अल्पाईन लोकांनी, याबद्दल तज्ज्ञ लोकांत थोडासा वाद उत्पन्न झालेला आहे. परंतु अल्पाईन लोकांची मूळभाषा आर्य भाषा होती याबद्दल वाद नाही आणि म्हणून भाषेच्या दृष्टीने पाहिले तर अल्पाईन लोक हे आर्य या पदवीला पात्र ठरतात.

## १०

हिंदुस्थानात दोन आर्य वंश अस्तित्वात होते, असे ऋग्वेदावरून दिसून येते. वरील भागात जे मुद्दे दिलेले आहेत त्यावरून हेच दिसून येते की, मानववंश शोधकशास्त्राच्या दृष्टीने मानवी डोके व त्याचे अवयव यांचे मोजमाप करण्याचे शास्त्र व इतिहास ही दोन्ही वरील सिद्धांताला-हिंदुस्थानात दोन आर्य वंश होते याला – बळकट पुष्टी देतात. ही परिस्थिती लक्षात घेतली तर युरोपियन ग्रंथकारांचा सिद्धांत आणि ऋग्वेदातील पुरावे यांच्यात एकमत नही, हे कोणालाही मान्य करावे लागेल. युरोपियन ग्रंथकारांचा सिद्धांत म्हणतो की, हिंदुस्थानात एक आर्य वंश होता आणि ऋग्वेद म्हणतो की, दोन आर्य वंश होते. याप्रमाणे एका महत्त्वाच्या बाबातीत युरेपियन ग्रंथकारांचा सिद्धांत आणि ऋग्वेद यांच्यात दुमत होते. या बाबतीत ऋग्वेद हाच जास्त प्रमाणभूत धरला पाहिजे; आणि त्याच्याशी न जुळणारा युरोपियन ग्रंथकारांचा सिद्धांत कुचकामाचा म्हणून त्याज्य मानला पाहिजे, याशिवाय दुसरा मार्ग नाही.

युरोपियन ग्रंथकारांचा सिद्धांत आणि ऋग्वेद यांचे आर्यांचे वंश एक होते की दोन होते, याबद्दल जो मतभेद आहे त्यावरून आर्यांनी हिंदुस्थानावर स्वारी करून हिंदुस्थान जिंकला या युरोपियन ग्रंथकारांच्या सिद्धांतातील मुद्द्यासंबंधीही मतभेद साहजिकच होणार. दोन आर्य वंशापैकी कोणता आर्यवंश प्रथम हिंदुस्थान आला याची आपणाला माहिती नाही. पण तो वंश जर अल्पान वंश धरला तर त्याचे मूळस्थान हिमालयाच्या असपास धरले जाते आणि म्हणून हा वंश हिंदुस्थानाच्या बाहेरून स्वारी करण्यास आला असा सिद्धांत मांडण्यास मुळीच वाव रहात नाही. आर्यांनी हिंदुस्थानातील मूळ रहिवाशांना जिंकले, हा सिद्धांत जखरी खरा धरला तरी ती बाब युरोपियन ग्रंथकार समजतात तितकी सोपी नाही. दास व दस्यू हे वांशिक दृष्टीने आर्यांपासून वेगळे होते ही गोष्ट गृहीत धरल्यानंतर युरोपियन ग्रंथकारांनी असे दाखविणे जरूर होते की, बाहेरून आलेल्या आर्यांनी हिंदुस्थानातील दास

व दस्यू यांना तर जिंकलेच, पण दुसरे जे आर्य हिंदुस्थानात होते त्यांनाही जिंकले. पण ही वस्तुस्थिती त्यांनी दर्शविलेली नाही. त्याचप्रमाणे, आर्यांनी जर दास व दस्यू यांना जिंकले असेल तर ते कोणत्या आर्यांनी (दोन आर्य वंशापैकी) हे युरोपियन ग्रंथकारांनी स्पष्ट सांगावयस पाहिजे होते.

इण्डो-जर्मन वंशाचे लोक हे फार प्राचीन काळच्या आर्यांचे वंशज आहेत व पहिल्यात जे सद्गुण सध्या दृग्गोचर होतात तेच दुसऱ्यात असले पाहिजेत, अशी कल्पना करून घेऊन युरोपियन ग्रंथकारांनी पूर्वकाळच्या आर्यांच्याबद्दल ज्या अनेक कल्पना बांधलेल्या होत्या, त्यांना अनुरूप दिसणाऱ्या गोष्टी तेवढ्या त्यांनी शोधून काढल्या व याच गोष्टी खऱ्या होत असे गृहीत धरून त्यांनी त्यावर सांगोपांग विचार केला नाही. यामुळे त्यांना वरील गोष्टींच्या आधारावर आपला सिद्धांत कसाबसा उभारावा लागला. या सिद्धांताचा पाया कच्चा आहे हे उघड आहे. म्हणून तो सिद्धांतही कच्चा आहे हे स्पष्ट आहे. काही गोष्टी निवडून काढून त्या गोष्टी खऱ्या होत असे गृहीत धरून त्या गोष्टींच्या पायावर जो सिद्धांत आहे. अशा नाजूक आणि नश्वर, ठिसूळ पायावर उभारलेला आपला सिद्धांत युरोपियन ग्रंथकारांनी गाढे विद्वान लोकांच्या मान्यतेसाठी उभारावा आणि तो सिद्धांत इतके दिवस टिकाव धरून राहावा ही गोष्ट अत्यंत आश्चर्याची समजली पाहिजे. या प्रकरणात ज्या नव्या गोष्टींवर चर्चा करण्यात आलेली आहे त्या गोष्टींपुढे या सिद्धांताचा मुळीच टिकाव लागत नाही. म्हणून हा सिद्धांत अडगळीत फेकून द्यावा हेच बरे.

OOO

# शूद्र आणि दास

युरोपियन ग्रंथकरांनी आर्यांबद्दल जो सिद्धांत मांडलेला आहे, तो कसा असमर्थनीय आहे हे मागे दाखविलेले आहे. त्या सिद्धाताच्या एका भागाचा अजून आपण विचार केलेला नाही. शूद्र कोणाला म्हणावे, हा तो भाग होय. श्री. ए.सी. दास (Rig Vedic Culture, p. 133) म्हणतात -

''दास व दस्यू हे जंगली लोक तरी होते किंवा अनार्य लोक तरी होते. त्यापैकी जे युद्धात पकडले गेले त्यांच्यावर गुलामगिरी लादण्यात आली आणि हे गुलाम लोक म्हणजे शूद्र लोक होते.''

श्री. काणे (धर्मशास्त्र, II (1), p. 33) हे एक वैदिक वाङ्मयाचे निष्णात पंडित आहेत. युरोपियन ग्रंथकारांनी मांडलेल्या सिद्धांताला ते उचलून धरतात. शूद्र कोणाला म्हणावे, याबाबत त्यांचे मत खालीलप्रमाणे आहे.

''अलीकडच्या वैदिक वाङ्मयात 'दास' हा शब्द शेतीवर काम करणारा किंवा गुलाम या अर्थांनी वापरलेला आढळतो. यावरून असे अनुमान काढता येते की ज्या दासांच्या टोळ्या आर्यांच्या टोळ्यांशी झगडत होत्या असे जे ऋग्वेदात वर्णन आलेले आहे त्या टोळ्या क्रमाक्रमाने पराजित होत गेल्या आणि त्यांना आर्यांची सेवाचाकरी करणे भाग पडले. ब्राह्मण लोकांचे आमरण दास्यत्व करण्यासाठी परमेश्वराने शूद्राला जन्माला घातले असे मनुस्मृतीत (८-४१३) म्हटलेले आहे. तैत्तिरीय संहिता, तैत्तिरीय ब्राह्मण आणि इतर ब्राह्मण ग्रंथ यावरून आपणाला असे आढळून येते की, स्मृतींनी शूद्रांना जे स्थान दिलेले आहे, तसाच प्रकारचे स्थान शूद्रांना सदर ब्राह्मण ग्रंथांनी दिलेले आहे. म्हणून दास किंवा दस्यू यांना प्रथम आर्यांनी पादाक्रांत केले व त्यानंतर दास व दस्यू यांचे हळूहळू शूद्रात रूपांतर होत गेले असे अनुमान काढणे संयुक्तिक होईल.''

या मतावरून असे दिसते की, शूद्र हे दास व दस्यू होत आणि शूद्र हे हिंदुस्थानचे मूळचे रहिवाशी होत व ते अगदी वन्यावस्थेत राहात होते व त्यांची संस्कृती अगदी रानटी होती. आता या मुद्यासंबंधी आपण विचार केला पाहिजे.

पहिला मुद्दा अलग नाही. त्यात दुसरा एक मुद्दा अंतर्भूत झालेला आहे. या संयुक्त मुद्यातील एक भाग असा आहे की, दास व दस्यू हे एकाच प्रकारचे लोक होत. त्याचा दुसरा भाग असा आहे की, दास व दस्यू हे आणि शूद्र हे एकाच प्रकारचे लोक होत.

दास व दस्यू हे एकच लोक होत, म्हणजे एकाच प्रकारचे लोक होत असे म्हणणे ठीक आहे; पण त्याची सत्यता संशयास्पद आहे. दास व दस्यू हे लोक एकाच प्रकारचे होत

अशा अर्थाने ऋग्वेदात पुष्कळ संदर्भ आढळतात. पण ते सारे संदर्भ या बाबतीत निर्णयात्मक स्वरूपाचे नाहीत. काही काही ठिकाणी ऋग्वेदात दास व दस्यू हे शब्द अशा अर्थाने वापरलेले आहेत की जणू काही त्यांच्यात भेद नाही. शाबर, शुष्न, वृत्र आणि पिप्रु यांना ऋग्वेदात दास व दस्यू असे म्हटलेले आहे. दास व दस्यू हे दोघेही इंद्र आणि देव आणि विशेषतः अश्विन यांचे शत्रू होत, असे ऋग्वेदात त्यांचे वर्णन केलेले आहे. दास व दस्यू या दोघांचीही शहरे इंद्र व देव यांनी जमीनदोस्त केली असे ऋग्वेदात वर्णन केलेले आहे. 'दास व दस्यू यांच्या पराभवाचे फळ एकच होते असे ऋग्वेदात वर्णन केलेले आहे. ते फळ म्हणजे पाण्याची मुक्तता आणि प्रकाशाचा उदय. दभीती यांची मुक्तता कशी झाली, याचे ऋग्वेदात वर्णन आलेले आहे. या प्रसंगी दास व दस्यू या दोघांचाही निर्देश केलेला आहे. दभीतीची मुक्तता दासांपासून केली असे एके ठिकाणी वर्णन केलेले आहे; आणि त्याची मुक्तता दस्यूपासून केली असे दुसऱ्या ठिकाणी म्हटलेले आहे.

वर दाखविलेल्या ऋग्वेदातील संदर्भावरून असे दिसते की, दास व दस्यू हे एकच होत– निरनिराळे लोक नव्हते. ऋग्वेदात जे इतर संदर्भ आहेत त्यावरून असे वाटते की, दास व दस्यू हे निरनिराळे लोक होते. दास यांचा ऋग्वेदात निराळ्या भावनेने ५४ ठिकाणी उल्लेख केलेला आहे, त्याचप्रमाणे दस्यू यांचा निराळ्या भावनेने ७८ ठिकाणी उल्लेख आहे. दास व दस्यू हे वेगवेगळे लोक नव्हते असे म्हटले, तर त्यांचे ऋग्वेदात अनेक ठिकाणी वेगळ्या भावनेने उल्लेख का केलेले होते? यावरून अंदाज बांधला येतो की, दास व दस्यू हे निरनिराळ्या दोन जमातींचे लोक होते.

दास व दस्यू हे आणि शूद्र हे एकच होते, असा जो संयुक्त मुद्याचा दुसरा भाग आहे तो वरील विवेचन लक्षात घेतले तर अगदी बिनबुडाचा भ्रम दिसतो.

शूद्र लोक म्हणजे दास व दस्यू हे लोक होत असे म्हणणारे लोक आपल्या मताला पुष्टी मिळविण्यासाठी शूद्र या शब्दाची व्युत्पत्ती स्पष्ट करून पुढे मांडतात. त्यांचे म्हणणे असे की, शूद्र हा शब्द शुक् म्हणजे दुःख आणि द्रु म्हणजे व्याकूल होणे या शब्दापासून झालेला आहे. शूद्र या शब्दाचा अर्थ दुःखाने व्याकुळ झालेला असा होतो. शूद्र या शब्दाची अशाप्रकारे जे व्युत्पत्ती लावतात ते आपल्या मताला पोषक म्हणून वेदांत सूत्रात (१–३–३४) जनश्रुतीसंबंधी सांगितलेल्या कथेचा आधार घेतात. ही कथा अशी आहे की, हंस पक्षी आपणासंबंधी अत्यंत तिरस्कारपूर्वक बोलत आहेत हे ऐकून जनश्रुती दुःखाने व्याकुळ झाला. (काणे यांच्या धर्मसूत्र २ (१), पा. १५५ या ग्रंथातील संदर्भ) विष्णुपुराणात तशाच प्रकारची व्युत्पत्ती दिलेली आहे. (Muir, Vol. I, p.77)

वर उल्लेखिलेली विधाने कितपत समर्थनीय आहेत? शूद्र हा शब्द विशेषनाम म्हणून समजला जात नाही, तर तो दुसऱ्या धातूपासून झालेला शब्द आहे, असे समजणे म्हणजे भाषेचे दारिद्र्य कबूल करणे होय. आपल्या मनाला पोषक अशा शब्दांच्या खोट्या व्युत्पत्ती तयार करणे ही एक गोठी कला आहे आणि या कलेत ब्राह्मण ग्रंथकारांचा जगात कोणीही हात धरू शकणार नाही. संस्कृत भाषेत असा एकही शब्द मिळणार नाही की, ज्याच्याबद्दल

ब्राह्मण ग्रंथकार व्युत्पत्ती तयार करून ठेवणार नाहीत. उपनिषद या शब्दाच्या निरनिराळ्या ब्राह्मण ग्रंथकारांनी निरनिराळ्या व्युत्पत्ती सांगितलेल्या आहेत. यासंबंधी प्रो. मॅक्स मुल्लर यानी खालीलप्रमाणे विचार प्रदर्शित केलेले आहेत. (Upnishads-Introduction pp. 064-71)

''ब्राह्मण ग्रंथकारांनी या बाबतीतील स्पष्टीकरणे जाणूनबुजून इतकी उलटी पालटी मांडलेली आहेत की, त्यांच्यातील एकमत कोणत्या स्पष्टीकरणाबद्दल आहे, हे समजून घेणे कठीण झालेले आहे या बाबतीत आपण ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, अर्धवट शिकलेल्या लोकांची प्रवृत्ती अशी असते की, ज्या शब्दाचा अर्थ जास्त प्रचारात आहे त्या अर्थाला जुळणारी त्या शब्दाची व्युत्पत्ती ते मान्य करतात. अशाप्रकारे तयार केलेल्या व्युत्पत्ती म्हणजे शब्दांची ओढाताण करून विशिष्ट अर्थाशी जुळणारे त्याचे अर्थ लावणे. अशी रीतीने व्युत्पत्ती तयार केलेल्या आहेत.''

वेदांतसूत्र आणि वायू, विष्णुपुराण यामध्ये शूद्र शब्दाची व्युत्पत्ती सांगण्याचा जो प्रयत्न केलेला आहे तोही प्रो. मॅक्स मुल्लर यांनी सांगितलेल्या तऱ्हेचा आहे. शूद्र हा शब्द धातुसाधित आहे व त्याचा अर्थ 'दुःखाने व्याकुळ झालेले लोक' असा होतो, असा जो या ग्रंथांनी प्रयत्न केलेला आहे तो बालिश व निरर्थक आहे, एवढेच नव्हे तर तो त्याज्य आहे.

ब्राह्मण ग्रंथकार म्हणतात की, शूद्र हा शब्द धातुसाधित आहे. याचा उलट असे म्हणता येईल की, शूद्र हा शब्द नाही, तर तो स्वतंत्र आहे; आणि तो शब्द एका जमातीचे किंवा टोळीचे विशेषनाम म्हणून वापरलेला आहे. याला आपणाजवळ प्रत्यक्ष पुरावा आहे. सिकंदरने हिंदुस्थानावर स्वारी केली तिचा इतिहास इतिहासकारांनी लिहिलेला आहे. त्या स्वारीच्या वेळी हिंदुस्थानात स्वतंत्र व स्वायत्त अशी लोकसत्ताक राज्ये अस्तित्वात होती व त्या राजांनी सिंकदरला टक्कर दिली, असे इतिहासकारांनी लिहिलेले आहे. ही लोकसत्ताक राज्ये निरनिराळ्या टोळ्यांची मिळून झालेली होती व प्रत्येक टोळीला निरनिराळे नाव होते. अशा लोकसत्ताक राज्यातील टोळीपैकी सोदरी या नावाने संबोधिली जाणारी एक टोळी होती. ती बरीच महत्त्वाची टोळी होती. सिकंदरबरोबर ज्या टोळ्यांनी युद्ध केले त्यापैकी सोदरी ही एक टोळी होती. इतर टोळ्यांप्रमाणे याही टोळीचा पाडाव सिकंदराने केला होता. सोदरी लोक म्हणजेच पूर्वीचे शूद्र लोक असा लॅसेन या ग्रंथकाराने आपला अभिप्राय व्यक्त केलेला आहे. पतंजलीने महाभाष्याच्या १-२-३ या श्लोकांत शूद्रांचा उल्लेख केलेला आहे. शूद्र व अभर हे एकच लोक होते असे पतंजलीने आपले मत व्यक्त केलेले आहे. महाभारतातील सभापर्वाच्या ३२ व्या अध्यायात शूद्र लोकांच्या प्रजासत्ताक राज्यासंबंधी उल्लेख आढळतो. विष्णुपुराण, मार्कंडेय पुराण आणि ब्रह्म पुराण यात असे म्हटलेले की, शूद्रांची टोळी ही अनेक टोळ्यांपैकी एक स्वतंत्र टोळी आहे आणि विंध्य पर्वताच्या उत्तरेकडील प्रदेशात ती टोळी राहात असे. (Tribes in Ancient India, by B. C. Law, p. 350)

## २

दास व दस्यू हे अनार्य लोक होते, हे दाखविण्यासाठी ते शुद्ध वांशिक अर्थाने वापरलेले आहेत काय? तसे जर असेल तर शूद्र हे हिंदुस्थानचे मूळ रहिवाशी होते हे सिद्ध करण्यास काही सूचक पुरावा आहे काय? या दोन प्रश्नांचा विचार करणे जरूर आहे. या प्रश्नांचे उत्तर होकारार्थी दिले तर दास व दस्यू आणि शूद्र हे एकच लोक होते असे म्हणता येणे शक्य नाही.

दस्यू हा शब्द अनार्य लोक यांना उद्देशून वांशिक अर्थाने वापरलेला आहे हे दाखविण्यास पुरावा नाही. उलटअंशी आर्य धर्माचे रीतिरिवाज न पाळणारे लोक अशा अर्थाने दस्यू हा शब्द वापरलेला आहे, याला भक्कम पुरावा नाही. या बाबतीत महाभारताच्या शांतिपर्वातील ६५ व्या अध्यायातील २३ वा श्लोक विचारात घ्यावा. तो श्लोक असा-

*दृश्यन्ते मानुषे लोके सर्ववर्णेषु दस्यवः ।*
*लिंगान्तरे वर्तमाना आश्रमेषु चतुर्ष्वपि ।।*

**अर्थ** – ''सर्व वर्णात आणि सर्व आश्रमात दस्यू लोकांचे अस्तित्व आढळून येते.''

दस्यू हा शब्द अनार्य लोकांची टोळी दर्शविणारा शब्द म्हणून वापरण्यात येत नव्हता. हे महाभारतातील वरील उताऱ्यावरून स्पष्ट दिसून येते. (हा उतारा म्हणजे एक निर्णायक पुरावा होय. याबद्दल शंका घेण्यास मुळीच वाव राहात नाही.)

दस्यू हा शब्द कसा उत्पन्न झाला हे सांगणे कठीण आहे. या बाबतीत असे मत प्रचलित आहे की हिंदी-आर्य लोकांनी दस्यू हा शब्द हिंदी-इराणी लोकांना शिवी म्हणून वापरलेला होता. या मतात अतिशयोक्ती किंवा ओढाताण दिसत नाही. हिंदी-आर्य व हिंदी-इराणी या लोकांत झगडे होते असे इतिहास सांगतो. यावरून हे शक्य आहे की, हिंदी-आर्य लोकांनी आपल्या शत्रूंना तिरस्कारपूर्वक रीतीने संबोधण्यासाठी दस्यू हा शब्द उत्पन्न केला असेल. ही विचारसरणी खरी मानली तर दस्यू हे हिंदुस्थानचे रहिवाशी होत असे म्हणता येणार नाही.

दास या शब्दाबद्दल विचार केला तर असा प्रश्न प्रथम उपस्थित होतो की, झेंद् अवेस्ता यात वर्णन केलेला अझही-दाहक आणि दास या शब्दांमध्ये काही संबंध आहे काय? अझही – दाहक हा संमिश्र शब्द अझही व दाहक या शब्दांनी मिळून झालेला आहे. अझही म्हणजे साप, राक्षस. दाहक हा शब्द दाह या धातूपासून झालेला आहे. दाह म्हणजे चावणे, इजा करणे, अझही-दाहक याचा अर्थ चावणारा राक्षस असा होतो. झोहाक या नावाने हिंदी-इराणी लोकांत सामान्यपणे संबोधला जाणारा जो माणूस आहे त्याला अझही-दाहक असे योग्य नाव देण्यात आलेले आहे. झोहाक याचा बाष्ट वाङ्मयात पुष्कळ वेळा उल्लेख केलेला आहे. हा राक्षस बबिलोनमध्ये राहात होता व तेथे त्याने राजवाडा बांधलेला होता असे मानले जाते. या जगात पावित्र्याचे जे राज्य चाललेले आहे त्याचा विनाश करण्यासाठी राक्षसांचा प्रमुख अंग्र मायन्यू याने अझही-दाहक याला उत्पन्न केले. हिंदी

इराणी लोकांचा प्रसिद्ध राजा यिमा याच्याबरोबर अझही-दाहक याने युद्ध केले व त्यात त्याने यिमाचा पाडाव करून त्याला युद्धात ठार मारले.

क्षाइता म्हणजे चकाकणारा, तेजस्वी किंवा राज्य करणारा या अर्थाने यिमाचा अवेस्तामध्ये फार वेळा उल्लेख केलेला आहे. क्षी या धातूचे दोन अर्थ आहेत-चकाकणे, तेजस्वी होणे किंवा राज्य करणे. हवन्थ्वा असे तिसरे विशेषण यिमाला अवेस्ताने दिलेले फार आढळते. हवन्थ्वा म्हणजे मेंढ्यांचा चांगला कळप बाळगणे. हा अवेस्तातील यिमा क्षाइता पुढील पर्शियन भाषेत जमशिद् झाला. अशा दंतकथा प्रचलित आहेत की, जमशिद् राजा विवध्वंताचा मुलगा होता. तो इराणच्या इतिहासाचा नायक होता. पर्शियन संस्कृतीचा तो संस्थापक होता. तो पेशदियाद्यान या घराण्याचा राजा होता. यास्न हा ९ व ५ कोइमा याशी यात म्हटलेले आहे की, हस्म (संस्कृत सस्म) याचा बेधडकपणे चक्काचूर करणारा या जगातील पहिला माणूस 'विवशस' हा होय. या कार्याबद्दल विवशसला वर मिळाला. त्या वरान्वये त्याला मुलगा प्राप्त झाला. तो मुलगा म्हणजे तेजस्वी व मेंढ्यांचा चांगला कळप बाळगणारा, मानवात श्रेष्ठ, पराक्रमी व सूर्यासारखा प्रकाशमान असलेला,ज्याने आपल्या कारकीर्दीत सरदार व जनावरे यांना अमर केले व पाण्याचे प्रवाह बारामास अखंडपणे वहात ठेवले व वृक्षांना अमर केले. तो राजा यिमा त्याच्याजवळ शाश्वत आध्यात्मिक तेज होते. कीर्तिवंत यिमाच्या कारकीर्दीत कडक थंडी किंवा कडक उन्हाळा, वृद्धत्व, मृत्यू आणि तिरस्कार ही कधीच अस्तित्वात आली नाहीत.

झेंद् अवेस्तातील दाहक व ऋग्वेदातील दास हे एकच होते की काय? त्यांच्या नावात जे साम्य आहे त्याला महत्त्व द्यावयाचे म्हटले तर ते शब्द म्हणजे एकाच माणसाची दोन नावे होत, हे उघड होते. संस्कृतमधील दास हा शब्द अवेस्तातील दाह हा शब्द होऊ शकतो. याचे कारण असे की, संस्कृतातील 'स' याचे रूपांतर 'ह' असे सहजपणे होऊ शकेल. या एका पुराव्यावरून आपण असा निष्कर्ष काढला की, ऋग्वेदातील दास व झेंद् अवेस्तातील दाहक हे एकच लोक होत, तर तो निष्कर्ष केवळ त्या एका पुराव्याच्या आधारामुळे एक प्रकारची कपोलकल्पित कल्पना ठरेल. या पुराव्याशिवाय या बाबतीत दुसरा पुरावा आहे. हा पुरावा इतका सबळ व भरभक्कम आहे की त्यावरून दास व दाहक हे लोक एकच होते असा निष्कर्ष काढावयास मागेपुढे पाहण्याची मुळीच जरुरी वाटत नाही. यास्न हा ९ मध्ये अझही-दाहक याचे असे वर्णन केलेले आहे की, त्याला तीन डोकी व सहा डोळे होते अझही-दाहक याचे असे वर्णन केलेले आहे की, याचे अवेस्तातील वर्णन ऋग्वेदातील दास याच्या वर्णनाशी तंतोतंत जुळते. या दोघांचे शारीरिक वर्णन इतके सारखे असावे हे आश्चर्यकारक आहे. (दास व दाहक हे एकच लोक होत, असा सिद्धांत महाराष्ट्र ज्ञानकोष, भाग ३, पा. ५३ वर सप्रमाण मांडलेला आहे. ही माहिती मला फार उपयोगी पडली, याबद्दल मी त्या ग्रंथाचा ऋणी आहे.) ऋग्वेदातील दास व अवेस्तातील दाहक हे एकच लोक होते, ही विचारसरणी जर ग्राह्य धरली तर हे उघड आहे की, दास हे हिंदुस्थानातील मूळचे रहिवाशी नव्हेत.

शूद्र वन्यावस्थेत राहाणारे हिंस्र लोक होते काय? दास व दस्यू हे वन्यावस्थेत राहणारे हिंस्र लोक नव्हेत. ते आर्यांइतके सुसंस्कृत लोक होते. एवढेच नव्हे तर आर्यांपेक्षाही ते प्रबळ व पराक्रमी होते या मुद्याला ऋग्वेदातून पुरावा मिळतो. त्या मुद्याला सुरेख गोषवारा श्री. अय्यंगार यांनी खालीलप्रमाणे दिलेला आहे.

"दस्यू शहरात रहात असत. (ऋग्वेद, १-५३-८; १-१००-३) ते निरनिराळ्या राजांचे प्रजाजन होते. त्या राजांपैकी बऱ्याच राजांची नावे सांगण्यात आलेली आहेत. दस्यूंजवळ साठवून ठेवलेली संपत्ती असे (ऋग्वेद, ७-४०-६). साठवून ठेवलेली संपत्ती म्हणजे गाई; घोडे आणि रथ (ऋग्वेद, २-१५-४). ही संपत्ती जरी शंभर वेशी असलेल्या शहरात ठेवलेली होती, (ऋग्वेद १०-९९-३) तरी इंद्राने ती लुटली व त्याचे भक्त जे आर्य यांनी ती त्याने दिली (ऋग्वेद, १-३३-४). दस्यू श्रीमंत होते (ऋग्वेद, १-३३-४), आणि सपाट जमिनीमध्ये आणि दऱ्याखोऱ्यात त्यांनी आपी मालमत्ता तयार करून ठेवली होती. (ऋग्वेद, १०-६९-६). त्यांच्या अंगावर सोन्याचे व जवाहिराचे दागिने असत, (ऋग्वेद, १-३३-८) पुष्कळ किल्ले होते, (ऋग्वेद १-३३-१३, ७-१७-१४). दस्यू राक्षस आणि आर्य देव हे अंगावर सोन्याचे व चांदीचे दागिने घालून रहात असत; ते लोखंडी किल्ल्यात रहात असत. (S.S.S.; ६-२३) (अथर्ववेद, ५-२८-९; ऋग्वेद, २-२०-८). दिवादस हा इंद्राचा भक्त होता. त्याचा ऋचांत वारंवार उल्लेख केलेला आहे. इंद्राने त्याच्यासाठी दस्यूंचे शंभर दगडी किल्ले जिंकून घेतले. (ऋग्वेद, ४-३०-२०) आर्य अग्नीची पूजा करीत असत. दस्यू अग्नीची पूजा करीत असत. अग्नी आर्यांच्या तर्फे प्रदीप्तमान होऊन दस्यूंची शहरे जाळीत असे (ऋग्वेद, ७-५-३). आर्यांची गुरे चोरून आणून दस्यूंनी त्यांना दगडी तुरुंगात (गोठ्यात) ठेवले होते. बृहस्पतीने तो तुरुंग फोडला (ऋग्वेद, ४-६७-३). दस्यूंजवळ रथ होते व त्यांचा ते आर्यांप्रमाणे युद्धात उपयोग करीत असत. आर्यांजवळ जी शस्त्रे होती तीच शस्त्रे दस्यूंजवळ होती. (ऋग्वेद, ८-२४-२७; ३-३०-५, २-१५-४)."

दास व दस्यू आणि शूद्र हे एकच लोक होते असे म्हणणे म्हणजे कल्पनेची भरारी आहे. ते म्हणणे म्हणजे कल्पनेची वावडी वाऱ्यावर सोडून देणे होय. या म्हणण्याला आतापर्यंत मान्यता दिली गेली याचे कारण हे की, ते म्हणणे आदरणीय विद्वानांच्या तोंडातून बाहेर पडलेले होते. परंतु हे म्हणणे सिद्ध करणारा पुरावा कोठेही मिळत नाही. दास हा शब्द ऋग्वेदात ५४ वेळा आणि दस्यू हा शब्द ७८ वेळा वापरलेला आहे; हे पूर्वी सांगितलेले दास व दस्यू हे एकच लोक होते, या भावनेने त्यांचा उल्लेख ऋग्वेदात काही ठिकाणी केलेला आहे. शूद्र हा शब्द ऋग्वेदात फक्त एकदाच वापरलेला आहे; आणि तो अशाप्रकारे वापरलेला आहे की, तो ज्या संदर्भाने वापरलेला आहे त्या संदर्भाशी दास व दस्यू या शब्दांचा काही संबंध नाही. वर जे विवेचन केलेले आहे ते लक्षात घेतले तर कोणता सुबुद्ध माणूस असे विधान करील की, शूद्र आणि दास व दस्यू हे एकच लोक होत या बाबतीत लक्षात

ठेवण्यासारखी दुसरी अशी गोष्ट आहे की, दास व दस्यू ही नावे पुढील वैदिक वाङ्मयातून अजिबात अदृश्य झाली. याचा अर्थ असा की, दास व दस्यू यांना आर्यांनी संपूर्णपणे आत्मसात करून टाकले. परंतु शूद्रांची गोष्ट काहीशी निराळी आहे. अगदी प्राचीन काळच्या वैदिक वाङ्मयात शूद्रांसंबंधी काहीच उल्लेख आढळत नाहीत. परंतु पुढील वैदिक वाङ्मयात शूद्रांसंबंधी भरपूर उल्लेख आढळतात. या सर्व पुराव्यांवरून हीच गोष्ट सिद्ध होते की, शूद्र लोक दास व दस्यू या लोकांहून निराळे लोक होते.

४

शूद्र अनार्य होते काय, या बाबतीत श्री. काणे म्हणतात, (Kane's Dharma Sutras, II (1) p. 35) -

"ब्राह्मण ग्रंथ त्याचप्रमाणे धर्मसूत्रे जेव्हा लिहिली गेली तेव्हा या ग्रंथांच्या लेखकांनी आर्य आणि शूद्र यांच्यात असलेला भेदभाव सतत नजरेपुढे ठेवलेला होता. ताड्य ब्राह्मणात लुटुपुटूच्या लढाईचे वर्णन केलेले आहे. त्यात असे म्हटलेले आहे की, 'शूद्र व आर्य हे कातड्यावर लढतात. त्यांची लढाई अशा बेताने चालते की तीत आर्यरंग यशस्वी होतो.' आपस्तंब धर्मसूत्र (१-१-३-४०-४१) म्हणते की, 'स्वतः भिक्षा मागून आणलेले अन्न ब्रह्मचारी जर खाऊ शकत नाही तर ते त्याने आर्याजवळ (त्याच्या उपयोगासाठी) ठेवावे किंवा त्याच्या गुरूचा जो दास शूद्र असेल त्याला ते अन्न त्याने द्यावे.' त्याचप्रमाणे, गौतम सूत्राने (१०-६९) शूद्राला 'अनार्य' हा शब्द वापरलेला आहे."

शूद्र व आर्य यांच्यात असलेला भेद किती कडक रीतीने पाळला जात होता याचे जास्त स्पष्टीकरण होणे जरूर आहे.

शूद्र हे अनार्य होते, असा जो पुरस्कार करण्यात येतो त्याला आधार म्हणून खालील पुरावे विशेष महत्त्वाचे आहेत–

अथर्ववेद, ४-२०-४ "हजार डोळ्यांचा देव हा लता माझ्या उजव्या हातात ठेवा; तिच्या सहाय्याने मी प्रत्येकाला पाहतो, शूद्राला तसेच आर्याला." कथक संहिता, ३४-५- "शूद्र व आर्य यांचा कातड्यासंबंधी तंटा होतो. देव व दैत्य (राक्षस) यांच्यात सूर्यासंबंधी तंटा उत्पन्न झाला. देवांनी लढून सूर्य मिळविला. शूद्रांशी तंटा करण्याचे आर्य वर्णाला यश मिळविण्यास भाग पडते व आर्य स्वतःला यशस्वी करतो. आर्य देवाच्या गाभाऱ्यात राहील, शूद्र देवाच्या गाभाऱ्याबाहेर राहील कातडी पांढरी, वर्तुळ, सूर्याच्या आकाराप्रमाणे राहील."

वाजसनेयी संहिता, २३, ३०-३१ – "जेव्हा हरिण शेतातील बाजरीचे पीक खाते तेव्हा शेताच्या धन्याला त्या हरिणाबद्दल प्रेमभाव वाटत नाही; जेव्हा शूद्र स्त्रीला आर्य पती असतो, तेव्हा या पतीला आपल्या पुढील सुखसमृद्धीची इच्छा रहात नाही.

जेव्हा हरिण शेतातील बाजरीचे पीक खाते तेव्हा शेताच्या धन्याला या हरिणाचा राग येतो. जेव्हा शूद्र माणूस आर्य स्त्रीचा पती होतो तेव्हा तो पती तिच्या भावी सुखसमृद्धीबद्दल आपली संमती देत नाही."

वरील श्लोकावरून हे स्पष्ट होते की, शूद्र व आर्य हे वेगवेगळे लोक होते व त्यांच्यात वैर होते. यावरून पर्यायाने असे सिद्ध होते की, शूद्र हे अनार्य होत. परंतु असा निष्कर्ष एकदम काढणे जरा घाईचे होईल. शूद्र अनार्य होते असा निष्कर्ष वरील श्लोकातील माहितीवरून काढण्यापूर्वी दोन गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. पहिली गोष्ट ही की, पूर्वी सांगितलेल्याप्रमाणे व ऋग्वेदात उपलब्ध असलेल्या पुराव्यावरून असे म्हटले पाहिजे की, अर्यांत दोन प्रकार आहेत – वैदिक आर्य व निर्वैदिक आर्य. ही गोष्ट लक्षात घेतली तर असे मान्य करावे लागेल की, एका प्रकारचे आर्य दुसऱ्या प्रकारच्या आर्यांबद्दल दुज्याभावाने आणि वैरभावाने बोलत असतील. हा मुद्दा लक्षात घेतला तर पुढची पायरी अशी होते की, शूद्र व आर्य यांच्यात जो वैरभाव वर्णन केलेला आहे त्यावरू शूद्र हे अनार्य होते असा निष्कर्ष काढता येत नाही. शूद्र हे दुसऱ्या प्रकारचे आर्य होते असे म्हणता येईल.

शूद्र हे अनार्य नव्हते, तर ते आर्य होते; परंतु त्यांची टोळी किंवा त्यांची जमात किंवा त्यांचा पंथही निराळा होता, असा निष्कर्ष काढणे शक्य आहे. या निष्कर्षाला पोषक अशी माहिती हिंदुधर्माच्या पवित्र वाङ्‌मयात मिळते. ती माहिती खालीलप्रमाणे आहे –

(१) अथर्ववेद, १९-३२-८ – ''हे दर्भा! (गवता!) मी ब्राह्मणांना, राजन्यांना (क्षात्रियांना), शूद्रांना, आर्यांना, जे जे आम्हाला आवडतात आणि जे जे पाहू शकतात त्या सर्वांना मी प्रिय होईल असे कर.''

(२) अथर्ववेद, १९-६२-१ – ''मी देवांमध्ये आवडता होईल असे कर. मी राजांमध्ये आवडता होईल असे कर. जो पाहतो, मग तो शूद्र असो वा आर्य असो, त्या प्रत्येकाला मी आवडेन असे कर.''

(३) वाजसनेयी संहिता, १८-४८ – ''(हे अग्नी!) आम्हाला ब्राह्मणांमध्ये तेज दे. आम्हाला राजांमध्ये तेज दे; आम्हाला वैश्यांमध्ये व शूद्रांमध्ये तेज दे. मला तेजात तेज मिळवून ते तेज दे.''

(४) वाजसनेयी संहिता, २०-१७ – ''आम्ही गावात, वनात, लोकसभेत जाणूनबुजून शूद्रांविरुद्ध किंवा आर्यांविरुद्ध कोणतेही पाप केले असेल, आमच्यापैकी एकाने (यज्ञ करणारा यजमान व त्याची पत्नी यापैकी) अतिथींच्या पाहुणचारात काही न्यून पाडून एखादे पाप केले असेल, तर त्या पापांचा तू विध्वंसक आहेस.''

(५) वाजसनेयी संहिता, २८-४८ ''लोक ब्राह्मण, राजन्य, शूद्र, आर्य आणि माझा स्वतःचा शत्रू यांना उद्देशून मी मंगलमय शब्द बोलत आहे, तरी मी देवांना आणि या जगात दक्षिणा वाटणाऱ्याला प्रिय होवो. माझी ही इच्छा पुरविली जावो. तो (माझा शत्रू) माझा अंकित आहे.''

वरील उताऱ्यांतील विधाने काय दर्शवितात? पहिल्या उताऱ्यातील विधान असे स्पष्ट दाखविते की, ब्राह्मण व आर्य यांच्यात भेद होता. ब्राह्मण अनार्य होते आणि म्हणता येईल काय? दुसऱ्या उताऱ्यातील विधाने असे दाखवितात की, शूद्रांचे प्रेम व सदिच्छा प्राप्त करून घेण्यासाठी लोक देवाची प्रार्थना करीत असत. शूद्र जर वन्यावस्थेत राहणारा हिंस्र

माणूस होता, तर मग लोक त्याचे प्रेम व सदिच्छा संपादन करण्यासाठी परमेश्वराची प्रार्थना करीत असत, असे म्हणणे तरी तर्काला पटणारे दिसते काय? वरील उताऱ्यातील विधाने खरी मानली तर असे म्हणता येते की, त्या विधानांवरून शूद्र अनार्य होते असे सिद्ध होत नाही.

सर्व धर्मसूत्रांत शूद्रांना अनार्य म्हटलेले आहे. वाजसनेयी संहितेत शूद्र स्त्रीला अत्यंत तिरस्कारपूर्वक रीतीने वागविलेले आहे. तथापि त्यावरून शूद्रांच्या परिस्थितीबद्दल फारसा बोध होत नाही. शूद्रांना तुच्छ लेखणारे जे पुरावे धर्मसूत्रांत आढळतात, त्यावरून शूद्र हे अनार्य होते असे सिद्ध करता येत नाही. याची दोन कारणे आहेत. पहिले कारण असे की सर्व धर्मसूत्रे आणि इतर धार्मिक ग्रंथ हे शूद्रांच्या शत्रूंनी लिहिले ही गोष्ट यापुढे सप्रमाण दाखविण्यात येईलच. म्हणून या ग्रंथांतील शूद्रांविरुद्ध असलेले मुद्दे यांना पुरावे म्हणून किंमत देता येत नाही. या ग्रंथांतील शूद्रांविरुद्ध असलेले मुद्दे हे खरोखर वस्तुस्थितीदर्शक म्हणून ग्रंथकारांनी मांडलेले होते, की खोट्यानाट्या गोष्टींचा मिलाफ करून ते मुद्दे त्यांनी मुद्दाम रचलेले होते, हे समजणे फार कठीण आहे. शूद्रांसंबंधी इतर ग्रंथांत ज्या गोष्टी लिहिण्यात आलेल्या आहेत त्यांच्याशी धर्मसूत्रांतील व संहितेतील गोष्टी मुळीच जुळत नाहीत हेही लक्षात ठेवण्यासारखे आहे.

धर्मसूत्रे म्हणतात की, शूद्रांना उपनयन विधीचा आणि पवित्र जानवे घालण्याचा अधिकार नाही. परंतु 'संस्कार गणपती' या ग्रंथात असा स्पष्ट उल्लेख आहे की शूद्रांना उपनयन विधीचा अधिकार आहे. (Max Muller-Ancient Sanskrit Literature (1860), p. 58)

धर्मसूत्रे म्हणतात की शूद्रांना वेदाध्ययन करण्याचा अधिकार नाही. परंतु छांदोग्य उपनिषदात (४-१-२) जनश्रुती या शूद्राची जी कथा सांगितलेली आहे तिच्यावरून असे दिसते की, शूद्रांना वेदाध्ययनाचा अधिकार होता. ती कथा म्हणजे अशी की, जनश्रुती शूद्राला रक्वै या आचार्याने वेद शिकविला, यापेक्षा प्रबळ पुरावा कवष ऐलूष याचा आहे. कवष ऐलूष हा शूद्र ऋषी होता. ऋग्वेदातील दहाव्या मंडळात ज्या ऋचा आहेत त्यातील बऱ्याचशा ऋचा कवष ऐलूष याने रचलेल्या आहेत. (Max Muller-Ancient Sanskrit Literature (1860), p. 58)

धर्मसूत्रे म्हणतात की, शूद्रांना वैदिकविधी व यज्ञ करता येत नाहीत. पूर्वमीमांसाचा कर्ता जैमिनी याने फार प्राचीन काळच्या एका गुरूचा उल्लेख केलेला आहे. तो गुरू म्हणजे बदरी. बदरीचे ग्रंथ काळाच्या उदरात गडप झालेत. जैमिनीने असे म्हटलेले आहे की, शूद्रांना वैदिक यज्ञ करण्याचा अधिकार आहे, या तत्त्वाचा बदरीने पुरस्कार केला. भारद्वाज स्रोत सूत्र (५-२८) म्हणते की, वैदिक यज्ञ करण्याला अवश्य असे जे तीन पवित्र अग्नी लागतात ते तिन्ही अग्नी पेटविण्याचा अधिकार शूद्रांना आहे, असे मान्य करणारा एक पंडितांचा पंथ आहे. त्याचप्रमाणे कात्यायन स्रोत सूत्र १-४-१६ यांच्या टीकाकाराने असे कबूल केलेले आहे की, शूद्रांना वैदिक विधी करण्याचे अधिकार आहेत, असा निष्कर्ष

त्यांच्यावरून काढता येईल असे कित्येके भाग वेदात आहेत.

धर्मसूत्रे म्हणतात की, शूद्रांना पवित्र सोमरस पिण्याचा अधिकार नाही. परंतु शूद्रांना परमेश्वरी पेय पिण्याचा अधिकार आहे, हे सिद्ध करण्याचा अश्विनांच्या कथेत नक्की पुरावा सापडतो. ती कथा अशी – एकदा असे झाले की, सुकन्या ही अंघोळ करून विवस्त्र स्थितीत उभी असताना अश्विनांनी तिला पाहिले. च्यवन ऋषीची ती तरुण पत्नी होती. लग्नाच्या वेळी च्यवन इतका जख्खड म्हातारा होता की तो आज मरतो की उद्या! सुकन्येचे सौंदर्य व तारुण्य पाहून अश्विन तिच्यावर मोहित झाले. ते तिला म्हणाले, ''तू आम्हापैकी एकाला पती म्हणून माळ घाल. तू तुझे हे तारुण्य व्यर्थ वाया घालवावेस हे तुला शोभत नाही.'' ''मी पतिव्रता आहे'' असे उत्तर देऊन सुकन्येने अश्विनांची विनंती नाकारली. त्यांनी तिच्यापुढे एक करार ठेवला. ते म्हणाले, ''आम्ही दोघे स्वर्गाचे प्रसिद्ध वैद्य आहोत. आम्ही तुझ्या पतीला तरुण व सौंदर्यवान करू; हे तुला कबूल असेल तर तू आम्हीपैकी एकाला पती म्हणून मान्य कर.'' अश्विनांचे उद्‌गार ऐकून सुकन्या च्यवनाकडे गेली व तिने त्याला ते निवेदन केले. च्यवन सुकन्येला म्हणाला, ''तू तसे कर.'' कराराप्रमाणे सर्व गोष्टी झाल्यानंतर अश्विनांनी च्यवनाला तरुण केले. यानंतर असा प्रश्न उपस्थित झाला की, देवांचे पेय जे सोमरस ते पिण्याचा अधिकार अश्विनांना आहे काय? अश्विन हे शूद्र आहेत, म्हणून त्यांना सोमरस पिण्याचा अधिकार नाही, असा इंद्राने युक्तिवाद केला. अश्विनांनी च्यवनाला शाश्वत तारुण्य दिलेले होते, त्याने इंद्राशी युक्तिवाद करून अश्विनांना सोमरस देण्यास इंद्राला भाग पाडले. (V. Fausoli-Indian Mytholog pp. 128-134)

शूद्र हे अनार्य आहेत असे दाखविणारे जे पुरावे धर्मसूत्रांत आढळतात ते या बाबतीतील विश्वसनीय पुरावे म्हणून ग्राह्य मानता येत नाही, याचे दुसरे एक कारण आहे. हे पुरावे मनूच्या मताला पोषक ठरत नाहीत. शूद्र हे आर्य की अनार्य हा प्रश्न निकालात काढताना मनुस्मृतीतील खालील श्लोकांचा लक्षपूर्वक विचार करणे जरूर आहे.

''ब्राह्मणापासून उत्पन्न झालेल्या जातीची स्त्री व शूद्र स्त्री यांना वरिष्ठ जातीतील पुरुषापासून जर मुले झाली तर त्या मुलांच्या जातीला सातव्या पिढीत श्रेष्ठ जातीचा दर्जा प्राप्त होतो.''

''(याप्रमाणे) शूद्राला ब्राह्मणाचा दर्जा मिळविता येतो आणि (त्याच रीतीने) ब्राह्मण अधोगतीला जाऊन शूद्रांच्या दर्जाला जाऊन पोहोचतो; हाच नियम क्षत्रियांच्या किंवा वैश्यांच्या संततीला लागू होतो.''

''अनार्य स्त्रीपासून आर्य पुरुषाला मुलगा झाला व ब्राह्मण स्त्रीपासून अनार्य पुरुषाला मुला झाला तर त्या दोन मुलांपैकी कोणाला श्रेष्ठ मानावे, याबद्दल जर शंका उत्पन्न झाली तर...

''तिचा निकाल येणेप्रमाणे लावावा – अनार्य स्त्रीपासून आर्य पुरुषाला मुलगा झालेला असला तर तो आपल्या अंगच्या सद्‌गुणांनी आर्य होऊ शकत नाही.'' (मनुस्मृती, अध्याय १०, श्लोक ६४–६७).

मनुस्मृतीतील ६४ वा श्लोक (अध्याय १०) गौतम धर्मसूत्रात (४-२२) आढळतो. श्लोकाचा खरा अर्थ काय आहे याबद्दल विद्वानांत मतभेदाची थोडी लढत चालू आहे. निरनिराळ्या विद्वानांनी या श्लोकाचे जे अर्थ केलेले आहेत त्यांचा सारांश बुटलर यांनी खालील शब्दांत दिलेला आहे -

''मेध, गोव्ह, कुल्ल आणि राघ यांच्या मतांप्रमाणे या श्लोकाचा असा अर्थ होतो की, शूद्र स्त्री व ब्राह्मण पुरुष यांच्यापासून उत्पन्न झालेली मुलगी व तिची मुले, या सर्वांनी जर ब्राह्मणांशी लग्नं केली तर त्या शूद्र स्त्रीपासून सहावी मुलगी जन्माला येईल तिची मुले ब्राह्मण समजली जातील. गौतमसूत्रात या श्लोकाशी जुळणारा एक भाग आहे. त्या भागावर हरदत्त यांनी जी टीका केलेली आहे तिच्याशी वरील अर्थ जुळतो. तथापि नारदसूत्र व नंदनसूत्र ही या श्लोकाचा निराळाच अर्थ लावतात. त्यांचे मत असे आहे की, ब्राह्मण पुरुष व शूद्र स्त्रीच्यापासून उत्पन्न मुलगा किंवा मुलगी परासव म्हणून समजले जातात. अशाप्रकारच्या परासव मुलाने नीतिमत्ता श्रेष्ठ असलेल्या, इतर सद्गुणांनी युक्त असलेल्या परासव मुलीशी जर लग्न केले व त्यांच्या वंशजांनीही तशाच तऱ्हेची लग्ने केली तर सहाव्या पिढीत जन्मलेले मूल ब्राह्मण म्हणून बौद्धायन सूत्रातील १-१६-१३-१४ हा श्लोक नंदनसूत्रात उद्धृत केलेला आहे. त्या श्लोकाचा अर्थ येणेप्रमाणे - 'निषाध पुरुषाला निषाध स्त्रीपासून जी संतती होते ती आपल्या आईबापाचे शूद्रत्व पाचव्या पिढीच्या आत नाहीशी करते. अशा संततीच्या पाचव्या पिढीतील मुलांचा उपनयन विधी करण्यास हरकत नाही. अशा संततीच्या सहाव्हा पिढीतील वंशजाचे यज्ञकर्म करण्यास हरकत नाही. बौद्धायन सूत्रातील हा भाग खरा आहे, याबद्दल मद्रास येथे जी या सूत्राची हस्तप्रत उपलब्ध झालेली आहे त्यावरून दिसून येते. या भागावरून हे स्पष्ट होते की, ब्राह्मण पुरुष व शूद्र स्त्री यांच्यापासून जे मुलगे उत्पन्न होत त्यांना आर्यत्व मिळण्याचा अधिकार होता. मनुस्मृतीतील श्लोकाचाही अर्थ असाच असला पाहिजे. हे अशक्य नाही. असेही वाटते. या श्लोकाचे भाषांतर येणेप्रमाणे असावयास पाहिजे होते. 'ब्राह्मण पुरुष व शूद्र स्त्री यांना जर ब्राह्मण जातीचे गुणधर्म असलेला सर्वोत्कृष्ट मुलगा झाला किंवा परासव जातीचे गुणधर्म असलेली सर्वोत्कृष्ट मुलगी झाली तर परासव जातीला सातव्या पिढीत उच्चतम जातीचा दर्जा प्राप्त होतो.''

मनुस्मृतीतील ६४ व्या (अध्याय १०) श्लोकाचा अर्थ कसाही लावला तरी एक निर्विवाद आहे की, काही विशिष्ट परिस्थितीत शूद्र सातव्या पिढीत ब्राह्मण होऊ शकत होतो.

शूद्र जर आर्य नव्हता तर त्याला ब्राह्मण करण्याची कल्पना कोणालाही सुचणे शक्य नव्हते.

(प्राचीन काळी असा नियम सर्रासपणे पाळला जात होता की, एखाद्या माणसाला आपल्या जन्माची शुद्धता सिद्ध करावयाची असेल तर ती त्याने आपल्या सहा पिढ्यांतील लोकांच्या जन्माची शुद्धता सिद्ध करून दाखवावी लागत असे. सहा पिढ्यांतील लोक जन्मतः स्वतंत्र नागरिक होते व त्यांचा जन्म कायदेशीर रीतीने लग्न झालेल्या आईबापांच्या

पोटी झाला होता, हे सिद्ध करून दाखविणे जरूर होते) (W.E. Hearn, The Aryan Household, Chapter VIII).

शूद्र हा अनार्य होता हे मत अर्थशास्त्रातील तज्ज्ञांच्या मताला जुळणारे नाही. कौटिल्य हा अशा तज्ज्ञांपैकी एक होता. या बाबतीत त्याचे मत विशेष महत्त्वाचे समजले पाहिजे. गुलामगिरीचा कायदा तयार करताना तो म्हणतो, (Book III, Chapter 13) –

"....जन्मतः गुलाम नाही, वयात आलेला नाही, पण जन्माने आर्य आहे, अशा शूद्राची त्याच्या नातलगांनी विक्री केली किंवा त्याला आयुष्यभर गहाण ठेवले तर त्या नातलगांना १२ पणांचा दंड करावा.

एखाद्या गुलामाला पैसे द्यावयाचे असून ते फसवून बुडविले किंवा आर्य म्हणून त्या गुलामाला जे हक्क उपभोगता येतात ते हक्क त्याला भोगू दिले नाहीत तर अशी कृत्ये करणाराला दंडाची शिक्षा करावी. (आर्यांचे जीवित गुलामगिरीत अडकविण्याबद्दल जो दंड ठेवलेला आहे त्याच्या निम्मा दंड वरील गुन्ह्यास करावा.)

ओलीस धरल्याची रक्कम भरलेली असताही गुलामाला गुलामगिरीतून मुक्त केले नाही तर, त्याबद्दलही १२ पणांचा दंड द्यावा लागेल.

त्याने स्वतःला गुलाम म्हणून विकून घेतले असेल तर त्याची संतती आर्य म्हणून समजली जाईल. धन्याच्या कामाला काही बध न येऊ देता गुलामाने जी मिळकत मिळविली असेल तिच्यावर त्याचा हक्क राहील. त्याला बापापासून जो वारसा हक्क मिळालेला असेल त्यावरही त्याचा संपूर्ण ताबा राहील."

वरील उताऱ्यावरून हे स्पष्ट होते की, कौटिल्य स्पष्ट व खणखणीत शब्दात शूद्रांना आर्य संबोधित होता.

## ५

आर्यांनी शूद्रांना गुलाम केले, या मुद्द्यांचा विचार केला तर असे दिसते की, हा मुद्दा खोटा नसला तरी बराच मूर्खपणाचा वाटतो. हा मुद्दा दोन गृहीत गोष्टींवर उभारलेला आहे. दास हे गुलाम होत. असे ऋग्वेदात वर्णन आलेले आहे, ही पहिली गृहीत गोष्ट, दास व शूद्र हे एकच लोक होते, ही दुसरी गृहीत गोष्ट.

दास हा शब्द ऋग्वेदात गुलाम किंवा नोकर या अर्थाने वापरलेला आहे, हे खरे आहे. परंतु या अर्थाने हा शब्द फक्त पाच ठिकाणी वापरलेला आहे. परंतु हा शब्द या अर्थाने पाचापेक्षा अधिक ठिकाणी वापरलेला असला तरी त्यामुळे आर्यांनी शूद्रांना गुलाम केले, असे सिद्ध होते काय? दास व शूद्र ही एकाच लोकांची दोन नावे होत – म्हणजे ते एकच लोक होते असे सिद्ध केल्याशिवाय आर्यांनी शूद्रांना गुलाम केले असे म्हणणे हास्यास्पद आहे ज्ञात वस्तुस्थितीला सोडून आहे.

राजांच्या राज्याभिषेकविधीत शूद्रांना भाग घेता येत असे. वैदिक काळानंतरच्या पुढील काळात म्हणजे ब्राह्मणी काळात प्रजा राजाला राजत्व देत असे. प्रजेने राजाला

राजत्व दिले हे दर्शविण्यासाठी राज्यभिषेकाचा विधी केला जात असे. राजत्व देण्याच्या बाबतीत आणि राज्याभिषेक करण्याच्या बाबतीत जनतेचे प्रतिनिधी प्रामुख्याने भाग घेत असत. या प्रतिनिधींना रत्नी म्हणत असत. हे प्रतिनिधी राजत्वाचे प्रतीक म्हणून रत्न हातात घेऊन राज्याभिषेकाच्या वेळी राजाच्या हातात देत असत. म्हणून या प्रतिनिधींना रत्नी म्हणत असत. रत्नींकडून राजाला समारंभपूर्वक (राज्याभिषेकाच्या वेळी) रत्न मिळाले, तर त्याला प्रजेकडून राजत्व मिळाले असे समजले जात असे. रत्नीकडून रत्न मिळाल्यानंतर राजा प्रत्येक रत्नीच्या घरी जात असे व तो प्रत्येक रत्नीला काही नजराणे देत असे. अशा अनेक रत्नींपैकी एक रत्नी शूद्र आहे ही विशेष महत्त्वाची गोष्ट आहे. (Jayasswal Hindu Polity (1948) pp. 200-201).

नीतिमयुरव या ग्रंथाचा कर्ता नीलकंठ याने फक्त अलीकडच्या काळात झालेल्या राज्याभिषेकांचे वर्णन केलेले आहे. त्याने म्हटलेले आहे की, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार मुख्य मंत्री राजाला राज्याभिषेक करीत असत. त्यानंतर प्रत्येक वर्णाचे आणि त्या वर्णाच्या खालच्या जातीचे पुढारी राजाला पवित्र पाण्याचा अभिषेक करीत असत. त्यानंतर द्विज राजाच्या नावाचा घोषक करीत असत. (Jayasswal Hindu Polity (1943) p. 223).

पांडवांचा वडील बंधू युधिष्ठिर याच्या राज्याभिषेकाचे वर्णन महाभारतात आलेले आहे. त्या वर्णनावरून असे स्पष्ट दिसते की, राजा या राज्याभिषेकाला ब्राह्मण व शूद्र या दोघांनाही उपस्थित होण्याबद्दल आमंत्रण देत असे. (महाभारत, सभापर्व, अध्याय ३३, श्लोक ४१-४२).

प्राचीन काळी जानपद व पौर अशी दोन विधिमंडळे असत व त्यांचे सभासद शूद्र असत. या परिस्थितीमुळे शूद्रांना ब्राह्मणांकडूनसुद्धा योग्य तो मानमरातब मिळत असे. (Jayasswal Hindu Polity p. 248).

मनुस्मृती (४-६१) व विष्णुस्मृती (२१-६४) यांच्यावरूनही हेच सिद्ध होते की, शूद्रांना ब्राह्मणांकडून मानमरातब हक्काने मिळत होता. म्हणूनच मनूने असा निर्बंध घातला की, ज्या देशाचा राजा शूद्र असेल त्या देशात ब्राह्मणांनी राहू नये. हे राजे शूद्र होते हेही यावरून सिद्ध होते.

भीष्माने युधिष्ठिराला राजकारणाबद्दल जे उपदेशवजा धडे दिलेले आहेत, त्यांची माहिती महाभारताच्या शांतिपर्वात दिलेली आहे. भीष्म म्हणतो, (Roy's Translation, Vol. II, p. 197).

''तू कोणत्या प्रकारचे मंत्री नेमावेस, त्याची मी तुला माहिती देतो. वेदांचा अभ्यास केलेले, मानापानाची जाणीव असलेले, स्नातक पंथाचे आणि शुद्ध आचरणाचे चार ब्राह्मण; आणि शारीरिक बळाने उत्तम आणि शस्त्रे चालविण्यात चपळ असे आठ क्षत्रिय; आणि श्रीमंत असलेले एकवीस वैश्य; आणि स्वभावाने नम्र, आचरणाने शुद्ध आणि दररोजच्या कर्तव्याबद्दल दक्ष असे तीन शूद्र; आणि पुराणांचे ज्ञान असलेला आणि आठ प्रमुख गुणांची

पारख करणारा असा सूत जातीचा एक – असे मंत्री तू नेम.''

वरील उताऱ्यावरून हे स्पष्ट होते की, शूद्र लोक राजाचे मंत्री होत असत आणि त्यांची संख्या आणि ब्राह्मण मंत्र्यांची संख्या जवळ जवळ सारखी असे. (जातीय प्रतिनिधित्वाला भीष्याचा पाठिंबा होता.)

शूद्र गरीब व हीन दर्जाचे लोक नव्हते, ते श्रीमंत होते. ही गोष्ट मैत्रायणी संहिता (४-२-७-१०) पंचवीस ब्राह्मण (६-१-११) यांच्यावरून स्पष्ट होते. (Vedic Index, Vol II, p. 390).

आर्यांनी शूद्रांना गुलाम केले, या मुद्द्याला अजून दोन बाजू आहेत. शूद्रांना गुलाम केले ही गोष्ट खरी धरली तरी शूद्रांना गुलाम करण्यात आर्यांना कोणते महत्त्व वाटत होते? आर्यांना गुलामगिरीच्या पद्धतीबद्दल माहिती नव्हती किंवा आर्य आर्यांना गुलामीकरीता नसत, असे मानले तर शूद्रांना गुलाम करण्यात आर्यांना काहीतरी वाटत होते, असे समजता येईल. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, आर्यांना गुलामगिरीच्या पद्धतीची पूर्ण माहिती होती आणि ते आर्यांना गुलाम करण्यास संमती देत असत हे ऋग्वेदावरून (८-८६-७, ८-१९ ३६ आणि ८-५६-३) स्पष्ट होते. असे म्हणता, आर्य लोक शूद्रांना गुलाम करण्यास विशेष उत्सुक का होते? याहीपेक्षा जास्त महत्त्वाचा असा प्रश्न आहे की, शूद्र गुलामांकरिता आर्यांनी निराळे कायदे का केले?

सारांश, शूद्र हे पूर्वी कोण होते आणि ते चवथा वर्ण म्हणून कसे झाले या आपल्या प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्यास युरोपियन ग्रंथकारांचा सिद्धांत आपल्याला उपयोगी पडत नाही.

ooo

# शूद्र पूर्वी क्षत्रिय होते !

शूद्र जर हिंदुस्थानचे मूळ रहिवाशी अनार्य नव्हते तर ते कोण होते या प्रश्नाचा आता विचार केला पाहिजे. मी या बाबतीत जो एक सिद्धांत मांडण्याचे धारिष्ट्य करणार आहे, त्या सिद्धांताच्या तीन बाजू खालीलप्रमाणे आहेत-

(१) शूद्र पूर्वी आर्य होते.

(२) शूद्र क्षत्रिय वर्णाचे होते.

(३) शूद्रांचा समाज क्षत्रिय वर्णात इतका प्रबळ समाज होता की, प्राचीन काळच्या अत्यंत प्रमुख व प्रबळ आर्य जातीतील राजांपैकी बरेच राजे शूद्र होते.

शूद्रांच्या उत्पत्तीसंबंधीचा हा सिद्धांत जरी क्रांतिकारक स्वरूपाचा नसला तरी तो चमत्कारिक स्वरूपाचा आहे. तो इतका चमत्कारिक स्वरूपाचा आहे की, तो सिद्ध करण्यास भरपूर पुरावे असले तरी पुष्कळ लोक तो सिद्धांत मान्य करण्यास तयार होणार नाहीत. या बाबतीत माझी एवढीच जोखीम आहे की, उपलब्ध पुरावे पुढे मांडावेत व त्यांचे महत्त्व ठरविण्याचा मार्ग लोकांना मोकळा करून द्यावा.

महाभारताच्या शांती-पर्वातील ६० व्या अध्यायातील ३८-४० श्लोक यातील माहितीवर हा सिद्धांत उभारलेला आहे; म्हणून ती माहिती या सिद्धांताचा प्रारंभीचा पुरावा होय. तो पुरावा येणेप्रमाणे -

"आमच्या असे ऐकण्यात आलेले आहे की, फार प्राचीन काळी पैजवन नावाच्या शूद्राने आपल्या यज्ञाच्या समयी ऐन्द्राग्नी कायद्यान्वये एक लक्ष पूर्णपात्रांची दक्षिणा वाटली."

या उताऱ्यात महात्त्वाची विधाने अशी आहे- (१) पैजवन हा शूद्र होता. (२) या पैजवन शूद्राने यज्ञ केला आणि ब्राह्मणांची त्याच्या यज्ञात वेदोक्त विधी केले आणि त्याच्याकडून दक्षिणा घेतली.

उपरिनिर्दिष्ट उतारा श्री. रॉय यांच्या महाभारताच्या आवृत्तीतून घेतलेला आहे. या बाबतीत ही गोष्ट प्रथम नक्की केली पाहिजे की, उताऱ्याचे मूळ बिनचूक आहे की त्या मुळात आणखी काही भेदप्रकार आहेत. श्री. रॉय यांनी आपल्या आवृत्तीतील उताऱ्याचे मूळ अगदी बिनचूक आहे अशी ग्वाही दिलेली आहे. ते म्हणतात, (Sukkthaknkar Memorial Edition, Vol. I pp. 43-44).

"बंगालच्या रॉयल एशियाटिक सोसायटीने बंगालच्या काही विद्वान पंडितांच्या नेतृत्वाखाली आणि वैदिक वाङ्मयात ख्याती मिळविलेल्या एका इंग्रज विद्वानाच्या सहाय्याने महाभारताची आवृत्ती तयार करून ती सुमारे ३५ वर्षांपूर्वी प्रसिद्ध केली. महाभारताची

आवृत्ती तयार करताना सोसायटीच्या आवृत्तीची भरपूर मदत घेतलेली आहे. महाभारताच्या हस्तलिखित प्रती मी हिंदुस्थानातील सर्व भागातून जमा करून त्यांची तुलनात्मक दृष्टीने काळजीपूर्वक पाहणी केलेली आहे. अशा रीतीने तयारी केल्यानंतर मी महाभारताची आवृत्ती तयार केली. ती करताना मी सोसायटीच्या आवृत्तीचा मनमुराद उपयोग करून घेतलेला नाही, तर मी सर्व मदार हस्तलिखित प्रतींवर ठेवलेली होती. बरद्वानच्या महाराजांनी महाभारताची आवृत्ती बंगाली लिपीत अत्यंत परिश्रमपूर्वक व काळजीपूर्वक तयार करवून छापलेली आहे. त्या आवृत्तीशी मी माझी आवृत्ती पडताळून पाहिली, बरद्वानच्या पंडितांच्या स्वाधीन केली व त्या पंडितांनी प्रत्येक श्लोक सर्व हस्तलिखितांतील श्लोकांशी पडताळून पाहून त्यांची तेव्हा खात्री झाली की, हा श्लेक खरा आहे, (घुसडलेला नाही) तेव्हा तो श्लोक बरद्वानच्या आवृत्तीत प्रविष्ट करण्यात आला. अशा रीतीने बरद्वानची आवृत्ती तयार करण्यात आलेली होती.''

टीका करण्यास एकही स्थळ राहू न देता महाभारताची अत्यंत उत्कृष्ट आवृत्ती तयार करणारे जाडे विद्वान प्रो. सुकथनकर यांनी आपल्या आवृत्तीत महाभारताच्या सर्व आवृत्त्यांचा सांगोपांग परामर्श घेतलेला आहे. या बाबतीत त्यांनी शेवटी असा निष्कर्ष काढला की, ''कलकत्त्याची आवृत्ती १८३६ साली प्रसिद्ध होऊन शंभर वर्षे झाली तरी तीच आवृत्ती अद्याप महाभारताची सर्वोत्कृष्ट आवृत्ती म्हणून समजली जाते.'' (Sukthankar Memorial Edition, Vol. I p. 131)

श्री. रॉय यांनी संपादन केलेली महाभारताची आवृत्ती मूळच्या महाभारताच्या प्रतीशी शंभर टक्के जुळणारी आहे असे जरी गृहीत धरले, तरी श्री. रॉय यांच्या आवृत्तीला उचलून धरणारी दुसरी एखादी हस्तलिखित प्रत आहे काय, असा जर टीकाकारांनी प्रश्न विचारला तर तो अस्थानी वाटणार नाही. कारण शूद्रांची उत्पत्ती कशी झाली याबद्दलचा सिद्धांत श्री. रॉय यांच्या आवृत्तीवरूनच उभा केलेला आहे, म्हणून तो सिद्धांत ज्या आधारावर उभारलेला आहे तो आधार हस्तलिखित प्रतीत आहे काय हे समजून घेणे इष्ट आहे. या प्रश्नाची चौकशी करून त्याचे उत्तर शोधून काढताना दोन गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. महाभारताची अठरा पर्वे ज्या हस्तलिखित प्रतींत लिहिलेली आहेत, अशी संपूर्ण हस्तलिखित प्रत मुळीच अस्तित्वात नाही, ही पहिली गोष्ट. एक पर्व म्हणजे महाभारताचा एक स्वतंत्र घटक असे मानण्यात येते. याचा परिणाम असा झालेला आहे की, प्रत्येक पर्वाच्या अेनक प्रती लिहिल्या गेलेल्या आहेत आणि एकाच पर्वाच्या अनेक प्रतींत जे श्लोक ग्रथित केलेले आहेत ते एकच नाहीत. म्हणजे अनेक प्रतींतील एकच श्लोक निरनिराळ्या रीतीने लिहिला गेला आहे किंवा वगळला गेलेला आहे किंवा नवीन श्लोक काही प्रतींत ग्रथित केले आहेत. यावरून असे स्पष्ट होते की सर्व पर्वाच्या निरनिराळ्या हस्तलिखित प्रतींवरून श्री. रॉय यांच्या आवृत्तीची कसोटी पाहणे इष्ट वाटत नाही. कारण, एका पर्वाच्या अनेक हस्तलिखित प्रतींवरून कोणती प्रत शुद्ध स्वरूपाची आहे, हे ठरविणे अशक्य आहे.

या बाबतीत लक्षात घेण्यासारखी दुसरी गोष्ट ही की, प्राचीन काळापासून

महाभारताच्या दोन निराळ्या प्रती परंपरेने अस्तित्वात राहिलेल्या आहेत. उत्तर हिंदुस्थानात अस्तित्वात असलेली एक प्रत ही आर्यावर्ताला शोभेशी आहे, दक्षिण हिंदुस्थानात अस्तित्वात असलेली दुसरी प्रत ही दक्षिण पंथाला शोभेशी आहे.

उत्तर हिंदुस्थानात आणि दक्षिण हिंदुस्थानात अस्तित्वात असलेल्या महाभारताच्या अनेक प्रतीतून बऱ्याच निवडून काढून त्या निवडलेल्या प्रतींपैकी किती प्रतीतील मजकूर श्री. रॉय यांच्या महाभारताच्या आवृत्तीतील मजकुराशी जुळतो हे पडताळून पाहिल्यास काही प्रतींतील मजकूर श्री. रॉय यांच्या महाभारताच्या आवृत्तीतील शूद्राच्या मजकुराला पाठिंबा देणारे आहेत हे नक्की ठरविता येईल. अशा रीतीने बऱ्याच प्रतींतील मजकुराची परस्परतुलना केल्यानंतर आपणाला असे आढळून येते की, महाभारताच्या शांतिपर्वातील ६० व्या अध्यायातील ३८ व्या श्लोकात पैजवन शूद्राचा उल्लेख आलेला आहे. आपला संबंध विशेषतः याच श्लोकाशी आहे. निरनिराळ्या प्रतीत हा शब्द आहे, त्याबद्दल खालीलप्रमाणे माहिती मिळते–

| | |
|---|---|
| (१) शूद्रः पैजवनो नाम । | (क) द– |
| (२) शूद्रः पैलवनो नाम। | (म. १; म. ४) द. |
| (३) शूद्रः थैलननो नाम। | (म. । ३; म. ।४) द. |
| (४) शूद्रः थैजननो राम । | (फ) |
| (५) शूद्रोपि यजने नाम। | (ल) |
| (६) शूद्रः पौंजलक नाम। | (ट क) द. |
| (७) शुद्धो वैभवनो नाम। | (ग) उ. |
| (८) पुरा वैजवो नाम। | (अ. द.) |
| (९) पुरा वैजननो नाम। | (म) द. |

(वर दिलेली माहिती भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट या संस्थेने तयार करून ठेविली होती. ती वापरण्यास संस्थेने मला संमती दिली, याबद्दल त्या संस्थेचा मी ऋणी आहे. कंसात दिलेली अक्षरे ही निरनिराळ्या प्रतींना संस्थेने दिलेली सूचक अक्षरे होत. 'उ.' किंवा 'द.' ही उत्तरे हिंदुस्थानातील किंवा दक्षिण हिंदुस्थानातील प्रती दर्शविणारी अक्षरे होत. क हे अक्षर कुंभकोणम्‌ची प्रत दर्शविते.)

नऊ प्रतींतील श्लोकांची तुलना करून वरील माहिती तयार केलेली आहे. महाभारताच्या प्रती बऱ्याच आहेत; मग फक्त नऊ प्रतींतील श्लोकांची तुलना करून पैजवन शूद्राबद्दलचा श्लोक मूळचा कोणत्या स्वरूपात असावा, याबद्दल कयास बांधता येईल काय? महाभारताची चोख आवृत्ती काढण्यासाठी नऊपेक्षा अधिक प्रतींची पहाणी करावी लागली होती, हे खरे आहे. तथापि फक्त दहा प्रतींची पहाणी करून सर्व महाभारताची आवृत्ती काढण्यात आलेली आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. (Sukthankar Vol. I, p. 14) यावरून असे म्हणता येईल की, नऊ प्रतींवरून जी वरील माहिती जुळविली आहे, ती आपल्या मुद्द्यासाठी पुरेशी अधिकृत धरता येईल. भौगोलिक दृष्टीने नऊ प्रतींचे दोन वर्ग

करता येतात. उत्तर व दक्षिण, म १, म २, म ३, म ४ व थ क ही अक्षरे दक्षिण हिंदुस्थानातील प्रती दर्शवितात. महाभारतातील खरा मजकूर कोणता हे शोधून काढण्यासाठी विद्वानांनी ज्या दोन कसोट्या ठरविलेल्या आहेत, त्या कसोट्यांना आपण निवडलेल्या नऊ प्रती उतरतात.

नऊ प्रतींतील मजकुराची आपण छाननी केली तर असे दिसून येते की –

(१) निरनिराळ्या प्रतींत पैजवन याचे वर्णन निरनिराळे आलेले आहे,

(२) निरनिराळ्या प्रतींत पैजवन याचे नाव निरनिराळे आलेले आहे,

(३) नऊ पैकी सहा प्रतींत पैजवन शूद्र होता असे वर्णन आहे. एक प्रत त्याला शुद्ध असे नाव देते. दोन प्रती तो कोणत्या वर्गाचा होता हे न सांगता तो प्राचीन होऊन गेला असे 'पुरा' या शब्दाने दर्शवितात.

(४) नऊपैकी दोन प्रतीत त्याच्या नावासंबंधी एकवाक्यता नाही. प्रत्येक प्रतीत त्याचे निरनिराळे नाव दिलेले आहे.

वर दिलेली सर्व माहिती लक्षात घेतली तर असा प्रश्न उपस्थित होतो की, श्लोकाचे मूळचे खरे स्वरूप कोणते? नावासंबंधी प्रथम विचार केला तर असे दिसते की, नामदर्शक जी अक्षरे निरनिराळ्या प्रतीत वापरलेली आहेत ती अक्षरे अर्थसूचक नाहीत. या अक्षरांचे अर्थ करून खरे नाव ठरविण्याचा येथे प्रश्न उद्‌भवत नाही. परंतु खरे नाव कोणते असावे, इतर नावे ही पंडितांनी घालघुसड करून उत्पन्न केली असावीत हे कशावरून ठरवावे, हा येथे प्रश्न उत्पन्न होतो. पैजवन हेच खरे नाव असावे, याबद्दल शंका नाही. उत्तर व दक्षिण हिंदुस्थानातील महाभारताच्या प्रतींतील नाववरून हे सिद्ध होते. ८ व्या अनुक्रमान वैजवन हे नाव आलेले आहे, ते पैजवन हेच आहे. इतर अनुक्रमातील जी नावे आहेत ती घालघुसड करून उत्पन्न केलेली नावे होत. मूळ प्रतीची नक्कल करताना पैजवन हे नाव बरोबर दिसले नसेल किंवा नक्कल करणाऱ्या पंडितांना बरोबर वाचता आले नसेल. म्हणून नक्कल करणाऱ्या पंडितांनी पैजवन या नावाऐवजी इतर नावे नक्कलेत घुसडून दिलेली असावीत. अशी इतर नावे घुसडून दिल्यानंतर त्या पंडितांना त्यांचा हवा तसा त्या श्लोकाचा अर्थ लावता आला.

पैजवनच्या वर्णनाबद्दल आता आपण विचार करू या. या वर्णनात त्याचे शूद्र ह्या शब्दापासून पुरा या शब्दात जे रूपांतर केलेले आहे ते काही अकस्तितपणे झालेले नाही. ते रूपांतर जाणूनबुजून करण्यात आलेले आहे. हे रूपांतर कसे झालेले असावे, हे एकदम सांगणे कठीण आहे. या बाबतीत दोन गोष्टी अगदी स्पष्ट दिसतात. हे रूपांतर होणे साहजिक आहे, ही पहिली गोष्ट. पैजवन हा शूद्र होता हे विधान हाणून पाडण्याचा हेतू या रूपांतराचा नाही, ही दुसरी गोष्ट. ३८-४० श्लोकातील मजकूर लक्षात घेतला तर वरील निष्कर्ष खरे आहेत हे दिसून येईल. ३८-४० श्लोकांच्या अगोदरचे श्लोक लक्षात घेतले तर वरील मुद्दा चांगला ध्यानात येईल. त्या श्लोकांचा भावार्थ खालीलप्रमाणे –

''आपला धनी कसल्याही संकटात सापडो, त्याला शूद्राने कदापिही सोडून जाऊ

नये. धन्याची संपत्ती नष्ट झाली, तर शूद्राने त्याचे मनोभावाने पालनपोषण केले पाहिजे. शूद्राला स्वतःच्या मालकीचे धन जमा करून ठेवता येत नाही, त्याच्या जवळ जे काही ऐश्वर्यदर्शक असेल त्यावर त्याच्या धन्याची सत्ता राहील. यज्ञकर्म करणे हा त्रैवर्णिकांचा धर्म आहे. हे भारता! धर्मशास्त्रात शूद्रासंबंधी असेही सांगितले आहे की, त्याने यज्ञकर्म करावे, परंतु यज्ञात स्वहः व स्वधा किंवा कोणताही दुसरा मंत्र उच्चारण्याचा अधिकार शूद्राला नाही. याचे कारण असे की, वेदात सांगितलेली व्रते न पाळता शूद्रांनी पाकयज्ञासारखे लहान यज्ञ करून देवांची पूजा करावी. अशा यज्ञांत शूद्र जी दक्षिणा देतात तिला पूर्णपात्र म्हणतात.''

ज्या श्लोकांचा भावार्थ वर दिलेला आहे ते श्लोक ३८ ते ४० या श्लोकांच्या अगोदरचे आहेत. हे श्लोक व ३८ ते ४० हे श्लोक एकत्र लक्षात घेतले तर हे स्पष्ट होते की, या श्लोकातील मजकूर शूद्रांसंबंधीचा आहे. पैजवनाची कथा ही त्या मजकुरातील एक उदाहरण आहे. ही सर्व परिस्थिती लक्षात घेतली तर शूद्र हा शब्द पैजवन याच्या नावाच्या अगोदर वापरण्याची जरुयरी भासत नाही. दोन प्रतीत शूद्र हा शब्द पैजवनच्या नावापूर्वी का वापरलेला नाही, हे वरील गोष्टीवरून कळून येईल. शूद्र या शब्दाऐवजी पुरा हा शब्द वापरण्यात आला याचे हे कारण दिसते की, पैजवनची कथा फार प्राचीन काळी झालेली आहे व हे दाखविण्यासाठी पुरा हा शब्द वापरणे पंडितांना जरूर वाटले. ज्या पंडितांनी महाभारताच्या प्रतींची नक्कल केली, त्यांना पैजवन हा शूद्र होता, हे मुद्दाम दाखविण्याची जरुयरी वाटली नाही याचे कारण हेच की या नक्कल करणाऱ्या पंडितांना पूर्वीच्या संदर्भावरून हे नक्की माहीत होते की, पैजवन हा शूद्र होता. उलटअंशी, पैजवन शूद्र फार प्राचीन काळी होऊन गेला ही बाब पूर्वीच्या संदर्भात स्पष्ट केलेली नव्हती, ही गोष्ट या पंडितांना माहीत होती; ती स्पष्ट करणे त्यांना इष्ट वाटले म्हणून त्यांनी श्लोकातून शूद्र हा शब्द गाळला व त्याऐवजी पुरा हा शब्द लिहिला.

वरील स्पष्टीकरणे संयुक्तिक वाटली तर आपण असे धरून चालण्यास हरकत नाही की, महाभारताच्या शांतिपर्वातील मजकुरात ज्या मनुष्याचा उल्लेख केलेला आहे तो इसम म्हणजे पैजवन होय आणि हा पैजवन शूद्र होता.

## २

आता यापुढचा विचार करण्यासरखा प्रश्न म्हणजे पैजवनचे अस्तित्व सिद्ध करणे. हा पैजवन म्हणजे कोण?

या बाबतीत विचार करण्यासारखा प्रश्न म्हणजे पैजवनचे अस्तित्व सिद्ध करणे. हा पैजवन म्हणजे कोण?

या बाबतीत यास्काच्या निरुक्तात आपल्या हाती धागादोरा लागतो. निरुक्त २-२४ मध्ये यास्क म्हणतो, (Lakshman Sarup- The Nighantu and Nirukta pp. 35-36)

''द्रष्टा विश्वामित्र हा पिजवनाचा मुलगा सुदास याचा पुरोहित होता. विश्वामित्र हा सर्वांचा मित्र होता. सर्व एकत्र फिरत होते. सुदास हा अति उदार दाता होता. पैजवन हा

पिजवनाचा मुलगा होता. आणखी असे की, पिजवनाचा धावण्याचा वेग दुसऱ्यांना मत्सर उत्पन्न करण्याइतका मोठा होता. त्याची चालण्याची ढब कोणालाही साधत नव्हती.''

यास्काच्या निरुक्तापासून आपणाला दोन महत्त्वाच्या गोष्टी मिळतात – (१) पैजवन म्हणजे पिजवनाचा मुलगा आणि (२) जो इसम पिजवनाचा मुलगा आहे तोच सुदास होय. महाभारताच्या शांतीपर्वातील मजकुरामध्ये ज्या पैजवनाबद्दल उल्लेख आहे. तो पैजवन कोण, या प्रश्नाचे आपणाला यास्काच्या निरुक्ताच्या साहायाने देता येणे शक्य आहे. ते उत्तर हेच की पैजवन हे सुदास याचे दुसरे नाव होय.

यापुढचा प्रश्न हा की, सुदास हा कोण आणि त्याच्याबद्दल आपणाला काय माहिती आहे? ब्राह्मणी वाङ्मय चाळून पाहिले तर असे दिसून येते की, त्या वाङ्मयात सुदास या नावाचे तीन इसम आहेत. त्यापैकी एक सुदास ऋग्वेदात आढळतो. त्याच्या कुटुंबाची सविस्तर माहिती ऋग्वेदातील खालील ऋचांत दिलेली आहे. (Wilson Rigveda, Vol. IV (Poona Reprint), p. 146) -

**(१) ऋग्वेद, ७-१८-२१** – ''शेकडो राक्षसांचा संहार करणारा पाराशर आणि वसिष्ठ यांनी सर्व आयुष्य तुझ्या सेवेत घालविले. त्यांनी प्रत्येक घरात तुझी स्थापना करून भक्ती चालू की. अशा उपकारकर्त्यांच्या मैत्रीची तू अवहेलना करू नकोस. धार्मिक वृत्तीच्या माणसांना भरभराटीचे दिवस लाभतात.''

**(२) ऋग्वेद, ७-१८-२२** – ''देवताचा नातू, पिजवनाचा मुलगा, दोनशे गाया व दोन रथ यांचे दान करणारा, दोन बायका असलेला सुदास, यज्ञमंडपात पुरोहित यज्ञाचे मंत्र म्हणत यज्ञकुंडासभोवती ज्याप्रमाणे प्रदक्षिणा घालते त्याप्रमाणे, हे अग्ने! मी सुदासाच्या औदार्याची स्तुतिस्तोत्रे म्हणत तुझ्या सभोवती प्रदक्षिणा घालीत आहे.''

**(३) ऋग्वेद, ७-१८-२३** – ''ज्यांचे खोगीर सोन्याच्या दागिन्यांनी मढविलेले आहे, जे खडतर रस्त्यांनी धिम्मेपणाने पावले टाकीत चालतात, जे आपल्या सद्गुणांनी पृथ्वीतलावर प्रसिद्धीस आलेले अशा आहेत विलोभनीय चार घोड्यांचे दान पिजवनाचा मुलगा सुदाम याने मला केले. अन्न व संतती मिळविण्यासाठी तू मला आपला मुलगा समज.''

**(४) ऋग्वेद, ७-१८-२४** – ''तो जणू काही इंद्र आहे असे समजून सातही लोक सुदासाची स्तुती करतात. त्याची कीर्ती अफाट स्वर्ग व पृथ्वी यामध्ये पसरते. प्रत्येक श्रेष्ठ माणसाला त्याने द्रव्य दिलेले आहे, असा तो फार मोठा दानशूर आहे. वाहत्या नद्यांनी त्याच्यासाठी युध्यमधीला युद्धात ठार केले.''

**(५) ऋग्वेद, ७-१८-२५** – ''हे मरुत् देवांनो! तुम्ही यज्ञविधीचे अग्रणी आहात. सुदासाचा बाप दिवोदास याची तुम्ही जशी काळजी घेतली तशी तुम्ही या राजपुत्रांची काळजी घ्या. पिजवनाच्या कर्तव्यनिष्ठ मुलाची प्रार्थना तुम्ही ऐका व त्याचे इच्छित तुम्ही त्याला द्या. त्याचे सामर्थ्य असेच अबाधित राहो व चिरायु होवो!''

दुसरे दोन सुदास यांचे विष्णुपुराणात उल्लेख आढळतात. एक सुदास सागराचा वंशज म्हणून चवथ्या अध्यायाल उल्लेखिलेला आहे. सुदासाचे सागराशी नाते जोडणारा वंशवृक्ष पुढीलप्रमाणे आहे. (Wilson's Vishnu Puran, pp. 377-380).

"कश्यपाची मुलगी सुमती व राजा विदर्भाची मुलगी केसिनी या सागराच्या दोन बायका होत्या. त्याला बरेच दिवस अपत्य न झाल्यामुळे त्याने और्व ऋषींची मनोभावे भक्ती केली. मुनीने असा वर दिला की, सागराच्या एका पत्नीला एक पुत्र होईल व तो पुढे वंश चालवील आणि दुसऱ्या पत्नीला साठ हजार पुत्र होतील. या वरांपैकी कोणता वर कोणत्या पत्नीने पसंत करावा हे जिने तिने ठरवावे, असे मुनींने दोन्ही स्त्रियांना सांगितले. आपणाला एकच पुत्र व्हावा, अशी केसिनीने इच्छा प्रगट केली. आपणाला साठ हजार पुत्र व्हावेत, अशी सुमतीने इच्छा दर्शविली. थोड्याच दिवसात केसिनाला असमंजस हा मुलगा झाला व या युवराजापासून वंश वाढत गेला. विनताची कन्या सुमती हिला साठ हजार मुलगे झाले. असमंजसाला अंसुमत हा मुलगा झाला.

अंसुमताला दिलीप हा मुलगा झाला. दिलीपाला भगीरथ हा मुलगा झाला. भगीरथाने गंगा पृथ्वीवर आणली, म्हणून तिला भागीरथी हे नाव पडले. भगीरथाला स्त्रुत मुलगा झाला. स्त्रुताला नभग हा मुलगा झाला. नभगाला अंबरीय हा मुलगा झाला. अंबरीषाला सिंधुद्वीप हा मुलगा झाला. सिंधुद्वीपाला आयुताश्व हा मुलगा झाला. आयुताश्वाला ऋतुपर्ण हा मुलगा झाला. ऋतुपर्ण हा द्यूत खेळण्यात अत्यंत निष्णात होता, जो नळ याचा मित्र ऋतुपर्णाला सर्वकाम हा मुलगा झाला. सर्वकामाला सुदास हा मुलगा झाला. सुदासाला सौदास ऊर्फ मित्रसह हा मुलगा झाला.

पुरूचा वंशज म्हणून १९ व्या अध्यायात दुसऱ्या सुदासाचा उल्लेख केलेला आहे. या सुदासाचे पुरूशी नाते जोडणारा वंशवृक्ष पुढीलप्रमाणे आहे, (Wilson's Vishnu Puran, pp. 447-456) -

"पुरूचा मुलगा जनमेजय होता. जनमेजयाचा मुलगा प्राचिन्वत. प्राचिन्वताचा मुलगा प्रवीर होता. प्रवीराचा मुलगा मनस्यु होता. मनस्युचा मुलगा भयद होता. भयदाचा मुलगा सुद्युम्न होता. सुद्युम्नाचा मुलगा बहुगव होता. बहुगवाचा मुलगा संयती होता. संयतीचा मुलगा अहंयती होतो. अहंयतीचा मुलगा रौद्राश्व होता. रितेयु, कक्षेयु, स्थंडिलेयु, घृतेयु, जलेयु, स्थलेयु, संततेयु, धनेयु वनेयु व व्रतेयु असे दहा पुत्र रौद्राश्वाला होते, रितेयूचा मुलगा रतिनार होता. रतिनाराला तान्सू, अप्रतिरथ व ध्रुव असे मुलगे होते. कण्व हा अप्रतिरथाचा मुलगा होता. मेधातिथी हा कण्वाचा मुलगा होता. मेधातिथीपासून कण्वयान ब्राह्मण उत्पन्न झाले. अनिल हा तान्सूचा मुलगा. अनिलाला चार मुलगे होते. त्यातून दुष्यंत हा वडील मुलगा होता. दुष्यंताचा मुलगा सम्राट भरत हा होता.

भरताला निरनिराळ्या पत्नींपासून नऊ मुलगे झाले होते. परंतु हे मुलगे दिसण्यात माझ्यासारखे नाहीत, असे भरताने उद्गार काढल्यामुळे त्या स्त्रियांना भीती पडली की, भरत आपणाला सोडून देईल, म्हणून त्यांनी आपले नऊ मुलगे मारून टाकले. पुत्र जन्मून अशा रीतीने मेले म्हणून भरताने मरुतांना यज्ञ केले. उतश्यची पत्नी ममता हिच्यापासून बृहस्पतीला भारद्वाज हा मुलगा झाला होता. तो मुलगा मरुतांनी भरताला दिला...

भरताला दोन मुलगे झाले, पण व्यर्थ. म्हणून त्याला वितथा हे नाव पडले. वितथाचा मुलगा भवनमन्यू होता. भवनमन्यूला पुष्कळ मुलगे झाले, त्यातून बृहत्क्षत्र, महावीर्य, नर व

गर्ग हे प्रमुख होते. नराचा मुलगा संस्कृती हा होता. रुचिरधी व रंतिदेव हे संस्कृतीचे दोन मुलगे होते. गर्गाचा मुलगा सिनी होता. त्यांचे वंशज पुढे गार्ग्य व सैन्यस् (Sainyas) या नावाने ओळखले जाऊ लागले. हे लोक जरी जन्माने क्षत्रिय होते तरी ते ब्राह्मण झाले. महावीर्याचा मुलगा उरुक्षय याला त्र्य्यरुण, पुष्करिण व कपि असे तीन मुलगे होते. कपि हा ब्राह्मण झाला. बृहत्क्षत्राचा मुलगा सुहोत्र होता. सुहोत्राचा मुलगा हस्तिन् हा होता. हस्तिनाने हस्तिनापूर शहर बसवले. हस्तिनाचे मुलगे अजामिध, द्विमिध व पुसमिध हे होते. अजामिधाचा एक मुलगा कण्व हा होता. कण्वाचा मुलगा मेधातिथी हा होता. अजामिधाचा दुसरा मुलगा बृहदिशू होता. बृहदिशूचा मुलगा बृहद्वसू हा होता. बृहद्वसूचा मुलगा बृहत्कर्म हा होता. बृहत्कर्मचा मुलगा जयद्रथ हा होता. जयद्रथाचा मुलगा विश्वजित हा होता. विश्वजिताचा मुलगा सेनाजित हा होता. रुचिराश्व, कास्य, धृलधनुष व बसहनु हे सेनजिताचे मुलगे होते. रूचिराश्वचा मुलगा पृथुसेन हा होता. पाराचा मुलगा नीप हा होता. निपाला शंभर मुलगे होते. त्यातून समर हा प्रमुख होता. तो कम्पील्याचा राजा होता. पारा, सपारा व सदाश्व हे तीन मुलगे समराचे होते. पराचा मुलगा प्रिथु हा होता. व्यासाचा मुलगा शुक्क व शुक्काची मुलगी कृत्वि हिच्याशी अनुहाने विवाह केला व तिच्यापासून त्याला ब्रह्मदत्त हा मुलगा झाला. ब्रह्मदत्ताचा मुलगा विश्वक्षेण हा होता. विश्वक्षेणाचा मुलगा उदक्षेण हा होता. उदक्षेणाचा मुलगा भल्लत हा होता.

द्विमिधाचा मुलगा यावीनर हा होता. यावीनराचा मुलगा धृतिमत हा होता. धृतिमताचा मुलगा सत्यधृती हा होता. सत्यधृतीचा मुलगा धृधनेमी हा होता. धृधनेमीचा मुलगा सुपार्श्व हा होता. सुपार्श्वाचा मुलगा सुमती हा होता. सुमतीचा मुलगा सन्नतिमत हा होता. सन्नतिमताचा मुलगा कृत हा होता. हिरण्यनभाने कृताला योगाचे तत्त्वज्ञान शिकविले आणि कृताने पूर्व दिशेला राहणाऱ्या व सामवेदाचा अभ्यास करणाऱ्या ब्राह्मणांसाठी चोवीस संहिता ग्रथित केल्या. कृताचा मुलगा उग्रायुध हा होता. आपल्या सामर्थ्याने उग्रायुधाने क्षत्रियांचा निप वंश नष्ट केला. उग्रायुधाचा मुलगा क्षेम्य हा होता. क्षेम्याचा मुलगा सुवीर हा होता. सुवीराचा मुलगा नृपंजय हा होता. नृपंयजाचा मुलगा बहुरथ हा होता. यांना पौरव असे म्हणत असत.

अजामिधाला निलिनी म्हणून एक पत्नी होती; त्याला तिच्यापासून नील म्हणून मुलगा झाला. निलाला सान्ती म्हणून मुलगा झाला. सान्तीचा सुसान्ती हा मुलगा होता. सुसान्तीचा मुलगा पुरूजानू हा होता. पुरूजानूचा मुलगा चक्षू हा होता. चक्षूचा मुलगा हर्याश्व हा होता. मुग्द्रल, स्रिंजल, बुद्धिशु, प्रवीर व कम्पील्य असे पाच मुलगे हर्याश्वाला होता. मुलांना म्हणाला, हे माझे पाच मुलगे आपल्या देशाचे संरक्षण करण्यास समर्थ आहेत. म्हणून त्यांना पांचाळ हे नाव मिळाले. मुग्द्रलापासून मौग्द्रल्य ब्राह्मण उत्पन्न झाले. मुग्द्रलाला बहवाश्व हा एक दुसरा मुलगा होता. बहवाश्वाला एक मुलगा व एक मुलगी अशी दोन जुळी मुले झाली. त्यांची नावे अनुक्रमे दिवोदास व अहल्या अशी होती.

दिवोदासाचा मुलगा मित्रायू हा होता. त्याचा मुलगा च्यवन हा होता. च्यवनचा मुलगा सुदास हा होता. सुदासचा मुलगा सौदास उर्फ सहदेव हा होता. सौदासाचा मुलगा

सोमक हा होता. सोमकाला शंभर मुलगे होते. त्यातून जंतू हा सर्वांत वडील व प्रिशत हा सर्वांत लहान मुलगा होता. प्रिशताचा मुलगा द्रुपद होता. द्रुपदाचा मुलगा धृष्टद्युम्न हा होता. धृष्टद्युम्नाचा मुलगा धृष्टकेतु हा होता.

अजामिधाचा दुसरा मुलगा ऋक्षा हा होता. ऋक्षाचा मुलगा संवरण हा होता. संवरणाचा मुलगा कुरु हा होता. कुरूने आपले नाव कुरुक्षेत्र या पवित्र जिल्ह्याला दिले. सुधनुष, परीक्षित व इतर बरेच मुलगे कुरूला होते. सुधनुषाचा मुलगा सुहोत्र होता. सुहोत्राचा मुलगा च्यवन हा होता. च्यवनाचा मुलगा कृतक हा होता. कृतकाचा मुलगा उपरिचरवसू हा होता. उपरिचरवसूला बृहद्रथ, प्रत्याग्र, कुशंब, मवेल्ल, मत्स्य व इतर मुले होती. बृहद्रथाचा मुलगा कुसाग्र हा होता. कुसाग्राचा मुलगा ऋषभ हा होता. ऋषभाचा मुलगा पुष्पवत् हा होता. पुष्पवताचा मुलगा सत्यधृत हा होता. सत्यधृताचा मुलगा सुधन्वन हा होता. सुधन्वन याचा मुलगा जंतू हा होता. बृहद्रथाला आणखी एक मुलगा होता. जन्मतः त्याच्या शरीराचे दोन तुकडे झालेले होते. जरा या नावाच्या चेटकिणीने ते दोन तुकडे एकत्र जोडले, म्हणून त्या मुलाचे नाव जरासंध असे पडले. जरासंधाचा मुलगा सहदेव हा होता. सहदेवाचा मुलगा स्त्रतस्त्रवस हा होता. हे सर्व मगध देशाचे राजे होते.''

तीन सुदासांचा अगदी जवळचा वंशवृक्ष खालील तक्त्यात दिलेला आहे. हे तीन सुदास म्हणजे तीन निरनिराळे सुदास होते की, ते एकाच व्यक्तीचे निरनिराळ्या ठिकाणचे संदर्भ होते हे, हे ठरविण्यास खालील तक्त्याची मदत होईल–

| ऋग्वेदातील सुदास | | | विष्णुपुराणातील सुदास | |
|---|---|---|---|---|
| ७–१८–२२ | ७–१८–२३ | ७–१८–२५ | सागर कुटुंब यातील | पुरू कुटुंब यातील |
| देवावत<br>↓<br>पिजवन<br>↓<br>सुदास | पिजवन<br>↓<br>सुदास | दिवोदास =<br>पिजवन<br>↓<br>सुदास | ऋतुपर्ण<br>↓<br>सर्वकाम<br>↓<br>सुदास<br>↓<br>सौदास : मित्रसह | बहवाश्व<br>↓<br>दिवोदास<br>↓<br>मित्रायू<br>↓<br>च्यवन<br>↓<br>सुदास<br>↓<br>सौदास<br>↓<br>सोमक |

वरील तक्त्यावरून दोन गोष्टी सूर्यप्रकाशाप्रमाणे स्पष्ट दिसतात. विष्णुपुराणात वर्णन

केलेला सुदास व ऋग्वेदात वर्णन केलेला सुदास यांचा अर्थाअर्थी काही संबंध नाही, ही पहिली गोष्ट होय. दुसरी गोष्ट ही की, महाभारतात वर्णन केलेला पैजवन याचा प्राचीन काळी होऊन गेलेल्या पैजवनाशी काही संबंध पोहोचतो का हे शोधून काढावयाचे म्हटले तर ऋग्वेदात पैजवन म्हणून त्याला म्हटलेले आहे, त्या ऋग्वेदातील सुदासाशी महाभारतातील सुदासाचा संबंध पोहोचू शकतो. कारण हे की ऋग्वेदातील सुदास ऊर्फ पैजवन हा पिजवन ऊर्फ दिवोदास याचा मुलगा होय, असे ऋग्वेदात वर्णन आलेले आहे. (ऋग्वेदात वर्णन केलेल्या सुदासाची वंशावळ शोधून काढण्यात काही अडचणी उपस्थित होतात. परंतु देवावत म्हणजे दिवोदास असा मेळ घालून या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ऋग्वेदातील ७-१८ यातील २२, २३ आणि २५ या ऋचांतील मजकूर एकाच स्वरूपाचा नाही व हा मजकूर व्यवस्थितपणे पडताळून पहाण्याचा कोणी प्रयत्न केलेला नाही. यामुळे उपरिनिर्दिष्ट अडचणी उत्पन्न झालेल्या आहेत. चित्रावशास्त्री यांनी संपादन केलेली ऋग्वेदाची जी आवृत्ती आहे तीत पिजवन हे नाव सर्व ठिकाणी वापरलेले आढळते. सातवळेकर यांनी संपादन केलेली ऋग्वेदाची जी आवृत्ती आहे तीत पैजवन हे नाव सर्व ठिकाणी वापरलेले आढळते. वुईल्सनच्या ऋग्वेदाच्या आवृत्तीतील २२ व २३ या ऋचांत पैजवन हे नाव आढळते आणि २५ व्या ऋचेतच पिजवन हे नाव आढळते. वुईल्सनच्या आवृत्तीतील २५ व्या ऋचेचा मजकूर बरोबर आहे असे जर गृहीत धरले, तर सुदासाची वंशावळ शोधून काढण्यात कोणतीच अडचण उपस्थित होत नाही. हे स्पष्टीकरण जर अचूक धरले तर पिजवन हे दिवोदासाचे आणि पैजवन हे सुदासाचे दुसरे नाव ठरते.)

प्रो. वेबर यांनी या बाबतीत जो निष्कर्ष काढलेला आहे तोच माझा निष्कर्ष आहे, हे सुदैवाने माझ्या पथ्यावर पडलेले आहे. महाभारतातील शांतिपर्वातील मजकुरावर मी माझा सिद्धांत उभारलेला आहे. मजकुरांसंबंधी आले विचार प्रदर्शित करताना प्रो. वेबर म्हणतात—

"येथे अशी मनोरंजक दंतकथा प्रविष्ट केलेली आहे की, अनेक यज्ञ करून मोठी कीर्ती मिळविलेला आणि विश्वामित्राचा आश्रयदाता आणि वसिष्ठाचा शत्रू म्हणून ज्याचे ऋग्वेदांत वर्णन केलेले आहे तो पैजवन म्हणजे सुदास हा शूद्र होता." (Muir, Vol. I, P. 366)

या मजकुरातील मुद्द्याचे संपूर्ण महत्त्व प्रो. वेबर यांना आकलन करता आले नाही, ही दुर्दैवाची गोष्ट होय. परंतु ही गोष्ट अलाहिदा आहे. महाभारतातील पैजवन म्हणजे ऋग्वेदातील सुदास होय, असे प्रो. वेबर यांचे मत होते व हे मत माझ्या सिद्धांताला पोषक आहे, हे पुष्कळ झाले.

## ३

सुदास ऊर्फ पैजवन याच्याबद्दल आपणास काय माहीत आहे?

त्याच्याबद्दल खालीलप्रमाणे सविस्तर माहिती मिळते.

(१) सुदास हा दास किंवा आर्य नव्हता. दास व आर्य हे दोघेही त्याचे शत्रू होते. (ऋग्वेद, ७-८-३-१) याचा अर्थ असा की, सुदास हा वैदिक आर्य होता.

(२) सुदासाचा पिता दिवोदास हा होता. तुर्वस, यदू, शांबर, पख, करंज व गुंगु या लोकांबरोबर त्याने पुष्कळ लढाया केल्या. (ऋग्वेद ६-६१-१; ७-१९-८; ऋग्वेद १-१३०-७; १-५३-१०-४८, १-५३-८, ७-१८-१३). तुर्यवन आणि दिवोदास व त्यांचे दोस्त आर्यू व कुत्स यांच्यामध्ये वैमनस्य चालू होते. त्यामुळे त्यांच्यात नेहमी लढाई होत असे. शेवटी तुर्यवन यांना जय मिळाला. (ऋग्वेद, १-५३-८; ६-१८-१३).

एकदा इंद्राने दिवोदासाविरुद्ध, विशेषतः तुर्यवनाबरोबर झालेल्या युद्धात बाजू घेतली होती, असे दिसते. दिवोदासाने आपला पुरोहित भारद्वाज याला पुष्कळ प्रकारची दाने दिली. (ऋग्वेद, १-११६-१८). भारद्वाजाने दिवोदासाबरोबर खोटेपणा केला व तो तुर्यवनाच्या पक्षाला जाऊन मिळाला. (ऋग्वेद ६-१६-५)

सुदासाच्या आईचा कोठे उल्लेख सापडत नाही, परंतु सुदासाच्या पत्नीबद्दल उल्लेख आढळतो. त्याच्या पत्नीचे नाव सुदेवी. (ऋग्वेद, ६-१८-१३) अश्विनांनी सुदासासाठी तिला प्राप्त केले असे समजले जाते.

(३) सुदास हा राजा होता व त्याचा राज्यभिषेकविधी ब्राह्मण ऋषी वसिष्ठ यांच्या हस्ते झालेला होता.

कोणत्या राजाचा महाभिषेक कोणत्या पुरोहिताने केला याची माहिती ऐतरेय ब्राह्मणात दिलेली आहे. (Martin Hang, Vol. II, pp. 523-524) -

"मनूचा मुलगा शर्यात याचा राज्याभिषेक भृगूचा मुलगा च्यवन याने या विधीने केला. त्यानंतर शर्यात एकामागून एक असे जगातील सर्व देश जिंकीत चालला; त्याने अश्वमेध केला व देवांनी जो यज्ञोत्सव सुरू केलेला होता त्या उत्सवाला शर्यात उपस्थित झाला होता."

'सत्रजिताचा मुलगा शतनिक याचा राज्याभिषेक वजरत्नाचा मुलगा समसुशम याने या विधीने केला. त्यानंतर शतनिक एकामागून एक देश पादाक्रांत करीत सर्व पृथ्वीतलावर फिरला व त्याने अश्वमेध यज्ञ केला."

"अंबश्य याचा राजाभिषेक पर्वत व नारद यांनी या विधीने केला. त्यानंतर अंबश्य एकामागून एक देश पादाक्रांत करीत सर्व पृथ्वीतलावर फिरला व त्याने अश्वमेध यज्ञ केला."

"उग्रसेनाचा मुलगा युद्धमस्त्रौष्टी याचा राज्याभिषेक पर्वत व नारद यांनी या विधीने केला. त्यानंतर युद्धमस्त्रौष्टी एकामागून एक देश पादाक्रांत करीत सर्व पृथ्वीतलावर फिरला व त्याने अश्वमेध यज्ञ केला.

"भुवनाचा मुलगा विश्वकर्मा याचा राज्याभिषेक काश्यप याने या विधीने केला. त्यानंतर विश्वकर्मा एकामागून एक देश पादाक्रांत करीत सर्व पृथ्वीतलावर फिरला व त्याने अश्वमेध यज्ञ केला."

ते असे म्हणतात की, पृथ्वीने विश्वकर्माला पुढील श्लोक गाऊन दाखविला -

"मला दान म्हणून कोणाला देण्यास कोणत्याही मर्त्य मानवाला आपल्या परवानगी नाही. मी तुला सर्व पृथ्वी दान देईन, असे राजाने राज्याभिषेकविधी करीत असलेल्या आपल्या पुरोहिताला वचन दिले होते. हे विश्वकर्मा! तू मला दुसऱ्याला दान म्हणून दिले आहेस. म्हणून मी समुद्राच्या मध्यभागी उडी घेऊन समुद्रात बुडेन. मला तू काश्यपाला देण्याचे जे वचन दिले आहेस ते व्यर्थ होय."

"पिजवनाचा मुलगा सुदास याचा राज्याभिषेक वसिष्ठाने या विधीने केला. त्यानंतर सुदास एकामागून एक देश पादाक्रांत करीत सर्व पृथ्वीतलावर फिरला व त्याने अश्वमेध यज्ञ केला."

'अविक्षिताचा मुलगा मरुत् याचा राज्याभिषेक अंगीरसाचा मुलगा संवर्त याने या विधीने केला. यानंतर मरुत् एकामागून एक देश पादाक्रांत करीत सर्व पृथ्वीतलावर फिरला व त्याने अश्वमेध यज्ञ केला."

वरील माहितीत सुदास याचा स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे आणि त्याचा राज्याभिषेक विधी वसिष्ठाने केला हेही सांगितलेले आहे. ऋग्वेदात दशराजन् युद्ध म्हणजे दहा राजांचे युद्ध म्हणून ज्या प्रसिद्ध युद्धाचे वर्णन केलेले आहे, त्या युद्धातील नायक सुदास हा होता. ऋग्वेदातील सातव्या मंडळामध्ये जी सूक्ते आहेत त्यातील बऱ्याच सूक्तांत त्या प्रसिद्ध युद्धाबद्दल उल्लेख आढळतात.

**८३ वे सूक्त म्हणजे –**

"हे इंद्र व वरुण हो! भेडावर सुदास चालू करून जाण्याच्या अगोदरच तुम्ही भेडावर तुमच्या भयंकर शस्त्राचे प्रहार करून त्याला जेरीस आणले व भेडापासून तुम्ही सुदासाचे संरक्षण केलेत. तुम्ही या त्रित्सूंची प्रार्थना युद्धाच्या वेळी ऐका, म्हणजे मी त्रित्सूंना जो काही अशीर्वाद दिलेला आहे तो सफल होईल."

(६) हे इंद्र व वरुण हो! सुदास व त्रित्सू हे तुमच्याकडे येतील आणि दहा राजे जेव्हा सुदास व त्रित्सू यांच्यावर हल्ला करतील तेव्हा लढाईत आपणाला यश व संपत्ती मिळो अशी सुदास व त्रित्सू तुमची प्रार्थना करीत.

(७) "हे इंद्र व वरुण हो! परस्पराशी संलग्न झालेले ते धर्मभ्रष्ट दहा जे राजे सुदासवर विजय मिळवू शकले नाहीत. विधी करणाऱ्यांचे पुढारी व यज्ञीय अन्नदान करणारे यांची जी स्तुती गायली ती सफल झाली. त्यांच्या यज्ञाच्या वेळी देव उपस्थित राहिले होते."

(९) "तुमच्यापैकी एकजण शत्रूंना ठार करतो आणि दुसरा धार्मिक कर्मे उपद्रवापासून सदैव सुरक्षित ठेवतो; मानवांच्या डोकीवर हिताचा पाऊस पाडणाऱ्या देवांनो! आम्ही तुमची मनोमय प्रार्थना करून तुम्हाला आळवीत आहोत. हे इंद्र व वरुण हो! तुम्ही आम्हाला आशीर्वाद द्या."

**३३ वे सूक्त म्हणजे –**

(२) "इंद्र पाशद्युम्नाच्या यज्ञात सोमरसाचे घुटके घेत असताना त्यांनी खवळलेल्या इंद्राला तेथून आणून पाशद्युम्नाचा अपमान केला; सुदासाच्या यज्ञात इंद्राने सोमरसाचा

स्वीकार करावा म्हणून त्यांनी इंद्राला पाशद्युम्नाच्या यज्ञातून उठवून आणले होते. वयाताचा मुलगा पाशद्युम्न याने पुढे ठेवलेला सोमरस बाजूला सारून इंद्र तेथून उठला व तडकपणे वसिष्ठाकडे गेला.''

(३) ''त्याचप्रमाणे त्यांनी सुदासाला सिंधू नही सहजपणे ओलांडून जाण्यास सहाय्य केले. त्याचप्रमाणे शत्रूंना सहजपणे ठार मारण्यास त्यांनी सुदासाला साहाय्य केले. त्याचप्रमाणे वसिष्ठांनी त्याची आराधना करून दहा राजांच्या बरोबर चालू असलेल्या युद्धात सुदासाचे संरक्षण करण्यास इंद्राला उद्युक्त केले.''

''तहानेने व्याकुळ झालेले, पाऊस पडावा म्हणून प्रार्थना करणारे, दहा राजांशी चालू असलेल्या युद्धात त्रित्सूंची मदत घेणारे जे वसिष्ठ लोक त्यांनी इंद्राला सूर्याप्रमाणे प्रकाशमान केले. वसिष्ठांची ओतप्रोत स्तुती ऐकून इंद्राने त्रित्सूंना विस्तीर्ण प्रदेश बहाल केला.''

**१९ वे सूक्त म्हणजे –**

(३) ''यज्ञात यज्ञविधी हवन करणाऱ्या सुदासाचे, हे इंद्रा! तू न भिता संरक्षण केलेस. पृथ्वीवर ताबा मिळविण्यासाठी शत्रूबरोबर ज्या लढाया झाल्या, त्या लढायांत तू पुरुकुत्साचा मुलगा त्रासदस्यू व पुरू यांचे तू संरक्षण केले आहेस.''

(४) ''हे इंद्रा! यज्ञात यज्ञविधी हवन व दान करणारा सुदास याच्यावर तू जे अनुग्रह केले आहेस ते असंख्य आहेत. तू मानवाच्या डोकीवर हिताचा पाऊस पाडणारा आहेस. मी तुझे चपळ घोडे रथाला जुंपून तुझा रथ तुझ्यासाठी तयार करतो. तू महाबलाढ्य आहेस व तुझ्यासाठी असंख्य विधी करण्यात येतात. आमच्या प्रार्थना तुझ्या कानावर जावोत.''

**सातव्या मंडळातील १८ वे सूत्र म्हणते –**

(५) ''सुदासाला नावेत बसून पारूश्री नदीचे खोल असलेले पात्र पार करता यावे म्हणून वंदनीय इंद्राने सर्व व्यवस्था केली आणि यज्ञ करणाऱ्याच्या मनात आराधनामय ज्या तप्त भावना जागृत झालेल्या आहेत, त्यांचे रूपांतर इंद्राने नद्यांच्या निंद्य बडबडण्यात केले.''

(६) ''यज्ञ करण्यात तत्पर, यज्ञविधी करण्यास पुढाकार घेण्यात तुर्वाश द्रव्य मागण्यास सुदासाकडे गेला. परंतु मासे ज्याप्रमाणे पाण्याच्या प्रवाहशक्तीने स्थगित होत असतात त्याप्रमाणे भृगू व द्रुह्यू यांनी त्यांना अवरोधून ठेवले. सुदास व इंद्र हे दोघे मित्र सर्वत्र एकत्रपणे जात असत. इंद्र सुदासाची संकटातून मुक्तता करीत असे.''

(७) ''जे हव्य पदार्थांना व्यवस्थितपणे मांडून ठेवतात, जे पवित्र शब्द उच्चारतात, जे तप करण्यापासून परावृत्त होतात, जे हातात शिंगे धरतात, जे यज्ञ करून जगावर सुखाची छाया पसरवतात, त्यांना ज्या लुटारूंनी आर्यांची जनावरे चोरून नेली होती, त्यांच्यापासून ती जनावरे ज्या इंद्राने परत आणली व ज्या इंद्राने युद्धात शत्रूंना ठार केले त्या इंद्राची स्तुती करून त्याची महती वाढवावी.''

(८) ''हीन मनोवृत्तीच्या व मूर्ख अशा सुदासाच्या शत्रूंनी हीन पारूश्री नदी ओलांडून

तिची तीरे नष्ट केली. परंतु स्वतःच्या गौरवाने तो या पृथ्वीवर संचार करतो आणि बळी दिलेला पशू जसा खाली पडून रहातो त्याप्रमाणे चायामानांचा मुलगा कवी हा मृत्यूच्या मांडीवर झोपतो.''

(९) ''पाणी आपल्या मार्गाने सरळ वाहात जाऊन पारूश्री नदीला मिळाले. ते इकडे तिकडे वाहात जाऊन दुसरीकडे कोठे गेले नाही. सुदास राजा सरळ निरनिराळ्या ठिकाणी हल्ले करीत आला आणि बाष्कळ बडबळ करणारे सुदासाचे शत्रू व त्याचे असंख्य नातलग यांना इंद्राने जिंकून सुदासाचे प्रजाजन केले.''

(१०) ''निरनिराळ्या रंगाच्या जनावरांवर बसणारे प्रिश्नीने पाठविलेले व आपला मित्र इंद्र याला भेटण्याचे अभिवचन दिल्याचे स्मरण झालेले मरुत हे गुराखी नसताना जसे गुरे रानात चारून परत घरी येतात त्याप्रमाणे ते (मरुत) परत आले. (इंद्राकडे) त्यांना नियुत घोड्यांनी लौकर वाहात आणून शत्रूवर सोडले.''

(११) ''चांगला दिसणारा पुरोहित यज्ञाच्या पंडपात पवित्र तृणाचे ज्याप्रमाणे तुकडे करतो, त्याप्रमाणे कीर्ती मिळविण्याची महत्त्वाकांक्षा धरलेला वीर इंद्र याने राजाच्या मदतीसाठी मरुत् तयार केले आणि त्याने पारूश्री नदीच्या दोन्ही तीरांवर एकवीस माणसांची कत्तल केली.''

(१२) ''वज्र हातात घेणाऱ्या इंद्रा! श्रुत, कवष, वृद्ध व नंतर द्रुह्यू यांना पाण्यात बुडविलेस. ते तुझ्यापाशी इमान राखून होते, तुझ्या मैत्रीचा त्यांना हव्यास वाटत होता, म्हणून त्यांना तू जरी पाण्यात बुडविलेस तरी ते त्याबद्दल खुष होते.''

(१३) ''इंद्राने आपल्या सामर्थ्याने त्यांच्या माऱ्याच्या सर्व जागा व त्यांची सात तऱ्हेची शहरेही नष्ट केली. त्याने आनूच्या मुलाचे राहण्याचे घर त्रित्सूला दिले. इंद्राची स्तुती करून आपण युद्धात वाईट बोलणाऱ्या माणसाला युद्धात जिंकू या.''

(१४) ''आनू व द्रुह्यू यांचे योद्धे सुदासाची गुरे हाकून नेण्याची इच्छा करीत होते. ते धार्मिक सुदासाविरुद्ध झगडत होते. असे ६६,६६० योद्धे लढताना नष्ट झाले. अशी इंद्राची पराक्रमाची सर्व कृत्ये आहेत.''

(१५) ''सुदासाशी वैर करणारे हे त्रित्सू इंद्राबरोबर अज्ञानीपणे लढत राहिले; पण उतरणीच्या जागेवर नद्या ज्याप्रमाणे फार वेगाने धावतात त्याप्रमाणे युद्धात पाडाव झाल्यामुळे त्रित्सू हे समरभूमीतून पळत सुटले. त्यांनी आपली सर्व चीजवस्तू सुदासाला दिली.''

(१६) ''इंद्राचा श्रेष्ठ मित्र, यज्ञयागातील द्रव्ये गोळा करून ठेवणारा वीर सुदास याच्या सर्व प्रतिस्पर्ध्यांना इंद्राने पृथ्वीतलावर सर्वत्र पसरविले. क्रोधाविष्ट शत्रूंचा क्रोध इंद्राने दाबून टाकला आणि सुदासाचे शत्रू सुदासावर चाल करून येण्यास लागले, पण इंद्राला पाहताच त्यांनी भीतीने पाठ फिरवून पळ काढला.''

(१७) ''इंद्राने भिकाऱ्याकडून एक मौल्यवान दान देवविले, त्याने बकऱ्याकडून सिंहाला ठार मारविले, त्याने सुईने यज्ञस्तंभाचे कोन कापले आहेत; त्याने युद्धात मिळविलेली शत्रूची सर्व मालमत्ता सुदासाला दिली.''

(१८) ''हे इंद्रा! तुझे कित्येक शत्रू तुझे गुलाम झालेले आहेत. जे लोक तुझी स्तुती करतात, ते लोक दुष्ट आहेत असा त्यांच्यावर ठपका ठेवणारा अनियंत्रित भेडा याला तू केव्हातरी आपला गुलाम कर. इंद्रा! तुझे तीक्ष्ण वज्र भेडाच्या अंगावर फेकून दे.''

(१९) ''इंद्राने भेडाला युद्धात ठार केले तेव्हा यमुना व त्रित्सू यांच्या तीरावर रहाणाऱ्या लोकांनी इंद्राचा जयजयकार केला. अजरू, शिरू, याक्ष या लोकांनी युद्धात मारलेल्या घोड्यांची डोकी इंद्राला हवन म्हणून दिली.''

(२०) ''हे इंद्रा! तू दिलेले जुने व नवे वर,केलेले जुने व नवे अनुग्रह याची मोजदाद पुनः पुनः उगवणाऱ्या उषांची मोजदाद करतात त्याप्रमाणे करता येणार नाही. मान्यमानाचा मुलगा देयक याला तू ठार मारलेस आणि तू शांबर याला विस्तीर्ण पर्वतावरून खाली फेकून दिलेस.''

या युद्धात सुदासाच्या विरुद्ध जे राजे लढले त्यांची यादी खाली देत आहे. (ही यादी चित्रावशास्त्री यांच्या 'प्राचीन चरित्र कोष' या ग्रंथातून घेतलेली आहे (पान ६२४). या यादीत जी नावे दिलेली आहेत ती सर्व राजांची आहेत की काय, याबद्दल एकमत नाही. खालील यादीत १३ व १६ या क्रमांकांवर जी नावे आहेत, ती पुरोहितांची नावे आहेत असे सायणाचार्यांचे मत आहे. २७ ते २९ या क्रमांकावरील नावांबद्दल अशीच शंका आहे.)

(१) शिन्यु, (२) तुर्वाश, (३) द्रुह्यू (४) कवष (५) पुरू, (६) आनू (७) भेडा (८) शांबर (९) वैकर्ण (१०) दुसरा वैकर्ण (११) यदू (१२) मत्स्य (१३) पक्थ (१४) भालानस (१५) अलीन (१६) विशानिन (१७) अज (१८) शिव (१९) शिग्रू (२०) यक्षू (२१) युध्यमधि (२२) यादव (२३) देवक मान्यमन (२४) चायामन कवी (२५) सुतुक (२६) उचथ (२७) श्रुत (२८) वृद्ध (२९) मन्यु अमणि (३०) पृथु.

या युद्धाचे जे वर्णन करण्यात आलेले आहे त्यावरून त्याचे जे स्वरूप दिसते त्यापेक्षा ते युद्ध मोठ्या स्वरूपाचे होते, हे उघड आहे. हे युद्ध म्हणजे हिंदी आर्य समाजात एक महत्त्वाची बाब होऊन बसलेली असावी. ही परिस्थिती लक्षात घेतली तर सुदास त्याकाळचा मोठा पराक्रमशाली पुरुष होता याबद्दल आश्चर्य करण्याचे कारण वाटत नाही. (सुदासाचे नाव ऋग्वेदात २७ ठिकाणी आढळते. वैदिक लोक त्याला केवढा मोठा पराक्रमशाली पुरुष समजत होते, ही गोष्ट यावरून स्पष्ट होते.) हे युद्ध नक्की कोणत्या कारणामुळे झाले, याची आपणाला थोडीशी सूचक माहिती ऋग्वेद पुरविते. सुदासाच्या विरुद्ध जे राजे लढत होते त्यांचे या ऋचांत 'धर्मभ्रष्ट राजे' असे वर्णन केलेले आहे. यावरून असे दिसते की, हे युद्ध म्हणजे कदाचित धार्मिक स्वरूपाचे युद्ध असावे.

(४) सायणाचार्य यांचे जे मत आहे त्यावरून, त्याचप्रमाणे जी परंपरागत माहिती उपलब्ध आहे तीवरून असे दिसते की, ऋग्वेदातील खाली दिलेल्या ऋचांत कोणत्या राजाचा ऋषी कोण होता याची माहिती दिलेली आहे -

''वितहव्य (किंवा भारद्वाज); १९-९, अंबरिषाचा मुलगा सिंधुदीप (किंवा त्वष्ट्रीचा मुलगा त्रिशिरस); १०-७५; प्रियमेधाचा मुलगा सिंधुक्षित; १०-१३३, पिजवनाचा मुलगा

सुदास; १०-१३४, युवानसाचा मुलगा मंधात्रि; १०-१७९, उसिनाराचा मुलगा शिबी; दिवोदासाचा मुलगा आणि काशीचा राजा प्रार्तधन आणि रोहिदासाचा मुलगा वसुमानस; १०-१४८ या ऋचेत पृथ्वी वैन्य याचे नाव सांगितलेले आहे.''

सुदास हा वैदिक ऋचा रचणारा होता हे वरील यादीत आलेल्या त्याच्या नावावरून स्पष्ट होते.

(५) सुदासाने अश्वमेध यज्ञ केला होता, याबद्दलचा उल्लेख ऋग्वेदातील ३.५३ या ऋचेत सापडतो.

(९) ''देवांना उत्पन्न करणारा, देवतांना मोहित केलेला, पवित्र विधी करताना मुख्य होत्रीला महत्त्व न देणारा, मोठा ऋषी विश्वामित्र याने सुदासाचा यज्ञ यथाविधी करीत असता पाण्याचा वाहता लोंढा थोपवून धरला; हे पाहून इंद्र व कौशिक लोक हे संतुष्ट झाले.''

(११) ''हे कौशिकांनो! सुदासाच्या घोड्याजवळ जा. त्याला उत्तेजित करा आणि राजासाठी संपत्ती मिळविण्यासाठी त्याला तयार होऊ द्या. कारण, देवांचा राजा इंद्र याने पूर्व, पश्चिम व उत्तर या दिशांत वृत्र याला ठार केलेले आहे. म्हणून पृथ्वीच्या उत्तम प्रदेशामध्ये सुदासाला इंद्राची पूजा करू द्या.''

(६) ''ब्राह्मणांना दानधर्म करण्यात सुदास प्रसिद्धी पावलेला होता. म्हणून त्याला अतिथिग्व म्हणजे दानशूर श्रेष्ठ हे नाव पडलेले होते. सुदासाच्या दानशूरपणाची स्तुती ब्राह्मणांनी कशी केली होती हे ऋग्वेदातील खालील संदर्भावरून स्पष्ट होते.''

१-४-७-६ ''हे वेगाने चालणाऱ्या अश्विनांनो, तुमच्या रथात संपत्तीचे ढीग आहेत. सुदासाच्या संपत्तीत तुम्ही भर टाका. हवेतील, समुद्रात किंवा आकाशात जी विलोभनीय संपत्ती आहे ती तुम्ही आमच्याकडे पाठवा.''

१-६३-७ ''हे गर्जना करणाऱ्या इंद्रा! तेव्हा तू पुरुकुत्सासाठी युद्ध पुकारून सात शहरे उद्‌ध्वस्त केलीस. हे राजा! गवताची पेंडी दूर झुगारून द्यावी अशा सहज लीलेने तू सुदासाचे संकट त्याच्यापासून दूर झुगारून फेकलेस आणि पुरूला संपत्ती दिलीस.''

१-११२-१९ ''हे अश्विनांनो! ज्या सहाय्याने तुम्ही सुदासाला वैभवशाली सत्ता आणून दिली ते साहाय्य बरोबर घेऊन तुम्ही या.''

७-१९-३ ''हे रौद्र इंद्रा! तुला हव्यकव्य करणाऱ्या सुदासाला तू सर्व तऱ्हेचे साहाय्य दिलेस व त्याचे त्वरेने तू रक्षण केलेस. पुरुकुत्स व पुरू याचा मुलगा त्रासदस्यू हा देश जिंकीत असता तू त्याला वाचविलेस.''

७-२०-२ ''इंद्राचे सामर्थ्य वाढले व त्याने वृत्राला ठार केले. जो त्याची स्तुती करतो त्याचे संरक्षण तो वीर इंद्र करतो. सुदासासाठी तो जागा तयार करतो. (उदार यज्ञकर्मासायण) तो आपल्या भक्तांना वारंवार धन देत असतो.''

७-२५-३ ''शंभर मदती, हजार विलोभनीय दाने व सुखसमृद्धी ही सुदासाला मिळोत. प्राणघातक शत्रूचे हत्यार मोडून टाक. कीर्ती व संपत्ती आम्हाला दे.''

७-३२-१० "सुदासाच्यारथाला कोणी विरोध करू शकत नाही किंवा थांबवू शकत नाही. इंद्र व मरुत् हे ज्याचे रक्षण करतात तो गुराढोरांनी भरलेल्या हिरव्यागार गायरानात हिंडतो."

७-५३-३ "आणि हे स्वर्ग व पृथ्वी हो! तुम्ही सुदासाला संपत्तीच्या पुष्कळ देणग्या द्या."

७-६०-८ "ज्या अर्थी अदिती, मित्र व वरुण यांनी सुदासाला (किंवा उदार माणसाला) पुष्कळ संतती देऊन त्याचे पूर्ण संरक्षण केले, त्याअर्थी हे देवतांनो! आम्ही देवाविरुद्ध काही अपराध करू नये. आर्यमण आमच्या शत्रूच्या तावडीतून आमची सुटका करो! हे उत्साही देवांनो! तुम्ही सुदासाला विस्तीर्ण जागा द्या."

महाभारतातील शांतिपर्वात उल्लेखिलेला पैजवन याच्या चरित्राबद्दलची त्रोटक माहिती ऋग्वेदातील उतारे घेऊन वर दिलेली आहे. ऋग्वेदातील उतारे हेही माहिती पुरविणारे विश्वसनीय पुरावे होत असे समजले पाहिजे. ऋग्वेदातील या माहितीवरून आपणाला हे दिसून येईल की, पैजवन याचे खरे नाव सुदास हे होते व तो क्षत्रिय होता. क्षत्रियत्वाहून काहीतरी जास्त त्याच्यात होते. तो एक बलाढ्य राजा होता. वेदांमध्ये आलेल्या या माहितीत दुसऱ्या तपशीलाची भर महाभारताने घातलेली आहे. ती अशी की, पैजवन हा शूद्र आर्य असावा आणि तो क्षत्रिय असावा आणि राजा असावा! सुदासाबद्दलचा जो हा गौप्यस्फोट आलेला आहे त्याला इतिहासात तोड मिळेल काय? ही जी घटना आली ती अत्यंत क्रांतिकारक आहे. तिच्यापेक्षा अधिक मोठी क्रांतिकारक गोष्ट कोणती असू शकेल?

तीन महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा केल्यानंतर सुदासाच्या चरित्रविषयक तपशीलाचे संशोधन पुरे करू या. ते तीन प्रश्न असे – सुदास आर्य होता काय? जर तो आर्य होता तर तो कोणत्या टोळीचा होता? जर सुदास शूद्र होता तर शूद्र हा शब्द काय दाखवितो?

या चर्चेची सुरुवात दुसऱ्या प्रश्नापासून सुरू केली तर ठीक होईल. या प्रश्नाचा निकाल लावण्यास ऋग्वेदातील काही मजकुरांचे साहाय्य होणे शक्य आहे. ऋग्वेदात बऱ्याच टोळ्यांची नावे सापडतात. त्यातून त्रित्सू, भारत, तुर्वाष, द्रुह्यू, यदू, पुरू आणि आनू या नावाच्या टोळ्या जास्त प्रमुख होत. परंतु ऋग्वेदातील संदर्भावरून असे दिसते की, सुदासाचा संबंध फक्त तीन टोळ्यांशी आलेला होता. पुरू, त्रित्सू व भारत या त्या तीन टोळ्या होत. फक्त तीन टोळ्यांची माहिती लक्षात घेऊन सुदास हा कोणत्या टोळीचा होता, हे शोधून काढणे आपणाला शक्य आहे काय हे पाहू या. त्रित्सू व सुदास यांच्यात जे संबंध होते त्याबद्दल ज्यामध्ये उल्लेख आलेले आहे असे ऋग्वेदातील अत्यंत महत्त्वाचे श्लोक खालीलप्रमाणे आहेत –

१-६३-७; १-१३०-७; ७-१८-१५; ७-३३-५; ७-३३-६; ७-८३; ४-६.

दिवोदास हा पुरूंचा राजा होता असे १-१३०-७ या श्लोकात म्हटलेले आहे आणि दिवोदास याला पौर्व म्हणजे पुरु टोळीचा असे १-३३-७ या श्लोकात म्हटलेले आहे.

सुदास हा त्रित्सू नव्हता असे ऋग्वेदातील ७-१८-१५ व ७-८३-६ या श्लोकांमध्ये म्हटलेले आहे. सुदासाने त्रित्सूच्या बसाहतीवर हल्ला केला व त्रित्सूनी पळ काढला आणि सुदासाने त्रित्सूची संपत्ती हस्तगत केली असे पहिल्या श्लोकात म्हटलेले आहे. तरीपण त्रित्सू व सुदाम हे भिन्न भिन्न टोळीचे होते असेही या श्लोकात म्हटलेले आहे. दहा राजांच्या बरोबर जे युद्ध झाले त्यात त्रित्सू व सुदास हे एका बाजूने लढत होते असे दुसऱ्या श्लोकात दाखविलेले आहे, हे ७-३५-५ व ७-८३-४ या श्लोकांवरून स्पष्ट होते. एवढेच नव्हे, तर सुदास हा त्रित्सूचा राजा होता, असे ७-८३-४ या श्लोकावरून दिसते.

त्रित्सू व भारत या टोळ्यांमध्ये आणि टोळ्या व सुदास यांच्यामध्ये कसले संबंध होते हे शोधून काढणारा ऋग्वेदातील ७-३३-६ व ६-१६-४-६-१९ या श्लोकांत पुरावा मिळतो. पहिल्या श्लोकावरून असे दिसते की, त्रित्सू लोक म्हणजेच भारत लोक होते. दुसऱ्या श्लोकावरून असे दिसते की, सुदासाचा बाप दिवोदास याला भारत लोकांचा माणूस असे म्हटलेले आहे.

वरील चर्चेवरून एक गोष्ट खात्रीची वाटते की, पुरू, त्रित्सू व भारत या तीन टोळ्या निरनिराळ्या होत्या असे मानले तर सुदास प्रथमतः यांपैकी कोणत्या टोळीचा माणूस असावा? सुदासाचा बाप दिवोदास यांच्याशी पुरू व भारत या टोळ्यांचा जो संबंध होता तो लक्षात घेतला तर असे साहजिक वाटते की, सुदास प्रथमतः पुरू किंवा भारत या टोळीचा असावा; परंतु या दोन टोळ्यांपैकी कोणत्या टोळीचा तो होता हे सांगणे कठीण आहे.

सुदास पुरू टोळीचा होता की नाही हे जरी सांगता आले नाही तरी हे मात्र नक्की की, तो भारत टोळीचा होता. त्याचा बाप दिवोदास याचे वर्णन असे केलेले आहे की, तो भारत लोकांपैकी होता. हा पुरावा लक्षात घेतला तर सुदास भारत टोळीचा होता हे जे वर सांगितले आहे ते खरे मानावे लागते. यापुढचा प्रश्न असा की, हे भारत लोक म्हणजे कोण आणि ज्यांच्या नावावरून हिंदुस्थानला भारतभूमी हे नाव पडले तेच लोक भारत लोक होते की काय? बऱ्याच लोकांना खऱ्या गोष्टींची माहिती नाही, म्हणून हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा समजला पाहिजे. भारत लोक या अर्थाने हिंदू जेव्हा जेव्हा बोलतात, तेव्हा तेव्हा भारत लोक म्हणजे दौष्यंती भारत लोक, दुष्यंत व शकुंतला यांचा मुलगा भरत याच्यापासून उत्पन्न झालेले लोक व महाभारतात वर्णन केलेल्या युद्धात जे लोक लढले ते भारत लोक होत असे त्यांच्या मनात असते. या भारत लोकांशिवाय इतर भारत लोक यापूर्वी अस्तित्वात होते, याबद्दल त्यांना मुळीच कल्पना नसते. हिंदुस्थानाला भारतभूमी असे नाव देण्यात आलेले आहे ते दौष्यंती भारत लोकांच्यावरूनच होय, असा या लोकांचा दृढ विश्वास असतो.

भारत या नावाने ओळखले जाणारे लोक दोन प्रकारचे आहेत; ते परस्परांपासून भिन्न भिन्न आहेत. ऋग्वेदात वर्णन केलेले भारत हे मनूपासून उत्पन्न झालेले भारत लोक होत. हे एका प्रकारचे लोक. सुदास या लोकांपैकी होता. दौष्यन्ती भारत लोक हे दुसऱ्या प्रकारचे लोक होत. येथे विशेष महत्त्वाचा मुद्दा सांगण्यासारखा आहे तो हा की, हिंदुस्थानला भारतभूमी म्हणून जे नाव पडलेले आहे ते वैदिक काळातील भारत लोकांमुळे नव्हे! हा मुद्दा भागवत

पुराणातील खाली उद्धृत केलेल्या श्लोकांवरून स्पष्ट होईल (Quoted by Vaidya in Mahabharatacha Upaosamhara, P.200) -

*प्रियवंदो नाम सुतो मनोः स्वायंभुवस्य ह ।*
*तस्याग्निध्रस्ततो नाभिर्ऋषभश्च सुतस्ततः ।*
*अवतीर्णं पुत्रशतं तस्यासीद्ब्रह्मपारगम् ।*
*तेषां वै भरतो ज्येष्ठो नारायणपरायणः ।*
*विख्यातं वर्षमेतद्यन्नाम्ना भारतमुत्तमम् ।।*

"स्वयंभू मनू याला प्रियवंद नावाचा मुलगा होता. प्रियवंदाला अग्निध्र नावाचा मुलगा होता. अग्निध्राला नाभी नावाचा मुलगा होता. नाभीला ऋषभ नावाचा मुलगा होता. ऋषभाला शंभर पुत्र झाले व ते सर्व वेदाभ्यासात प्रवीण होते. त्यापैकी भरत हा सर्वांत वडील होता. तो नारायणाचा परमभक्त होता. त्याच्या नावावरून या अतिसुंदर भूमीला भारतभूमी हे नाव मिळाले."

किती थोर राजाच्या देदीप्यमान कुळात शूद्र सुदास याचा जन्म झालेला होता, हे वरील माहितीवरून दिसून येईल.

सुदास आर्य होता काय, हे यापुढे शोधून काढावयाचे आहे. भारत हे आर्य होते, याबद्दल प्रश्नच नाही; अर्थात् सुदास हाही आर्य ठरतो. ऋग्वेदातील ७-१८-७ या ऋचेतील संदर्भ लक्षात घेतला तर असे वाटते की, त्रित्सू व आर्य यांच्यात असलेले संबंध त्या ऋचेत वर्णन केलेले आहेत व त्या संबंधावरून सुदास आर्य असावा असे खात्रीपूर्वक म्हणता येत नाही. इंद्राने त्रित्सूपासून गाई सोडवून आणल्या व त्रित्सूंना ठार केले असे या ऋचेत वर्णन केलेले आहे. हे वर्णन असे सुचविते की, त्रित्सू आर्यांचे शूत्र होते. या ऋचांचे शब्दशः भाषांतर केल्यानंतर असे दिसून आले की, त्रित्सू हे अनार्य आहेत. त्रित्सूंना अनार्य समजणे हे ग्रिथिफस् या ग्रंथकाराला मुळीच पसंत पडले नाही. त्रित्सूंना अनार्य समजण्याचे टाळण्यासाठी त्याने गाई या अर्थी असलेल्या शब्दाचे भाषांतर 'दोस्त' असे केले. (त्याने केलेले भाषांतर- "युद्धातील लूटमार मिळविण्याच्या आणि योद्धांच्या युद्धात भाग घेण्याच्या इच्छेने आर्यांचे दोस्त आर्यांना त्रित्सूकडे जाणारा मार्ग दाखविण्यासाठी आले.") आर्यांच्या वंशाने किंवा धर्माने या दोन्हींपैकी कोणत्या एकाने हे सांगणे कठीण आहे. दोन वर्ग झालेले होते, याबद्दल ऋग्वेदात कथा आलेली आहे. ही कथा लक्षात घेतली तर ग्रिफिथस्ने केलेला भाषांतराचा खटाटोप निरर्थक वाटतो, हे उघड आहे. वरील गोष्टी लक्षात धरल्या तर त्या श्लोकांचा असा स्पष्ट अर्थ होतो की, तो श्लोक जेव्हा रचला गेला तेव्हा त्रित्सू लोक धर्माने आर्य झालेले नव्हते ते वंशाने आर्य नव्हते असा याच्यातून अर्थ निघत नाही. सुदास हा भारत टोळीचा होता कि त्रित्सू टोळीचा होता, यापैकी काहीही ग्राह्य धरले तरी एक गोष्ट निर्विवाद ठरते की, सुदास हा आर्य होता.

आता शेवटचा प्रश्न. तो कोणत्याही दृष्टीने पाहिले तर कमी महत्त्वाचा नाही. शूद्र

हा शब्द काय दर्शवितो? सुदास हा शूद्र होता हा जो नवा शोध लागलेला आहे त्याच्या प्रकाशात जर वरच्या प्रश्नाचा विचार करू लागलो, तर शूद्र हा शब्द आपल्यापुढे अगदी निराळ्या स्वरूपात उभा राहतो. शूद्र हा शब्द हिंदुस्थानातील मूळच्या रानटी रहिवाश्यांना आर्यांचे दास म्हणून नाव देण्यास वापरलेला शब्द होय, अशी जुन्या पंडितांची समजूत होती. उपरिनिर्दिष्ट नवा शोध जुन्या पंडितांना आश्चर्यकारक वाटेल. परंतु त्यांची मागील संशोधने या नव्या शोधाच्या आश्चर्याबद्दल समाधानकारक उत्तर देऊ शकणार नाहीत. माण्याबद्दल काही सांगावयाचे म्हटले तर या बाबतीत माझीही जुन्या पंडितांप्रमाणे अवस्था झालेली आहे. याचे कारण हे की वैदिक आर्यांच्या सामाजिक घटनेबद्दलचा सांगोपांग अभ्यास अजून व्हावयाचा आहे. वन्यावस्थेतील समाजाच्या हालचालींचा अभ्यास केल्यावरून आपणाला हे कळून आलेले आहे की, त्यांची संघटना संघासंघात होते व ते संघासंघाने काहीतरी करीत असतात. हे संघ निरनिराळ्या तऱ्हेचे असतात. एका संघातील लोक एकाच मूळपुरुषाचे वंशज असतात व एकवंशत्वाच्या भावनेने ते परस्परांशी दृढ बांधलेले असतात. दोन संघांतील लोक सामाजिक व धार्मिक विधी करताना एकच होतात व त्यामुळे त्यांच्यात दोन्ही संघांतील लोकांबद्दल बंधुभाव उत्पन्न होतो. अशा अनेक संघांची मिळून एक टोळी होते. अशा निरनिराळ्या टोळ्या बंधुभावनेवर उभारलेल्या असतात.

वैदिक आर्यांमध्ये अशा प्रकारापैकी कोणत्यातरी प्रकारची समाजसंघटना होते, याबद्दल शंका नाही. ही गोष्ट प्रो. सेनार्ट यांच्या खालील उताऱ्यावरून उघड होते.

''आर्यांच्या बाहेरच्या व सामाजिक जीवनाबद्दल सविस्तर माहिती देण्याच्या बाबतीत वैदिक ऋचा म्हणाव्या तशा अचूक व नक्की माहिती देणाऱ्या वाटत नाहीत. त्यांच्यावरून आपणाला एवढाच बोध होतो की, आर्य समाजाचे निरनिराळ्या टोळ्यांत किंवा संघात भाग केलेले होते. या टोळ्यांचे व संघांचे पुनः विभाग केलेले होते. हे विभाग निरनिराळ्या कुटुंबांचे बनलेले होते. हे विभाग बंधुभावनेने एकत्र बांधलेले होते. या बाबतीत ऋग्वेदात जी भाषा वापरलेली आहे ती काहीशा अनिर्णायक स्वरूपाची वाटते. परंतु सर्वसाधारण गोष्ट स्पष्ट आहे 'सजात' म्हणजे 'बंधुभाव' किंवा एका वंशाचे 'जातभाई' असे अथर्ववेदावरून स्पष्ट होते. हे शब्द एका टोळीचे लोक हे दर्शविण्याच्या हेतूने वापरलेले आहेत. जन हा शब्द जास्त व्यापक स्वरूपाचा आहे. तो टोळी या अर्थाने वापरलेला आहे. त्याच अर्थी वापरलेल्या प्रतिशब्द 'जाती' हा आहे. या अर्थी वापरलेला अवेस्तातील प्रतिशब्द 'झटु' हा आहे. 'उर, उरुज्ञ, व्रज, व्रत' हे शब्द याच अर्थी वापरलेले आहेत किंवा ते शब्द संघ अथवा टोळी यांच्यातील विभाग दर्शविण्याच्या हेतूने वापरलेले ऋचा ज्या काळासंबंधी हकिकती सांगतात त्या काळात आर्य लोक टोळी किंवा इतर विभाग यांच्या परंपरागत रूढींनी जाम जखडलेल्या समाजामध्ये रहात असत. आर्य समाजातील निरनिराळ्या भागांना व विभागांना निरनिराळी नावे होती. यावरून असेच स्पष्ट होते की, आर्य समाजाची समाजघटना काहीशी अस्थिर होती.''

आर्यांतील कोणते भाग व विभाग संघ, टोळी इत्यादी नावाला योग्य होत हे ठरविण्यास

आपणाजवळ माहिती नाही. अशी परिस्थिती असल्यामुळे शूद्र हे एखाद्या संघाचे, टोळीचे किंवा विभागाचे नाव होते हे सांगणे कठीण आहे. तथापि शतपथ ब्राह्मणातील (१-१-४-१२) उताऱ्याबद्दल प्रो. वेबर यांनी जे विचार प्रदर्शित केलेले आहेत ते या बाबतीत बरेच मनोरंजक वाटतात. यज्ञ करीत असता यज्ञकर्त्याला (यजमानाला) पुरोहिताने कोणत्या रीतीने बोलवावे याबद्दल शतपथ ब्राह्मणातील उपरिनिर्दिष्ट उताऱ्यात माहिती दिलेली आहे. यजमान ब्राह्मण असेल तर पुरोहिताने त्याला 'या' म्हणावे आणि यजमान म्हणावे. यजमान क्षत्रिय व वैश्य असेल त्याला 'इकडे लौकर या' असे म्हणावे आणि यजमान शुद्र असेल तर पुरोहिताने त्याला 'इकडे धावत ये' असे म्हणावे, अशी ती उताऱ्यातील माहिती आहे. या माहितीसंबंधी प्रो. वेबर म्हणतात, (Muir, Vol. I, P. 366)

"हा सर्व उतारा फार महत्त्वाचा आहे. कारण तो उतारा असे दर्शवितो की, शूद्रांना आर्यांच्या पवित्र यज्ञकर्मात भाग घेऊ देण्यात आला होता आणि शूद्रांना आर्यांची भाषा बोलता येत नव्हती तरी ते ती भाषा समजू शकत होते. (या मासिकाच्या पहिल्या भागात पा. ८३, येथे रॉय जे म्हणतो त्याच्याविरुद्ध हे मत आहे.) शूद्रांना आर्यांची भाषा बोलता येत नव्हती तरीपण ते ती भाषा समजू शकत होते, हा जो मुद्दा उत्पन्न केलेला आहे तो शूद्रांना आर्यांच्या यज्ञकर्मात प्रवेश मिळाला होता या मुद्द्यावरून सर्वस्वी काढलेला नाही. परंतु तो मुद्दा दुसऱ्या मुद्द्यावर बराचसा अवलंबून आहे, हे खरे! या सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर शेवटी मला असे वाटू लागले आहे की, शूद्र ही आर्यांपैकीच एक टोळी होती व ती इतर टोळ्यांच्या अगोदर बाहेरून हिंदुस्थानात येऊन वसाहत करून राहिली, असे जे ग्रंथकार मत प्रदर्शित करतात ते मत बरोबर असावे."

शूद्र हे आर्य होते असा जो प्रो. वेबर यांनी निष्कर्ष काढलेला आहे तो शंभर टक्के बरोबर आहे. 'शूद्र' हा शब्द एका टोळीचे नाव दर्शविणारा शब्द होय की काय, हा एकच संशयास्पद मुद्दा शिल्लक राहतो. परंतु शूद्र हे आर्य व क्षत्रिय होते यात तिळमात्र संशय नाही.

○○○